म. ग्रं. सं. ठाणें
विषय लिंब.
सं. क्र. १७३२

# केतकरी कादंबरी

— दुर्गा भागवत.

REFBK-0015926

# केतकरी कादंबरी

दुर्गा भागवत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

REFBK-0015926

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन : १५५

पहिली आवृत्ती : १९६७

©, १९६७ दुर्गा भागवत

किंमत दहा रुपये

मुखपृष्ठ :
गजानन भागवत

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

| | |
|---|---|
| प्रस्तावना | *सहा* |
| गोंडवनांतील प्रियंवदा | १ |
| परागंदा | १४ |
| आशावादी | २८ |
| गांवसासू | ४३ |
| ब्राह्मणकन्या | ५२ |
| विचक्षणा | ७१ |
| भटक्या | ९८ |
| समारोप | १०६ |
| डॉ० केतकरांची भाषा | ११४ |
| कादंबरीविषयीचे संदर्भग्रंथ | १२९ |
| सूची | १३१ |

# केतकरी कादंबरी

# प्रस्तावना

१९४९-५० साली 'डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या' या शीर्षकाखाली माझे आठ लेख 'सत्यकथे'त प्रसिद्ध झाले. त्यानंतर अनेक अडीअडचणींमुळे या लेखांचे स्वतंत्र पुस्तक प्रकाशित करण्याचे राहून गेले. त्यानंतर डॉ० द० न० गोखले यांचा 'डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या' हा दीर्घ निबंध पुस्तकरूपाने बाहेर पडला; त्यात त्यांनी केतकरांच्या कादंबऱ्यांना बोधवादी म्हटले आहे. सौ० कुसुमावतीबाई देशपांडे यांचे 'मराठी कादंबरी' हे द्विखंडात्मक समालोचनही त्यानंतरच बाहेर पडले: त्यात त्यांनी केतकरांच्या कादंबऱ्यांना अकलात्मक ठरवले आहे; तरी देखील हरी नारायण आपट्यांच्या नंतर मोठा कादंबरीकार केतकरच आहेत, असेही त्यांनी सांगितले. डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांना अकलात्मक ठरवताना, या समग्र ग्रंथात कुसुमावतीबाईंनी कलात्मक कादंबरीच्या स्वरूपाबद्दल काहीच सांगितलेले नाही. तेव्हा कलात्मक कादंबरी म्हणजे काय; तिचे गमक कोणते; तिचा घाट कसा असतो;—याबद्दल साहजिकच वाचकाला कुतूहल वाटते. त्यांच्याकडून या कुतूहलाचे शमन होत नाही, म्हणूनच मी या प्रस्तावनेत कादंबरीच्या कलामूल्यांची थोडी चर्चा केली आहे.

डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांच्या एका विशेषावर कुसुमावतीबाईंनी नेमके बोट ठेवले आहे. "व्यक्ति-परिस्थिति-सापेक्षत्वाचें चित्रण केतकरांच्या इतकें स्पष्टपणें व भरीवपणें मराठी कादंबरीत क्वचितच कोणी केलें आहे." थोर कादंबरीकार व अकलात्मक कादंबरीकार हा मोठा विरोधाभास आहे. ठरीव कलागुणांशिवाय

कादंबरीवाङ्मय थोरवीस प्राप्त होते काय? झाल्यास, का? कलामूल्यांची काही मर्यादा या प्रकारात संभवते का? की कलाबाह्य समजल्या जाणाऱ्या विशेषांनाही एक तरल रूप प्राप्त झाले की ते कलापूर्ण समजले जातात? [डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांना 'बोधवादी' म्हणणे सांप्रदायिक बोधवादकारांनाच शक्य आहे. त्याचा विचार करण्याचे प्रयोजन मला वाटत नाही. कारण केतकरांचा विशेष हाच आहे की कादंबऱ्यांतून त्यांनी समस्या मांडल्या, पात्रांच्या कृतींचे परिणाम मांडले, परंतु स्वतःची निर्णयात्मक बोधपूर्ण मते मांडली नाहीत. त्यांना लोकांना तयार विचार द्यायचे नव्हते; सामाजिक समस्यांमधली गतिशीलता दाखवायची होती.]

वर उल्लेखिलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरता मी बराच खटाटोप केला. 'कादंबरी' या कल्पित वाङ्मयाच्या एका प्रकाराचा पाश्चात्य वाङ्मयातला इतिहास, त्याचे स्वरूप, त्याचे घटक, त्याचे रूपबंध, त्याची कालसापेक्षता, त्याची अवकाश-सापेक्षता, त्याची भाषा, त्याचा घाट या साऱ्या विषयांवर मी काही इंग्रजी पुस्तके वाचून काढली, आणि त्यांच्याच अनुषंगाने काही आराखडे बसवून डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांचा या दृष्टीने फिरून आढावा घेण्याचा प्रयत्न केला. त्याशिवाय सर्व कादंबऱ्या वाचून मूळ लेखांमध्ये अवश्य तिथे नवी भरही टाकली. डॉ० केतकरांची भाषा हाही एक स्वतंत्र अभ्यासविषयच असल्यामुळे 'साहित्य' मध्ये १९५० साली मी दोन लेख लिहिले होते. त्यांचाही समावेश परिशिष्टात केला आहे.

कादंबरी हा प्रकार ज्या स्वरूपात आज मराठीत रुळलेला आहे, तो प्रकार अ-मराठी व अ-भारतीय आहे. युरोपातून, विशेषतः इंग्लंडातून, तो आमच्याकडे, म्हणजे महाराष्ट्राकडे, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आला. 'नॉव्हेल' किंवा 'कादंबरी' हा कथानकप्रकार युरोपात अठराव्या शतकाच्या सुरवातीस आला. डेफो, रिचर्डसन, फील्डिंग हे इंग्लंडातले आद्य कादंबरीकार. "जपानमध्ये कादंबरी बाराव्या शतकात अस्तित्वात आली. चीनमध्ये पंधराव्या शतकात आणि इतरत्र कुठल्याही संस्कृतीत ती आढळत नाही" असे डायना स्पिअरमन 'नॉव्हेल अँड सोसायटी' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणते. डायना स्पिअरमनला बाणाच्या कादं-बरीची माहिती असती, तर तिने या विधानात थोडा बदल केला असता. बाणाची कादंबरी हे जगाचे वाङ्मयभूषण आहे आणि त्या कृतीचेच नाव या वाङ्मयप्रकाराला देऊन मराठीच्या एकोणिसाव्या शतकातल्या वाङ्मयसूरींनी मोठे औचित्य दाखवले यात शंका नाही. अद्भुतकथेच्या छटा एकोणिसाव्या शतकातल्या उत्तरार्धात आलेल्या वाङ्मयकृतींत आढळत असल्या, तरी बाणभट्टाच्या कादंबरीच्या प्रकाराचे सातत्य भारतीय कादंबऱ्यांत आढळून येत नाही. हा प्रकार पाश्चात्य धाटणी घेऊनच आला. ऐतिहासिक व सामाजिक कादंबरी त्यानंतर आमच्या वाङ्मयात मात्र दृढमूल झाली.

आपल्याला इथे ऐतिहासिक कादंबरीचा विचार करायचा नसून सामाजिक कादंबरीचा करायचा आहे. कारण डॉ० श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या कादंबऱ्या 'सामाजिक'च नव्हेत तर 'समाजशास्त्रीय'ही आहेत. अशा या कादंबऱ्यांचे मूल्य-मापन करताना प्रथम दोन सामान्य आक्षेपांना समीक्षकाला तोंड द्यावे लागते. पहिला आक्षेप म्हणजे "केतकरांच्या कादंबऱ्या या कादंबऱ्याच नव्हेत" हा आणि दुसरा आक्षेप म्हणजे "त्यांनी सरळ समाजशास्त्रीय प्रबंध न लिहिता त्यांना कादंबऱ्यांचे स्वरूप देऊन लोकांना चकवले" हा. या दोन्ही आक्षेपांत अतिशयोक्ती आहे हे खरे असले, तरीही या कादंबऱ्यांचा विचार करताना समीक्षकाला दोन प्रश्नांचा विचार करणे प्राप्त होते. पहिला प्रश्न म्हणजे कादंबरी या प्रकाराचे शुद्ध स्वरूप कोणते आणि त्या स्वरूपाशी डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या मिळत्याजुळत्या आहेत की विसंगत आहेत, हा होय. दुसरा प्रश्न म्हणजे सामाजिक कादंबरीत समाजशास्त्राचे स्थान कशा प्रकारचे असते व असावे, हा आहे.

अर्थात वाङ्मयीन प्रकार म्हणून कादंबरीच्या मूलभूत घटकांची अगर गुणांची अल्प छाननी मी करणारच आहे. कारण ती केल्याशिवाय डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यां-वरच्या चर्चेची सांगता होणार नाही. परंतु त्याच्याही आधी कादंबरी व सामाजिकता यांचे परस्पर नाते समजल्यावाचून 'शुद्ध वाङ्मयीन मूल्य' आकलन होणे असंभवनीय आहे. आपल्याप्रमाणेच 'सामाजिक' व 'वाङ्मयीन' यांतला समन्वय व संघर्ष पाश्चात्य साहित्यिकांच्या व समीक्षकांच्या पुढेही वारंवार येतोच; त्या समन्वयाचे व संघर्षाचे स्वरूप अनेकांनी तुळण्याचा प्रयत्न केलेला असला, आणि सामाजिक आशय अगर मतपुरस्कार यांचे प्राबल्य झाले की कलामूल्य बिघडते अगर संपुष्टातही येते, असा ठोकळ निष्कर्षही सर्वमान्य झालेला असला, तरी सामाजिकतेने कादंबरीच्या स्वरूपाला, तिच्या घाटाला हानी पोचते असे आता कुणी समजत नाही. बव्हंशी सामाजिक अगर पूर्णतया व्यक्तिवादी असूनही कादंबरी ही कादंबरीच राहू शकते, असेच हल्लीच्या अनेक समीक्षकांच्या उद्गारांतून दिसून येते.

'सामाजिक' व 'समाजशास्त्रीय' ही कादंबरीच्या संदर्भात कशा स्वरूपात येतात ते समजल्याखेरीज सामाजिकतेची अगर सामाजिक मूल्यांची कादंबरीतील भूमिका समजणे कठीण आहे. या बाबतीत डायना स्पिअरमनचे विवेचन स्पष्ट व तर्कसुसंगत आहे. वर उल्लेखिलेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत तिने ही चर्चा केली आहे. तिचा मतितार्थ असा :

काही वाङ्मयीन ललित-कृतींचे स्वरूप इतके सार्वत्रिक असते की त्या सबंध मानवतेलाच अनुलक्षून असतात. कुठल्याही विशिष्ट सामाजिक प्रथेचा संदर्भ त्यांच्यात अभिप्रेत नसतो. सबंध मानवजातीशी संबद्ध असलेल्या प्रेरणा व अनुभव यांच्या अगदी विरुद्ध टोकाला वैयक्तिक वैशिष्ट्ये असतात. परंतु या व्यक्तिगत गुणधर्मांत

त्या त्या व्यक्तीचे स्वतःचे गुणवैशिष्ट्य काय व किती आणि परंपरेने व्यक्तीला प्राप्त झालेले किती हा प्रश्न राहातोच. 'सामाजिक' म्हणून जे गणले जाते, ते व्यक्ती म्हणून माणसामाणसांत जे परस्परसंबंध येतात त्यातल्या अंतस्थ प्रक्रियेस पूरक असते. पूर्वीच्या काळचा गोष्ट सांगणारा व त्याचे श्रोते, विशेषतः पौर्वात्य व मध्ययुगीन कथाकार व त्याचे श्रोते, दोघे मिळून एक सामाजिक परिस्थिती अगर प्रसंग उभा करीत; आता लेखक एकांतात बसून आपल्या काल्पनिक वाचकांना निवेदन करीत असतो. पण ते करताना अनेक लेखकांची अशी दृढ श्रद्धा असते की मानवी समाजात, त्याचप्रमाणे मानवमात्रात देखील काहीतरी वस्तुत्व अगर भाव असतो; त्या वस्तुत्वाला अगर भावाला संस्था, प्रथा, घडण, सामाजिक वस्तुस्थिती, आकृतिबंध, प्रभाव, शक्ती इत्यादी अनेक नावांनी ओळखले जाते; आणि त्याचे कसेही विश्लेषण केले तरी ज्या स्त्रीपुरुषांनी त्याची प्रतिष्ठापना केलेली असते, त्यांना उपयोगात आणलेले असते, वागविलेले असते, त्या स्त्रीपुरुषांत या गोष्टी कधीच सामावल्या आहेत, त्यांच्यात विरघळून गेल्या आहेत, असे होत नाही. 'समाजशास्त्रीय' या संज्ञेचा या संदर्भातला अर्थ असा की समग्रावरूनच त्याच्या घटकांचा स्वभाव, त्यांचे मूलधर्म ठरतात; मग ते समग्र म्हणजे संस्कृती असो, वर्ग असो, की त्या त्या राष्ट्राचे अगर कालाचे प्राणभूत रहस्य असो. सर्वच मानवी जीवनाची परिस्थिती सामाजिक असते ती याच अर्थाने की, माणसामाणसांचे जे संबंध येतात त्यांचा ती परिस्थिती परिपाक असते. परंतु ही प्रत्येकाची वेगळी परिस्थिती असली, तरीही या साऱ्या परिस्थितीदेखील समाजशास्त्रीय असतीलच असे नव्हे. ती ती परिस्थिती महत्तर सामाजिक परिमाणाने नियमित तरी झालेली असते किंवा त्या परिमाणाशी अगर सामाजिक परिस्थितीशी संबद्ध असते. जर एखाद्या माणसाला त्याचे प्रेम जिच्यावर आहे अशा स्त्रीशी, त्या दोघांच्या सामाजिक वर्गात अंतर असल्यामुळे, लग्न करता आले नाही, तर त्याचा अनुभव समाजशास्त्रीयतेने दडपलेला असतो. परंतु समजा, जर याऐवजी स्त्री मृत्यू पावली, अगर तिने त्याच्या प्रेमाची परतफेड केली नाही, तर हा अडथळा विश्वनियमानुसार अगर जगरहाटीप्रमाणे उपस्थित झालेला असतो; तो उघड असामाजिक असतो. समजा, जर ती स्त्री बुडून मेली तर तो उघड अपघात असतो; परंतु जर तिने त्याच्याशी लग्न करण्याचे नाकारले, तर सामाजिक गोष्टी तिच्या निर्धारास कारणीभूत झाल्याचा संभव असला, तरीही कुठलाही सामाजिक अडथळा नसण्याचाही संभव तेवढाच आहे. परंतु समजा, तसेच कारण असले तर ते सामाजिक असते; समाजशास्त्रीय नसते.

'सामाजिक' कुठल्या परिस्थितीला म्हणायचे? ज्या प्रसंगात व्यक्ती स्वतः सापडते आणि तो प्रसंग स्वतःचा म्हणूनच वेगळा काढते, असा प्रसंग अंतर्भूत असलेल्या परिस्थितीला 'सामाजिक' हा शब्द लावतात; मग ही परिस्थिती दुसऱ्या

माणसांशी झालेल्या समागमातून निर्माण झालेली असली व तिच्यात समाजशास्त्रीय घटक असले तरी हरकत नाही ('नॉव्हेल अँड सोसायटी', प्रस्तावना, पृष्ठ १०–११).

## कादंबरीचे कलामूल्यन

कादंबरीविषयी कुठलीही चर्चा करण्याच्या अगोदर तिची व्याख्या देणे उचित होईल. कादंबरीची सर्वांत सुटसुटीत व कामचलाऊ व्याख्या जे० बी० प्रिस्टले यांनी दिलेली आढळते. ती अशी : 'काल्पनिक पात्रे व घटना यांचा परामर्ष घेणारा गद्य कथाप्रकार.' ('दि इंग्लिश नॉव्हेल', लंडन १९२७, पृष्ठ ५) प्रिस्टलेची व्याख्या उद्धृत करण्याचे कारण असे की जेम्स जॉईसपूर्व कादंबऱ्यांचे लक्षणही या व्याख्येत आढळते. जेम्स जॉईसनंतर इंग्रजी कादंबरीने जी कलाटणी घेतली तिचे अल्प दिग्दर्शन ही व्याख्या ध्यानात घेतल्याशिवाय व तिच्या अनुषंगाने ठोकळ पण यशस्वी कादंबरीच्या स्वरूपाचे आकलन झाल्याशिवाय आपल्याला करता येणार नाही. ठोकळ किंवा पायाभूत कादंबरी 'जीवनाचा दर्पण'च असते आणि तिच्यात जे जीवन प्रतिबिंबित होते त्याची कक्षा इतकी विशाल असते की तेवढी कक्षा इतर कुठलाही वाङ्मयप्रकार पेलू शकत नाही. जीवन हे सर्वंकष, अवाढव्य व अगम्य असते; परंतु हे सर्व एकाच वेळीं अभिव्यक्त करता येणे शक्य नसल्यामुळे कादंबरीत त्याचे विविध पर्याय आढळतात. कधी कादंबरी केवळ साधी गोष्ट असते; कधी ती लोकांच्या वागणुकीचे चित्रण असते; कधी ती विविध पात्रांचे दर्शन घडवते तर कधी ती जीवनाच्या तत्त्वज्ञानाचे निरूपण करते; तर कधी ती आपल्या कर्त्यांचे मानस खोलून दाखविते. कादंबरी ही एक रंगभूमी असून तिच्यात पात्रांचे नाट्य चालू असते. थोर कादंबरीकारांचे एकमेव साम्य हेच की, त्यांची पात्रे इतकी जिवंत असतात की त्यांची प्रत्यक्ष जीवने कितीही विलक्षण, गहन व भयंकर असली तरीही कादंबरी वाचताना ती आपल्याला खरी वाटतात. ज्या कादंबरीकाराला जिवंत पात्रांची निर्मिती साधली आहे, त्याचे स्थान साहित्यात महत्त्वाचे ठरते. कादंबरीत पात्रनिर्मितीचे स्थान अनन्यसाधारण आहे. (प्रिस्टले, पूर्वोक्त, पृष्ठ ६)

वर दिलेल्या कादंबरीच्या स्वरूपात आणखीही विशिष्ट अंगांची व गुणांची भर कालमानाने पडत गेली. कादंबरीचे स्वरूप समाजाच्या अनुभवाप्रमाणे आणि लेखकाच्या धारणेमुळे आमूलाग्र बदलत चालले. पात्रप्रधानता काही कादंबऱ्यांनी उडवून दिली. आजच्या अत्याधुनिक कादंबरीला पात्रपरिपोष लागतोच असे नाही. नायक लागतोच असे नाही. अनायकी व अवनायकी (अँटि-हीरो) कादंबरी असते, व तीही उत्कृष्ट असते. त्याचप्रमाणे संविधानक गोष्टीत महत्त्वाचे असते. संविधानक म्हणजे घटनांची परंपरा. ही परंपरा कालसापेक्ष असते; म्हणजेच विविध

कालबिंदूत पसरलेली असते; अत्याधुनिक कादंबरी कालातले प्रसरण बाजूला टाकू शकते. कालसापेक्ष कादंबरीपेक्षा या कादंबरीत अंतर्वेध अधिक असतो. लेखक पूर्वी बहिर्मुख होता; तो आता अधिकाधिक अंतर्मुख होत चालला आहे. व्हर्जिनिया वुल्फ याचे उत्तम उदाहरण आहे.

जीवनाचे एका विशिष्ट स्वभावातून झालेले दर्शन हाच कादंबरीचा मुख्य पाया असतो; त्यामुळे चांगली कादंबरी कादंबरीकाराच्या आत्मशोधनाचे प्रत्यंतर असते. अत्यंत अट्टाहासाने आणि चेवाने अस्तित्वाची सर्व घटिते, जीवनाच्या साऱ्या समस्या, एकाच निकषावर तो पारखतो; तो निकष हा की साऱ्या अनुभवांचा माणसावर, समाजाचा एक घटक म्हणून नव्हे तर माणूस म्हणून, काय परिणाम होतो ते पाहाणे. त्याची परीक्षेची एकच खूण असते; ती म्हणजे भावनात्मक अनुभवाची. या अनुभवात माणूस घटक म्हणजे विक्रेता, निर्माता, यांत्रिक इत्यादी व्यावसायिक नसून केवळ माणूस असतो. वैयक्तिक शोध हेच कादंबरीकाराचे प्रथम भान असते; वाचकाचा विचार नंतर येतो, असे डी० एच० लॉरेन्स म्हणतो.

जीवनाचा वेध व्यक्तिगत जाणिवांतून घेणे व त्यांतून सत्य शोधणे हे कादंबरीचे परिणत स्वरूप आहे. अशा कादंबरीची व्याख्या 'काव्यात्म सत्याचे अकाव्यात्मक कथन' अशी एलिझाबेथ बॉवेन या कादंबरीकर्त्रीने केली आहे.

याच स्वानुभूतीच्या संदर्भात डी० एच० लॉरेन्स या कादंबरीकाराच्या कृती पाहाव्या लागतात. लॉरेन्स 'कलेसाठी कला' हे माझे ब्रीदवाक्य आहे असे म्हणतो ('रीडिंग अ नॉव्हेल'; वॉल्टर ॲलन; पृष्ठ १२-२४). लॉरेन्ससारखा कादंबरीकार आपले पात्र त्याच्या जीवनाच्या एका विशिष्ट क्षणीच पकडतो. बुद्धी मध्येच आड येऊन, त्या अनुभवलेल्या क्षणाला तर्कबद्ध करून, त्यातून काही निष्कर्ष काढण्यापूर्वीच पकडतो. कादंबरीकाराला आपण ज्या कालात जगतो त्याचे भान असते. त्या कालखंडावर जे दाब पडतात, जे ताणतणावे त्यात उपस्थित होतात, त्यांची स्वयंस्फूर्त जाणीव त्याला असते आणि त्यामुळे आपला काल तो इतर कालापासून वेगळा पाहू शकतो.

ईलियट म्हणतो की "प्रत्येक कालमानाला त्याला योग्य अशीच कला प्राप्त होते, आणि प्रत्येक कालमानाने आपापल्या वाटणीला आलेल्या कलेचा स्वीकार केला पाहिजे" ('द नॉव्हेल टुडे'; वॉल्टर ॲलन; पृष्ठ ७). कादंबरीत हीच कालमानसापेक्ष कला अभिप्रेत असते. 'कलेसाठी कला' आता कुणी कादंबरीकार जोजवीत नाही. जीवनसापेक्षताच नव्हे तर अस्तित्वसापेक्षता व वैयक्तिक अनुभूतीचा लय हे आता कादंबरीच्या गुणवत्तेचे गमक झाले आहे.

हा बदल लॉरेन्सनंतर इंग्रजी कादंबरीने जे वळण घेतले त्यात आपल्याला आढळून येतो. यात एक नवा आविष्कार आला. तो आविष्कार म्हणजे

'खुलेपणा'चा. यात "शेवट नाही, विराम नाही; केवळ गर्जना करणारा विशाल अवकाश ऊर्फ पैस आहे" अवकाशाचे किंवा पैसाचे हे नवे भान आल्यामुळे लॉरेन्सनंतर जेम्स जॉईस, व्हर्जिनिया वुल्फ, ऑल्डस हक्स्ले, एफ० स्कॉट फिट्झजिराल्ड, हेमिंग्वे इत्यादी कादंबरीकारांच्या कृती नव्या रचनेकडे, म्हणजे जाणिवेच्या स्रोताकडे, वळलेल्या दिसतात. या आत्मप्रत्ययाच्या अंतःप्रवाहामुळे अनुभवाला पूर्णत्व येते. याच्या आधीच्या कादंबरीचे स्वरूप बंदिस्त होते. आता ते खुले झाले आणि हा नवा घाट परिणत झाला; त्याचे कारण तत्कालीन संस्कृतीचा लेखकाच्या अनुभूतीवर घडलेला संस्कार. या नव्या कादंबरीच्या आकृतिबंधामुळे कादंबरीला दैवतकथेचे सामर्थ्य प्राप्त झाले असून तिच्यातला अनुभव एका अंतःस्थ आणि सुघटनाक्षम दृष्टीने निर्णित केलेला आहे. ('दि टर्न ऑफ द नॉव्हेल'; ॲलन फ्रीडमन; पृष्ठ १७९)

ध्येयवाद व वास्तववाद यांचे कादंबरीतले स्थान व परस्परपूरकत्व लक्षात घेणे जरुरीचे आहे. कादंबरी हा प्रकार एवढा विस्तृत आहे की, तो लोकशिक्षणाचे एक प्रमुख माध्यम बनून गेला आहे. कारण हा प्रकार रंजक आहे. या रंजकतेचे मूळ मानवी अनुभव असून, तो अनुभव चरित्र, इतिहास, सामाजिक अध्ययन, वैयक्तिक व बहुजनांचे मनोविज्ञान आणि अनंत घटना वगैरेंतून निर्माण झालेला असतो. काय असते व कसे असावे या दोहोतले अंतर लेखक जी भूमिका घेईल तिच्यावर अवलंबून असते. परंतु वास्तव म्हणजे काय असते हे सांगितल्यावाचून ते कसे असावे याचा बोध होत नाही आणि म्हणूनच कादंबरीत पुष्कळदा अनेक घटनांची माहिती पुरवणारी पार्श्वभूमी आढळते, सामाजिक आशय असणाऱ्या घटना आढळतात आणि सामाजिक मूल्यांचेही दिग्दर्शन होते. प्रादेशिक कादंबरीत सामाजिक माहिती विपुल आढळते; परंतु या पार्श्वभूमीत जो सामाजिक आशय असतो तो गतिमान असतो; अकारण आलेला नसतो. सामाजिक मूल्यांच्या अनुषंगानेच ध्येयवाद व वास्तववाद यांचा समतोल साधतो; हा समतोल लेखकाच्या तटस्थ वृत्तीवर व कादंबरीला त्याने जो घाट दिलेला असतो त्यावर अवलंबून असतो.

घाट म्हणजे काय? ललितकृतीत शैली व रचना यांच्या समन्वयाला घाट असे म्हणतात. घाट हा कादंबरीचा विषय व तिची अभिव्यक्ती यांनी घडवलेला असतो. बाह्यरचनेपेक्षा अंतर्गत समतोलावर घाटाचे यश अवलंबून असते.

व्यक्तीचा अनुभव समष्टीपर्यंत नेऊन भिडवणे म्हणजेच त्या त्या व्यक्तीचा त्या त्या समाजातला, त्या त्या कालातला एक ठसा, एक विशेष असतो असा प्रत्यय निर्माण करणे. व्यक्तीप्रमाणे घटना, प्रतीके वगैरेंचेही विशेष असतात. विशिष्टातून सामान्याची प्रतीती निर्माण करण्यात कादंबरीकाराचे कौशल्य आढळून येते. व्हर्जिनिया वुल्फने 'संज्ञाप्रवाह' व 'काल-कादंबरी' (कालबद्ध कादंबरी) असे दोन घाट

या प्रकारात मिसेस डॅलोवे या एकाच पात्राच्या द्वारा निर्माण केले. अर्थात त्या त्या कादंबरीकाराच्या आंतरवेदनाक्षमतेवर व त्याच्या कौशल्यावर त्याच्या कृतीचा घाट अवलंबून असतो. 'व्हॉट्स इन अ नॉव्हेल'; हेलन ई० हेन्स; प्रस्तावना) उत्कृष्ट घाटाबद्दल एवढेच म्हणता येईल की त्यात विषयाचे सारसर्वस्व आलेले असते. 'दि क्राफ्ट ऑफ फिक्शन'; पर्सी लबॉक) अर्थातच एडविन म्यूरने १९२८ साली केलेली कादंबऱ्यांची वर्गवारी—क्रियाप्रधान कादंबरी व पात्रप्रधान कादंबरी—ही कादंबरीचे एक ऐतिहासिक पर्व दिग्दर्शित करते. ('दि स्ट्रक्चर ऑफ दि नॉव्हेल'; एडविन म्यूर) कादंबरीची अनेक परिवर्तने झाली व होत आहेत. प्रत्येक परिवर्तनाच्या प्रवर्तकाला नवा कादंबरीकार, त्याच्या कृतीला नवी कादंबरी, व त्याने हाताळलेल्या तंत्राला नवा घाट म्हणतात. डोस्टोव्हस्की नवा कादंबरीकार होता. फ्लॉबेर नवा कादंबरीकार होता. जेम्स जॉईस नवा कादंबरीकार होता. व्हर्जिनिया वुल्फ नवी कादंबरीकार होती. कामू नवा कादंबरीकार होता. असे नवे नवे कादंबरीकार प्रत्येक मन्वंत तयार होतच असतात. नवा कादंबरीकार काय करतो? तो नव्या कादंबरीचा शोध लावतो. म्हणजेच विश्व व मानव यांच्या परस्परसंबंधांची अभिव्यक्ती करण्यासाठी तो नवा घाट हुडकून काढतो. कादंबरीचा घाट शोधणे म्हणजेच मानवाचाही शोध घेणे आहे. मानव नव्याने कल्पून घडवणे आहे. म्हणूनच जुन्या घाटांची उजळणी करणे केवळ वेडगळपणाचेच नव्हे तर वांझपणाचे चिन्ह आहे; त्यातून धोका निर्माण होण्याचा संभव आहे, हे समर्थ कादंबरीकार मनोमन ओळखतात. थोर आधुनिक कादंबरीकार हा प्रज्ञावंत असतो. परंतु त्याच्यात दैवाची सूत्रे हातात ठेवणारा एक विनाशी राक्षसही लपलेला असतो. तो धीरगंभीर व कंटाळा न करता दीर्घश्रम करणारा असतो. प्रत्येक वाक्याची घडण खूप चिंतनानंतर अत्यंत पद्धतशीरपणे तो करतो. (उदाहरणार्थ, काफका).

पूर्वीच्या किंवा आताच्या थोर कादंबरीकारांच्यामध्ये सृजनशील जाणीव, हेतू व शिस्त हे गुण प्रामुख्याने आढळतात. प्रत्येक कादंबरीकाराला व प्रत्येक कादंबरीला आपापला घाट शोधून निर्मावा लागला पाहिजे. कुठलेही ठरीव सूत्र या बाबतीत नाही. परंतु कुठल्याही कृतीत परंपरा ही असतेच आणि म्हणून नवे घाट निर्माण होतात त्यावेळी त्यांची जुन्या घाटांशी तुलना होते आणि त्यांच्या मानाने नवे घाट घाटहीन ठरतात. नवा घाट तयार करण्यास कादंबरीकाराला चाकोरी तोडावी लागते.

लेखकाच्या तटस्थपणाबद्दल बोलायचे झाल्यास संपूर्ण तटस्थपणा ठेऊन गोष्टी बनणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे. सांस्कृतिक किनारी या वस्तूंना, घटनांना सदासर्वदा चिकटलेल्याच असतात. या सांस्कृतिक किनारी म्हणजे मनोविज्ञानाचे, नीतिशास्त्राचे, व तत्त्वज्ञानाचे तुकडे किंवा अंश.

'पात्रे', 'वातावरण', 'कथनकौशल्य', 'वास्तववादी कादंबरीकार', 'कथा',

'घाट', 'संदेश', वगैरे संज्ञा नेहमी टीकावाङ्मयात आढळतात. त्यांच्यासंबंधी आता थोडे पाहू.

**पात्र :** पात्र म्हणजे ती जुनी, मोडकळीस आलेली तसबीर नव्हे. कादंबरीतले पात्र म्हणजे कुठूनतरी ओढूनताणून आणलेला, ठराविक क्रिया करणारा अनामिक नव्हे. पात्राला त्याचा स्वतःचा स्वभावविशेष लागतो, आणि तो स्वभावविशेष दर्शविणारा चेहरा लागतो. त्याच्या त्या स्वभावाप्रमाणेच त्याच्या क्रिया घडतात; आणि प्रत्येक प्रसंगी त्याच्या प्रतिक्रियाही विशिष्ट स्वरूपाच्याच होतात. पात्राच्या या स्वभावामुळेच वाचक त्याला जोखू शकतो; त्याच्यावर प्रेम करतो किंवा त्याचा द्वेष करतो. त्याच्या या स्वभावधर्मामुळेच पुढे त्या पात्राचे नाव मानवविशेषाला दिले जाते : एक वर्गच त्याच्या नावाचा तयार होतो. कादंबरीतले पात्र हे आपल्या वैशिष्ट्याने अतुलनीय असले पाहिजे. इतके की त्या वैशिष्ट्यामुळे त्याचा एक वेगळा वर्गच निघाला पाहिजे. त्याच्या वैशिष्ट्यामुळे ते पात्र अढळ झाले पाहिजे. पण त्या ठराविकपणाबरोबरच त्याच्यात काहीतरी असे महान असले पाहिजे की ते सार्वत्रिकही दिसले पाहिजे.

**कथा :** कथा केवळ रंजक असून भागत नाही; नुसती अपूर्व किंवा सनसनाटी असून भागत नाही; जर मानवी सत्याचा पुरेसा भार वाहण्याइतकी समर्थ ती व्हायची असेल, तर त्या कथेत वर्णन केलेली साहसे खरी असून खऱ्या माणसांच्या बाबतीतच ती घडलेली आहेत याचा प्रत्यय वाचकाला आणून देणे तिला जमले पाहिजे. एवढेच नव्हे तर, हे प्रसंग स्वतःच्या डोळ्यासमोर घडलेले आहेत असेही वाचकाला भासवण्यात तिला यश आले पाहिजे. या बाबतीत वाचक व लेखक यांच्यात एक सुसंवाद निर्माण झाला पाहिजे. जीवनाप्रमाणेच कथादेखील आपसूक आलेली आणि अमर्याद वाटली पाहिजे.

**लेखकाची बद्धता :** लेखक आता 'कलेसाठी कला' या ब्रीदाशी बद्ध नाही; तर समग्र जीवनाच्या जाणीवेतून जे जीवनाचे अंतर्दर्शन त्याला घडते, त्याच्या भावनिक अभिव्यक्तीशी बद्ध आहे.

**घाट व आशय :** अद्यापही जो उत्तम गोष्ट शोधून काढतो अगर बनवतो तो चांगला कादंबरीकार समजला जातो. हल्ली तंत्र आणि घाट यांच्या मागे लागून गोष्टीचा विध्वंस करण्यात येतो. गोष्टीचा अर्थही त्यामुळे नष्ट होतो. परंतु कादंबरी ही कलाकृती असल्यामुळे कलेचा मुख्य निकष म्हणजे गरज अगर आवश्यकता तो तिलाही लागू होतो. आवश्यकता म्हणजे उपयुक्तता नव्हे. ही गरज संपूर्णतया आंतरिक गरज आहे ('स्नॅपशॉट्स अँड टोवर्डस अ न्यू नॉव्हेल'; ॲलन रॉबे-ग्रिलेट).

कादंबरीचे स्वरूप, तिचे कलागुण आणि तिचे समाजसापेक्षत्व यांच्याबद्दल पाश्चात्य टीकाकारांची मते थोडक्यात आपण पाहिली. हा प्रकार मूळचाच तिकडचा

आणि हा प्रकारही तिकडेच विविध प्रयोगांनी सतत प्रगत होत राहिला असल्यामुळे त्यातली विधाने आपल्याला गृहीत धरायला प्रत्यवाय नसावा.

आता डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांकडे वळताना कुसुमावतीबाईंचे मत आपण पाहिले; पण त्यांच्या अगोदर प्रा० ना० सी० फडके यांनी 'उसाच्या मळ्यात शिरलेला रानडुक्कर' अशी उपमा देऊन केतकरांचा कादंबरीकार म्हणून उपहास केलेला आहे. श्री० ना० बनहट्टी व ग० त्र्यं० माडखोलकर यांनीदेखील त्यांच्या कादंबऱ्या कादंबऱ्याच नव्हेत, थोर व्यक्तींची कुचेष्टा आणि सर्व उलटे पाहण्याची दृष्टी, बोजडपणा, बेडौल भाषा वगैरे अनेक दोष दाखवले आहेत. श्री० वि० स० खांडेकरांनी देखील अनेक वर्षांपूर्वी या कादंबऱ्या नव्हेत तर प्रबंध आहेत असे म्हटले होते. पण त्यानंतर काही वर्षांनी केतकरांच्या कादंबऱ्यांचे पुन्हा आलोडन केल्यानंतर त्यांनी एक समर्थ कादंबरीकार म्हणून डॉ० केतकरांना गौरवले आहे.

डॉ० केतकर हे कादंबरीकार नव्हते, प्रबंधाला कादंबरीचे स्वरूप देण्याचा उपद्व्याप त्यांनी केला, असे म्हणणारा जो एक वर्ग आहे (आता हा विरळ झाला आहे) त्याच्या विधानाला पुष्टी देणारे विधान स्वतः डॉ० केतकरांनीच केलेले आहे. परंतु या आक्षेपकांनी मात्र त्या विधानाची दखल स्वसमर्थनार्थही घेतली नव्हती. ते विधान असे : "इंटरच्या वर्गात असतांना इंग्रजी निबंधसंग्रह (लॉवन्स एसेज) होता. त्यांत इंग्रजी निबंधावरून कादंबरी अवतरली असें वाचलें होतें. त्यामुळें निबंध व कादंबरी या दोहोंचें मिश्रण माझ्या हातून अलक्षितपणें तयार झालें असावें, असें माझ्याविषयीं विचार केला असतां वाटतें." ('माझें कादंबरीलेखन', संपादक या० मु० पाठक, पृष्ठ ५३-५४) या विधानातला 'अलक्षितपणें' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. संशोधकाचे वैचारिक वाङ्मयाशी जडलेले घनिष्ठ संबंध आणि मानवी व्यवहाराच्या जटिल समस्यांतून प्रतीत होणारे परस्परसंबंध यांच्या जोडसांध्यावरचे हे वाङ्मय आहे. सामाजिक आणि समाजशास्त्रीय यांचा कादंबरीच्या कलागुणाला, तिच्या अभिव्यक्तीला, आशयाला अगर विषयाला विरोध नसतो, असे वर मी जे विवेचन दिले त्यावरून दिसून येते. प्रश्न एवढाच की समाजशास्त्रीय डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांना कलात्मकरीत्या अपकारक ठरले काय ? व तसे झाले असल्यास, का ?

डॉ० केतकरांनी एकंदर सात कादंबऱ्या लिहिल्या. १९१६ ते १९३७ सालापर्यंत त्यांचे हे लेखन चालू होते. या पंचवीस वर्षांत त्यांच्या मतांची जी जी परिवर्तने झाली, ती ती त्यांच्या कादंबऱ्यांतून आढळतात. [डॉ० केतकरांची तीव्र निरीक्षणशक्ती, त्यांचे सामान्य घडामोडींचे व मानवी परस्परसंबंधांचे असामान्य ज्ञान, आपले व आपल्याभोवतीच्या व्यक्तींचे विचार जरासुद्धा आडपडदा न ठेवता जगापुढे मांडण्याचा त्यांचा प्रांजळपणा यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या सर्व गुणदोषांसकट त्यांच्या लेखनात, विशेषतः कादंबऱ्यांत, जसे दिसून येते तसे

महाराष्ट्रातल्या दुसऱ्या कादंबरीकारांच्या बाबतीत झाले नाही. त्यांच्या कादंबऱ्या म्हणजे त्यांच्या विचारांचा व कालिक भावभावनांचा सूक्ष्म नकाशाच आहे. सॉमरसेट मॉमने 'समिंग अप' या पुस्तकात असे म्हटले आहे की, "माझ्या मनात येणारे सर्व विचार जर मी जसेच्या तसे टिपून ठेवले तर पुष्कळ वेळा मी कुणी विकृतीचा पुतळाच आहे की काय असे लोकांना वाटेल!" डॉ० केतकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून जे लहानमोठ्या व्यक्तींचे चित्रण केले आहे, त्याबद्दल त्यांच्या समकालीन टीकाकारांनी (उदाहरणार्थ, 'एकावलि', श्री० ना० बनहट्टी, पृष्ठ ९७) त्यांना विकृत म्हटले आहेच. पण आता तीस वर्षांनी त्यांच्या समग्र कादंबरीवाङ्मयाचा आढावा घेतल्यास आपल्याला त्यांना विकृत म्हणता येणार नाही. कारण या कालात जागतिक घडामोडी झपाट्याने झाल्या. मानसशास्त्र व समाजशास्त्र यांच्या कक्षा फार वाढल्या व त्यांचे ज्ञान बरेच फैलावले आहे. डॉ० केतकरांच्या अनेक विधानांमागे मोठा समाजेतिहास दडलेला असतो; म्हणून त्यातले रहस्य सहज समजत नाही. परंतु त्यांचे लेखनदोष इतके ढोबळ आहेत की ते मात्र कुणालाही समजावेत. उदाहरणार्थ, त्यांची रुक्ष व ओबडधोबड भाषा, व्यक्तींवर व प्रसंगांवर केलेली निर्भीड टीका, इत्यादी.

डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या लोक वाचतील; त्यांच्यावर बरेवाईट मत देतील; पण कुणीही तोडून त्यांच्यातले संदर्भ देऊ शकणार नाही. डॉ० केतकरांच्या कादंबरीवाङ्मयाचा एक गुण असा आहे, की जे आहे तिथे असेल त्याच संदर्भात एकजीव होते. तिथून बाहेर काढले की त्याचा संदर्भ हरवतो आणि ते गुणहीन व निर्जीव दिसते. हा प्रत्येक घटनेमागचा, व्यक्तीमागचा संदर्भ डॉ० केतकरांच्याच अतिविलक्षण मनोव्यापारांशी संलग्न होता. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्यांची तुलना हरिभाऊंच्या किंवा वामन मल्हारांच्या कादंबऱ्यांशीही करता येत नाही. केवळ बरे, वाईट, यशस्वी, अयशस्वी वगैरे विशेषणांनी त्यांच्या कादंबऱ्यांचे परिशीलन करणे हास्यास्पद आहे. त्यांच्या कादंबरीवाङ्मयाला कालीनतेची एक मोठी पार्श्वभूमी आहे. ठराविक कालातल्या ठराविक घटना प्रत्येक कादंबरीच्या बुडाशी आहेत. डॉ० केतकरांचे चिंतन कालसापेक्ष आहे. कालिकता हीच त्याची मर्यादा आहे. काळाच्या या भानातूनच सर्व सामाजिक, राजकीय व व्यक्तिगत घटना त्यांच्या कादंबरीत शिरल्या आहेत. 'गांवसासू'त ही कालिकता कलात्मक ठरली आहे; 'भटक्या'त तिच्यामुळेच रसहानी झाली आहे.

स्वतःच्या कादंबरीविषयी डॉ० केतकरांना अभिमान वाटत असे. आपल्या कादंबऱ्या इतर कादंबऱ्यांहून वेगळ्या नव्हेत तर श्रेष्ठ असल्याबद्दलचे त्यांचे उद्गार प्रसिद्धच आहेत. त्यांच्याविषयीं दुमत होणे अपरिहार्य आहे. पण डॉ० केतकरांचे आपल्याबद्दलचे उद्गार मात्र महत्त्वाचे आहेत. ते असे : "पाश्चात्य कादंबऱ्या थोड्या वाचल्या. माझ्या लिखाणाला कादंबरी म्हणावें कीं म्हणूं नये असा प्रश्न

उत्पन्न करतात त्यांना उत्तर असें आहे कीं माझ्या कादंबऱ्या कादंबरीच्या व्याख्येंत बसत नसतील तर कादंबरी या शब्दाची व्याख्या बदलावी किंवा त्या कृतीचें वर्गीकरण निराळेंच नांव देऊन करावें. कादंबऱ्यांचें लक्षण कधींच बांधतां येणार नाहीं आणि जें लक्षण तयार होईल त्याचा उपयोग जुन्याच्या स्पष्टीकरणापुरताच आहे, नवीन तऱ्हेच्या प्रयत्नास नियंत्रक नाहीं असें समजावें." ('माझें कादंबरीलेखन', संपादक या० मु० पाठक).

**समाजशास्त्रीय धोरण :** डॉ० केतकरांचे समाजशास्त्रीय धोरण कोणत्याही जुन्या किंवा नव्या मतप्रणालीवरून आखलेले नव्हते. परंपरेने आणि पांडित्याने रूढ झालेले श्रुतिस्मृतींतील जातिविषयक व विवाहविषयक नियम त्यांनी आस्थेने अभ्यासिले होते आणि चालू सामाजिक रीतींचे, जातीजातींतील परस्परसंबंधाचे, अधर्मसंततीचे, स्त्रीचारित्र्याचे निरीक्षण त्यांनी पोटतिडिकीने केले होते. जातिभेद हे भारताचे मोठे दुखणे आहे. त्याच्या बाबतीत डॉ० केतकर 'समाजशास्त्रीय व धर्मशास्त्रीय' या लेखात म्हणतात की, "जातिभेद जो मोडावयाचा तो आमच्यांतील कांहीं लोक, सर्व माणसें ईश्वराचीं लेकरें आहेत, म्हणून सांगतात त्यासाठीं नव्हे; तर आमच्या देशांतील सर्व लोकांचें एकीकरण करून आमचें एक बलवान राष्ट्र करावयाचें व हिंदुस्थानाचें महत्त्व आम्हांस जगात वाढवावयाचें यासाठीं होय. हें ध्येय आमच्या पुढाऱ्यांनीं, व्याख्यात्यांनीं, कवींनीं, कादंबरीकारांनीं, लोकमताच्या नेत्यांनीं, कायदे करणारांनीं, समाजसुधारकांनीं देशासमोर वारंवार ठेवलें पाहिजे. तसें केलें म्हणजे परस्पर विवाहास उत्तेजन मिळेल व प्रगतिपथाचीं चाकें जोरानें फिरूं लागतील. आपल्या राष्ट्रधर्माच्या आड हा जातिभेद येतो व त्याकरितांच हा मोडला पाहिजे, ही गोष्ट लोकांच्या कपाळीं सदैव ओरडली पाहिजे."

मराठा समाजाची संख्यावर्धिष्णुता, सर्वसंग्राहकता डॉ० केतकरांनी हेरली व 'उघड्या तोंडाची जात' म्हणून 'ब्राह्मणकन्ये'त या मताचा उपयोग करून घेतला. 'तर्कटनीति', 'वैजनाथस्मृति' त्यांच्या कादंबरीत येण्याचे व त्या मुख्य कादंबरी-पासून थोड्या अलग असण्याचे कारणही वरच्या उद्गारांत सापडते. डॉ० केतकरांनी आवतीभोवती असलेल्या व्यक्तींची जीवने पाहिली. कुमारी माता पाहिल्या, धडपडणारे स्खलनशील तरुण पाहिले, समाजाच्या उन्नतीसाठी झटणारे सुविद्य तरुण पाहिले आणि त्यांच्या प्रतीकात्मक छाया त्यांनी कादंबऱ्यांत रेखाटल्या.

थोडक्यात सांगायचे म्हणजे केतकरांच्या कादंबऱ्या मी वर उद्धृत केलेल्या कादंबरीच्या स्वरूपाच्या आधारे पाहाताना जुन्या वळणाच्या आहेत. त्यांत संविधानक आहे, पात्रे आहेत, नायकनायिकाही आहेत. कालाची क्रमिक गती आहे. परंतु 'भटक्या' व काही अंशी 'ब्रह्मगिरी' या पात्रांची निर्मिती करण्यात अवनायकाला सदृश अशी पात्रनिर्मिती जर कुणी स्वयंस्फूर्तीने केली असेल तर ती

डॉ० केतकरांनीच. या कादंबऱ्या प्रबंधाच्या स्वरूपात लिहिता आल्या असत्या का, याचा विचार करताना, आल्या नसत्या, असे मला वाटते. डॉ० केतकरांनी ज्या घटना अगर समस्या घेतल्या आहेत त्या सजीव व्यक्तींशी निगडित आहेत. व्यक्ती आहेत म्हणून घटनांचे महत्त्व आहे. हे प्रसंग व व्यक्तींच्या कृती केवळ कथेच्या स्वरूपातच परिणामकारक होणे शक्य होते; नव्हे, कुठलीही कादंबरी घ्या, तिचे संविधानक ही एकच पूर्ण घटना आहे आणि तिचे पात्रांशी असलेले नाते अतूट आहे, रक्ताचे आहे. कादंबरीकाराला अत्यावश्यक असे हे भान आहे आणि ते भान डॉ० केतकरांमध्ये चांगले आढळते.

लेखनातला अव्यवस्थितपणा, भाषेतली ढिलाई, संवादातला बोजडपणा वगैरे दोषांमुळे त्यांच्या कादंबऱ्या कलागुणांत उणावल्या. डॉ० केतकरांनी विविध समस्या लोकांपुढे मांडल्या, पण प्रत्यक्ष प्रचार त्यांनी कादंबऱ्यांतून केला नाही. कुठल्याही प्रश्नाच्या दोन्ही बाजू त्यांनी लोकांपुढे व्यक्तिरेखांतून व प्रसंगांतून मांडल्या, आणि अविस्मरणीय व्यक्ती व प्रसंग यांची निर्मिती केली. डॉ० केतकरांनी रचनेच्या बाबतीत जुने तंत्र वापरले म्हणून रचनाशैथिल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या आहेत त्याहून अधिक सदोष वाटतात. पण कादंबरीचा गाभा मात्र या स्वतःला न जमणाऱ्या तंत्राच्या चौकटीला खिळखिळी करीत तसाच ठाम जिद्दीने जिवंत उभा राहिला. हा गाभा, हे अंतरंग नव्या सामाजिक जाणिवांनी भरलेले होते. या जाणिवांचे रिंगण फार विस्तृत होते. सबंध जगाचे रिंगणच इथे सिद्ध होते. स्थलकालाचा पैस खुशाल हवा तसा पसरला होता. घटनास्थळ इथले असो, इंग्लंडातले असो, की अमेरिकेतले असो, लेखक त्याच्याशी परिचित होता. त्या घटनेमागची व त्या त्या पात्रांमागची सामाजिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी त्याला अवगत होती. सामाजिकतेचा इतिहास मुळातच जटिल, अनेक समस्यांनी भरलेला. तो उकलला की अद्भुतात जमा होणारा. माणसाला संशय असला तर तो काढून श्रद्धाळू बनवणारा, श्रद्धा असली तर ती काढून जागरूक बनवणारा. अशा या विलक्षण सामाजिक इतिहासाच्या ज्ञानाची किल्ली ज्याला अवगत झालेली होती तो हा पंडित लेखक अनेक सामाजिक लालित्ये—व्यक्तिव्यक्तीतली, घटनाघटनांतली—हेरीत होता. त्या लालित्याने भारावून जाऊनच त्याने आपल्या कथा रचल्या. रुक्मिणी, प्रियंवदा, देवीदास, रंजना, डॉ० लोंढे ही पात्रे या भारावलेल्या वृत्तीची साक्ष आहेत. लेखक अशा भाववृत्तीत असल्यामुळे जे जे सामाजिक सत्य त्याने सांगितले ते पठीक एकांगी सत्य नव्हते; जे जटिल, अनेकरूपी, अनेकरंगी सत्य पारदर्शी असलेल्या कथाकाराला लाभलेले असते, तेच सत्य डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांच्या अंतरंगात भरलेले आहे. वास्तव व ध्येयरूप यांची सांगड त्यांच्या कादंबऱ्यांत व्यवस्थित पडली आहे. तशी नसती तर एवढा विस्तृत पट त्यांना पेलला नसता. वर्तमानाच्या पूर्ण वास्तवातून ऐतिहासिक भूतकाल पूर्णपणे आकळून,

भविष्यकाळाची शुभसूचना देण्याचे समाजप्रेमी लेखकाचे कार्य त्यांना साधता आले नसते.

डॉ० केतकरांच्या समाजप्रेमाने त्यांना पंडित बनवले. त्यानेच त्यांना कादंबरीकार केले. आम्हांला अनोखा असला तरी सच्चा दिलाचा कादंबरीकार हा आहेच. आम्हाला अनोखा; कारण विशिष्ट तंत्रमंत्राला सवकलेल्या वाचकाला त्यांच्याशी समरसता येत नाही. हा आमचा दोष नव्हे, तसा त्यांचाही नव्हे. 'ब्राह्मणकन्ये'च्या प्रस्तावनेत 'ही कादंबरी अनेकदा वाचा म्हणजे तुम्हाला तिचे रहस्य कळेल' असे त्यांनी आवर्जून सांगितले ते उगीच नव्हे. या कादंबऱ्या वाचकाला शिणवतात; पण शिणल्यानंतर हा शीण वृथा नव्हे तर सुखकारक आहे, विशालतर जाणिवांपर्यंत आपल्याला पोचवणारा आहे, असे मोजक्या वाचकांना वाटल्याशिवाय राहाणार नाही. आणि केतकरी कादंबरीचा वाचकवर्ग नेहमी मोजकाच राहाणार. कारण त्यांत नुसती कथा, पात्रे व घटनाच नाहीत, तर त्या निर्माण करणारे असाधारण बुद्धिवान, विनोदी, अभिनिवेशी असे मन आहे. ते लेखकाचे मन टाळून या कादंबऱ्या वाचता येत नाहीत. हे मन कधी अगदी तटस्थ असते, तर कधी उपरे आणि पूर्ण वैयक्तिक असते. [इथे पात्रे प्रसंग स्वतःचा भोगतात, पण संभाषण डॉ० केतकराचेच करतात.] सर्वच कादंबऱ्यांतली पात्रे तसे करतात; पण इथे ही क्रिया झाकलेली नसून उघड आहे : इतकी उघड की तिच्यामुळे कादंबरीची गती अडखळते, आणि तिच्यातले कलास्वरूप शबलित होते. परंतु इतक्या स्वतंत्र प्रेरणेने, समाजप्रेमाच्या ऊर्मीने, अत्यंत उल्हासभराने आणि विलक्षण गैरशिस्तपणे, गलथानपणे कादंबरी रचणारा लेखक एकच : श्रीधर व्यंकटेश केतकर. हा खरा कादंबरीकार की खोटा? हरिभाऊंमध्येही सामाजिक अभिनिवेश होता, पण कलावंत अधिक होता. कथावस्तूची काटछाटदेखील प्रसंगी करून आणि भावनिक उंचसखलता परिणामकारक रीतीने त्यांनी हाताळली. ही भावनिक उंचसखलता केतकरांना साधलेली नाही. त्यांचे निवेदन समतल पातळीवरूनच होते. हा संथ सूर अनेकांना आवडणारा नव्हे. पण खर्जात ज्याप्रमाणे सर्व सुरावट लपलेली असते, त्याप्रमाणेच डॉ० केतकरांच्या निश्चित बसकट सुरात साऱ्या भावनांचा अर्क देण्याची त्यांची प्रवृत्ती आहे; पण ती देण्याची ताकद त्यांच्या लेखणीला काही ठिकाणी पेललेली नाही हे मात्र खरे.

हरिभाऊ हे जुन्या म्हणजे न बदलणाऱ्या समाजाला जाग आणू पाहात होते. दुःखी जीवांची गाऱ्हाणी सामाजिक वैगुण्ये म्हणून जगापुढे मांडू पाहात होते. डॉ० केतकरांनीही ही सारी सामाजिक वैगुण्ये ओळखली. परंतु अमूक परिस्थिती बदलली की सुखाचा सुकाळ होईल अशी भाबडी आशा जाणकार डॉ० केतकर बाळगू शकत नव्हते. समाज केव्हाच तटस्थ नसतो; तो सदा बदलत असतो; तो स्थिर असतो तितकाच परिवर्तनशील असतो. हे समाजाच्या स्थितीगतीचे गणित

डॉ० केतकरांनी ओळखले होते. त्याचप्रमाणे एकाला जी प्रथा मारक वाटते, तीच दुसऱ्याला तारक ठरते. सामाजिक गरजेपोटीच प्रत्येक प्रथा अवतरते व कालांतराने प्रत्येक सुधारणा जुनी व सदोष होते, फिरून नव-सुधारणेची गरज तयार होते. हे सामाजिक आवर्तन डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांत त्या त्या कथेच्या व प्रसंगाच्या निमित्ताने प्रतीत होते. प्रत्येक घटनेला प्रतिक्रिया होते ती माणसांच्या मनांतून; आणि जिथे मन आले, तिथे स्वभाव आला व परिस्थितीबद्दल व्यक्तीची पसंती, नापसंती आली. नापसंती असल्यास प्रतिक्रिया व विरोध अटळ असतात. हा संघर्ष, समाजातले हे सारे ताणतणावे त्या त्या पार्श्वभूमीसकट मांडणारे डॉ० केतकर हेच योग्य कादंबरीकार आहेत. हे व्यक्तिगत मानसिक संघर्ष मांडण्यास कादंबरी हेच योग्य माध्यम होते. व्यक्तीपासून समष्टीपर्यंत साऱ्या क्रियाप्रतिक्रिया नेऊन पोचवणे व कथासूत्राशी इमान राखणे ही अवघड गोष्ट आहे. ती करण्याचा प्रयत्न डॉ० केतकरांनी केला. 'टेंडन्सीज इन द मॉडर्न नॉव्हेल'मध्ये इंग्रजी कादंबरीचा आढावा घेताना ह्यू वॉल्पोलने व्हर्जिनिया वुल्फबद्दल असे म्हटले होते की तिला आपल्या लेखनाला कादंबरी म्हणावे की नाही ही शंका होती; पण अन्य कोणतेही रूढ नाव त्याला देता येण्यासारखे नसल्यामुळे हे नावच चालवणे क्रमप्राप्त झाले. आल्डस हक्सलेलाही स्वतःचे लिखाण कादंबरीत सामावत नाही असे टीकाकारांचे बोल ऐकावे लागले आणि आपल्या लिखाणाला अनुरूप नाव देण्यास तोही तयार होता. याचा मतितार्थ एवढाच की कादंबरीचे अंतरंग व बहिरंग झपाट्याने बदलते आहे व त्याची जाणीव लेखकांना आहे. महाराष्ट्रात ही जाणीव प्रथम डॉ० केतकरांनाच झाली हे विसरून चालणार नाही.

व्हर्जिनिया वुल्फशी त्यांची तुलना करता येत नाही. कारण ती आत्मलक्ष्मी होती. प्रत्येक वाक्य, प्रत्येक घटना कोरून लिहीत होती. शब्दांच्या रचनेत डॉ० केतकर तेवढेच अव्यवस्थित होते व ते बहिर्लक्षी होते. याप्रमाणे समकालीन कादंबरीचे बाह्यतंत्र अंशतः वापरून, अंशतः झुगारून स्वतःच्या प्रतीतीप्रमाणे, मनूपासून साम्यवादापर्यंत साऱ्या सामाजिक क्रिया-प्रतिक्रिया तपाशीत चालणारा हा लहरी कादंबरीकार आहे. त्याने कादंबऱ्याच घडविल्या असे नाही; त्याने केतकरी कादंबरी घडवली.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना 'ब्राह्मकन्या' कादंबरी आवडली होती, असे डॉ० केतकरांनी 'प्रतिभे'च्या कोल्हटकर-अंकात (जून १९३६) आपल्या आठवणींत सांगितले आहे. वामन मल्हारांनीही त्यांच्या कादंबरीबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. श्री० वि० स० खांडेकरांनीदेखील नागपूरला १९५४मध्ये जे भाषण केले त्यांत कादंबरीकार झालेले थोर समाजशास्त्रज्ञ डॉ० केतकर यांनी नवयुग सुरू केले असे उद्गार काढले आहेत. ते अयथार्थ आहेत असे कोण म्हणेल?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७७०९६ दि: १-१०-६१ एक
क्रमांक १७३२ नों. दि. २६।११।६७
९५-३९

# गोंडवनांतील प्रियंवदा

'गोंडवनांतील प्रियंवदा' ही डॉ० केतकरांची पहिली का[illegible] साली त्यांनी लिहायला घेतली आणि १९२६ मध्ये पुरी केली. ही 'विद्यासेवका'त क्रमशः 'अज्ञात' या टोपणनावाने प्रसिद्ध झाली. कादंबरीत आलेली अनेक विषयांची निर्भीड चर्चा आणि मुख्यतः लेखक हा ललित-लेखक म्हणून कोणासच पूर्वी माहीत नव्हता, तेव्हा 'कर्त्याच्या नांवामुळें वाचकाचें मत ठरूं नये' म्हणून डॉ० केतकरांनी ते गुप्त राखले. पण "'विद्यासेवका'च्या संपादकास कादंबरीच्या स्तुतिपर जीं अनेकांकडून पत्रें आलीं, त्यांवरून बऱ्याच व्यक्तींचें स्वतंत्र मत व्यक्त झालें", व त्यामुळे पुस्तक छापताना त्यावर डॉ० केतकरांनी आपले नाव सरळ घातले. या कादंबरीची बऱ्याच जणांनी व लेखकांनी जी स्तुती केली त्याबद्दलचा उल्लेख डॉ० केतकरांनी 'परागंदा' कादंबरीच्या प्रस्तावनेतदेखील पुन्हा केला आहे. त्या स्तुतीमुळेच दुसरी कादंबरी लिहायला हुरूप आला, असे ते म्हणतात. डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या आवडणारा असा एक भाषानिरपेक्ष सुशिक्षितांचा छोटासा वर्ग डॉक्टरांच्या परिचयाचा होता. या वर्गाच्या उत्तेजनामुळेच त्यांचे कादंबरीलेखन शेवटपर्यंत चालू राहिले यात संशय नाही.

डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या ह्या कादंबऱ्याच नव्हत; त्यांची भाषा गचाळ, त्यांचे स्वभावरेखन दूषित, विषयप्रतिपादनात औचित्याचा अभाव; वगैरे आरोप पुढे त्यांच्यावर अनेक टीकाकारांनी केले. (उदाहरणार्थ, माडखोलकर, 'प्रतिभा' केतकर

अंक: 'डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या'.) त्यात माडखोलकर व प्रो० ना० सी० फडके हे प्रमुख होत. एकीकडे या टीकाकारांचे मत व दुसरीकडे 'तुम्हांला ठराविक इंग्रजी कादंबऱ्यांचें अनुकरण करून मराठी कादंबरी लिहिणाऱ्यांच्या लेखनाची सवय लागली आहे. माझ्या कादंबऱ्यांची रचना स्वतंत्र आहे. मी तुम्हां सर्वांपेक्षा चांगला कादंबरीकार आहें' हे डॉ० केतकरांनी माडखोलकरांना दिलेले अहंमन्य उत्तर, या दोन टोकांमधून आपल्याला आपला समीक्षणाचा मार्ग काढायचा आहे हे विसरून चालणार नाही.

## कादंबरी-लेखनाचा इतिहास

डॉ० केतकरांना 'तुम्ही पाहिजे तर निबंध लिहावे, पण कादंबरीच्या भानगडींत पडूं नये' असा इषारा त्यांचे मित्र बाळकृष्ण संतुराम गडकरी—'सुधारणेचा मध्यकाल' या कादंबरीचे लेखक—यांनी दिला होता. पण त्याला आव्हान म्हणूनच की काय, डॉक्टरांनी 'गोंडवनांतील प्रियंवदा' लिहायला घेतली. पण एवढे मात्र खरे की, कादंबरीलेखनास त्यांनी प्राधान्य कधीच दिले नाही. इतर लेखन करून उरला वेळ कसा तरी घालवायचा, त्या वेळेस ते कादंबऱ्या लिहीत. ही कादंबरीदेखील तशीच लिहिली गेली. त्यांनी ज्ञानकोश कंपनी रजिस्टर व्हायला वेळ होता, एक महिना ते रिकामे बसले होते, तेव्हा काहीतरी लिहायचे म्हणून त्यांनी या कादंबरीची दोन प्रकरणे व काही लेख लिहिले. 'परागंदा' कादंबरीच्या प्रस्तावनेत त्यांनी 'आपण आपली कादंबरी कंपॉझिटरची निकड असल्यामुळें लिहितों' असे म्हटले आहे. डोक्यात विषय नाना तऱ्हेचे घोळत असायचे. त्यांनाच कादंबरीरूप देऊन आता काही मजकूर, मग काही मजकूर, असा छापखान्याच्या गरजेप्रमाणे द्यायचा, असा त्यांचा शिरस्ता असे. कधीकधी 'विद्यासेवका'स काही मजकूर नसला म्हणजे या कादंबऱ्यांचा उपयोग होई. 'आशावादी' कादंबरीच्या प्रस्तावनेत मनाला खिन्नता आल्यामुळे विरंगुळा हवा म्हणून ती कादंबरी लिहिली असे म्हटले आहे. अर्थात ज्या वेळेला जे विचार डोक्यात घोळत असतील त्यांचेच रूपांतर कादंबरीत होई. एखादा कलावंत लेखक आपले संविधानक मोजूनमापून प्रमाणबद्ध व कलापूर्ण करतो, तशी अर्थातच या कादंबऱ्यांची रचना नाही, यात नवल नाही. दुसरे म्हणजे वर सांगितलेल्या कारणांमुळे डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या म्हणजे कादंबरीकाराचे त्या त्या वेळचे विचारदर्शनच आहे. कादंबरीत कथानकाची व पात्रांची अगदी तंत्रपूर्ण नसली तरी काहीतरी मर्यादा असतेच. त्या मर्यादेमुळे पुष्कळसे स्वतःचे विचार डॉ० केतकर अत्यंत संक्षेपात देतात. यामुळे कित्येक शास्त्रीय विचारसरणीच्या वाचकास ते उडते व अपुरे वाटतात, तर निव्वळ कादंबरीच्या रसग्रहणात आनंद मानणाऱ्या वाचकाला ते बोकांडी बसल्यासारखे वाटतात. उदाहरणार्थ, याच कादंबरीत 'प्रियाराधनांत

गायनाचा उपयोग' यावर प्रियंवदेने जीविशास्त्राचा (बायॉलॉजीला डॉक्टरांनी दिलेले नाव) आधार घेऊन भावास दिलेले व्याख्यान, (पृष्ठ १८, पहिली आवृत्ती) पुरुषी धर्मशास्त्राची चेष्टा करून नव्या धर्मशास्त्रात मातृसत्ताक पद्धतीच्या एका अंगाचे प्रियंवदेने शारदेला उद्देशून केलेले विवरण (पृष्ठ ११५) इत्यादी.

## तीन जोडप्यांची कथा

या कादंबरीचे कथानक अगदी साधे आहे. 'गोंडवनांतील प्रियंवदा आणि बरकुट्टे घराण्याचा इतिहास' असे जे चमत्कारिक नाव कादंबरीला दिले आहे, ते भाषेमुळे जरी बोजड वाटले, तरी आतील मजकुराच्या दृष्टीने समर्पक आहे. या कादंबरीत एकंदर तीन जोडप्यांची चार वर्षांची हकिगत आहे. हकिगतीला आरंभ १८९४ साली, म्हणजे 'रानड्यांच्या काळीं', होत आहे, ही विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. यापैकी प्रियंवदा व तिचा नवरा रामचंद्र हे सुशिक्षित, समवयस्क जोडपे आहे. प्रौढविवाह हे त्यांच्या विवाहाचे वैशिष्ट्य आहे. (जरी प्रियंवदेचे वय सतरा वर्षांचे व नवऱ्याचे बावीस वर्षांचे होते, तरी त्या काळी तो प्रौढविवाहच होता.) बिंब्राबाई व हरिभय्या मोघे आणि शारदाबाई व वैजनाथशास्त्री ही दोन पुनर्विवाहित जोडपी आहेत. बिंब्राबाई ही मालगुजार घराण्यातली सवत्स विधवा व हरिभय्या हा तिचा गायनशिक्षक असतो. शारदाबाई विधवा असली तरी बालविधवा असून, चारित्र्य व विद्वत्ता यांच्यामुळे लोकप्रिय झालेली अध्यापिका आहे. १८९५ साली तर काय पण १९१६ साली, ज्या वेळी डॉ० केतकरांनी ही कादंबरी लिहायला घेतली त्या वेळी, विद्वान कुमारिका स्वतंत्र तऱ्हेने चरितार्थ चालविणारी खरोखरच दुर्मिळ होती. परंतु प्रौढ कुमारिकांची स्थिती काय असते, हे डॉक्टरांनी विलायतेत व अमेरिकेत पाहिले होते, व त्यांचा अमेरिकेत विद्यार्थिदशेत थोडाबहुत अभ्यास पण केला होता. पाश्चात्य देशांत प्रौढ व स्वतंत्र कुमारिका ही समाजाचे एक अनुपेक्षणीय अंगच आहे. पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या आणि समाजशास्त्राचा अभ्यास केलेल्या डॉक्टरांच्या मनावर या कुमारीचा ठसा खोल उमटावा यात काहीच नवल नाही. खरोखरच 'समाजसेवेकरता आजन्म अविवाहित राहाण्याचा' जो एक ध्येयवाद हरि नारायण आपट्यांच्या कादंबरीतसुद्धा दिसून येतो, त्याचे मूळ या पाश्चात्य कुमारिकेतच आहे. पण स्वतःच्या समाजाचे व समाजाच्या आकांक्षांचे निरीक्षण करताना त्या वेळी डॉ० केतकरांना अशी स्त्री प्रत्यक्ष व्यवहारात तर कुठे दिसेना; पण तिची छाप मात्र तत्कालीन कादंबरीकारांच्या वाङ्मयात दिसून येत होती. स्वतः अशा कुमारिकांचा अभ्यास केल्यामुळे त्यांनी आपल्या कादंबरीत कुमारी विधवा (शारदाबाई) ही प्रतीक म्हणून पसंत केली. पंडिता रमाबाईंचे उदाहरण सर्वांना माहीतच होते. तेव्हा कुमारीपेक्षा

विदुषी विधवा समाजात त्या काळी प्रत्यक्ष पाहून माहीत होती. त्याशिवाय माझ्या माहितीप्रमाणे शारदाबाईंचे चित्र हे खरोखरीच एका अत्यंत हुशार व पंडिता म्हणून नागपूरच्या भागात गाजलेल्या पदवीधर विधवा विदुषी कै० तापीबाई हर्डीकर यांच्या पूर्वचरित्रावरून बरेचसे रंगवले आहे. अर्थात या विदुषी डॉ० केतकरांच्या समकालीन होत्या; १८९७ मधील नव्हेत. थोडक्यात सांगायचे म्हणजे 'नवरा असलेली व नवरा नसलेली' असे स्त्रियांचे दोनच भाग डॉ० केतकर पाडतात. कुमारिका व विधवा एकाच सदरात येतात.

## कालाची विसंगती

शारदाबाई या १८९५ च्या सुमारातल्या नसून आपल्याच समकालीन आहेत, हा दोष डॉ० केतकरांच्या लक्षात आला असावा. कारण प्रौढ कुमारींचा जीवनकलह हिंदी लोकांच्या जीवनात त्या काळी कोणत्याही रीतीने तीव्र स्वरूपात भासमान होत नव्हता. डॉ० केतकरांच्या काळीं असे भास चुकतमाकत होऊ लागले होते. तेव्हा एकीकडे शालीनता, एकीकडे—डॉ० केतकरांच्या भाषेत सांगायचे म्हणजे—'पुरुषाकर्षण' व एकीकडे स्वकर्तव्याची तीव्र जाणीव या तिहेरी संभ्रमात सापडलेली स्त्री आपला मार्ग निश्चितपणे कसा आखू शकेल, याचेच चित्र डॉ० केतकरांनी रंगविले आहे. १८९५ च्या सुमारास 'जननेंद्रियविषयांतर्गत मानसशास्त्र' (पृष्ठ ७०) जे डॉक्टर केतकरांनी वैजनाथशास्त्र्यांच्या तोंडून वदवले आहे, ते हिंदुस्थानात अज्ञातच होते असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही. प्रियंवदेसारख्या मॅट्रिक झालेल्या मुलीने चर्चा करण्याइतके लैंगिक मानसशास्त्र, म्हणजे 'पुरुषाकर्षण', अजूनही सवंग झालेले नाही. अजूनही त्याची चर्चा सार्वत्रिक रूपाची झालेली नाही. रानड्यांच्या काळी कांट, मिल, स्पेन्सर यांचाच पगडा सुशिक्षितांच्या मनावर बसला होता. समाजाच्या अनेक अंगांची जी चर्चा होई तिचा पाया त्या काळी 'शास्त्रीय' नसून तात्त्विक व ऐतिहासिक स्वरूपाचा होता. चिपळूणकर, टिळक, आगरकर यांचे राजकीय व सामाजिक लेख पाहा, नाहीतर आपट्यांच्या कादंबऱ्या पाहा, त्यात मिल-स्पेन्सरचेच महत्त्व अधिक दिसून येते. अर्थात, 'शास्त्रीय' पद्धतीचा अंगिकार करणाऱ्या डॉ० केतकरांना कदाचित ही विसंगती जाणवली असावी. आणि म्हणूनच पुनर्विवाहाचा त्या काळचा प्रश्न त्यांनी घोळूनघोळून लिहिला असावा. एवढेच नव्हे, तर शारदाबाई 'जातीच्या व इतिहासाच्या' अभिमानाने प्रेरित होऊन, हिंदुधर्माच्या कळवळ्याने, स्त्रियांमध्ये काही करता येईल की नाही या शंकेने व्याकुळ होते, त्यावेळी धर्मशास्त्राचा, इतिहासाचा आणि तत्त्वज्ञानाचा गाढ व्यासंग असलेले चातुर्वर्ण्याचे अभिमानी वैजनाथशास्त्री यांचे शिष्यत्व ती पहिल्याच भेटीत स्वीकारते, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. डॉ० केतकरांनी ती ठासून सांगितलेली आहे. या

घटनेच्या पाठीमागे पंडिता रमाबाईंच्या शारदासदनातील विद्यार्थिनींच्या धर्मांतरामुळे महाराष्ट्रात जी मोठी खळबळ झाली, व धर्मांतराविरुद्ध एक मोठी लाट उसळली, तिचे प्रच्छन्न दिग्दर्शन आहे, असे मला वाटते. परिस्थितीचा सूक्ष्म व स्वार्थविरहित विचार करणाऱ्या शारदाबाईंसारख्या स्त्रीच्या बाबतीत स्वसमाजाबद्दलचे हे उत्कट प्रेम दाखविले नसते, तर ते पात्र १८९५च्या सामाजिक परिस्थितीत मुळीच बसू शकले नसते. कारण शारदाबाईंची खरी भूमिका कुमारीची आहे, विधवेची नव्हे.

कालविसंगतीच्या ह्या दोषामुळे, कादंबरी लिहिताना पहिल्या वीस व नंतरच्या प्रकरणात जे दहाबारा वर्षांचे अंतर पडले त्यामुळे सर्वच पात्रांना १८९५ साली न शोभणारी आधुनिकता आली आहे, एवढेच नव्हे, तर त्यांनी एकाच विषयाचा अगदी जुन्या व अती आधुनिक पद्धतीने विचार करून आधुनिक विचारांना पुष्टी दिली आहे. उदाहरणार्थ, हिंदू स्त्रियांची धर्मशास्त्राप्रमाणे आधुनिक कालात कशी व्यवस्था करणे इष्ट व शक्य आहे याचा थोडा खल शारदाबाई वैजनाथशास्त्र्यांशी बोलताना करतात. जुनी रूढी किंवा शास्त्र यांना न सोडण्यात पुष्कळ शहाणपणा आहे याचे व ज्या योगाने राष्ट्रीयपणा न सोडता स्त्रीला राष्ट्रसंसाराला कशी मदत करता येईल याचे दिग्दर्शन केले आहे. संन्यासधर्म शारदाबाईंना मान्य असतो; पण स्त्री एकाकी असली तर तिच्या जीविताचे साफल्य नुसत्या स्त्रीशिक्षणाच्या कार्याने होऊ शकत नाही. समाजाच्या अंतरंगापर्यंत स्वतः पत्नीपद किंवा मातृत्व न अनुभवलेली स्त्री जाऊ शकत नाही, हे शारदाबाईंनी स्पष्टपणे बोलून दाखविले आहे. असे करताना त्यांनी सुधारकांच्या अदूरदृष्टीपणाची चेष्टाही केली आहे. हा झाला परंपरागत दृष्टिकोन. यानंतर प्रियंवदा शारदाबाईंजवळ स्त्रीच्या मातृत्वाच्या मागे केवढी शक्ती आहे, आणि त्या शक्तीच्या मागे मातृसत्ताक संस्कृतीचे केवढे भव्य कार्य दडून राहिले आहे, याचे विवरण करते. स्त्रीपुरुषांतले लैंगिक आकर्षण हे इतके महत्त्वाचे आहे की, कुठल्याही स्त्रीने ही आपली शक्ती फुकट दवडू नये. अनुनयात पसंतीची सवलत पुरुषापेक्षा स्त्रीलाच जास्त मिळावी; कारण स्त्री म्हणजे राष्ट्र आहे. अगदी थोडे पुरुष व जास्ती स्त्रिया असल्या तर वेचिराख झालेले राष्ट्रदेखील बहुपत्नीत्वामुळे लवकरच पूर्वस्थितीला पोचू शकेल. पण उलट झाले तर काय? राष्ट्रच नष्ट होईल. या कारणास्तव स्त्रीने पुरुषास पसंत करण्याचा हक्क स्वतःकडे राखून ठेवावा व पाहिजे असलेला पुरुष हातचा निसटू नये म्हणून आटोकाट यत्न करावा. पुरुषाने स्त्रीला मागणी घालण्याची पाश्चात्यांची रीत वाजवी नाही, वगैरे. आता सुद्धा हे विचार किती जणांना पटतील?

## आशावादी व भविष्यवादी

डॉ० केतकरांच्या या कालाच्या विसंगतीमागे मात्र निष्काळजीपणा हा दुर्गुण नाही. ही विसंगती त्यांच्यामधल्या एका मोठ्या गुणामुळे म्हणा किंवा वैशिष्ट्यामुळे

म्हणा निर्माण झाली आहे. डॉ० केतकर कमालीचे आशावादी होते. त्यांच्या कादंबऱ्यांत कुठलेही पात्र निराशेमुळे किंवा परिस्थितीमुळे कायमचे गारद झाले नाही. त्यांच्या कादंबऱ्यांत शोकांत कथा नाहीत. निराशेच्या भोवऱ्यातून सुद्धा कुठल्या ना कुठल्या तरी अगदी व्यावहारिक सिद्धांताचा आश्रय घेऊन त्यांची पात्रे फिरून जीवनाचा भरपूर आस्वाद घेतात. उदाहरणार्थ, बिंबासारखी अगदी सामान्य विधवा-सुद्धा हरिभय्याबरोबर प्रणयचेष्टांत गर्क झालेली असताना इतर विधवांसारखा आपला अधःपात होऊ नये म्हणून विचारोन्मुख होते; आणि लग्न केले तर आपले वागणे मुळीच गैर नाही, असा निर्णय ती दोघे घेतात. त्यांच्या लग्नाचे कारण पैसा, कीर्ती वगैरे नसून खरे प्रेम आहे.

डॉ० केतकरांच्या विसंगतीस पुष्टी देणारे दुसरे त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची भविष्यकाळात स्वैर संचार करणारी दृष्टी. ज्ञानकोशाच्या प्रस्तावनाखंडात भारतीय संस्कृतीचे जगात स्थान काय असावे, याबद्दल त्यांनी नाना तऱ्हेची भाकिते वर्तवली आहेत. तिथे त्यांनी त्या भविष्यकाळच्या गोष्टी म्हणून उघड नमूद केल्या आहेत; त्यांच्या या स्वप्नांपैकी 'एक जगाची कल्पना' आता नुसती कल्पना राहिलेली नाही. त्याचप्रमाणे या कादंबरीतदेखील त्यांनी प्रियंवदेच्या तोंडून वदवलेली प्रमेये ही त्यांच्या शास्त्रीय भविष्यवेत्तेपणाची खूण आहे.

## कादंबरीचे अंतरंग

आता पुस्तकाच्या अंतरंगाकडे म्हणजे मुख्य विषयाकडे वळू. या कादंबरीत आलेल्या तीन जोडप्यांपैकी प्रियंवदा व रामचंद्र यांचे लग्न अगोदरच झालेले असून दुसरे पुनर्विवाह सहवासानंतर कसे घडून आले हे दाखविले आहे. या कादंबरीचा विषय, लग्नानंतरचे व लग्नापूर्वीचे अनुरूप जोडप्यांतले प्रेम कसे असते व अशा प्रकारचे गाढ व सात्त्विक प्रेम असणे किती आवश्यक आहे, हा आहे. खरे म्हटल्यास 'घरकुट्टे घराण्याचा इतिहास' हा कथानकात लोंबताच राहिला आहे. बिंबाबाई व हरिभय्या यांच्या साहचर्यास, विधवा मुलीच्या इस्टेटीवर आपला काबू राहावा ही जी अनंतराव घरकुट्ट्याची इच्छा कारणीभूत झाली, ती सर्व कुठलाही तपशील न वगळता एका प्रकरणात घालता आली असती. हिंदुस्थानात दिसून येणाऱ्या लाचार आणि 'इंग्रजपूजन' करण्यात तत्पर अशा सरकारी नोकरांचे अनंतराव हे उत्तम प्रतीक असले तरी त्यांचे पात्र व कारवाया कथानकाच्या दृष्टीने फार गौण आहेत. बिंबाबाईच्या भाऊ बंडूनाना याच्या सरकारी नोकरीचा व व्यापारी अनुभवांचा वृत्तांत उद्बोधक असला, तरी कथानकाला गती देत नाही, तर उलट त्याची गती थांबवतो. या कादंबरीत विविध प्रसंगांमुळे कथानकास जी चालना मिळायला पाहिजे. ती मिळत नाही. प्रसंग असे या कादंबरीत विरळा. उदाहरणार्थ, कादंबरीची नायिका जी प्रियंवदा

तिच्या हकिगतीत प्रसंग असे आहेतच कुठे ? शारदा व बिंना या दोघींच्या आयुष्यात अधिक प्रसंग व गती आहे. या कादंबरीत गती आहे ती सर्व विचारांच्या प्रेरणेने आली आहे. परिस्थिती व माणसाच्या आकांक्षा यांतल्या झगड्याचे चित्र मात्र लेखकाने अप्रतिम वठवले आहे यात शंका नाही. अशा प्रकारच्या जोडप्यांचा इतिहास डॉक्टर केतकरांनी यानंतरच्या 'परागंदा' कादंबरीतही घराण्याच्या पूर्व-वृत्तांताची पार्श्वभूमी घालून ऐसपैस रंगवला आहे. अशा तऱ्हेची कादंबरीलेखनाची पद्धत आपल्याकडे नवी असली, तरी अमेरिकेत ती रूढ आहे, असे त्यांनी 'परागंदा'च्या प्रस्तावनेत म्हटले आहे. यानंतरच्या कादंबऱ्या मात्र अधिक स्वतंत्र व शुद्ध केतकरी वळणाच्या झाल्या आहेत.

## प्रौढविवाह व पुनर्विवाह

१८९४ च्या सुमारास प्रौढविवाह व पुनर्विवाह हे जे समाजात जिव्हाळ्याचे किंवा टीकेचे विषय म्हणून समजले जात, त्यांवर शास्त्रीय पद्धतीने विचार केल्यास काय सार काढता येईल ते डॉ० केतकरांनी दाखविले आहे. अर्थात प्रौढविवाह, पुनर्विवाह इत्यादी बाबतीत स्त्री व तिचे शिक्षण यांना जास्त प्राधान्य आपल्या इकडील सामाजिक परिस्थितीमुळे आल्याने, या कादंबरीत स्त्रीपात्रांना महत्त्व आले आहे. परंतु वैजनाथशास्त्र्यांचे अतिकठोर आणि अहंमन्य असे तेजस्वी पात्र घालून सुधारक कादंबरीकार आपल्या स्त्रीपात्रांबद्दल जे अतिशय 'नरमाईचें स्त्रीदाक्षिण्ययुक्त धोरण' स्वीकारीत, त्याला डॉ० केतकरांनी पायबंद घातला आहे.

या कादंबरीत मुख्य टीका सुधारकांच्या धोरणावर आहे. राजकीय बाबतीत डॉ० केतकर टिळकपक्षाशी जास्त समरस होत. पण सामाजिक बाबतीत त्यांचे धोरण टिळकपक्षाप्रमाणे 'प्रतिगामी' नसूनही त्यांनी सुधारकांवर, जहाल करीत नसतील अशी टीका केली आहे. पुष्कळांचा समज त्यामुळे ते जहाल पक्षाचे आहेत असा झाला होता. पण तो समज खरा नाही. समाजसुधारणेबद्दल त्यांचे विचार लैंगिक मानसशास्त्र, जीविशास्त्र, इतिहास व तुलनात्मक संस्कृती यांचा अभ्यास केल्यामुळे सुधारकांच्या फार पुढे गेले होते. राजकीय सुधारणा, भाषेची सुधारणा आणि सामाजिक सुधारणा अशी त्यांनी त्यांची स्वतःची 'सुधारणात्रयी' बनवली होती. ('ज्ञानकोशमंडळाचा इतिहास', पृष्ठ १७). डॉ० केतकर समाजशास्त्रज्ञ होते. पाश्चात्य आणि हिंदू समाजांच्या तौलनिक अभ्यासामुळे त्यांची मते काटेकोर बनली होती. पण ती सुधारक किंवा उद्धारक यांच्याप्रमाणे आग्रही नव्हती. ते दोन्ही बाजू नीट पडताळून पाहात. त्यामुळे काही लोकांना त्यांची मते फारच पुढे गेलेली वाटत, तर काही बाबतीत ते मागासलेले आहेत असे कित्येकांचे म्हणणे असे. डॉ० भांडारकरांनी त्यांची मते वाचून 'हें लिहिण्याचें धैर्य मलाहि झालें नसतें' असे उद्गार काढले ('माझें बारा वर्षांचें

काम ऊर्फ ज्ञानकोशमंडळाचा इतिहास', पृष्ठ २४). उदाहरणार्थ, पुनर्विवाहाबद्दलच पाहा. या पुस्तकात त्यांची ही दोन्ही प्रकारची मते जितक्या स्पष्टपणाने मांडली गेली आहेत, तितकी त्यांच्या पुढच्या कादंबऱ्यांत ('ब्राह्मणकन्या' सोडल्यास) मांडली गेलेली नाहीत. सुधारकांवर ते वारंवार उसळून पडले आहेत, याचे कारण ते पुनर्विवाहाच्या विरुद्ध होते म्हणून नव्हे. जीविशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणे प्रत्येक तरुण स्त्री व पुरुष यांना ती अविवाहित असल्यास एकमेकांस आकर्षित करण्याचा नैसर्गिक हक्क आहे. ती तरुण रक्ताची गरज आहे आणि ती भागलीच पाहिजे. तेव्हा विधवेने लग्न केल्यास हरकत काय? (पृष्ठ ३९)—असे त्यांचे विचार होते. पुनर्विवाह बहुतेक प्रौढपणीच होत असतात. प्रौढविवाहास विवाहपूर्व अनुनयाची आवश्यकता फार आहे. आणि प्रचलित पद्धतीत तर अनुनयास फाटा दिलेला आढळतो. वाटेल त्या विधवेस वाटेल त्या विधुराशी सुधारक एकत्र आणू पाहातात. लग्नापूर्वी स्त्रीपुरुषांची मैत्री किंवा सहवास होऊ द्यावा, या गोष्टीला त्यांची फारशी संमती नसते. त्यांच्या नीतिकल्पनेला त्यामुळे धक्का बसतो. यामुळे सुधारकांच्या बिनधाडसी धोरणाचा डॉ० केतकरांना राग येई, व म्हणूनच बिंबाबाई व हरिभय्या यांचा चोरटा पण उत्तान शृंगार त्यांनी बेधडक लोकांपुढे मांडला; (१९१६, किंबहुना १९२६, साली कादंबरीत सहसा चुंबनाचे वर्णन देण्यात येत नसे.) व वर असे लिहिले की, त्यांनी केले ते सारे ती दोघे लग्न करणार असल्यामुळे क्षम्यच नव्हे तर स्वाभाविक आहे. लग्न करण्याचा हेतू नसताना जर कोणी असे वर्तन केले तर ते मात्र दोषास्पद आहे. रानड्यांच्या सुधारकी बाण्याची टीका ज्यात ओतप्रोत आहे, पण ज्यात पुनर्विवाहाची तरफदारी शास्त्रीय दृष्टीने करण्याची एकही संधी फुकट दवडलेली नाही, अशा या दुहेरी पेचात वाचकाला टाकून त्यांनी जे प्रेमशास्त्राचे नानाविध धडे जरासुद्धा भीड न ठेवता, आणि त्यातल्या त्यात १८९८ च्या पूर्वीचा काल घेऊन दिले आहेत, त्याने कोणीही वाचक बिचकूनच जाईल. किंबहुना, वाचकाला आडदांडपणे आश्चर्याचे व जिज्ञासेचे धक्के पानोपानी देणे हे डॉ० केतकरांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य आहे.

विधवांचा कळवळा हे सुधारकांच्या चळवळींचे मोठे ध्येय होते. रानडे, भांडारकर, आगरकर व पुढे कर्वे यांनी त्या बाबतीत जे कार्य केले त्याचा मोठेपणा कोणीही नाकबूल करीत नाही. खुद्द डॉ० केतकरांनाही त्या व्यक्तींबद्दल अनादर नाही. 'कर्व्यांसारखें कार्य दीर्घकाल लोकविरोधाला न जुमानता मला करतां आलें तर मी धन्य होईन' असे उद्गार त्यांनी ज्ञानकोशमंडळाच्या इतिहासात काढले आहेत. पण विधवाशिक्षणाचा फारसा उपयोग विधवांची स्थिती सुधारण्यात झाला आहे, असे आपणांस वाटत नाही, हे विधान त्यांनी शारदाबाईच्या तोंडी घातले आहे. विधवांचे पोळपाट-लाटणे जाऊन त्यांना मास्तरणीची आठदहा रुपयांची नोकरी मिळाली यात त्यांचे आर्थिक किंवा सामाजिक हित काय वाढले? उलट, दर्जामुळे राहाणीचा व

कपड्यालत्त्यांचा खर्च वाढला. नोकरीसाठी वरिष्ठ पुरुष त्यांचा वाटेल तसा उपयोग करून घेतात. अर्थात शील ठेऊन नोकरी करणे जवळजवळ अशक्यच होत आहे (पृष्ठ ६८), असे शारदाबाई म्हणतात. भावना बाजूला सारल्या तर डॉ० केतकरांचे म्हणणे एक प्रकारे खरे नाही असे कोण म्हणेल?

प्रियंवदेच्या तोंडी त्यांनी पुरुषी धर्मशास्त्राची टिंगल करून मातृसत्ताक पद्धतीच्या एका अंगाचे विवरण केले आहे. किती सुधारकांना १९१६ साली हे विचार पटण्यासारखे होते? आणि हा सर्व खटाटोप डॉ० केतकरांनी कशाकरता केला? तर त्यांना विवाह व प्रेम यांबद्दलचे आपले विचार लोकांपुढे मांडायचे होते. समाजाच्या नीतीला, बुद्धीला व आरोग्याला जी कीड लागली आहे ती काढून, त्यांना चिरस्थायी स्वरूप आणायचे झाल्यास अगदी आधुनिकातली आधुनिक शास्त्रीय पद्धती अंगिकारून आणि आपली परिस्थिती पाहून विचार करा; पाश्चात्यांचे अंध अनुकरण करण्यात धोका आहे. स्वैर प्रेम नको, पण ज्या प्रेमाला लग्नाचे दृढबंधन आहे, असे प्रेम अवश्य हवे;—असे ते म्हणत. "प्रेमाची अत्युच्च कल्पना म्हणजे सायुज्यतेची होय. सायुज्यता साध्य होण्यासाठी एक व्यक्ती साध्य-रूप असली पाहिजे आणि दुसरी साधक-रूप असली पाहिजे. आपलें ध्येय-रूपत्व कायम ठेवण्यासाठीं नवऱ्यानें नेहमी प्रयत्न करीत राहणें आणि तें अंतर काढून टाकण्यासाठीं स्वतःच्या मनास, वाचेस आणि आचारास उच्च तऱ्हेची शिस्त लावून साधकानें साध्याशीं सायुज्य संपादन करण्यास निकराचा प्रयत्न केला पाहिजे. या प्रकारच्या खटपटींत पति-पत्नी-प्रेम उत्कर्षास पावतें आणि कवीस, कादंबरीकारास आणि नीतिविषयक तत्त्ववेत्त्यास मोहक होतें. पतिपत्नी-प्रेमाची कल्पना केवळ समानतेसंबंधीं उखाळ्यापाखाळ्या काढणाऱ्या, संस्कृतच्या ऐवजीं फ्रेंच शिकणाऱ्या अर्वाचीन अल्पवयस्क अविवाहित विदुषींस होणार नाहीं." थोडक्यात म्हणजे डॉ० केतकर 'प्रेमाचे भाष्यकार' आहेत. या सर्व मांडणीत दोष एवढाच की, विषय मांडण्यास लागणारा बुद्धीचा समतोलपणा व भावनांची श्रद्धा हे गुण डॉ० केतकरांमध्ये भरपूर असले, तरी अशा विषयामध्ये मार्मिकपणा निर्माण होण्यास जे भाषेचे सौष्ठव व सूचकत्व लागते त्याचा त्यांच्यापाशी अभाव आहे आणि त्यामुळे छिद्र नसलेल्या मण्याप्रमाणे त्यांच्या विचारांचा फायदा व्यवहारात लोकांस मिळू शकला नाही. त्याच्या कल्पनांचा प्रसार झाला नाही. भावनांचा ओलावा व भाषावैभव असल्यामुळेच 'गद्धे गणपतराव' (हे डॉ० केतकरांनी केलेले गणपतरावांचे वर्णन) निर्माण करणारे हरिभाऊ आपटे समाजात विचारक्रांतीस मदत करू शकले. ती मदत डॉ० केतकरांना कादंबरीच्या द्वारा करता आली नाही.

### प्रादेशिक कादंबरी

ही कादंबरी प्रादेशिक आहे. डॉ० केतकरांचे परिस्थितीचे ज्ञान सूक्ष्म आणि

निरीक्षण हेतुपूर्वक व निःपक्षपाती असल्यामुळे गोंडवनातील म्हणजेच नागपूरच्या भागातील सामाजिक परिस्थितीचे दिग्दर्शन उत्कृष्ट झालेले आहे. मराठीत तर राहोच, पण इंग्रजीतसुद्धा ज्या प्रादेशिक स्वरूपाच्या कादंबऱ्या आहेत त्यांमध्येदेखील 'गोंडवनांतील प्रियंवदे'चा नंबर बराच वर लागेल. प्रादेशिक कादंबरी म्हणून मराठीत तर ती श्रेष्ठच आहे. खरे म्हटले असता वास्तवता हवी, निरीक्षण हवे, असे म्हणणाऱ्यांनासुद्धा पुष्कळ वेळा हे अतिसूक्ष्म निरीक्षण केवळ त्यात असलेल्या माहितीच्या आणि मानवी व्यवहाराच्या बारीकसारीक खोचांच्या तपशिलामुळे अपेक्षेच्या पलीकडे मोठे वाटते. ते पुष्कळांना पचत नाही व रुचत पण नाही. पुष्कळ जण म्हणतात की, हे वर्णन समाजशास्त्रात घाला हवे तर, पण कादंबरीत कशाला? डॉ० केतकरांचा स्वतःचा या बाबतीतला निर्णय फार मनोरंजक व कित्ता घेण्याजोगा आहे. ज्ञानकोशमंडळाच्या इतिहासात ते म्हणतात की, 'लोकांची तक्रार असत्याबद्दल नसून पुष्कळ वेळां सत्य दाखविल्याबद्दल जास्त असते. चांगल्या गोष्टीसुद्धा वस्तुस्थितीप्रमाणे दाखवलेल्या त्यांना रुचत नाहींत.' (परिशिष्ट, पृष्ठ १६८) डॉ० केतकरांचे प्रादेशिक परिस्थितीचे वर्णन करण्याचे सामर्थ्य कसे आहे ते पाहा. तहसिल्दार व नायब तहसिल्दार अगदी कायदेशीरपणे पैसे कसे खातात ते दुसऱ्या कोणत्याही कादंबरीकाराने अजून दाखविले नाही. सिरोंचा भागातल्या मागासलेल्या, दारिद्र्याने पीडित आणि तीन भाषा नांदत असलेल्या जंगली मुलुखाचे व तिथल्या दीन जनतेच्या मूक वेदनांचे वर्णन खरोखर फार चांगले वठले आहे. त्याचप्रमाणे रायपूर-नागपूरच्या जनतेची अभिरुची कशी आहे, पुण्यामुंबईकडले ब्राह्मण नागपुरी ब्राह्मणांत हळूहळू कसे मिसळून गेले ही कथा, मालगुजाराच्या इतमामाचे महत्त्व, भोसला मिल्सचा कारभार, नागपूरच्या मंडळींची पुण्यामुंबईकडल्या काही 'थोतांडी विद्वानांची व्याख्यानांत टवाळी करून करमणूक करून घेण्याची प्रवृत्ती'—या सर्व गोष्टी उत्तम निरीक्षणाच्या द्योतक आहेत. प्रादेशिक कथा लिहिताना त्या प्रदेशातल्या माणसांच्या खाचाखोचा व बाहेरच्या प्रांतांतील अनेक गोष्टींचे उल्लेख क्षम्यच समजले पाहिजेत. या कादंबरीची पार्श्वभूमी प्रादेशिक असली, तरी तिच्यात गोवलेले विषय इतके मोठे आहेत की, त्यांच्यामुळे ही कादंबरी केवळ नागपुरी न राहाता महाराष्ट्रीय स्वरूपाची झाली आहे. विशेषतः नागपूरबाहेरचे वैजनाथशास्त्र्यांसारखे पात्र घालून डॉ० केतकरांनी या कादंबरीतल्या सर्व विचारांना गांभीर्य आणले आहे.

### प्रियंवदा

या कादंबरीचे वैशिष्ट्य हे आहे की, हिच्यातली पात्रे डॉ० केतकरांच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणे त्या त्या वर्गाची केवळ प्रतीक म्हणून नाहीत. ती अगदी

वैशिष्ट्यपूर्ण व आपापल्यापरी आदर्श अशी आहेत. (विशेषतः प्रियंवदेसारखे पात्र तर डॉ० केतकरांनी श्रद्धापूर्वक रंगवले आहे). तरी पण त्या सर्वांना सामान्य माणसांना हव्याहव्याशा गोष्टींचा मनापासून ध्यास आहे. डॉ० केतकरांची भाषा इतकी बोजड नसती, तर खरोखरच त्यांची पात्रे वाङ्मयात चिरंजीव ठरली असती. प्रियंवदा रसिक, विनोदी, (प्रसंगी चावट व टवाळ पण) आणि सौंदर्याने व तारुण्याने मुसमुसलेली आहे. तिचे पतिप्रेम सायुज्यता पावलेले आहे. तिची नवऱ्याला लिहिलेली पत्रे, तिचा मनसोक्त रोमान्स, तिचे स्त्रीपुरुषसंबंधाबद्दलचे खुले विचार, तिचा प्रेमी जीवांबद्दलचा कळवळा, यामुळे ती 'प्रेमाची भाष्यकार' झाली आहे. डॉ० केतकर म्हणतात त्याप्रमाणे 'अर्वाचीन कादंबऱ्यांतील आणि गोष्टींतील नवऱ्याला चहा पाजण्यांतच केवळ रोमान्स मानणाऱ्या मुंबईच्या, किचकट आणि स्वतः चहा पिऊन दुर्बल झालेल्या कादंबरीकारांच्या डोक्यांतून निघालेल्या नायिकांप्रमाणें ही प्रियंवदा नव्हती.' (पृष्ठ ४) प्रियंवदेचे चित्र खरोखरच रमणीय आहे, पण भाषेमुळे ते हवे होते तितके आल्हाद-दायक वठले नाही. मात्र तिच्यामुळे सर्व कादंबरीत विनोदी वातावरण पहिल्यापासून शेवटपर्यंत भरलेले आहे.

## विभावरी-वाङ्मयाची पूर्वचिन्हे

गंभीर, अंतर्मुख शारदाबाई बिंबाबाईस उद्देशून म्हणते, की आजन्म कौमार्या-पेक्षा वैधव्य बरे. पुढे ती म्हणते की, 'मी खरोखरच सांगतें कीं तूं माझ्यापेक्षां अधिक सुखी आहेस. मी पुस्तकें वाचतें, प्रसंगीं वर्तमानपत्रांतून लिहितें, कधी कधी व्याख्यानेंही देतें. तथापि या सर्वांच्यामुळें माझ्या आयुष्याला स्पष्ट हेतू उत्पन्न होत नाहीं. आम्हीं आयुष्यांत करावयाचें काय? आम्ही स्त्री-शिक्षण देणार; पण आम्ही स्त्रीशिक्षण देणार म्हणजे तरी काय करणार? स्त्रियांचें जीवित माझ्यासारखींच्या प्रयत्नानें खरोखरच अधिक सुखकर होत आहे कीं काय असा संदेह वारंवार उत्पन्न होतो...माझ्या आयुष्याला देशकल्याणापेक्षां अगर समाजकल्याणापेक्षां अधिक स्पष्ट हेतू पाहिजे' इत्यादी (पृष्ठ ३१-३२). शारदाबाईंचे हे उद्गार व तिला प्रथमदर्शनीच वैजनाथशास्त्र्यांबद्दल वाटणारे आकर्षण ही सर्व विभावरी-वाङ्मयाची पूर्वचिन्हे होत. फक्त विभावरीच्या नायिका परिस्थितीची बाहुली आहेत. शारदाबाई परिस्थिती-बद्दल मुळीच तक्रार करताना दिसत नाहीत; भरपूर व मनापासून काम करतात. त्या जिज्ञासू असून समाजकार्याची आवड असणाऱ्या आहेत. त्यांच्यापेक्षा तीव्रतर जिज्ञासा असलेले आणि इतिहाससंशोधनात मग्न झालेले वैजनाथशास्त्री ऊर्फ 'जोगडा' हा त्यांना श्रीमंत व सुशिक्षित तरुणांपेक्षा योग्य सहचर वाटतो व त्या शास्त्रीबोवांशी विवाहबद्ध होतात.

## राजवाड्यांचे चित्र?

वैजनाथशास्त्र्यांचे वर्णन 'तो मनुष्यरूपी जड पदार्थांचा गोळा, अगर प्रखरता, तेजस्विता, सर्वग्राहकता, आणि भयदायकता या बाबतींत साक्षात वैश्वानराची बरोबरी करणारा असा अरसिक वैजनाथशास्त्री' असे डॉ० केतकरांनी केले आहे. वैजनाथशास्त्र्यांचे पात्र इतिहासाचार्य राजवाड्यांवरून रंगविले आहे यात शंका नाही. या पात्राबद्दल डॉ० केतकर स्वतः 'गांवसासू'च्या प्रस्तावनेत म्हणतात, "या तऱ्हेचा नमुना प्रत्येक देशांत आहे. पण अशीं माणसें महाराष्ट्रांत फारच थोडीं नजरेस येतात. त्यामुळें तें पात्र विशिष्ट व्यक्तीस अनुलक्षून आणलें असा लोकांचा समज झाला. जर प्रत्यक्षावर पात्ररचना झाली नसली तर त्या पात्राला असत्यता उत्पन्न होते. यासाठीं प्रत्यक्षावरच पात्ररचना केली पाहिजे. व्यक्तीला बरोबर लागेल असें वर्णन देण्याच्या निषेधाच्या पाठीमागे साहित्यशास्त्रीय तत्त्व नसून कातडी बचावण्याचें तत्त्व आहे." राजवाड्यांचे चरित्रकार श्री० भा० वा० भट यांनी राजवाड्यांच्या चरित्रात याबाबत एक मजेदार हकिगत वर्णन केली आहे. ते म्हणतात की, ही कादंबरी वाचून जदुनाथ सरकारांची अशी समजूत झाली की, राजवाडे खरोखरच पुनर्विवाह करणार होते, व तसे त्यांनी लिहिलेदेखील. राजवाड्यांचे वर्णन देऊन त्यांचे हे प्रेमप्रकरण रंगविण्यात डॉ० केतकरांनी मर्यादातिक्रम केला आहे, असे कित्येकांचे मत आहे. मला तसे वाटत नाही. कारण राजवाड्यांबद्दल डॉ० केतकरांना फार आदर होता व तो या कादंबरीतदेखील व्यक्त झाला आहे. (शीलवतीबाईंशी याबाबतीत बोलत असता त्या म्हणाल्या, "राजवाड्यांचा संताप व त्यांचे एकाकी जीवन पाहून डॉ० केतकरांना दया येई. 'त्यांच्या कर्तृत्वाला साजेलशी गृहिणी त्यांना लाभती तर ते इतके विक्षिप्त झाले नसते; निदान संतापी तरी बनते ना.' असे ते वारंवार म्हणत.") अर्थात विरागी वैजनाथशास्त्र्यांना संसारी बनवताना डॉ० केतकरांनी आपले त्यांच्याबद्दलचे एक स्वप्न कथेत जोडून दिले आहे. वैजनाथशास्त्री सामान्य स्त्रीकडे आकर्षिले जाणे शक्य नव्हते. ते उपजत गुरू होते. त्यांना शिष्यांचीच वाण होती. असा शिष्य त्यांना शारदाबाई मिळाल्या. आयुष्याची भग्न चित्रे दाखविणे डॉ० केतकरांना आवडत नसावे, असे त्यांच्या कादंबऱ्यांवरून वाटते. त्यांची सर्व पात्रे स्वतःचे साध्य परिश्रमाने प्राप्त करून घेताना दिसतात.

## चर्चात्मक संवाद

डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांतल्या संवादांचे वैशिष्ट्य म्हणजे ते बहुतेक दोनच पात्रांचे संवाद, व पुष्कळ वेळा तर एकाच माणसाचे लांबलचक भाषण, असतात. हे सर्व संवाद वामन मल्हार जोशी यांच्या कादंबऱ्यांतल्या संवादांप्रमाणे चर्चेच्या स्वरूपाचे असतात. त्या बाबतीत केतकरांची पात्रे हरिभाऊंच्या गणपतरावाला-

देखील सहज हरवतात. हे त्यांचे वैशिष्ट्य व कादंबरीत प्रसंग फार थोडे, यामुळे मला त्यांच्या कादंबऱ्यांना रूढ अर्थाने कादंबऱ्या न म्हणता 'सामाजिक विचारकथा' म्हणावेसे वाटते. परंतु त्या कथा आहेत हे मात्र नक्की. हे प्रबंध निश्चित नव्हत. या साऱ्या भाषणांचे निबंधात रूपांतर केले जाणार नाही. ते निबंध केवळ सूत्ररूप राहातील. जिवंत पात्रे व सत्य सामाजिक परिस्थिती असल्यामुळेच या सामाजिक प्रमेयांना आधार मिळालेला आहे. ही केवळ उदाहरणे किंवा 'केस हिस्टरीज' नव्हेत. त्यातल्या घडामोडींचा व पात्रांचा संबंध दूरवर पोचणारा व गुंतागुंतीचा आहे. काल्पनिक कथेशिवाय त्याला रूपबंधच प्राप्त होणार नाही. आणि म्हणून प्रदीर्घ कथा-कथानकांच्या या विदग्ध साहित्याला कादंबरीशिवाय दुसरा कोणताही घाट जुळणारा नाही.

दोन

# परागंदा

'परागंदा' ही डॉ० केतकरांची दुसरी कादंबरी. ही त्यांनी 'विद्यासेवका'त क्रमशः लिहून १९२६ साली प्रसिद्ध केली. 'प्रियंवदे'चा आणि 'परागंदा'चा प्रसिद्धिकाल एकच असला, तरी अमेरिकेसारख्या सुधारलेल्या व ऐश्वर्यशाली देशात कादंबरीचे बरेचसे कथानक तयार झाल्यामुळे या कादंबरीत अधिक तात्त्विक व विस्तृत स्वरूपाच्या विचारांना जास्त अवसर सापडला आहे. अर्थात या कादंबरीत भारतीय समाजाविषयी, म्हणजेच हिंदू समाजाविषयी, डॉ० केतकरांचे विचार अधिक स्पष्ट स्वरूपात मांडलेले दिसतात. या कादंबरीच्या 'ग्रंथरचनेचें श्रेय' कंपॉझिटरच्या निकडीला आहे, स्वतःच्या स्फूर्तीला फारसे नाही, असे डॉ० केतकरांनी प्रस्तावनेत सांगितले आहे. अशा निकडीमुळे वाङ्मयाची निपज जरी भरपूर व वेळेवर झाली, तरीदेखील घाईमुळे येणारे विसंगतीचे व पुनरुक्तीचे दोष बऱ्याच प्रमाणात अशा लिखाणात राहातात. आणि पुष्कळ ग्रंथकार ते काढून टाकण्याचा आळस करतात. डॉ० केतकरांच्या बाबतीत असेच झाले आहे. त्यामुळे कादंबरीत कथानकाचा एकसंधीपणा आणि प्रवाह पुष्कळदा अडल्यासारखा वाटतो. कित्येकदा तुकडे ओढूनताणून जोडल्याचा पण भास होतो. उदाहरणार्थ, प्रो० गोगट्यांचे सबंध आख्यान असे अधांतरीच लटकते राहिले आहे. लाला गजपतरायांचे अत्यंत प्रभावशाली पात्रसुद्धा कथानकात थोड्याशा चर्चेपलिकडे काहीच उपयोगाचे नाही. अर्थात हे पात्र अधिक संक्षेपात लेखकाला देता आले असते. उलट, ते विस्ताराने देऊन वर त्या पात्राची कथानकातली आणि

सार्वजनिक आयुष्यातलीदेखील निष्क्रियताच जास्त प्रमाणात दाखवली गेल्यामुळे थोरांची कुचेष्टा करण्याचा अपवाद मात्र निरर्थक लेखकास सोसावा लागला. प्रमाण-हीनतेचा दोष लेखकाला दोनचारदा आपले लिखाण वाचून पाहिल्यानंतर सहज काढून टाकता आला असता.

## कादंबरीचे तंत्र

'प्रियंवदे'मुळे डॉक्टरांचे मार्मिक लेखकांकडून जे कौतुक झाले त्यामुळे डॉ० केतकरांनी त्या कादंबरीतले आपले तंत्र फिरून या कादंबरीत अधिक मुक्त हस्ताने वापरले आहे. कोणते ते तंत्र? त्यांची पहिली कादंबरी मराठीत सामान्यतः लोकप्रिय झालेल्या कादंबऱ्यांच्या साच्यात बसणारी नव्हती, म्हणजे ती कादंबरीच्या 'शास्त्रीय नियमां'नी तयार झालेली नव्हती, हा आक्षेप डॉ० केतकरांच्या कानी पडला होता. नायकनायिकेचे प्रेम, खलनायक, कथानकाची गुंतागुंत, कौटुंबिक रहस्ये वगैरे ललित भाषेच्या गुंफणीत बसलेले कथासाहित्य म्हणजे कादंबरीचा मुख्य आधार असे साधारणपणे समजण्यात येते. इंग्रजी कादंबरीकारांच्या पावलावर पाऊल टाकूनच हरिभाऊ, नाथमाधव यांच्यासारख्या कादंबरीकारांनी विपुल कथावाङ्मय निर्माण केले. त्यांच्या कादंबऱ्या वाचून त्यांचीच अभिरुची जनतेत निर्माण झाली. डॉ० केतकरांची अभिरुची पुढे जरी पूर्ण स्वतंत्र झाली आणि 'गावसासू'च्या प्रस्तावनेत "इंग्रजी कादंबरीतलें तंत्र तेंच तेवढें खरें तंत्र काय? आणि माझें स्वतंत्र तंत्र म्हणून असूंच नये काय?" म्हणून जरी वाचकांपुढे त्यांनी आपली कैफियत सादर केली असली, तरी पहिल्या दोन कादंबऱ्यांत रचनेच्या बाबतीत त्यांनी युरोपीय वाङ्मयातल्या विशिष्ट कथाप्रकाराचे एक तंत्र अवलंबिले आहे. तेव्हा त्यांच्या कादंबऱ्या तंत्रबद्ध नाहीत असा आरोप त्यांच्यावर करणाऱ्या टीकाकारांना या नव्याच तंत्राची ओळख डॉ० केतकरांनी करून दिली आहे. याबाबतीत कुठल्या पाश्चात्य कादंबरीकारांचा प्रभाव आपल्या या रचनाप्रकारावर पडला ते डॉ० केतकरांनी कुठेच सांगितलेले नाही. तेव्हा पाश्चात्य वाङ्मयाच्या गेल्या दोनशे वर्षांच्या अफाट ललित वाङ्मयाच्या पसाऱ्यात अमूकच एका ग्रंथकाराशी किंवा वाङ्मयप्रकाराशी डॉ० केतकरांच्या या कादंबऱ्यांची तुलना करणे धाडसाचे ठरेल. डॉ० केतकरांप्रमाणे आपणही याबाबतीत मौन पाळणेच बरे. आणि म्हणूनच त्यांच्या तंत्राचा मूळ आधार शोधण्यापेक्षा त्यांची त्या तंत्राबद्दलची कल्पना काय हे त्यांच्याच शब्दांत समजून घेतलेले बरे. ते तंत्र असे : "जगांत जे व्यक्तींचे संबंध लेखक पाहातो ते संबंध कथानकाचे अंश होत. त्यांची एक-मेकांशी जुळणी झाली म्हणजे कथानक तयार होतें या साध्या नियमानें प्रस्तुत गोष्ट तयार झाली आहे. एखाद्या ग्रामाचा किंवा मनुष्यसमूहाचा आयुष्यक्रम सांगणाऱ्या यूरोपीय वाङ्मयांत ज्या कादंबऱ्या आहेत, त्यांमध्यें कथानकाची गुंतागुंत वरीच

कमी असते. एक मोठा वृक्ष व त्याचीं अनेक बांडगुळें व त्यांस वेष्टिणाऱ्या पण एकमेकांत गुंतलेल्या अशा वनस्पतिसमुच्चयाशीं त्या कादंबऱ्या तुल्य नसून, एकमेकांशीं ज्यांच्या फांद्या अडकल्या आहेत अशा स्वतंत्र बुंधाच्या वृक्षराजीशीं त्या तुल्य असतात. या प्रकारच्या कादंबऱ्यांशीं ज्यांस परिचय नाहीं त्यांस 'प्रियंवदा' ही कादंबरी 'शास्त्रीय नियमांनीं' तयार झालेली नाहीं, असें वाटलें. तथापि ती कादंबरी कांहीं निराळ्या प्रकारचीच आहे हें कांहीं मार्मिक लेखकांनीं ओळखलेंच. या एका गोष्टींत 'प्रियंवदा' आणि 'परागंदा' या दोन्ही कादंबऱ्यांत साम्य आहे" (प्रस्तावना) सोप्या भाषेत डॉ० केतकरांचे म्हणणे मांडायचे झाल्यास, या नेहमीप्रमाणे कौटुंबिक वातावरण असलेल्या कादंबऱ्या नव्हेत. एका जागी राहिल्यामुळे बिननात्याची माणसेसुद्धा एकमेकांत गुरफटली जातात. त्याचप्रमाणे एकाच परिस्थितीतली माणसेसुद्धा एकमेकांच्या आयुष्यावर गंभीर परिणाम करू शकतात. आता समवयस्क तरुणतरुणी एकत्र आल्यावर प्रियाराधन व विवाह या गोष्टी तर ओघाने व उघडपणे होतातच. पण स्त्री-पुरुष-संबंधापलीकडचीसुद्धा नाना तऱ्हेची भावनांची व आकांक्षांची बंधने वेगवेगळ्या वृत्तींच्या व पेशांच्या माणसांना एकत्र बांधू शकतात. या कादंबरीत राजकीय आकांक्षा हे फार मोठे आकर्षण या कादंबरीतल्या प्रमुख पात्रांच्या आयुष्याला कलाटणी देताना दिसते. त्याप्रमाणे डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांत घरापेक्षा घराबाहेरचे वातावरण माणसाच्या आयुष्यावर बरेवाईट परिणाम कसे घडवून आणते ते दाखविले आहे. उदाहरणार्थ, याच कादंबरीत कामत किंवा सरंजामे व परभणीकर यांच्या कौटुंबिक गोष्टींविषयी प्रसंगी खल केला असला, तरी कुटुंबातील अंतःस्थ घडामोडींपेक्षा बाहेरच्या घडामोडींचा व्यक्तीच्या मनावर व पर्यायाने कर्तृत्वावर कसा परिणाम होतो तेच प्रामुख्याने दाखविले आहे. मुख्यतः चरितार्थाचे साधन आपलेसे करून घेणे आणि अविवाहित असल्यास विवाह मनाजोगता घडवून आणणे या दोन गोष्टींना लेखकाने प्राधान्य दिले आहे. डॉ० केतकरांना आपल्या लेखनाच्या चाकोरीची पूर्ण जाणीव आहे. "अधिक धडपड करणारा अमेरिकेंतील भारतीय (म्हणजे हिंदू) समाज आणि त्याच्या मनांत येणारे विचार यांचें दिग्दर्शन यांत आहे" असे ते म्हणतात. भारतीयांच्या अमेरिकेतील अनुभवांचे हे पूर्ण चित्र नाही, असेही ते सांगतात. ध्येयहीन, भटके, अपमानित आणि मजुरी करून जगण्याऱ्या भारतीयांचे चित्रण या कादंबरीत मुळीच नाही. हे चित्र फक्त विद्याविभूषित आणि स्वतःच्या समाजाची आर्थिक, सामाजिक व राजकीय स्थिती सुधारण्याकरिता झटणाऱ्या वर्गाचे आहे. 'प्रियंवदे'प्रमाणे या कादंबरीतले प्रत्येक पात्र सत्प्रवृत्त असून आपले उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी धडपडत आहे. धडपडीनंतर अपेक्षित फल डॉ० केतकर नेहमीच आपल्या पात्रांच्या पदरात टाकतात.

## निकडीचे सामाजिक प्रश्न

डॉ० केतकरांची लेखणी वाग्विलासासाठी जन्मली नव्हती. त्यांची भूमिका ते 'संकीर्ण लेखां'च्या प्रस्तावनेत म्हणतात त्याप्रमाणे शिक्षकाची होती. त्यांचा कुठलाही लेख उगीच लिहिल्यासारखा नाही. त्यामागे हेतू आहे. लोकशिक्षण व सामाजिक जागृतीचे मोठे ध्येय त्यांच्यासमोर असे. या त्यांच्या सामान्य धोरणाप्रमाणे आपल्याला जे काही सांगायचे, जो आदेश द्यावयाचा, तो जास्तीत जास्ती पसरावा आणि अगदी अल्पशिक्षितालासुद्धा कळावा अशा कळकळीने त्यांनी बहुजनसमाज कादंबरीप्रिय आहे म्हणून कादंबऱ्यांच्या रूपाने आपले विचार मांडण्यास सुरुवात केली. त्या दृष्टीने या कादंबरीच्या मुखपृष्ठावर दिलेला त्यांनी स्वतःच रचलेला संस्कृत श्लोक महत्त्वाचा आहे. तो असा :

> **"जीवने शासने भेदाः । परजातिसमागमः ।**
> **विविधा भौतिका भावाः । उपसंस्कृतिकारकाः ॥"**

'जीवन आणि शासन यांच्यांतले भेद, वेगवेगळ्या जातींचे विवाहरूपानें झालेलें मिश्रण, हरतऱ्हेचे व्यवहार आणि अशीच संस्कृतीचीं उपांगें' यांचा विचार आपण कादंबरीत केला असल्याचे त्यांनी सांगितले आहे. अर्थात मनोविश्लेषण किंवा कथानकापेक्षा समाजशास्त्रीय सूत्रांनाच त्यांनी उघड या कादंबरीत व इतरही कादंबऱ्यांत जास्त प्राधान्य दिले आहे. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्या खऱ्याखुऱ्या समाजशास्त्रीय कादंबऱ्या आहेत.

डॉ० केतकर हे संस्कृतीचे अभ्यासक होते. एवढेच नव्हे तर ते 'भारतीय समाज' म्हणून जेव्हा म्हणतात तेव्हा तो शब्द ते स्थूल अर्थाने हिंदू समाजालाच अनुलक्षून वापरतात. हा समाज पुराण संस्कृतीने बद्ध व पाश्चात्य संस्कृतीने पराभूत अशा परिस्थितीत असलेला डॉ० केतकरांना दिसला. पण हा समाज काही अंशी बुद्धिजीवी आहे. त्याला परवशतेची लाज वाटते, चीड येते. त्याच्या आकांक्षा जागृत आहेत. या समाजाचा विस्तार एवढा अवाढव्य आहे व त्यातल्या जातींच्या 'लखोटबंद' पद्धतीमुळे कोणताही व्यवहार इतका अवघड झाला आहे की, हिंदू समाजात जवळजवळ राहाणाऱ्या दोन जातींना खरोखरच एकमेकांबद्दल खरी माहिती मिळणे दुरापास्त होते. अशा परिस्थितीत प्रत्येक इसम 'मी ब्राह्मण आहें, मी कायस्थ आहें, मी मराठा आहें' अशाच संभ्रमात जन्मभर वावरत असतो. 'मी हिंदी आहें, भारतीय आहें, पूर्वकालीन भारतीय संस्कृतीचा वारसा घेऊन जन्माला आलों आहें, आणि मला पाश्चात्य संस्कृतीच्या अनुषंगानें पण तिच्या पुढें मान न तुकवितां मला व माझ्या समाजाला अधिक सन्मानानें जगतां येईल असें कार्य शक्तीप्रमाणें करावयाचें आहे' ही जाणीव उत्पन्न व्हावी या आकांक्षेने प्रेरित होऊन डॉ० केतकरांनी ही

कादंबरी लिहिली. जातिनिष्ठ व्यक्तीने आपला संकुचित जात्यभिमान टाकून थोडी दूर दृष्टी टाकल्यास कितीतरी अगदी निकडीचे प्रश्न दृष्टीसमोर येतील व ते लहान-थोरांच्या कार्यक्षमतेला उत्तेजित करतील, हे उद्दिष्ट डॉ० केतकरांच्या नजरेसमोर होते. प्रो० गोगट्यांचे 'मी पूर्वी कोकणस्थ ब्राह्मण होतों, आतां हिंदी झालों आहें.' (पृष्ठ १२३) हे लक्षात ठेवण्याजोगे वाक्य आहे. याच भावनेभोवती सबंध कादंबरीची उभारणी झाली आहे.

## 'परागंदा' आणि समाजशास्त्र

आपण हिंदी आहो ही जाणीव परदेशातल्या माणसाला स्वाभाविकपणे जितकी होते तितकी मायभूमीतच जन्मभर राहून पुष्कळदा होत नाही. पण पुष्कळ तऱ्हेच्या राजकीय किंवा सामाजिक चळवळी मायभूमीत जितक्या आवेशाने चालू राहातात, तितक्या आवेशाने परप्रांतांत चालू राहात नाहीत, हेही तितकेच खरे आहे. मायभूमीवरील प्रीतीचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर 'परागंदा' समाजात कसे करता येईल, याबद्दलची डॉ० केतकरांची विशिष्ट मते या कादंबरीतल्या घटनांचा मुख्य आधार आहेत. 'गांवसासू' कादंबरीसुद्धा इंग्लंडमधल्या परागंदा भारतीय समाजाचेच चित्र आहे. पण ते चित्र व या कादंबरीतले चित्र यात फार फरक आहे. मुख्यतः या कादंबरीत डॉ० गोगटे, डॉ० सरंजामे व रघुनंदन कामत हे तिघेही भौतिक शास्त्रज्ञ असून समाजशास्त्रात पूर्णपणे रंगून गेलेले दाखविले आहेत. अमेरिकेत जाऊन भारतीयाने एक विशिष्ट प्रकारची समाजशास्त्र शिकण्याची दृष्टी प्राप्त करून घेतली आहे, ही गोष्ट या कादंबरीत प्रत्यक्षपणे सांगितली नाही, तरी अप्रत्यक्षरीत्या सूचित केली आहे. या कादंबरीत जी मोठी समाजशास्त्रीय चर्चा आली आहे तितकी 'ब्राह्मणकन्या' सोडल्यास डॉ० केतकरांच्या दुसऱ्या कादंबरीत आली नाही, अमेरिकेने समाजशास्त्राला दिलेले महत्त्व दिग्दर्शित करण्यासाठी व स्वतःचे त्या त्या विषयावरील विचार प्रकट करण्याच्या दुहेरी हेतूने डॉ० केतकरांनी कथानकाशी खरोखर संबंध नसलेली अशी चर्चा जवळजवळ व्याख्यानरूपाने (पृष्ठे १५६-१५८) वाचकाच्या गळ्यात बांधली आहे. परंतु हे करताना डॉ० केतकरांचे धोरण संधिसाधू लेखकाचे नव्हते. त्याच्यामागे मोठी कारणे होती. ती वैयक्तिक होती, तशीच सार्वजनिक पण होती. त्या कारणांचे मूळ राजकारणात व ब्रिटिशांच्या कारवाईत होते. ज्ञानकोश-मंडळाच्या इतिहासात डॉ० केतकरांनी नमूद केलेले या बाबतीतले विचार मननीय आहेत. ते असे : "१९१४ सालापर्यंत समाजशास्त्रीय, शासनशास्त्रीय, अर्थशास्त्रीय संशोधनबुद्धीचें शिक्षण देण्याची पद्धत इंग्लंडांत सुरू झाली नव्हती आणि त्यामुळें इंग्लिश युनिव्हर्सिट्यांतून बाहेर पडणारे पदवीधर किंवा तिकडून येणारे इंग्रज शिक्षक माझ्याइतके शिक्षणाचे नव्हते. तथापि

इकडील युनिव्हर्सिट्यांतून ते इंग्रज असल्यामुळें आणि संशोधनविद्येशीं अपरिचित असल्यामुळें संशोधनाच्या आवश्यकतेचा काल इकडे अजून आला नाहीं असें ते म्हणत आणि त्यांच्या तंत्रानें इतर लोक चालत." (पृष्ठ १२) समाजशास्त्राचा पद्धतशीर अभ्यास अमेरिकेत प्रत्यक्ष निरीक्षण व माहिती गोळा करून १९१० सालाच्या अगोदरपासूनच होत होता. १९१० सालापासून डॉ० केतकरांनी हिंदूंच्या जातिरचनेचा पद्धतशीर पण पुस्तकी अभ्यास करावयास सुरुवात केली. अमेरिकेत लैंगिक नीतीचे मूल्यमापन करण्याच्या निमित्ताने त्यांनी बरेचसे अवलोकन करून एका खेड्याचा अभ्यास केला. अमेरिकेतले वाङ्मय आंग्ल वाङ्मयापेक्षा अधिक खुले आहे. त्याचा मोठा परिणाम डॉ० केतकरांच्या विचारपद्धतीवर झाला आहे. डॉ० केतकरांचा कुठल्याही विषयावर चर्चा करताना दिसून येणारा धीटपणा, त्यांचा व्यक्तिविषयक टीकेतला निर्भीडपणा, नीतिविषयक प्रश्नांचा न संकोचता खल करण्याची प्रवृत्ती, ही सर्व अमेरिकन शिक्षणाची फळे आहेत. आमच्याकडे आता कुठे सर्व विषयांची चर्चा जरा मोकळेपणाने होऊ लागली आहे. डॉ० केतकरांच्या व त्यांच्या आधीच्या पिढीला डॉ० केतकरांनी वर सांगितलेल्या कारणांमुळे समाजशास्त्राची जवळून ओळख झाली नव्हती. मिल, स्पेन्सरसारख्या तात्त्विक समाजशास्त्रज्ञांवरच आमचे सर्व विद्वान भिस्त ठेऊन असत. समाजशास्त्राचे प्रात्यक्षिक जिथे इंग्लंडमध्येच फारसे लोकप्रिय नव्हते, तिथे ते इंग्लंडच्या दास्याखाली असणाऱ्या आमच्या मागासलेल्या देशात कसे माहीत असणार? तेव्हा अर्थातच डॉ० केतकरांनी जातिसंस्थेच्या आपल्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा खल जो प्रबंधात केला होता, तोच बऱ्याच वर्षांनंतर, म्हणजे एका तपानंतर, अधिक सुधारलेल्या आणि लौकिक स्वरूपात, सोपा करून या कादंबरीत मांडला आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे समाजशास्त्राच्या वाढीला अमेरिकन शिक्षणपद्धती ब्रिटिश पद्धतीपेक्षा अधिक अनुकूल होती, हा आपला अनुभवच त्यांनी (अमेरिकन पार्श्वभूमी घालून) या चर्चांच्या रूपाने प्रकट केला आहे, असे समजण्यास हरकत नाही. 'गांवसासू' कादंबरीत विलायतेची पार्श्वभूमी असली आणि समाजविषयक चर्चा हे डॉ० केतकरांच्या संवादाचे वैशिष्ट्य असले, तरीदेखील त्या चर्चेत त्यांनी कथेतल्या रसाच्या परिपोषाकडे अधिक लक्ष दिले आहे.

### गौण कथानक व प्रभावी व्यक्तिविशेष

समाजशास्त्रीय प्रश्नांना कळत न कळत प्राधान्य मिळाल्याने 'परागंदा'त कथानकाला स्वाभाविकच गौणपणा आला आहे. कथानकात एका विवाहित जोडप्याच्या पुनर्मीलनाची आणि दुसऱ्या दोन जोडप्यांच्या मिश्रविवाहांची हकिगत दिली आहे. या कादंबरीत मिश्रविवाहाचा प्रश्न प्रौढविवाहाच्या खालोखाल महत्त्वाचा गणला आहे.

डॉ० केतकर हे प्रेमविवाहाचे पुरस्कर्ते होते. प्रौढ वयाच्या स्त्रीपुरुषांचा एकमेकांच्या आवडीनावडी ओळखून झालेला विवाह फार इष्ट आहे आणि असे विवाह आपल्या सुशिक्षित तरुण मंडळीत सरसकट जमून यावे असे त्यांना वाटे. १९२६ पर्यंत महाराष्ट्रात प्रीतिविवाह फारसे प्रचलित नव्हते. त्यामुळेच पु० य० देशपांडे यांच्या विवाहाबद्दल डॉ० केतकरांना फार कुतूहल वाटे. आपल्याकडील शिकलेली प्रेमविवाहित जोडपी बोलतात कशी, कोणत्या भाषेत, इंग्रजीत की मराठीत, याबद्दल ते चौकसपणा दाखवीत. ('प्रतिभा', केतकर अंक १९३७, आ० रा० देशपांडे : 'डॉ० केतकरांच्या जुन्या व नव्या आठवणी') पाश्चात्य देशांत 'फ्लर्टिंग' नित्य व्यवहाराचा एक भाग असतो. स्त्रीपुरुषांची नीती न बिघडता एकमेकांचे सहवाससुख आणि बौद्धिक स्नेह कशा प्रकारे हस्तगत करून घेता येईल या विचारावरच या कादंबरीतील प्रेमिकांच्या पात्रांची रचना मुख्यतः झाली आहे. आणि म्हणूनच डॉ० मत्तमयूरी आपल्या हाताखालच्या रुक्मिणीला फ्लर्टिंगबद्दल आणि पाश्चात्य देशांतल्या स्त्रीपुरुषसंबंधाबद्दल सभ्य समाजात काय काय रीतिरिवाज असतात त्याबद्दल खुल्या दिलाने माहिती सांगताना आढळते. डॉ० मत्तमयूरीच्या या संभाषणामुळे आणि तिच्या व तिच्या पतीच्या प्रणयचेष्टांच्या भडक वर्णनांमुळे पुष्कळ सोवळे वाचक त्या वेळी बिचकून गेले यात शंका नाही.

'परागंदा'त रुक्मिणी व मत्तमयूरी, आणि गंगाधरपंत आणि गजपतराय ही महत्त्वाची पात्रे आहेत. बाकीची पात्रे याच पात्रांच्या लहानमोठ्या छाया आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. गजपतराय सोडल्यास बाकीची तीन पात्रे तर इतकी प्रभावी आहेत की, ती मराठी वाङ्मयात खरोखरीच फार मोलाची समजली पाहिजेत.

### रुक्मिणी आणि गंगाधर

रुक्मिणी ही गंगाधरपंत परभणीकरांची अशिक्षित पत्नी. त्याचे लग्न ती वयात येण्यापूर्वीच झालेले होते. त्या वेळी गंगाधरपंत इंटरमध्ये होते. गंगाधरपंतांचे कुटुंब जुन्या वळणाचे व 'सासुरवासा'च्या ठरीव कल्पना पुढे ठेवून वागणारे होते. लहानपणापासून गंगाधरपंत कुटुंबात समरस होऊ शकला नाही. व्यायमाचा षोक असूनही खाण्यास योग्य खुराक न मिळाल्यामुळे त्याला तालमीचा नाद सोडावा लागला होता. गंगाधराचे लग्न वडिलांच्याच पसंतीने जुळविण्यात आले होते. पुष्कळ दिवस त्या दोघांची ओळखसुद्धा नव्हती. घरातल्या वडील बायकांच्या सांगण्यावरून गंगाधर पुष्कळदा तिला रागावे. परंतु त्याच्या मनात बायकोबद्दल अतोनात माया होती. गंगाधर व रुक्मिणी यांच्या पहिल्या भेटीत रुक्मिणीने नवरा मारहाण करणार या धास्तीनेच खोलीत प्रवेश केला होता. पण अचानक नवऱ्याचे आपणावर प्रेम आहे,

इतकेच नव्हे तर विश्वास पण आहे, हे कळून तिला अतोनात आनंद झाला. या प्रसंगाचे हरिभाऊ आपट्यांच्या 'पण लक्षात कोण घेतो?' या कादंबरीतल्या यमू व रघुनाथराव यांच्या पहिल्या भेटीशी पुष्कळ साम्य आहे. पण दोघांच्या लेखनशैलीत दोन ध्रुवांचे अंतर असल्यामुळे, आपट्यांनी वर्णिलेला प्रसंग वाङ्मयात चिरंजीव झाला. डॉ० केतकरांच्या बाबतीत तसे होऊ शकले नाही.

गंगाधर हा संसारातच केवळ रमणारा पुरुष नव्हता. त्याला राजकारणाचा ध्यास लागला होता. आणि त्यामुळे कॉलेजचे शिक्षण अर्धवट सोडून, बायकोच्या साहाय्याने थोडे द्रव्य जमवून, घरात कुणालाही न कळवता त्याने अमेरिकेस प्रयाण केले. तिथे तो अनेक चळवळींत पडला. त्याने बायकोला एकदोन पत्रे पाठवली असतील तेवढीच. तिथे तो धडपड करीतच होता. राजकारणाला क्षणभर विसंबला नाही. बायकोचे स्मरणही त्याला नव्हते, असे नाही. पण राजकीय जबाबदारी आणि निर्धनता यांच्या काचात सापडल्यामुळे आपले कुटुंब हिंदुस्थानात कचाट्यात सापडू नये म्हणून तो घरी पत्रव्यवहारही करीना. एरवी पोलादी मनाचा दिसणारा गंगाधर डॉ० सरंजामे या मित्राशी रुक्मिणीबद्दल बोलताना म्हणाला की, 'माझी बायको फार चांगली मुलगी आहे. तूं हिंदुस्थानांत जातो आहेस, तर तूं तिच्याशीं लग्न केलेंस तरी हरकत नाहीं. माझें भवितव्य अनिश्चित आहे' आणि त्याचा कंठ भरून आला. पुढे रुक्मिणी जेव्हा अमेरिकेत आली तेव्हा गंगाधराने आतुर प्रियकराप्रमाणे तिचे स्वागत केले व ती दोघे आनंदात काळ कंठू लागली. गंगाधरपंताला मत्तमयूरी-बद्दल मोह उत्पन्न झाला होता. पण तो त्याने आवरला. आपले लग्न झाले आहे, आणि आपली बायको आपणाकरता झुरत आहे, एवढी कल्पना त्याला अधःपाता-पासून वाचविण्यास समर्थ होती.

आणि रुक्मिणी! रुक्मिणी ही आर्य स्त्रीचा केतकरांच्या कादंबऱ्यातला एक उत्कृष्ट नमुना म्हणायला काहीच हरकत नाही. नवरा दूर गेलेला. घरी दारिद्र्य व जाच. नातेवाईकांनी घरातून काढून लावले. नवऱ्याचे कोणत्याही तऱ्हेचे आश्वासन तर राहोच, पण बातमीसुद्धा नाही. अशा स्थितीत नर्सिंगचे शिक्षण घेण्यास घराबाहेर पडलेली ती अशिक्षित, गरजू अशी तरुण व सुंदर स्त्री; तिच्या मागे पुरुषांचा त्रास असे. पण रुक्मिणीचे अंतःकरण गंगाधराशी इतके समरस झाले होते की, कोणत्या तरी उपायाने पतीच्या जवळ जायचे एवढे एकच साध्य तिच्या धडपडीच्या मागे होते. पतिसान्निध्य हाच तिचा मोक्ष होता. मत्तमयूरीच्या सहवासात आल्यानंतर तिला जेव्हा मत्तमयूरीने गंगाधरपंतांच्या व आपल्या स्नेहाची हकिगत सांगितली, तेव्हा एक प्रकारच्या असाहाय्यतेने व असूयेने रुक्मिणीचे मन व्याकुळ झाले. पण मत्तमयूरी स्वार्थी नव्हती. गंगाधर मोह आवरू शकतो हे तिला माहीत होते. आणि जरी गंगाधराने पत्नीविषयी मौन बाळगले होते, तरी त्याने आपले लग्न झाले आहे,

ही गोष्ट कधीच चोरून ठेवली नव्हती. मत्तमयूरी जरी गंगाधरपंतांवर मनातून प्रेम करीत होती, तरी ती सत्प्रवृत्त होती आणि रुक्मिणीची परिस्थिती आणि तिचा गोड स्वभाव यांचा फार परिणाम तिच्या मनावर झाला. आणि तिनेच गंगाधर व रुक्मिणी यांच्या पुनर्मीलनाला शक्य तेवढी मदत केली. 'रुक्मिणीचें अंतःकरण' हा केतकर-वाङ्मयातला एक उत्कृष्ट असा भाग आहे. ज्या श्रद्धेने डॉ० केतकरांनी प्रियंवदेचे पात्र रेखाटले आहे, त्याच श्रद्धेने त्यांनी हे लहानसे चित्र रेखाटले आहे. रुक्मिणीचा प्रियंवदेपेक्षा कथानकात फारच थोडा भाग आहे. प्रियंवदेप्रमाणे ती स्वभावतः धीट नाही. पण परिस्थितीला तोंड देऊन आपला मार्ग आक्रमण करण्याइतकी चिकाटी तिच्यात आहे. प्रवाहपतित, निर्धन असूनही तिच्यात शीलाचे, प्रेमाचे आणि निश्चयाचे तेज आहे. ती सौम्य व मुग्ध आहे. या तिच्या गुणांमुळेच अमेरिकेतही सरंजामे वगैरे पुरुष तिला फार मान देत. गदर चळवळीत भाग घेणाऱ्या गंगाधरा-सारख्या नेत्याची पत्नी म्हणून जरी तिचा गौरव इंग्लंडात हिंदी समाजाने केला, तरी तिचे गुणच तिच्या गौरवास कारण होते हे लेखकाने दाखविले आहे. सुंदर व विद्याविभूषित लीलाही गंगाधरावर मोहित झाली होती. पुढे डॉ० सरंजाम्यांसारख्या देखण्या पंडिताबरोबर तिचे लग्नही झाले. पण रुक्मिणीपुढे लीला व मत्तमयूरी फिक्या पडलेल्याच लेखकाने दाखविले आहे.

### ठसठशीत मनोरम स्त्रीत्व

डॉ० मत्तमयूरी हे केतकर-वाङ्मयातले एक महत्त्वाचे पण प्रतीकात्मक पात्र आहे. मत्तमयूरी सुंदर आहे, रसिक आहे, भाबडी आहे आणि गोड स्वभावाची आहे. वस्तुतः या कादंबरीपुरतेच पाहायचे झाल्यास मत्तमयूरीचे ठसठशीत मनोरम स्त्रीत्व वाचकास चांगलेच जाणवते. खरोखर 'जातिबाह्य' समाज म्हणून जो हिंदु-समाजात उपेक्षित आहे त्याचा कळवळा डॉ० केतकरांस फार वाटत असे. मत्तमयूरी ही अशाच 'कडू' संबंधापासून झालेली, पण धनाने व शिक्षणाने संभावित असलेल्या आईबापांची लेक. तिला जगात काही कमी नसते. शल्य काय ते हीन जातीचे. पण त्याने तिच्यावर लहानपणापासून इतका परिणाम झाला होता की, ते शल्य कोणाला समजू नये म्हणून अमेरिकेसारख्या देशातसुद्धा, मित्रमंडळीत वागतानादेखील ती कौटुंबिक बाबतीत कोणाची चौकशी करीत नसे, की स्वतःबद्दल कुणाला काही सांगत नसे. मत्तमयूरीला तिच्या दर्जाला साजेसा पती तिच्या समाजात मिळणे दुरापास्त होते आणि उच्चवर्णीय, सुविद्य तरुण केवळ जन्मदूषणामुळे तिला पारखे झाले होते. अमेरिकेत डॉक्टरची पदवी घेऊन ती हिंदुस्थानात परत येऊन कामाला लागली, तरी तिच्या चित्ताची व्यग्रता जाईना. अमेरिकेत तिचे मन गंगाधर या धाडसी व गरीब पण उमद्या तरुणाने मोहित केले होते. गंगाधराचाही एक वेळ तोल सुटून त्याने

तिचे चुंबन घेतले होते. पण आपण अगोदरच विवाहित असताना हिच्याशी असे वागणे बरे नव्हे, हा विचार मनात आणून तिची त्याने मनापासून क्षमा मागितली व आपले लग्न झाले आहे हे तिला सांगितले. जातीच्या शल्यानंतर हे दुसरे शल्य मत्तमयूरीला नेहमी अस्वस्थ करी. इतके की गंगाधराच्या क्षमायाचनेमुळे तिचा त्याच्याबद्दलचा आदर दुणावला आणि ज्या त्याच्या स्त्रीचा त्याच्याशी कुठलाही संबंध वर्षानुवर्षे राहिला नव्हता तिच्याबद्दल त्याने एवढी कर्तव्यबुद्धी दाखवावी याचा तिला विषाद वाटे आणि कौतुक पण वाटे. याच द्विधा मनोवृत्तीमुळे तिच्यावर आसक्त झालेल्या रघुनंदन कामतला पण तिने बरेच दिवस होकार न देता ताटकळत ठेवले. हे तिचे मोहपटल रुक्मिणी, तिच्या इस्पितळातली शिकाऊ नर्स, तिची नोकर म्हणून राहिलेली, दूर करते.

रुक्मिणी व मत्तमयूरी यांना गंगाधराशी असलेल्या आपल्या उभयतांच्या संबंधाची जाणीव होताच दोघींनाही एक प्रकारची पराभूतपणाची जाणीव उत्पन्न होते. आपल्याला शिक्षण नाही, पैसा नाही, नवऱ्याने जवळजवळ टाकले आहे, आणि ही डॉक्टरीण तर त्याची मोठी मैत्रीण, तर आता कसचा आपला संसार होणार ?— अशी भावना रुक्मिणीच्या मनात उत्पन्न झाली. तर रुक्मिणीचे रूप, तिची नवऱ्याला भेटण्यासाठी चाललेली धडपड, तिचा पवित्र व कष्टाळू जीवनक्रम यांनी स्वतःच्या जन्मलांच्छनाशी तुलना करता मत्तमयूरीला भारून टाकले. मत्तमयूरी गंगाधराचे अंतःकरण चांगले ओळखीत होती. तिच्या आयुष्यात करुणा होती. रुक्मिणी एका पुरुषावर प्रेम करीत आहे, व तो तिच्या हक्काचा नवरा आहे, तो तिजपासून हिरावून घेण्याचा आपल्याला काय हक्क ?—असा विचार तिच्या मनात येतो, व ती प्रांजळपणे आपले हृदय रुक्मिणीपुढे उघडे करते. त्यांचा संवाद हा आता दोन सवतींचा संवाद राहिला नाही, तर तो एकाच पुरुषावर प्रेम करणाऱ्या दोन समानशील स्त्रियांच्यामध्ये झालेला व्यवहाराचा तहनामाच म्हटला पाहिजे. याच संवादात मत्तमयूरी आपले हृद्गत रुक्मिणीला सांगते, ते हे की, 'प्रेम करणाऱ्या पुरुषाशिवाय, किंवा ज्या पुरुषावर आपण प्रेम करतो अशा पुरुषाशिवाय आयुष्य व्यर्थ आहे!' डॉक्टर असूनही शरीरशास्त्राचा, मानसशास्त्राचा किंवा अशाच आपल्या पेशाला शोभेशा कोणत्याही लहानमोठ्या विषयाचा खल डॉ० केतकरांनी या पात्राच्या द्वारे, शक्य किंवा युक्त असूनही केला नाही. प्रियंवदेस त्यांनी तसे करावयास लावले आहे. मत्तमयूरीने केले ते सर्व प्रियाराधन, निष्फल व सफल, व मग योग्य तरुणाशी विवाह. एवढेच काय, पण 'अधर्मसंततीचे भवितव्य', 'उघड्या तोंडाची जात' वगैरे प्रश्न मत्तमयूरीच्या जीवनाशी सुसंगत असूनदेखील ते तिच्याशी कथानकात जोडलेले नाहीत. ते तत्त्वज्ञान डॉ० गोगट्यांच्या समाजशास्त्रीय प्रवचनात घातले गेले आहे. मत्तमयूरीचे पात्र खरेखुरे साधे आणि केवळ स्त्रीत्वाच्या उच्च आकर्षणांनी नटलेले दाखविण्यात

डॉ० केतकरांनी फार अभिज्ञता दाखविली आहे, असे मला वाटते. कारण त्यांना मत्तमयूरीच्या रूपाने हेच सांगायचे होते की, "मयूरीसारखी सुंदर, चतुर आणि सुशिक्षित मुलगी ज्या सामाजिक निर्बंधामुळें वगळली जाते, ते नियमच चुकले असें मी म्हणेन. जात, कुळी इत्यादी गोष्टी ज्या लोकांना आपला मोठेपणा स्वतःच्या पराक्रमानें दाखविण्याची सवड नसते, ती मंडळी जातीच्या उच्चतेवर स्वतःला खपवून घेतात आणि जातीची उच्चता मनुष्य बोलूं लागला म्हणजे समाजांत वैयक्तिक उच्चतेचा ऱ्हास होत चालला आहे असें समजावें." (पृष्ठ१२३)

## अविस्मरणीय व्यक्तिरेखा

गंगाधर हे केतकर-वाङ्मयातले (ब्रह्मगिरी सोडल्यास) अत्यंत अविस्मरणीय पात्र आहे. देशोन्नतीची तळमळ असलेला हा तरुण परदेशी क्रांतिकारक चळवळी-साठी शस्त्रे व बॉंब तयार करण्याची विद्या शिकण्यासाठी गेलेला असतो. पुढे लाला हरदयाळ यांचे अनुयायित्व तो क्रांतिकारक चळवळीचे वैफल्य ध्यानात आल्यामुळे सोडून देतो. त्या वेळी अमेरिकेत शांतताप्रस्थापनाचे किंवा युद्धबंदीचे जे तत्त्वज्ञान फैलावत चालले होते, त्या योगाने निःशस्त्रांच्या राजकारणाकडे तो गदर चळवळीतून खेचला जातो. ही नवी दृष्टी आल्यामुळे भारतासंबंधाने बेफिकीर असलेल्या अमेरिकेतल्या शिक्षित तरुणांमध्ये तो हिंदी संस्कृतीचा व देशाभिमानाचा पुरस्कार करतो आणि हिंदी तरुणांना सांगतो की, तुमच्यामध्ये खऱ्या राजकारणाचा, तुमचे ज्ञान शास्त्रीय नसल्यामुळे, अभाव आहे. सर्व बाबतींत शास्त्रीय प्रगती झाल्याखेरीज 'स्वत्वस्थापन' करणे हिंदी लोकांना शक्य नाही. परदेशात संचार करून तिथे जी शास्त्रे व विचार भरभराटले आहेत ते आत्मसात केल्यावाचून आपला तरणोपाय नाही. आपल्या राष्ट्रातले पुढारी या शास्त्रीय दृष्टीस पारखे आहेत. म्हणून भारताबाहेर असलेला 'परागंदा' समाज शास्त्रशुद्ध राजकारणी चळवळ करण्यास अधिक योग्य व समर्थ आहे. तात्त्विक दृष्ट्या डॉ० केतकरांच्या आकांक्षा 'परागंदा' समाजाच्या बाबतीत उच्च व यथार्थ असल्या तरीदेखील त्या व्यवहार्य नाहीत. इतकेच नव्हे तर आमचे पुष्कळसे नेते पाश्चात्य शिक्षण आणि रहिवास यांच्यामुळे अधिक चांगल्या तऱ्हेने जनतेचे मार्गदर्शन करू शकले ही गोष्ट खरी असली, तरी, भारताबाहेर राहून राष्ट्रीय चळवळ केली तर ती भारतातल्या आबालवृद्धांना कार्यक्षम बनवू शकणार नाही, हे डॉ० केतकरांना उमगलेले दिसत नाही. जनतेच्या जागृतीमुळेच अखेर चळवळी यशस्वी होतात. मूठभर शिक्षित फारसे कार्य करू शकत नाहीत. त्यातून ते देशापासून दूर असले की, हे अंतर आणखीच वाढत जाते. हा हेत्वाभास सोडल्यास गंगाधराची राजकीय भूमिका अत्यंत शुद्ध आहे. कारण त्याची दृष्टी व्यापक आणि पक्षोपपक्ष यांच्या बाहेरचे मोठे जग न्याहाळणारी आहे.

आणि त्याचा देशाभिमान वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपासून अलिप्त आहे. आणि म्हणूनच या कादंबरीत जे राजकारण आले आहे त्याचा दर्जा गंगाधराच्या व्यक्तित्वामुळे उच्च राहिला आहे. गंगाधराचे पात्र असे आहे की, कादंबरीत हरएक पात्र त्याच्याशी जखडले गेलेले आहे. आणि गजपतराय सोडल्यास हे सर्व संबंध आत्मीयतेनेच उत्पन्न झालेले दाखविले आहेत.

### औचित्यभंगाचा आरोप

कथानकाच्या दृष्टीने गौण पण राजकीय धोरणामुळे अत्यंत गाजलेले असे हे पात्र आहे. ज्या वेळी ही कादंबरी लिहिली गेली त्या वेळीं लाला लजपतरायांची कीर्ती शिखरावर पोचली होती. मिस मेयोला त्यांनी दिलेले खरपूस उत्तर हा लोकांच्या कौतुकाचा विषय झाला होता. हिंदी राजकारणातसुद्धा जालियनवाला बागेने लालाजींना अमर राष्ट्रनेत्यांत नेऊन बसविले होते. अशा वेळी लालाजींचे यत्किंचित-देखील व्यंग दाखविणारे चित्र लोकांच्या क्षोभास प्राप्त व्हावे यात नवल काय? पण डॉ० केतकरांची प्रतिभा सर्वसंचारी व सूक्ष्म होती. विभूतिपूजेपेक्षा कुणाचेही व्यक्तित्व छेदून त्यातील सोन्याचे कण वेचून घ्यावे, मातीचे फेकून द्यावे, ही त्यांची प्रवृत्ती. त्यामुळे गजपतरायांचे पवित्र आचरण, हिंदू बाणा, अप्रतिम राष्ट्रप्रेम यांबद्दल या कादंबरीत डॉ० केतकरांनी त्यांचे अभिनंदनच केले आहे. त्यांचा कटाक्ष दोनतीन गोष्टींवर मुख्यतः आहे. तो म्हणजे लालाजींना अमेरिकेत बरीच वर्षे राहून शिकून तयार झालेल्या गंगाधर, डॉ० सरंजामे यांच्यासारखी अमेरिकन आयुष्याची माहिती नव्हती. ते परदेशात हंगामी आलेले. तेव्हा रोझनब्रामसारख्या चाणाक्ष व फराळाच्या प्रसंगी पाहुण्यास प्रसन्न करून स्वतःची वर्तमानपत्रात प्रसिद्धी करायची या 'सोशल लाइफ'मध्ये ते अनभिज्ञ होते. दुसरे म्हणजे शास्त्रीय विचारसरणीने आपली मते तपासून घेण्याची इच्छा त्यांना नव्हती. नुसते राजकीय स्वातंत्र्य समाजाच्या उन्नतीस पोषक असले तरी सर्वस्वी पूरक नसते हे त्यांस पटत नसे. तिसरे म्हणजे त्यांच्यातला प्रांताभिनिवेश गेलेला नव्हता. या बाबतीत डॉ० पट्टाभी सीतारामय्या यानी देखील 'द हिस्टरी ऑफ द इंडियन नॅशनल कॉंग्रेस' या ग्रंथात लाला लजपतराय यांचे वर्णन करताना हा एक स्वल्प दोष म्हणून दाखविला आहे. तेव्हा डॉ० केतकरांनी त्यांचे जे दोष दाखवले ते दाखविण्यात औचित्यभंग झाला आहे असे मला वाटत नाही. दुसरे म्हणजे पाश्चात्य देशांत ज्ञानाची प्रगतीच इतकी झालेली आहे की, तिथे साधारणपणे हिंदी मोठ्या माणसाचेही व्यक्तित्व त्या वातावरणात जरा खुजटच दिसते. प्रांताभिनिवेश देखील भारतीय जीवनाचे एक अपरिहार्य व्यंगच आहे. हा देश इतका अफाट व विविध संस्कृतींनी गजबजलेला आहे की, प्रांताभिमान बाजूला सारून या देशातील दुसऱ्या प्रांतांचे सम्यगवलोकन

करण्याची शक्तीच आमच्यात आलेली नाही. केवळ इच्छाशक्तीने भागत नाही. प्रांताप्रांतांचे व्यवस्थित ज्ञान होऊन आपण संपूर्ण भारतीय आहो, कोणताही प्रांत आपला आहे, ही भावना मोठ्या व्यक्तीच्याही अंतःकरणात खऱ्याखुऱ्या अर्थाने भरायला अद्याप अवधी आहे. आणि म्हणूनच मोठ्या माणसांचीदेखील दुर्बलता राजकीय व सामाजिक जीवनात अखिल भारतीय प्रश्न पुढे आला की वेळोवेळी उघडी पडते. मग विशाल जागतिक जीवनाची गोष्ट तर दूरच राहिली. हा दोष त्या व्यक्तीचा नाही, तर ज्या परिस्थितीत ती व्यक्ती वाढली तिचा आहे.

धीरगंभीर अशी लालाजींची मूर्ती हिंदी लोकांच्या मनात कायम आहे. त्याएवजी डॉ० केतकरांनी गजपतरायांच्या मनात स्वराज्याची वकिली परदेशी करताना 'निराशेचें साम्राज्य' पसरलेले दाखविले आहे. "आम्ही (स्वराज्य) मागतों याचें कारण प्रत्येक देशांतल्या लोकांवर राज्य त्या लोकांनीच करावें हें तत्त्व श्रेष्ठ आहे म्हणून...स्वराज्य हवें याविषयींच त्यांची खात्री होईना." कारण हिंदू-मुसल्मानांतील तंटे मिटायचे नाहीत, म्युनिसिपालट्यांचा कारभार गचाळच आहे, वगैरे प्रश्न त्यांना भेडसावीत होते. (पृष्ठ ६१) डॉ० केतकरांना या बाबतीत 'मूर्तिभंगा'च्या पापाबद्दल दोषी ठरविण्याच्या अगोदर, लाला लजपतरायांनी घनश्यामदास बिर्ला यांना अखेरचे पत्र लिहिले होते,—'जीवनाची समस्या' या नावाने ते सह्याद्रीत (दिवाळी अंक, १९४८) प्रसिद्ध झाले आहे—त्यातले लालाजींचे उद्गार पाहा : "शरीरानें व मनानें मला आयुष्याचा वीट आला आहे. माझ्यांत उत्साह व प्रेरकशक्ति कशी ती राहिलीच नाहीं—खरी गोष्ट म्हणजे हल्लीं माझा स्वतःवरचा, ईश्वरावरचा, मनुष्य-जातीवरचा, मानवी जीवनावरचाही विश्वास साफ उडून गेला आहे....स्वभावतः मी शूर अगर धैर्यवान नाहीं. पण मनाच्या तीव्रतेमुळें संकटांना तोंड द्यावेंसें वाटते." कटू अनुभवांनी विटून गेलेले लालाजींचे मनच यात प्रतीत झाले आहे. डॉ० केतकरांनी, गजपतराय तोंडावर स्तुती व मागून निंदा करणारे नव्हते, विश्वासू मित्र होते, म्हणून त्यांची फार प्रशंसा केली आहे, ती लक्षात ठेवण्यासारखी आहे.

डॉ० गोगटे हे डॉ० केतकरांच्याच विचारप्रदर्शनाचे मूर्त स्वरूप आहे. सरंजाम्याची पण तीच स्थिती आणि या दोघांच्या विचारांमुळेच या कादंबरीला भारतीय अल्प समाजाच्या विवर्ताचे स्वरूप आले आहे.

## परागंदा समाजाबद्दलची आकांक्षा

भविष्यकाळासंबंधाने उच्च आशा बाळगून राहाणाऱ्या डॉ० केतकरांनी परागंदा समाजाच्या कार्यांचे देखील एक मोठे स्वप्न पाहिले. ते स्वप्न म्हणजे भारतीय समाजाच्या भविष्यकालीन घटनेत परागंदा समाज एक क्रांतिकारक सुधारणा घडवून आणू शकेल ही आशा. हिंदू समाजात जातीच्या 'लखोटबंद'पणामुळे मिश्रविवाह

थोडे होते. त्यामुळे अधर्मसंततीची फार आबाळ होते. कारण ही संतती कुठल्याच जातीत सामावू शकत नाही. असे होणे हा घोर सामाजिक अन्याय आहे. या दीन मुलांचे संरक्षण चांगले होण्यास एका ‘उघड्या तोंडाच्या जाती’ची आवश्यकता आहे. अमेरिकेत किंवा इंग्लंडात स्थायिक झालेला भारतीय लग्नाच्या बाबतीत आपल्या जातीला चिकटून राहू शकत नाही. म्हणून परागंदा समाजात अशी जात निर्माण होईल. पाश्चात्यांच्या विचारसरणीशी व ज्ञानसंपदेशी अधिक परिचय असल्याने ही जात जगात मागे न पडता, खुद्द भारतीय संस्कृतीतही मानाचे नव्हे तर पहिले स्थान मिळवून सामाजिक कर्तव्याची जाणीव भारतीयांस सदैव करून देत राहील, हे स्वप्न डॉ० केतकरांनी पाहिले. जातिभेदावर दुसरा तोडगा त्यांना दिसेना. परंतु डॉ० केतकरांची ही कल्पना केवळ कल्पनाच राहिली. जातिभेदाचे उच्चाटन होण्यासाठी जे काही लहानमोठे यत्न झाले ते सारे हिंदुस्थानातच होत राहिले आहेत. भारतीय जनता तडाखे खाऊन, अनुभवामागून अनुभव घेत, मुंगीच्या गतीने जातिभेदाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करीत आहे.

१९७४/५०.
अनुक्रम ४४०९६ दि: १/१०/८४
१८३२ ... १६/२/१८८

तीन

# आशावादी

'आशावादी' ही डॉ० केतकरांची तिसरी कादंबरी. ही १९२७ साली डॉ० केतकरांनी प्रचलित राजकारण व समाजकारण यांचे तंतोतंत खरे पण अत्यंत उपहासगर्भ चित्र काढून लिहिली आहे. दीड वर्षाच्या अवधीत डॉ० केतकरांच्या तिन्ही कादंबऱ्या 'विद्यासेवका'तून दोनतीन महिन्यांच्या खास जोड अंकातून प्रसिद्ध झाल्या. महिन्यामहिन्याला कादंबरी देण्यात वाचकांचा खोळंबा होतो तो होऊ नये म्हणून ही त्यांची युक्ती होती. यावरून डॉ० केतकरांची लिहिण्याची गती किती द्रुत होती हे चांगलेच प्रत्ययाला येते. पण त्याबरोबरच अशा घाईच्या लिहिण्यात येणारे कलाहीनतेचे दोषही लेखनात शिरतात. 'आशावादी'वर जो टीकांचा भडिमार झाला त्यात एका टीकाकाराने 'विद्यासेवक' पाक्षिक केले तर दर दोन महिन्यालासुद्धा डॉक्टर एक कादंबरी वाचकांच्या माथी मारतील असा शेरा मारला होता. या कादंबरीची रचना शिथिल व एकंदरीत विवेचन बरेच ठिकाणी कंटाळवाणे झाले आहे. याची जाणीव डॉ० केतकरांना स्वतःला चांगली होती; त्यांनी त्याबद्दल प्रस्तावनेतच कबुली दिली आहे. 'आशावादी'सारखी सुंदर कादंबरी नावाप्रमाणेच होण्यास मनाचे जे स्वास्थ्य हवे ते त्यांना नव्हते. ज्ञानकोश पुरा झाला, त्याचे तीस हजारांचे कर्ज डोक्यावर चढलेले. कोशासारखे काम पुरे केल्यावर कोशकाराचा अंत हा ठरलेलाच, अशी महाराष्ट्राच्या कोशकारांची आतापर्यंतची परंपरा डोळ्यापुढे उभी. त्यातच एका स्नेह्याने याबाबतीत दिलेला स्पष्ट इशारा. तशात कुत्रे चावलेले.

त्याच्या विषाने आपल्याला मृत्यू येईल की काय, ही दारुण शंका. या सर्व गोष्टींनी दैवाला जणू आव्हान देतच काही काळ कादंबरीचे बंद ठेवलेले लेखन डॉक्टरांनी फिरून सुरू केले. त्यांना त्यात विरंगुळा मिळाला. कादंबरी पुरी झाल्यावर मात्र ते खरेच आनंदी व आशावादी बनले. ही या कादंबरीची पूर्वकथा. डॉ० केतकर हे अत्यंत आशावादी असल्यामुळे देवीदास ऊर्फ ब्रह्मगिरी म्हणजे खुद्द डॉ० केतकर असे काहीजण समजतात. देवीदासाचे विचार हे पुष्कळ अंशी डॉ० केतकरांचे विचार असले, तरीदेखील प्रसंग वेगळे असल्यामुळे देवीदासाची कृती व लेखकाचे वर्तन यात बरीच तफावत आहे.

## टीकाकारांचा अहेर

डॉ० केतकरांच्या सर्व कादंबऱ्यांत अत्यंत धाडसी धोरण डॉक्टरांनी या कादंबरीत स्वीकारले आहे. त्यामुळे त्यांना टीकेचे अत्यंत तीव्र प्रहार सोसावे लागले. ‘ परागंदा ’वर ज्या टीका झाल्या त्यात निंदास्तुतीचे समप्रमाण होते. पण या कादंबरीवर ‘ किर्लोस्कर ’ व ‘ ऐक्य ’ सोडल्यास अतिशय जहाल टीका आल्या होत्या. ‘ महाराष्ट्रा ’त माडखोलकरांनी कलाहीनता, औचित्यभंग, मोठ्या समकालीनांची कुचेष्टा याबद्दल दूषण लावले. ‘ मुमुक्षू ’ने गीतेस ‘ सैतानी ’ ग्रंथ म्हटल्याबद्दल रान उठवले. ‘ केसरी ’ने व इतरही पत्रांनी कुत्रे चावल्यामुळे त्याचा चावरा गुण केतकरांना लागला असे म्हटले आहे. अशी या कादंबरीची थोडक्यात संभावना झाली आहे. या सर्व टीका झाल्याला आता अडीच तपे उलटून गेली आहेत. तेव्हा या कादंबरीचा फेरविचार करायची ही उत्तम संधी आहे असे मला वाटते. येथे या टीकांचा परामर्श घेताना हे सांगावेसे वाटते की, बऱ्याच जणांना ‘ किर्लोस्करा ’त आलेली पुरोगामी स्वरूपाची व म्हणूनच अनुकूल असलेली टीका आज आवडण्याचा अधिक संभव आहे.

## स्वामी ब्रह्मगिरी

‘ विद्यासेवका ’तल्या एका संपादकीय स्फुटात ‘ आशावादी ’च्या अंतरंगाबद्दल असे म्हटले आहे की, “ ‘ आशावादी ’ ही कादंबरीही सद्यःकालीन अनेक प्रश्नांकडे महाराष्ट्रीय जनतेचें लक्ष वेधून, निरनिराळ्या अनेक प्रश्नांकडे निर्विकार मनानें पाहून त्यांतील इष्टानिष्ट गोष्टींची निवड करण्याची व अनेक प्रश्नांकडे निराळ्याच दृष्टीनें पाहाण्याची प्रवृत्ती लोकांमध्यें उत्पन्न करील व कार्यकर्त्या माणसांच्या कार्यांतील अडचणी लोकांच्या स्पष्टपणें निदर्शनास आणून देईल व समाजांतील अनेक पुढारी-वर्गाच्या भिन्नभिन्न मनोभूमिकांची ओळख वाचकांस पटवील, अशी आमची खात्री आहे. ” (विद्यासेवक वर्ष ४, अंक ४) देवीदासपंत सप्रे अथवा स्वामी ब्रह्मगिरी यांचे हे चरित्र आहे. वयाच्या चाळिसाव्या वर्षापर्यंत देशोदेशी हिंडून, संन्यासी पेशाने

निरनिराळ्या लोकांच्या विचारांचे सूक्ष्म निरीक्षण करून, आपले विचार चांगले समृद्ध झाले आहेत अशी खात्री झाल्यावर, आपल्या देशासाठी आपण काही तरी करावे अशा प्रबळ प्रेरणेने ब्रह्मगिरी हिंदुस्थानात येतात. ब्रह्मगिरींची जिज्ञासा फार तीव्र; आणि नाना तऱ्हेच्या, नाना पेशांच्या स्त्रीपुरुषांच्या सहवासामुळे व्यवहारात वागताना कोणत्याही प्रसंगी संयम राखण्याचे मनोबल त्यांनी कमावलेले आहे. त्यांच्या भावना उसळून येणाऱ्या असल्या, तरी त्यांनी प्रतिपक्षाचे कसलेही प्रहार सहन करण्याइतकी मनाची शांती कमावलेली होती. राजकारण, समाजकारण व धार्मिक उन्नती यांची सारखीच ओढ त्यांच्या मनाला लागलेली असे. पण त्यातल्या त्यात राजकारण किंवा स्वातंत्र्यप्राप्तीसाठी होणारी चळवळ ही केवळ साधनरूप असून, समाजाचे शाश्वत सुख हे कायमचे व सर्वांत उच्च ध्येय आहे, अशी त्यांची भावना होती.

हिंदुस्थानात आल्यावर ब्रह्मगिरींच्या तीनचार महिन्यांतल्या आयुष्यक्रमाचे दिग्दर्शन या कादंबरीत आले आहे. सार्वजनिक आयुष्य किती गुंतागुंतीचे आणि मती मूढ करणारे असते, हे ह्या हकिगतीत फार सूक्ष्मपणाने रंगवले आहे. सार्वजनिक चळवळी आणि त्यातल्या त्यात राजकारण म्हटले म्हणजे त्यात सर्व तऱ्हेची लबाडी आलीच. त्यातल्या त्यात पक्षोपपक्षांचे, निवडणुकी लढविण्यासाठीच तयार झालेले हंगामी राजकारण तर किती ढंगाने भरलेले असते, याबद्दल मला वाटते आता दुमत होणार नाही. या सर्व प्रकारात एक तर नेता अत्यंत निधड्या छातीचा व ध्येयपरायण असावा लागतो आणि ध्येय फार विशाल व उच्च असावे लागते; तरच ह्या गोलमाल्यातून काही तरी मार्ग काढता येणे शक्य असते. निवडणुकी लढविण्याच्या तंत्रावर अधिष्ठित असलेल्या राजकारणाचे विदारक चित्र डॉ० केतकरांनी काढले आहे. नागपुरातल्या पुढारी नसलेल्या व स्वराज्य पक्षातून फुटून निघालेल्या प्रतिसहकारवादी पक्षाच्या निष्क्रिय, वाचाळ, पण सार्वजनिक आयुष्यात पुढारी म्हणून गाजलेल्या धेंडांच्या मनोवृत्तींचा व कारवायांचा तपशील देऊन त्यांनी वर्णन केले आहे. त्यामुळे अर्थातच त्या पक्षाच्या लोकांची कडक टीका डॉ० केतकरांना सोसावी लागली. महात्मा गांधींच्या मतांशी डॉ० केतकरांचा कितीही विरोध असला, व तो त्यांनी झणझणीत शब्दात व्यक्त केला असला, तरीदेखील महात्मा गांधींचे मोठेपण स्वयंभू आहे हे डॉ० केतकरांना माहीत होते. 'आशावादी'च्या सुमारास लिहिलेले 'निःशस्त्रांचें राजकारण' हे पुस्तक डॉ० केतकरांच्या त्या काळच्या राजकीय विचारांचे उत्तम प्रतीक आहे. या वेळी डॉ० केतकरांचे राजकीय विचार सूक्ष्म पण फार संयमशील होते. ते कोणत्याही पक्षाचे नव्हते. त्यामुळे प्रत्येक पक्षाचे गुणदोषमापन ते निःसंकोचपणे, पण कोणालाही अन्याय न होता करीत. या काळात त्यांनी गांधीवादाचे पृथक्करण मोकळेपणाने करूनही असे म्हटले आहे की, गांधीवादाची बैठक अशा तत्त्वांवर झाली आहे की, दोष दाखवायचे म्हटले तरी त्या तत्त्वांची

मांडणी आपल्यास करून दाखवता येणार नाही. महात्मा गांधींच्या कार्यपद्धतीवर त्यांनी अपूर्णतेचा शिक्का मारला आहे. पण 'केसरी'ने उचलून धरलेल्या व नागपुरात बळावत चाललेल्या प्रतिसहकारवादी पक्षाच्या राजकारणात मात्र त्यांना स्वराज्य पक्षाची बळजोरी दिसेना; गांधीवादाची लोकानुरंजकता दिसेना. केवळ लो० टिळकांचे नाव घेऊन, ज्या कर्मयोगाचा वास्तविक फैलाव महाराष्ट्राच्या सामान्य जनांत कधीच झाला नाही, त्या योगाला लो० टिळकांचे व्यक्तित्व नष्ट झाल्यावर, राजकीय हत्यार म्हणून गांधीवादाविरुद्ध वापरण्यासाठी योजलेली क्लृप्ती एवढेच काय ते या पक्षाचे भांडवल. प्रत्यक्ष कार्यक्रम नाही, स्वतंत्र विचार नाही, प्रभावी नेता नाही, अशा परिस्थितीत असलेल्या या पक्षाचे दुबळे पण महाराष्ट्रात गाजलेले राजकारण डॉ० केतकरांनी या कादंबरीत, तसेच 'निःशस्त्रांच्या राजकारणा'तही उघडे करून दाखविले आहे अर्थात त्यांच्या या काळच्या सर्व लिखाणाचा विचार केल्यास त्यांचे राजकीय विचार प्रसंगी कटू वाटले तरी चिंतनीय आहेत. १९३० पासून मात्र राजकीय सुधारणेचा ध्यास घेतल्यानंतर त्यांच्या राजकीय विचारांस उतरती कळा लागली. तिचेच पर्यवसान लॉर्ड बर्कनहेडवर व काँग्रेस अधिकाऱ्या-विरुद्ध फिर्यादी करण्याच्या कल्पनेत व 'व्हिक्टोरियस इंडिया' (हे पुस्तक त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले.) या पुस्तकाच्या रचनेत व पर्यायाने डॉ० केतकरांच्या राजकीय विचारांच्या दिवाळखोरीत झाले.

## 'आशावादी'तील धर्म

डॉ० केतकरांच्यापुढे भारतीय समाजाच्या पुनरुज्जीवनाचे ध्येय असल्यामुळे प्रत्येक कादंबरीत त्यांनी सामाजिक विचारांची एकएक कक्षा दाखविली आहे. या कादंबरीचा नायक संन्यासी असल्यामुळे स्वाभाविकच धार्मिक चर्चेला या कादंबरीत महत्त्व आले आहे. ब्रह्मगिरी राजकीय व सामाजिक चळवळीतसुद्धा कसोशीने काम करण्याची इच्छा बाळगून होते. ब्रह्मगिरींची ही भूमिका त्या काळी संन्यस्त वृत्तीची एक मोठी खूणच मानली जात असे. १९२७ साली खून झालेल्या स्वामी श्रद्धा-नंदांची पकड लोकांवर होती. खुद्द महात्मा गांधींचे 'छाटीचे राजकारण'देखील फार प्रभावशाली ठरलेले होते. त्यामुळे डॉ० केतकरांच्या संन्यासी नायकाचे कार्य बरेचसे त्यांच्या स्वरूपाचे असले, तरी त्याचे मांसमच्छर खाणे, गीतेकडे अतिचिकित्सक दृष्टीने पाहाणे, ब्रह्मचर्याच्या तत्त्वांची चेष्टा व शेवटी लौकिक संन्यासधर्माची भेदक चर्चा करून छाटी जाळून टाकणे, या गोष्टी त्या काळच्या सामान्य वाचकांस तर राहोच, पण ठराविक राजकीय व धार्मिक प्रणालीतून जाणाऱ्या थोरामोठ्या लोकांनाही न रुचणाऱ्या झाल्या यात नवल नाही. तरी पण डॉ० केतकरांनी त्यावेळी जे काही लिखाण 'विद्यासेवका'तून केले आहे, त्यावरून त्यांची त्या त्या

विषयाबद्दलची भूमिका काय होती हे स्पष्ट दिसून येते. उदाहरणार्थ, शुद्धिसंघटनेची चळवळ त्या वेळी जोरात होती. या कादंबरीत गोदावरीचे खरोखरच अत्यंत सत्त्वशील असे पात्र रंगवून लौकिक शुद्धीच्या कल्पनेला त्यांनी धाब्यावर बसवले आहे. त्यावरून पुष्कळ वाचकांना ते ख्रिस्ती लोकांशी अधिक मिळते घेणारे आणि श्रद्धानंद व महात्मा गांधी यांच्यासारख्या थोर गृहस्थांची चेष्टा करणारे आहेत असा ग्रह झाला. (महात्मा गांधींच्या बाबतीत तो दुर्दैवाने पुढे खराही झाला.) याच साली 'विद्यासेवका'त त्यांनी 'शुद्धिसंघटना' म्हणून एक महत्त्वाचा लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी हिंदू समाजाला एका अत्यंत थोर व विचारी कार्यकर्त्याची, नेत्याची जरूर आहे, असे विधान करून, स्वामी श्रद्धानंद हे तशा कार्याला सर्वस्वी लायक होते, असे म्हटले आहे. मात्र शुद्धीचा उपयोग ख्रिस्ती व मुसलमान समाजांविषयी तिरस्कार निर्माण करण्यापेक्षा या समाजाविषयी जास्त आपलेपणा वाढण्याकडे जास्त चांगल्या तऱ्हेने करता येईल, असे त्यांनी सांगितले आहे. अस्पृश्याला आमच्या समाजात स्थान नाही. त्याला ख्रिस्ती होऊ द्यावे व तो मिशनऱ्यांकडून चांगले शिकला, म्हणजे मग त्याला आपल्या समाजात घ्यावे. म्हणजे अस्पृश्यतेचा प्रश्न राहाणार नाही व अधिक स्वच्छ राहाणीचा कर्तबगार नागरिक आपल्या समाजाला मिळेल, असा डॉ० केतकरांचा नवलपूर्ण सिद्धांत होता. थोडक्यात सांगायचे म्हणजे त्या काळचे अगदी ताजे प्रसंग घेऊन त्यावरच ही कादंबरी लिहिली गेली असल्यामुळे त्या वेळी जे प्रश्न फार कडू वाटले, ते आता तसे वाटण्याचे कारण नाही. एवढेच नव्हे, तर डॉ० केतकरांची या प्रश्नांबद्दलची भूमिका उन्मत्ताची नसून विचारवंताची व कल्पकाची होती, हे दृष्टोत्पत्तीस येते.

आता गीतेच्या कर्मयोगाचे उदाहरण घेऊ. लो० टिळकांनी जो कर्मयोग प्रसृत केला तो लोकांना नैष्कर्म्यापासून सोडवून त्यांना कार्यप्रवृत्त व युयुत्सू करण्यासाठी. त्याची मीमांसा डॉ० केतकर कशी करतात ती पाहा. गीता त्यांनी दोन प्रकारे त्याज्य ठरवली. कारण तिच्या काळच्या व आजच्या समाजरचनेत इतके अंतर आहे की, तिला आजच्या लोकांना स्फूर्ती देण्याचे काम झेपणार नाही. मरणाच्या द्वारी पडलेल्या लोकांना, देहांतराचा संदेश काय तो उपयोगी पडेल. दुसरे म्हणजे युद्धाला विरोध करून निःशस्त्रांचे राजकारण करणाऱ्या डॉ० केतकरांना युद्ध चालू ठेवण्याचा गीतेचा संदेश परवडला नाही. लो० टिळकांप्रमाणेच कर्माचे महत्त्व डॉ० केतकरांना मान्य होते. गीता गृहस्थाश्रमी कृष्णाने गृहस्थाश्रमी लोकांसाठी लिहिली आहे; तिच्यात संन्यासधर्म अभिप्रेत नाही आणि लो० टिळकांनीही हाच गृहस्थी बाणा बाळगला आहे, असे डॉ० केतकरांचे म्हणणे आहे. गीतेतल्या 'कर्मफलत्यागा'वर मात्र डॉ० केतकरांनी टीकेची झोड उठवली आहे. स्वार्थत्यागाच्या कोत्या व रूढ कल्पनेवर त्यांनी 'स्वार्थत्यागाची मीमांसा' या लेखाने

१९१६ सालीच हल्ला चढवला होता. त्याचीच पुनरावृत्ती येथें त्यांनी केलेली आहे. ध्येय म्हणजे मोठा केलेला स्वार्थ, अशी त्यांची कार्याबद्दलची भूमिका असल्यामुळे भोळ्या लोकांना ठकविण्यासाठी हुशार व लबाड लोकांनी तयार केलेले 'स्वार्थत्यागा'चे बुजगावणे डॉ० केतकरांनी निर्भयपणे मोडून टाकले. डॉ० केतकरांच्या समकालीनांच्या व समकालीन घटनांबद्दलच्या निर्भीड विचारसरणीचे वर्णन त्यांनी 'समकालीनांविषयी उल्लेख' या १९२६च्या 'विद्यासेवका'च्या शेवटल्या अंकात केले आहे. ते म्हणतात, "एवढें मात्र खरें कीं, कित्येक प्रसंगीं लिहावें कीं न लिहावें या विषयीं इतर लोकांस संकोच वाटतो. पण मला वाटत नाहीं. आणि अशा प्रसंगीं मी अधिक पृथक्करणपर विचार करतों आणि त्यामुळें मनास अधिक निर्भयता उत्पन्न होते." (पृष्ठ ४६)

कादंबरीचे तत्त्वज्ञान आशावादावर उभारलेले आहे. हिंदुस्थानात पसरलेल्या दैववादावर तोडगा म्हणूनच त्यांनी आशावादाचा पुरस्कार केला आहे. आणि महाराष्ट्राच्या सुशिक्षित मध्यमवर्गाचे चित्र रंगविताना त्या काळी समाजात नांदत असलेली सर्व प्रकारची सामाजिक वैगुण्ये जमेस धरूनही, त्यांनी भावी कालाबद्दलची उच्च आकांक्षा सोडली नाही. विचारांचे दुर्भिक्ष्य नष्ट झाले तर आमची यशाची वाट किती सुकर होईल, ते त्यांनी दाखविले आहे व म्हणूनच बिकट परिस्थितीचे भेसूर चित्र त्यांनी निःशंकपणे लोकांच्यापुढे मांडले. प्रवाहपतितालाही केवळ दैववादी होण्याचे कारण नाही, हाच सूर या कादंबरीत उमटला आहे.

## निकोप उपरोध

'प्रियंवदा' व 'आशावादी' या कादंबऱ्यांत डॉ० केतकरांचा विनोद भरपूर प्रमाणात पाहायला मिळतो. 'प्रियंवदे'चे कथानकच सुखपूर्ण असल्यामुळे विनोदी वातावरण पहिल्यापासून शेवटपर्यंत खेळते राहिले आहे. या कादंबरीत मात्र कारुण्य, गांभीर्य व विनोद यांचे मिश्रण आहे. यात कारुण्य अधिक प्रभावशाली आहे. पण विनोद आहे तो फार ठसठशीत आणि केतकरी वळणाचा असल्यामुळे त्याची थोडी छाननी करणे अवश्य आहे.

शाब्दिक कोट्यांनी विनोद करणे डॉ० केतकरांना माहीत नव्हते. शाब्दिक विनोद भोंगळवार, गेंगणे, अलंकार इत्यादी नावांनीच ते सूचित करतात. त्यांच्या विनोदाची बैठक विचारांवर आधारलेली आहे. चर्चात्मक संवाद डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांचे वैशिष्ट्य आहे, हे मागे सांगितलेच आहे. या चर्चेत बहुधा दोनच व्यक्ती भाग घेतात, असे त्यांच्या सर्व कादंबऱ्यांत आढळून येते. ही चर्चा म्हणजे बौद्धिक द्वंद्वच असते. अर्थात कोणतेही द्वंद्व पाहाताना श्रोत्यांची जी करमणूक होते तीच करमणूक डॉ० केतकरांच्या वाचकांना मिळते. फक्त चार ठिकाणच्या भिन्नभिन्न मतांच्या लोकांचे वादविवाद ऐकण्याची त्यांना थोडी तरी आवड हवी.

स्वतः निर्विकार राहून ज्या ज्या व्यक्ती आपल्या परिचयात येतील त्यांचे त्यांच्या गुणदोषांसकट, भोवतालच्या परिस्थितीतले काही न वगळता, वर्णन करणे हे डॉ० केतकरांच्या औपरोधिक विनोदाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. जोपर्यंत या व्यक्ती लहान व नित्याच्या पाहाण्यातल्या अशा वाटतात, तोपर्यंत या विनोदाची धार सूक्ष्म असली तरी बाधक वाटत नाही. उदाहरणार्थ, डॉ० केतकरांनी टेंगशांच्या वाड्यातल्या दुय्यम दर्जाच्या नोकऱ्या करून जगणाऱ्या सुशिक्षित चौकडीवर जे भाष्य केले आहे ते वाचण्यासारखे आहे. उदाहरणार्थ, "त्या वेळेस पुण्यातलीं भाडीं स्वस्त होतीं. प्रत्येक जण दोनतीन रुपयांच्या आतलेंच भाडें भरणारा, आणि मोठमोठ्या मंडळीवर व धर्म, शिक्षणपद्धती व राजकारण इत्यादी सर्व तऱ्हेच्या विषयांवर टीका करणारा. तो पौराणिक धार्मिक गोष्टींत अधिकारी वक्ता म्हणून मिरवे. कलेक्टर कचेरींतील कारकून आपणांस सरकारचीं सर्व रहस्यें ठाऊक असल्याचा बाणा बाळगी. तो कारकून असा तसा नव्हता. तो ग्रॅज्युएट होता. तो स्वार्थत्यागी शाळामास्तर भावी पिढीस उच्च वळण लावण्यासाठीं आपण अवतरलों आहों, असा बाणा बाळगी; तर दुय्यम लेखक महाराष्ट्र आपल्या तावडींत आहे अशा भावनेनें वागत असे. सर्व मंडळी एकाच मताची होती असें नाहीं...या वाड्यांतील मंडळींचीं भिन्न मतें तरी कशावर असायचीं? स्त्रीशिक्षण व पुनर्विवाह. हे त्यावेळच्या जगांतले दोनच विषय. यांवर एका बाजूनें बोललें म्हणजे सुधारक म्हणत, दुसऱ्या बाजूनें बोललें म्हणजे उद्धारक म्हणत. मनुष्यमात्राचें वर्गीकरण एवढ्याच गोष्टीकडे पाहून करावयाचें, असा त्या वेळच्या लोकामध्यें संप्रदाय पडला होता. तो टेंगशांच्या वाड्यांत पूर्ण प्रतिबिंबित झाला होता. त्या मंडळींना विचाराला विषय थोडे होते. पण मंडळी मात्र असें समजत कीं, हा टेंगशांचा वाडा सर्व महाराष्ट्रीय उन्नतीचें केंद्र आहे." इत्यादी. भांडारकर, रानडे, गांधी, टागोर वगैरे सर्व व्यक्तींचा उल्लेख जरी डॉ० केतकरांनी आपल्या लेखनात केला असला तरी त्यांनी या मोठ्या व्यक्तींना आपला विनोदविषय बनविले नाही. त्यांच्या मतांवर त्यांनी उघड हल्ला केला आहे. त्यांच्या लहानसहान अनुयायांना मात्र त्यांनी ठिकठिकाणी चेष्टेचा विषय बनविले आहे.

### आणखी एक विशेष

डॉ० केतकरांच्या विनोदाचा आणखी एक विशेष म्हटला म्हणजे स्वतःची केलेली चेष्टा सहन करण्यास लागणारी विनोदशक्ती. उदाहरणार्थ, ब्रह्मगिरींना आपल्या विद्यार्थीदशेतील एक मजेची गोष्ट आठवली ती अशी : "चिंचपोकळीच्या एका गिरणींत आपण कामाला असतां आपल्या खात्यांतील फोरमनच्या आग्रहावरून एका तमाशाला कसे गेलों, तेथें फोरमननें खूण केल्यावरून लावण्या म्हणणारी बाई आपल्या मांडीवर कशी बसली आणि आपण कसे बिचकलों आणि आपला झालेला

घोटाळा पाहून इतर मंडळीमध्यें हशा कसा पिकला, याचीही त्यास आठवण झाली" (पृष्ठ ६९). त्याचप्रमाणे इंग्लंडात ब्रह्मगिरींची युरोपियन शिष्या त्यांना सोडून दुसऱ्या गुरूकडे गेल्यावर त्यांचे चित्त व्यग्र झाले होते, त्या स्थितीवर ब्रह्मगिरींनी एक श्लोक खरडण्याचा प्रयत्न केला होता. तो श्लोक त्यांच्या पुस्तकांमध्ये विनोदी डॉ० नंदिकेला सापडल्यावर ती त्यावर 'शिष्योत्तमे तव जसें स्पृहणीय भाग्य' हे विडंबन रचून संमेलनात ब्रह्मगिरिंसमोर म्हटले जाईल अशी व्यवस्था करते; त्याने हास्याचा कल्लोळ लोकांत उसळला. ते सर्व ब्रह्मगिरींनी तिऱ्हाइताप्रमाणे सहन केलेच; पण पुढे हिंदुस्थानात आल्यावरदेखील नंदिकेच्या खोचक प्रश्नांना सावकाश व हसून, समर्पक उत्तरे देऊन तिला निरुत्तर केले, आणि तिच्यावर आपली छाप बसवली अशी की, तिचा उध्वस्त होऊ पाहाणारा संसार पुढे त्यांच्यामुळे तरला.

## अपेक्षाभंगाचे धक्के

याखेरीज विरोधाभासावर अधिष्ठित झालेला विनोद डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांत ठिकठिकाणी आढळतो. वाचकाचे औत्सुक्य वाढवायचे व मग त्याला निराळीच कलाटणी द्यायची, हा डॉ० केतकरांच्या लेखणीचा विशेष आहे. अपेक्षाभंगामुळे वाचकाला ते आश्चर्याचे धक्के देत असतात. कधी त्यामुळे वाचक हसतो तर कधी संतापतो. उदाहरणार्थ, 'नागपूरच्या गाडीत' या प्रकरणात आगगाडीत ब्रह्मगिरींनी बॅ० मोरे व विश्वामित्र यांची ब्राह्मण-ब्राह्मणेतरांच्या प्रश्नावरची चर्चा अत्यंत उत्सुकतेने ऐकली. "'तुमच्या दोघांच्या मनांतले विचार मला कळले. नागपूरला आपण गेल्यानंतर पुन्हां भेटूं आणि पुन्हा चर्चा करू.' असें म्हणून भगवद्गीतेचे पुस्तक उघडून स्वामी ब्रह्मगिरींनी गादीवर आपली पाठ टेकली" असा मजकूर आहे. पण काही दिवसांनंतर विद्यार्थ्यांनी जेव्हा त्यांना गीतेवर मत विचारले तेव्हा "गीता हें सैतानी पुस्तक आहे" असे सांगून स्वामी मोकळे झाले. पहिल्या भागातल्या व दुसऱ्या भागातल्या विधानांत जी विसंगती विनोदाला कारण होते ती अपेक्षाभंगामुळे होते. विवेकानंदांच्या सावलीत वाढलेल्या आणि टिळकांच्या महाराष्ट्रात जन्मलेल्या सुशिक्षित संन्याशाचे हे उद्गार! हा विनोद सूक्ष्म व फारच खवचट असा आहे यात शंका नाही. कारण पहिल्या विधानामुळे स्वामींची गीतेवर फार श्रद्धा असावी असा वाचकाचा आपोआपच ग्रह होतो. तो पुढे पुरा ढासळून जातो. याच ग्रहामुळे कर्मयोगाची ढाल पुढे करून आपल्या प्रतिसहकारपक्षाला निवडणुकीत यश मिळावे म्हणून स्वामींचा उपयोग करून घेण्याचे बापू भोंगळवारांनी ठरवले. पण कर्मयोगावरचे स्वामींचे भाष्य जेव्हा जाहीर झाले तेव्हा लगेच स्वामींच्या सत्काराला ओहोटी लागून रातोरात भोंगळवारांनी नोकरांकरवी परस्पर त्यांचा उपमर्द केला आणि त्यांच्यासंबंधी कंड्या पिकविण्यास सुरुवात केली. पुढे शुद्धी-चळवळीच्या

निमित्ताने देवीदासपंतांच्या बायकोचे शुद्धीकरण करून आपल्याला निवडणुकीत मिरवता येईल या भोंगळवारांच्या अपेक्षेलाही ख्रिस्ती बायकोचा तसाच स्वीकार करून फजीत केले. अशी कितीतरी उदाहरणे या पुस्तकात आणखी सापडतील. खुद्द डॉ० केतकरांना पण याची चांगलीच जाणीव होती. त्यांच्या या विनोदाचे वर्णन ते स्वतः असे करतात की "जे विचार संन्याशाच्या कपड्याशी विरुद्ध गुणन्यासामुळे मौजेचे वाटतात, तेच विचार साध्या कपड्यांतला मनुष्य बोलूं लागला तर त्याचें स्वारस्य नाहींसें होतें. मी गीतेवर जे विचार व्यक्त केले ते संन्यासी नसतांना व्यक्त केले असते, तर लोकांना कदाचित त्याचें कांहींच वाटलें नसतें." (पृष्ठ २२५)

## पात्रे आणि उपकथानके यांची गर्दी

डॉ० केतकरांच्या सर्व कादंबऱ्यांपेक्षा या कादंबरीत पात्रांची संख्या जास्त असून उपकथानके पण चारपाच आहेत. उदाहरणार्थ, बॅ० विश्वामित्राची संसारकथा, परमानंदाचे कौटिल्य, कपिलेचे कथानक, मिसेस हंटरचा पूर्ववृत्तांत, अलकनंदेच्या आय० सी० एस० नवऱ्याची कथा, नंदिकेच्या पित्याचा वृत्तांत, इत्यादी. त्यामुळेच कथानकाच्या गुंतागुंतीबरोबर पात्रांची संख्या पण प्रमाणाबाहेर फुगली आहे. उदाहरणार्थ, विश्वामित्राच्या कथेत सुशिक्षित नवरा व अशिक्षित बायको यांमधले मानसिक अंतर, त्याचप्रमाणे श्रीमंतीची अपेक्षा करणाऱ्या स्त्रीला नवऱ्याच्या कमी प्रतीच्या आर्थिक स्थितीबद्दल वाटणारे वैषम्य व त्याच्या कार्याबद्दल वाटणारे औदासीन्य ही प्रतीत होतात. 'इंग्रजपूजना'मुळे आय० सी० एस० मधील काही अधिकारी प्रतिसाहेब होऊन आपल्या संसाराची कशी धूळधाण करतात, हे अलकनंदेच्या कथेत दाखविले आहे. अल्पशिक्षित जातीत जन्म झाल्यामुळे उच्चविद्याविभूषित डॉक्टरला त्याच्या योग्य प्रौढ पत्नी जातीत न मिळाल्यामुळे तो कुमार्गास कसा प्रवृत्त झाला, हे परमानंदाच्या कथेत पाहावयास मिळते. अर्थात हे सर्व विषय इतके मोठे व गुंतागुंतीचे आहेत की, त्या एकेकावरच एक-एक विस्तृत कादंबरी लिहिता आली असती. पण डॉ० केतकरांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीने या कल्पना आख्यानांच्या संक्षिप्त रूपाने कादंबरीत गोवल्या आहेत. त्यामुळे आपल्या अवतीभोवती दिसणाऱ्या विशिष्ट घटनांचे समाजशास्त्रीय दृष्टीने केलेले विवेचन म्हणून जरी या सर्व कल्पना उपपत्तीसकट डॉ० केतकरांनी वाचकांपुढे मांडल्या असल्या तरी कादंबरीत थोड्या जागेत त्या अगदी कोंदाटून बसवलेल्या दिसतात. आणि म्हणून त्या कथानकांचा विचारजागृतीच्या दृष्टीनेही व्हावा तितका फायदा वाचकास मिळत नाही. पाश्चात्य देशांत जशी समाजशास्त्रज्ञ कथालेखकांची परंपरा आहे, तशी महाराष्ट्रात अजून नाही. डॉ० केतकर हे त्यामुळे पहिलेच अशा तऱ्हेचे लेखक आहेत. त्यांच्या मागून येणाऱ्या त्यांच्यासारख्या लेखकांवरूनच पुढे

त्यांच्या या लिखाणाचे खरे मूल्यमापन करावे लागेल.

'आशावादी'तले मुख्य पात्र म्हणजे देवीदास. त्याच्या कामगिरीचे वर्णन अगोदरच बरेच आले असल्यामुळे इथे त्याची पुनरावृत्ती करीत नाही.

## कठोरपणे रंगवलेली पुरुषपात्रे

बॅ० विश्वामित्र व ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी बॅ० मोरे व लालनाथ सोडल्यास बाकीची सर्व पुरुषपात्रे डॉ० केतकरांनी कठोरपणेच रंगविली आहेत. स्त्रीपात्रांच्या बाबतीत मात्र त्यांनी फार सहृदयता दाखविली आहे. या कठोर टीकेमागे एक मोठे सत्य डॉ० केतकरांना दाखवायचे होते. टेंगशांच्या वाड्यातल्या सुशिक्षित चौकडीचे उदाहरण देऊन त्यांनी सुशिक्षित व त्यातल्या त्यात शिष्ट समजलेल्या मंडळीतही 'विचारांचे दुर्भिक्ष्य' किती मोठे असते हे दाखविले आहे. मग ती मंडळी केवळ नोकरीपेशाने जगणारी असो, की वैयक्तिक महत्त्वाकांक्षेमुळे दादासाहेब गंगणे किंवा बापूराव भोंगळवार यासारखी 'चळवळी' झालेली असो. गलिच्छ कोट्या करून 'अलंकार' पदवीस प्राप्त झालेले नारायणराव तर एक अपूर्व पात्र आहे. 'पण लक्षात कोण घेतो'मध्ये जे शंकरमामंजींचे कार्य तेच कोणत्याही समाजात वरच्यासारख्या मंडळींचे असते. कुठेही जा, प्रत्येक लहानमोठ्या सार्वजनिक चळवळीत, मोठ्या लोकांच्या अवतीभोवती ही मंडळी नेहमी दिसून येते.

स्वामी ब्रह्मगिरींच्या पात्रामुळे बॅ० विश्वामित्रांसारखी पात्रे ही सार्वजनिक आयुष्याला योग्य ते वळण लावण्यास मनापासून झटणारी दाखवली असली तरी ती फिकीच पडतात. विसदृश पात्रे मात्र अधिक उठावदार झाली आहेत.

स्वतः कारकुनी पेशातील हा सद्भावनांनी प्रेरित असा पती आपल्या बुद्धिमान भार्येला विलायतेहून डॉक्टर करून आणतो. पण पुढे त्या दोघांत जे मानसिक अंतर उत्पन्न होते, त्याचा लालनाथाच्या प्रेमळ पण दुबळ्या मनावर जो परिणाम झाला त्याचे चित्र डॉ० केतकरांनी फार चांगले रंगवले आहे. रागावण्याचेही सामर्थ्य त्याला नसते. कारण आपण बायकोला शिक्षण देऊन या विचित्र परिस्थितीत तिला आणून टाकले, ही खंत त्याला वाटत असते. बायकोच्या खाण्यापिण्याकडेही तो कळकळीने लक्ष पुरवताना आढळतो. लालनाथाचा संभ्रम सुदैवाने ब्रह्मगिरींच्या आगमनाने लवकरच नाहीसा होतो. लालनाथ व विश्वामित्र यांच्यासारख्या सौम्य व सत्प्रवृत्त पात्रांमुळे कादंबरीचे वातावरण केवळ भेदक राहिले नाही.

## मिशनरी मिसेस हंटर

मिसेस हंटर ही हिंदुस्थानात मिशनरी काम करून स्त्रिया, मुले यांच्यासाठी शाळा व राहाण्याच्या संस्था काढून त्या चालविणाऱ्या परिचित स्त्रियांपैकीच एक

आहे. फक्त अशा स्त्रिया कोणत्या हेतूने हे समाज चालवितात त्या हेतूची सांगोपांग माहिती जनतेस नसते. त्यांचा हेतू हिंदू समाजाच्या व्यंगांचा फायदा घेऊन खिस्ती धर्मांचा प्रसार करणे हाच असतो काय? की त्यांच्या स्वतःच्या आयुष्यातील अंतःप्रवाहाने समाजसेवा हेच आपले कर्तव्य आहे असे समजून त्या कार्यास प्रवृत्त होतात? या कादंबरीतील मिसेस ॲडेलीन हंटर या दुसऱ्या वर्गात मोडतात. पण समाजसेवेचे हे ध्येय त्या 'देवतारूप' व्यक्ती होत्या म्हणून त्यांनी पत्करले नसून हिंदुस्थानातील दीनदुबळ्या स्त्रियांची सेवा हा त्यांच्या आयुष्यातला मोठा प्रायश्चित्त-विधीच होता. डॉ० केतकरांनी दिलेला मिसेस हंटरच्या पूर्वायुष्याचा वृत्तांत फार मनोरम आहे. डॉ० केतकरांच्या स्त्रियांविषयीच्या ज्या काही कल्पना आहेत, त्यांपैकी एक आवडती कल्पना म्हटली म्हणजे स्त्री कोणत्याही सार्वजनिक आयुष्यात गढली असली, तरी त्या सार्वजनिक आयुष्याला प्रेरणा बहुधा तिचे ज्या पुरुषावर प्रेम असते त्याच्या कल्पनेप्रमाणे मिळत असते. मिसेस हंटरचे प्रेम रिचर्ड कार्नी नावाच्या एका पंगू पण अत्यंत भावनाक्षम व बुद्धिमान तरुणावर जडले होते. रिचर्डचा जन्म हिंदुस्थानात झाला होता. त्याचा बाप हिंदुस्थानात अधिकारी होता. त्याच्या मनात हिंदुस्थानातल्या लोकांचे दैन्य पाहून अनुकंपा उत्पन्न झाली व आपण हिंदुस्थानातल्या गरीब लोकांकरता काहीतरी करणे आपले कर्तव्य आहे अशी त्याची भावना होती. पण पुढे पक्षघातामुळे तो असमर्थ बनला. या स्थितीत ॲडेलिनची व त्याची मैत्री जमली. 'जगातील दुर्बल व सामर्थ्यहीन लोकांना मदत करणें हें सुशिक्षित राष्ट्रांचें व लोकांचें कर्तव्य आहे' असे तिला पहिल्यापासूनच वाटत असे. त्या दोघांनी हिंदुस्थानात जाऊन कार्य करण्याचे ठरविले. पण ॲडेलिनच्या पित्याला हा संबंध पसंत नसल्याने त्याने तिचे लग्न हंटर नावाच्या एक आफ्रिकेतल्या प्लँटरबरोबर लावून दिले. ॲडेलीनचे आयुष्य निराशेने आता स्वैर बनले. ती नवऱ्याच्या वाऱ्यास उभी राहात नसे; व शेवटी तर ती घटस्फोट देऊन परत इंग्लंडात येऊन लेखिका व नटी म्हणून काम करू लागली. पण पुढे तिने लिहिलेल्या एका आत्मचरित्रपर कथेने तिचा नवरा आपली भूमिका समजावून देणारे पत्र तिला लिहितो. तिच्या मनात सामाजिक कार्य करायचे असल्यास त्यास मदत म्हणून दोन हजार पौंड रक्कम पाठवितो. तिला परत यायचे असल्यास आपण अवश्य आनंदाने तिचे स्वागत करू म्हणून कळवतो. या पत्राने व्यावहारिक, चैनी आणि व्यसनी माणसाच्या अयुष्यातही उदात्त भावना किती जाज्वल्य असू शकतात, हे मिसेस हंटरला कळून आले. तिचा स्वतःबद्दलचा तिरस्कार दुणावला. नवऱ्याबद्दलचा राग ओसरला. आणि ती त्याला 'क्षमस्व' म्हणून पत्र लिहिणार तोच त्याच्या मृत्यूची बातमी तिला कळली. मरताना त्याने आपली अफाट संपत्ती तिलाच दिली होती. रिचर्ड कार्नी तर अगोदरच मरण पावला होता. तेव्हा हंटरची संपत्ती व रिचर्डची हिंदुस्थानात काम करण्याची

इच्छा या दोहोंच्या बळावर मिसेस हंटरने आपली संस्था हिंदुस्थानात चालू केली. धर्मांतरापेक्षा ज्यांना कोणी विचारतापुसता नाही, अशा अनाथ व पतिता स्त्रियांना उद्योगाची गोडी लागून त्यांचे आयुष्य उपयुक्त व सुखी व्हावे म्हणून ती आमरण झटली. मिसेस हंटरच्या आयुष्याचा सर्वांत करुण भाग म्हणजे पुढे तिचे अंतःकरण रिचर्डपेक्षां हंटरवरच पूर्णपणे जडले. पश्चात्तापाने दग्ध अशा स्थितीत दुसऱ्याचे दुःख निवारण्याचे काम हेच आपले दुःख विसरण्याचा, आपले पाप धुवून काढण्याचा मार्ग आहे असे समजून, ती आपले आयुष्य कंठीत होती. लोकांची निंदा तिला कधीच बाधली नाही. पण नवऱ्याने दाखवलेली क्षमा ती विसरू शकत नव्हती. ती क्षमा तिला कार्याला स्फूर्ती देत होती. तीच क्षमा तिच्या अंतःकरणाच्या तीव्र वेदना पण जागृत ठेवीत होती.

## भारतीय स्त्रीचा आदर्श

या कादंबरीतली सर्वच स्त्री-पात्रे डॉ० केतकरांनी सहानुभूतीने रंगवली आहेत. पण त्यातल्या त्यात गोदावरीचे पात्र त्यांनी पातिव्रत्य व भारतीय गुणी स्त्रीचा आदर्श म्हणून रंगवले आहे. गोदावरीचा नवरा बेपत्ता झाला. तिला दिराने घरातून काढून लावले व ती मिसेस हंटरच्या उद्योगमंदिरात राहू लागली. ती खिस्ती झाली, ती मिसेस हंटरच्या सांगण्यावरून नव्हे किंवा तिला खिस्ती धर्माबद्दल प्रेम वाटत होते म्हणून नव्हे, तर आपण खिस्ती बाईच्या आश्रयाला राहिल्यावर आपला समाज आपल्याला परत घेणार नाही या भावनेने. पुढे मात्र तिची खिस्तावर श्रद्धा बसली. तरी पण हिंदू धर्माचे काही संस्कार तिच्या मनावरून कधीच पुसटून गेले नाहीत. तिची आपल्या नवऱ्याबद्दलची श्रद्धा अथांग होती. नवऱ्याची फारशी ओळख नसूनसुद्धा, किंवा तो मेला असे नातेवाईकांनी सांगितले असतानाही, गोदावरीचे मन सदैव त्याच्याशी बद्धच राहिले. खिस्ती झाल्यामुळे दुसरे लग्न करण्याला मोकळीक असूनदेखील ती विवाहसंबंधापासूनच काय, पण कोणत्याही मोहापासून कटाक्षाने अलिप्त राहिली. तिच्या वागणुकीत पातिव्रत्याचा दर्प नाही, स्वतः वर्तनाने शुद्ध राहूनही पतितांच्याकडे ती सहानुभूतीने पाही. त्यांच्या वर्तनाचे मर्म तिला जसे कळले, तसे तिच्या मानलेल्या आईला, म्हणजे मिसेस हंटरलाही, उमगले नाही. संस्थेचा पसारा गोदावरी ऊर्फ एल्मा आईच्या बरोबरीने व समरस होऊन उचलीत होती, तरी तिचे मन सुखी नव्हते. तें अज्ञात नवऱ्याभोवतीच गुरफटलेले होते. संस्थेचे काम ती रोजचे व मोठे काम म्हणून करीत होती, पण 'मातृत्वाची भूक' मात्र संस्थेचे काम करून शांत होते, असे तिला वाटत नव्हते. संस्थेपेक्षा संसार श्रेष्ठ, हा तिचा निष्कर्ष होता. त्यामुळे आपल्या दुःखाकडे दुर्लक्ष करून, नवऱ्याने कर्तव्य केले नाही त्याबद्दल त्याला दूषण न देता, आपणच त्याची विचारपूस केली नाही, कदाचित तो

फार संकटात असेल, म्हणून स्वतःलाच ती दोषी समजे. हा तिचा गुण देवीदासपंतांनी एवढा वाखाणला की, या साधुत्वामुळे "पूर्वेनें पश्चिमेला अजून शिकविण्याजोगें पुष्कळच आहे" असे उद्गार त्यांनी काढले. मिसेस हंटरचे "प्रत्येक मनुष्य जो वाईट गोष्ट करतो, तिचें कारण बहुधा त्याच्या दुष्टपणापेक्षा दुर्दैव असतें" हे तत्त्वज्ञान कादंबरीत जरी उत्कृष्टपणे वठवले असले तरी ते गोदावरीच्या या साधुत्वापुढे फिके पडते, असे डॉ० केतकरांनी दाखविले आहे. गोदावरीचे कार्य तिच्यापुढे होतेच. देवीदासपंतांप्रमाणे तिला कार्य हुडकण्याची जरूर नव्हती. फक्त त्या कार्यासाठी लागणारी जिवंत प्रेरणा तिला हवी होती. निसर्गनिर्मित पतिसुख व मातृत्व यांनीच हे कार्य अधिक चांगले होईल असे तिचे मन तिला सांगत होते. देवीदासपंतांशी पुनर्मीलन झाल्यामुळे तिचे स्वप्न अक्षरशः खरे झाले, व देवीदासपंतांनाही एक मोठे कार्य पुढे चालून आले.

## विस्कळितपणा कमी करणारे पात्र

डॉ० नंदिकेची भूमिका देवीदासपंतांच्या चरित्रात अगदीच गौण असली, तरी कादंबरीतल्या बऱ्याचशा पात्रांना एका सूत्राने बांधून ठेवण्याचे काम ती करते. म्हणजेच कथानकातला विस्कळितपणा कमी करून बऱ्याचशा पात्रांचे दळणवळण एकत्रित करण्यास डॉ० नंदिकेचा फार उपयोग होतो. लाल्नाथ, परमानंद, पद्मावती, विश्वामित्र व विहंगमा, स्वामी ब्रह्मगिरी, गोदावरी इत्यादी पात्रे तिच्याशी या ना त्या तऱ्हेने संलग्न आहेत. डॉ० नंदिका स्वभावाने गोड, दिल्दार, बुद्धिमान, समाजात मान्यता पावलेली आणि सुंदर वेषभूषा करून पुरुषांना प्रिय होण्यात आनंद मानणारी अशी आहे. मात्र ती स्वैराचारी नाही. तिचा नवरा तिला प्रिय असतो. तिला त्याच्याबद्दल कृतज्ञता वाटते. पण शिक्षणात तफावत पडल्यामुळे डॉ० परमानंद तिला जो बौद्धिक आनंद देऊ शकत असे, तो लाल्नाथांना देता येत नसे. इतकेच नव्हे, तर पद्मावतीचे रहस्य अचानक कळल्यामुळे ती परमानंदाच्या मोहातून निसटते. तिची दृष्टी अंतर्मुख होते. स्वैराचाराची गोडी तिला नाही. पुरुषांना आपल्याविषयी वाटणारे आकर्षण कोठपर्यंत जाऊ द्यावे, याचे ज्ञान तिला असते. जेव्हा ती अंतर्मुख होऊन विचार करू लागते तेव्हा तिला असे आढळून येते की, आपल्या नवऱ्याचे आपल्यावर गाढ प्रेम आहे व आपल्या परमानंदाशी सलगीच्या वागणुकीमुळेच त्याला दुःख होत असले तरी त्याचे प्रेम बलवत्तर असल्यानेच केवळ तो आपला राग काबूत ठेवू शकतो. डॉ० नंदिकासुद्धा कार्याच्या पसाऱ्यात गढलेली बाई आहे. पण तिच्या अंतःकरणाचा गाभा दुःखाने भरलेला आहे. तिचे जीवन गोदावरीप्रमाणे एकाकी नव्हते. तरी पण लाल्नाथमध्ये व आपल्यामध्ये असणारे अंतर तिला जाणवत होते. गोदावरीने नवऱ्याचा शोध चालवला, तेव्हा तो

कोणत्याही स्थितीत असता, विशेषतः दुरवस्थेत असता, तरी तिने त्याचा अंगिकार केला असता. पण नंदिकेची भूमिका वेगळी आहे. नुसता नवराच नाही, तर ठराविक तऱ्हेचे म्हणजे पाश्चात्य पद्धतीचे उत्तान, दर्शनी असे प्रियाराधन तिला हवे असते. लालनाथाच्या लाजाळू व भिडस्त स्वभावामुळे ते आपल्याला मिळत नाही, हा शोध तिला व लालनाथांना एकदमच लागला; व पुढे हा दोष गेल्यामुळे ती दोघे संसारसुखात मग्न झाली. नंदिकेला पद्मावतीबद्दल वैषम्य वाटले नाही, करुणा वाटली; व तिने परमानंदांच्या कुटिलपणाला देवीदासपंतांच्या साहाय्याने आळा घालून पद्मावती व तिची मुलगी या दोघींचा स्वीकार परमानंदांना करायला भाग पाडले. नंदिकेच्या द्वारे पतिपत्नीप्रेमात कृतज्ञता फारसे कार्य करू शकत नाही, अनुनय व आकर्षणच जास्त महत्त्वाचे आहे, असे पण डॉ० केतकरांनी सूचित केले आहे.

कथानकाच्या दृष्टीने कपिलेचे पात्र गौण असले तरी, भडक रंगांत डॉ० केतकरांनी काढले आहे. वेश्येने संवर्धन केलेल्या या 'ब्राह्मणकन्ये'ची स्त्रियांची एकजूट करून त्यांना नाना तऱ्हेच्या चरितार्थाच्या साधनांकरता कार्यक्षम बनवण्याची तडफ देवीदासपंतांना इतकी आकर्षक वाटली की, त्यांना तिच्याशीच लग्न करावे असे वाटू लागले. कपिला कुमारी व अजून पुरुषांविषयी कोरे अंतःकरण असलेली दाखविली आहे. वास्तविक गोदावरी संस्थेत वाढलेली; तिच्यात ही तडफ अधिक असती तर बरे झाले असते. पण तिची भूमिका पत्नीची, मातेची. पण कपिला मात्र संसाराच्या भावनांना पारखी असल्यामुळेच की काय, समाजसेवेविषयी मोठमोठ्या महत्त्वाकांक्षा बाळगून होती.

## काही विसंगती

या कादंबरीतल्या विचारपद्धतीत एकदोन मोठे दोष दिसून येतात. त्यांपैकी एक देवीदासपंतांच्या विचारसरणीत दिसून येणारा चमत्कारिक विरोध. वर दिलेली विरोधाभासाची किंवा सर्व प्रकारच्या अप्रिय पण तात्त्विक चर्चेची उदाहरणे देवीदासाच्या शीलाला व प्रामाणिक विचारसरणीला पुष्टीच देतात. पण "मी जगद्गुरूच आहे" अशी त्याची घोषणा व पुढे "मी केलें काय, मी प्रवाहपतित आहे" ही त्याची भावना यात दिसून येणारी विसंगती पाहून वाचक बुचकळ्यात पडतो. हे वाक्य गाळले असते तर पुढे दिलेली देवीदासाच्या प्रवाहपतित्वाची जाणीव फार स्वाभाविक दिसली असती. देवीदासाचे पात्र जगद्गुरू होण्याइतके अहंकारी व कार्यक्षम बनवायचे असल्यास पुढे दिलेले प्रवाहपतित्व गाळायला हवे होते.

दुसरा एक दोष म्हणजे देवीदासाच्या आठवणींची पूर्वायुष्यातील प्रकरणे कादंबरीत आरंभापासून शेवटपर्यंत घातली आहेत. ती हकिगत महत्त्वाची असली,

तरी एकाच ठिकाणी अधिक व्यवस्थित बसवता आली असती. वारंवार व अधेमधेच जुन्या हकिगती घातल्यामुळे 'मुख्य' कथानकाची गती एकदम थांबते. आणि त्यामुळेच गोदावरीचे देवीदासाला मोहापासून परावृत्त करणारे दर्शन, लेखकाने चांगले वर्णन केले असूनही, कथानकात पाहिजे तसा भावनांचा ओलावा निर्माण करू शकत नाही. नैष्ठिक ब्रह्मचर्याच्या विफलतेसंबंधाने सुद्धा डॉ० केतकरांनी केलेली सर्व विधाने लक्षात घेतली, तरी त्यांनी कर्मयोगावर केलेली टीका जितकी समर्पक वठली आहे तशी ही टीका वठत नाही. ब्रह्मचर्याचे पालन अत्यंत कठीण आहे. आज हजारो वर्षे हिंदुस्थानातले थोर संन्यासी आचार्यही हे सांगत आले आहेत. पण त्याचा अत्यंत यशस्वी प्रयोग याच भूमीत वेळोवेळी थोरांनी करून दाखविला, यातही शंका नाही. देवीदासाला मोहापासून वाचवून शुद्धचरित ठेवणाऱ्या डॉ० केतकरांना याची जाणीव नव्हती असे वाटत नाही. लादलेले ब्रह्मचर्य ही एक विकृती आहे, हा आधुनिक लैंगिक मानसशास्त्राचा सिद्धांत लक्षात घेता, डॉ० केतकरांची या बाबतीत सर्व विधाने शास्त्रीय दृष्टीने काटेकोर असली, तरी त्यांनी ब्रह्मचर्य योगात अभिप्रेत नाही म्हणून 'हठयोगा'तील काही क्रियांचे उदाहरण दिले आहे; मला वाटते, नेमके तेच वैगुण्य भारतीय संन्यासवृत्तीचा व त्या पंथाचा अभ्यास अपूर्ण असल्यामुळे त्यांच्या लेखनात राहिले आहे. वेदांच्या अभ्यासात काय किंवा इतरत्र काय, केवळ सांसारिक वृत्तांताकडे जेवढे डॉ० केतकरांनी लक्ष दिले तेवढे निवृत्तीकडे त्यांचे लक्ष गेलेले नाही. त्यांची स्वतःची वृत्ती पूर्णपणे संसारी होती; पण निवृत्तीचा अभ्यास केल्याखेरीज भारतीय संस्कृतीचा अभ्यास सदोष राहातो, याची जाणीव डॉ० केतकरांना झालेली दिसत नाही. हठयोग हा सर्वाभिमत असा योगमार्ग नव्हे. तेव्हा ब्रह्मचर्यास विघातक असे उदाहरण जे डॉ० केतकरांनी दिले आहे, ते तात्त्विक दृष्ट्या सदोष आहे.

थोडक्यात सांगायचे म्हणजे जास्तीत जास्त विचारांचा खुराक देऊन, वाचकाला सर्वांत जास्त शिणविणारी डॉ० केतकरांची कुठली कादंबरी असेल तर ती आशावादी.

चार

# गांवसासू

'गांवसासू' ही डॉ० केतकरांची चौथी कादंबरी. 'विद्यासेवक' मासिक बंद पडल्यानंतर १९३० साली 'विजय-साहित्य-माले'तर्फे पुण्यास स्वतंत्रपणे ती प्रसिद्ध झाली. 'आशावादी'वर झालेल्या टीकांच्या भडिमारामुळे म्हणा, किंवा मध्ये तीन वर्षांचा अवधी लोटल्यामुळे म्हणा, किंवा या काळात गेल्या सहासात वर्षांत जे प्रचंड लेखन डॉ० केतकरांनी केले त्याचा भार आता पुष्कळच कमी झाल्यामुळे म्हणा, १९२८ पासून ते १९३० पर्यंत त्यांचे प्रसिद्ध झालेले लिखाण थोडे आहे. १९२८ पासून त्यांच्या आयुष्याला उतरती कळा लागली. या सुमारास गुजराती ज्ञानकोश, प्राचीन महाराष्ट्र (सातवाहन पर्व) इत्यादी लेखनाची जुळवाजुळव ते करीत होते. बाकी परिस्थिती कशीही असो, या काळात सुरू करून पुऱ्या केलेल्या त्यांच्या दोन कादंबऱ्या 'गांवसासू' व 'ब्राह्मणकन्या' त्यांच्या पहिल्या तिन्ही कादंबऱ्यांपेक्षा फार काळजीपूर्वक लिहिलेल्या व त्यामुळेच सरस उतरल्या आहेत.

'गांवसासू' ही एकप्रकारे 'परागंदा'ची पुरवणी म्हणता येईल. कारण हिच्यात 'परागंदा भारतीयांचे एक सामाजिक दृश्य' दाखविले आहे. कादंबरीचा मुख्य विषय म्हणजे विवाहेच्छू स्त्रियांची योग्य तरुणांशी लग्न करण्याची धडपड. त्यातल्या त्यात श्रीमंत व वजनदार नवरा, आणि तोही आय० सी० एस० तरुण, आपल्या मुलीला मिळावा म्हणून 'इंग्रजपूजन' करणाऱ्या, विलायती संस्कृतीत वाढलेल्या स्त्रीचे 'जावईपकडू' धोरण कसे असते त्याचे चित्र डॉ० केतकरांनी या कादंबरीत रंगवले

आहे. या कादंबरीच्या घटनेचा काल 'आशावादी'प्रमाणेच केवळ काही महिन्यांचा आहे. पण कथानक अतिशय साधे, सोपे व सुटसुटीत केल्यामुळे केवळ विवाहविषयक दोन-चार प्रश्नांचाच ऊहापोह त्यात करण्यात आला आहे. त्यामुळे ही कदंबरी तंत्रदृष्ट्या निर्दोष आणि वाचनीय झाली आहे. डॉ० केतकरांच्या सर्व कादंबऱ्यांत ही कादंबरी फार नीटनेटकी झाली आहे व विवाद्य मुद्दे या कादंबरीत थोडेच आहेत. ब्राह्मोसमाजाच्या समाजसुधारणेविषयी त्यांची मते अगोदरच्या कादंबऱ्यांत येऊन गेलीच आहेत; त्यांचीच पुनरावृत्ती केशवचंद्र सेनांचा उल्लेख करून डॉ० केतकरांनी या कादंबरीत केली आहे. विवाहपूर्व अनुनयाची आवश्यकता हा एक मुख्य विषयही अगोदरच हाताळला गेल्यामुळे तोही नवा नाही. पण त्याची मांडणी मात्र या कादंबरीत अधिक चांगल्या तऱ्हेने केल्यामुळे कथानकात गती उत्पन्न करून भावनांस पोषक असा तो झाला आहे.

### कादंबरीचे कथानक

या कादंबरीचे वैशिष्ट्य असे की, कादंबरीत एकही महाराष्ट्रीय पात्र नाही. कदाचित यामुळेच केशवचंद्र सेनांच्या कार्याचे मूल्यमापन आपल्याकडील लोकांना रानडे-भांडारकरांच्या कार्याच्या मूल्यमापनाइतके कडू वाटण्याचा संभव नाही. ब्राह्मो सांप्रदायिकांनाच काय तो राग येण्याचा संभव. (परंतु ब्राह्मोसमाजावरची टीका शरद्बाबूंच्या कादंबऱ्यात व टागोरांच्या 'गोरा' कादंबरीतही आढळते.) त्याचप्रमाणे कादंबरीतील पात्रांची ठेवण, विचारसरणी व कालखंड ही 'आशावादी'प्रमाणे आजतागायत नसून गतकालीन आहेत. पहिल्या महायुद्धापूर्वीचा, म्हणजे जवाहरलाल नेहरू हे विद्यार्थीदशेत असतानाचा काळ हा कथानकाचा काळ आहे, हे लेखकाने प्रस्तावनेत सांगितले आहे. अर्थात अशा अनेक प्रकारांनी विरोधी टीकेची धार बोथट करण्याचे श्रेय डॉ० केतकरांनी या कादंबरीत मिळवले आहे. डॉ० केतकरांनी जे जे आपल्या कादंबऱ्यांत दिले आहे, ते ते त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाचे फल व त्यांच्या अनुभवाचे सार आहे. विलायतेत त्यांचे वास्तव्य महायुद्धापूर्वी म्हणजे १९१६पर्यंत झाल्यामुळे तो काल त्यांनी या कादंबरीत लेखनास घ्यावा हे उचितच आहे. 'परागंदा'मध्येही केतकरांनी महायुद्धापूर्वीचेच खरोखर चित्र स्वानुभवाचे खत घालून दिले आहे. परंतु १९१० सालापासून १९२० सालापर्यंतच्या घडामोडींचे हे एक समाजचित्र आहे आणि खरे कथानक १९२० सालचे आहे असे जे त्यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे, ते एकंदर कादंबरीतील विचारसरणी पाहिली तर विसंगत वाटते. कादंबरीचा काल महायुद्धापूर्वीचा व त्यातल्या त्यात १९१० पूर्वीचा म्हणजे डॉ० केतकरांनी अमेरिका सोडण्यापूर्वीचा आहे असे म्हटले तरी चालेल. काळाच्या विसंगतीचा दोष हा एरवी किरकोळ असला, तरी डॉ० केतकरांसारख्या

समाजशास्त्रज्ञाचे ध्येय जिथे काटेकोर समाजचित्रे काढून नवसमाजनिर्मिती करण्याचे आहे, त्याच्या बाबतीत महायुद्धापूर्वीच्या व महायुद्धानंतरच्या विचारकक्षेचे काटेकोर परीक्षण वाचकही अपेक्षित असतो. 'परागंदा'तले हे राजकीय आकांक्षांचे स्वरूप १९४७पर्यंत स्वातंत्र्यप्राप्ती झाली नसल्यामुळे जरी स्थूल दृष्टीने चूक म्हणता आले नाही तरी महायुद्धानंतर खुद्द यूरोप-अमेरिकेच्या सामाजिक विचारांचे रूप पुष्कळ बदलले. त्यामुळे महायुद्धानंतर हिंदुस्थानात आलेल्या डॉ० केतकरांना 'परागंदा'त गजपतरायाचे चित्र रंगवावे लागले. यामुळेच 'आशावादी'मध्ये कडक टीका असली तरी राजकीय परिस्थितीचे जे सूक्ष्म चित्र त्यांना देता आले ते त्यांना 'परागंदा'त देता आले नाही. 'गांवसासू'मध्ये मात्र त्यांनी राजकीय मतांना प्राधान्य न देता इंग्रजानुवर्ती असा जो भारतीयांचा अधिकारी वर्ग त्याचेच चित्रण केले आहे व ते कोणत्याही प्रकारे कालाची विसंगती न ठेवता केले आहे.

एकाच लहान विषयाची मांडणी आटोपशीरपणाने केल्यामुळे या कादंबरीत प्रमाणबद्धताही आली आहे. पात्रे मोजकी पण ठसठशीत आणि कथाप्रसंगाला सर्वस्वी पोषक अशी असल्यामुळे कादंबरी वाचताना कंटाळा येत नाही, आणि कथानकाची गती कुठेही कुंठित होत नाही. त्याचप्रमाणे वातावरण विलायतेचे, सर्वच पात्रे सुशिक्षित आणि मोठे व गुंतागुंतीचे विचार करण्यास इतकेच नव्हे तर ते व्यवस्थित स्वरूपात व्यक्त करण्यास समर्थ असल्यामुळे ही कादंबरी स्वाभाविक झाली आहे. त्यामुळे केतकरी चर्चा इतर ठिकाणी जशा कृत्रिम वाटतात तशा या कादंबरीत वाटत नाहीत. एवढेच नव्हे, तर घटनांपेक्षा संभाषणांवरच या कादंबरीची उभारणी झाली आहे. पण ही सर्व संभाषणेही सरस व विषयाला अगदी धरून असल्यामुळे फार चांगली वठली आहेत. 'ब्रिटिश म्युझियममधील संभाषण' या प्रकरणात जान्हवी कैलासनाथ व चंदनानी यांचे संभाषण अत्यंत चतुर संभाषणाचे उत्कृष्ट वाङ्मयीन उदाहरण आहे. त्या एका संभाषणामुळे सर्व कथानकाची मांडणी इतकी व्यवस्थित जमली आहे. या कादंबरीत जान्हवी कैलासनाथ, कुसुमकलिका दास, सुनीती दास व चंदनानी ही प्रमुख पात्रे आहेत.

## 'गांवसासू' जान्हवी

जिच्यामुळे 'गांवसासू' हे नाव कादंबरीला मिळाले ती पुरंध्री जान्हवी कैलासनाथ होय. ती लहान वयात लग्न होऊन मुले झालेली एक सधन विधवा असते. मुलांचे शिक्षण करण्यासाठी ती विलायतेतच स्थायिक झालेली असते. अल्पशिक्षित असली तरी ती बहुश्रुत असते. स्वतःकडे मोठेपणा घेण्याची वृत्ती असली, तरी ही मनाने साधी व अंतःकरणाने गोड आहे. धूम्रपानाची तीव्र आसक्ती व देवीच्या वणांनी विद्रूप झालेला चेहरा, यामुळे प्रथम जरी तिची छाप तरुणांवर पडली नाही

तरी तिची स्वभाविक चौकस वृत्ती, सभाधीटपणा, समयसूचकता, स्पष्टोक्ती व दुसऱ्याचे भले करण्याची तत्परता इत्यादी गोष्टींमुळे परिचितांवर ती चांगले वजन बसवी. वृद्ध माणसे देतात तसले उपदेशाचे घुटके ती तरुणांना आपणहून पाजीत नसे. त्यांचा रंगेलपणा ती त्याज्य मानीत नव्हती. तिची स्वतःची वागणूक अघळपघळ असल्यामुळे तरुण मुलामुलींचे मोकळे वागणे तिने गैर मानले नाही. पण सर्वांशी मिळूनमिसळून वागणारी ही स्त्री एखाद्या तरुणाचे वर्तन वावगे दिसताच मोठ्या खुबीने पण खरमरीत रीतीने त्याची हजेरी घेई. या गुणामुळेच तिला 'गांवसासू' हे नाव मिळाले होते. या तिच्या 'गावसासू'पणामुळेच सुनीती दास व चंदनानी यांच्या प्रेमाचा गैरसमजामुळे जो विचका होत होता तो न होता ती दोघे विवाहाने बद्ध होतात. आय० सी० एस० तरुणांना जाळ्यात पकडू पाहाणाऱ्या मिसेस कुसुमकलिका यांनी काही कारणाने अपमान केल्यामुळे चंदनानी त्यांना आपले लग्न झाले आहे म्हणून खोटेच सांगतो. त्यामुळे सुनीतीचा व त्याचा जो स्नेहभाव होता त्यात अंतराय उत्पन्न होतो. पहिले लग्न झालेल्या पुरुषावर आपल्या मुलीने प्रेम करू नये म्हणून मिसेस दास सुनीतीला त्याच्यापासून दूर ठेवतात. सुनीती मानी असते. तिचे प्रेम चंदनानीवर जडले असले तरी आता ती फसवणुकीमुळे त्याच्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करून व इतर तरुणांशी साहचर्य वाढवून चंदनानीला अधिकच संताप आणते. या वेळीं अविचारी आणि आततायी कुसुमकलिका दास ही चंदनानीविरुद्ध वाटेल त्या कंड्या पिकवून त्याचा सूड घेऊ पाहाते. एकीकडे चंदनानीबद्दलचे प्रेम, एकीकडे त्याने केलेल्या फसवणुकीबद्दल चीड, एकीकडे आई करीत असलेल्या प्रकाराबद्दल तिटकारा यामुळे सुनीती मनातल्या मनात कुढते आहे हे सत्य सर्वांपेक्षा जान्हवी कैलासनाथाला उमगले. तिचे सुनीतीवर मुलीप्रमाणे प्रेम असते. आणि हे प्रेम ती प्रत्यक्ष शब्दांनी व कृतीने व्यक्त करते. सुनीती व चंदनानी यांच्यामधला गैरसमज ती आपल्या संभाषणकौशल्याने त्यांचा विश्वास संपादून दूर करतेच, पण इतक्या प्रकारानंतरही त्या दोघांना एकमेकांजवळ जाऊन आपले प्रेम व्यक्त करण्याचे धैर्य नाहीसे पाहून ती मेजवानीच्या प्रसंगी या दोघांचे हात एकमेकांच्या हाती देऊन त्यांचा विवाह जाहीर करते. सुनीती व चंदनानी त्यामुळे हतबुद्ध होतातच, पण सुनीतीची आई मिसेस दास कैलासनाथचा हा डाव पाहून आश्चर्याने थक्क होते.

आपल्या मनात आलेल्या कल्पनांना वाचेने व कृतीने मूर्त स्वरूप देण्याची या बाईची तडफ व चातुर्य डॉ० केतकरांच्या इतर पात्रांत दिसून येत नाही. डॉ० केतकरांच्या इतर पात्रांप्रमाणे मिसेस कैलासनाथ विचार व कृती यांचा मेळ कसा बसवावा, आपले ध्येय काय, कार्य काय, अशा संभ्रमात कधीच पडत नाहीत. विलायतेच्या बऱ्याचशा संस्कारांत मुरलेली, विधवा असूनही एका विधुराशी असलेल्या स्नेहसंबंधाबद्दल लोकांनी कुजबूज केली तरी न बिचकणारी, उघड यथेच्छ

धूम्रपान करणारी, अशी ही बाई, आनंदी, प्रत्यक्ष व्यवहारात विनोद निर्माण करणारी, आणि सत्प्रवृत्तीने आपल्याभोवती जमलेल्या तरुणतरुणींचे सुख वाढवणारी अशी आहे. "ही काळी आणि तोंडावर देवीचे वण असलेली बाई थोडीबहुत तरी अद्भुतरसप्रिय असेल अशी चंद्नानीनें कल्पनाही केली नव्हती" हे वाक्य मिसेस कैलासनाथला किती लागू पडते हे प्रत्यक्ष कथानकात डॉ० केतकरांनी मार्मिकपणे दाखविले आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे प्रियंवदा किंवा रुक्मिणी यांची पात्रे रंगवण्यात जी गौरवाची भावना डॉ० केतकरांनी व्यक्त केली आहे तीच भावना त्यांनी जान्हवीबाईचे पात्र रेखाटण्यात उपयोगात आणली आहे.

## खवचट रेषांनी चितारलेले पात्र

मिसेस कैलासनाथच्या सर्वतोपरी विरुद्ध असे हे पात्र आहे. मिसेस दास सुंदर, व्यवहारात धूर्त, स्वतःच्या व स्वतःच्या मुलींच्या बाबतीत अत्यंत दक्ष अशी उपवर कन्यांची माता दाखविली आहे. तिची आई इंग्लिश पण मोलमजुरी करून जगणाऱ्या वर्गातली होती. सर्वसाधारण अशा स्त्रियांचे हिंदुस्थानातून गेलेल्या पैसेवाल्या व होतकरू तरुणांना जाळ्यात पकडून त्यांच्याशी विवाहबद्ध होण्याचे धोरण कुसुमकलिकेच्या आईत प्रामुख्याने दिसून येत होते. आपले 'मृगयाकौशल्य' मिसेस मैत्र यांनी आपल्या लेकीस पूर्णपणे पटवून दिले होते. स्वतः मिसेस दास यांचे कौमार्यातले व नंतरचेही वर्तन किती घेण्याजोगे नव्हते. तरी पण प्रेमापेक्षा आपल्या हौशी व संभावितपणा यांची राखण करणारा प्राणी या दृष्टीने नवऱ्याकडे पाहाणारी, सावत्र मुलाला घरातूनच काय पण आपल्या नवऱ्याच्या आयुष्यातून उठवून लावणारी ही स्त्री स्वतःच्या मुलींवर मात्र अखंड वात्सल्याचा वर्षाव करीत असते. मातृप्रेम हा एकच गुण तिच्यात वाखाणण्याजोगा डॉ० केतकरांनी दाखविला आहे. एरवी रूप, कार्यकौशल्य, समाजात प्रतिष्ठा वगैरे सर्व गुणांनी मंडित अशी ही स्त्री डॉ० केतकरांनी फार खवचटपणाने रंगविली आहे. वर सांगितलेला गुण नसता आणि सामाजिक परिस्थिती आणि प्रत्येक व्यक्तीची स्वहितासाठी चाललेली बरीवाईट धडपड यांचा समन्वय करण्याची असाधारण शक्ती डॉ० केतकरांच्यामध्ये नसती तर मिसेस दासचे चित्र काळेकुट्ट झाले असते. परंतु लेखकाने तिचे स्वभावरेखन असे केले आहे की शेवटी तिच्याबद्दल घृणा न वाटता करुणा वाटते. तिचे प्रयत्न 'जावई-पकडू' होते; व वरसंशोधनातील मुख्य हत्यार 'पैशाची दृष्टी' होती. मुलीला तिची लग्नाच्या बाबतीतली मुख्य 'संथा' अशी होती की, "तरुण मंडळींवर आपलें प्रेम आहे असें दाखवावें, पण तोंडानें बोलू नये. कारण मुलीला आपलें प्रेम पूर्णपणे पुरुषावर स्थापित होऊ देण्याचा योग्य काळ म्हणजे लग्नानंतरचा काळ होय. तोपर्यंत स्त्रीला विशिष्ट पुरुष पत्करील किंवा नाही हें अनिश्चित असतें.

यासाठीं स्त्रीनें आपलें अंतःकरण गमावून तें पुरुषाकडे पुरें जाऊं देणें हें कधींच श्रेयस्कर होणार नाहीं" (पृष्ठ ६९ आवृत्ती पहिली) या संथेचे दुसरे एक तत्त्व असे होते की, "लग्न ही लढाई आहे. लढाई खरें बोलून गमावण्यांत शहाणपण नाहीं. ती जिंकलीच पाहिजे. जिंकल्यानंतर लबाडी उघडकीस आली तर आली. आपली मुलगी कोणत्याही बाबतीत कमी दाखवायची नाहीं. लग्न झाल्यानंतर आपण फसलों म्हणून नवरा बायकोला टाकून देत नाही." (पृष्ठ ११५) परंतु ही दोन्ही 'कुटुंबशास्त्राची रहस्यमय तत्त्वे' मिसेस दास यांना त्यांच्या आंग्ल मातेकडून मिळालेली, त्यांच्या दोन्ही मुलींनी अनपेक्षित रीतीने मोडून आईला फजित केले. 'अनुनय ही वेळ खाणारी बाब' असल्यामुळे, ललितेशी प्रेमबद्ध झालेला मोहिनीमोहन चॅटर्जी परीक्षेत नापास झाल्याबरोबर मिसेस दास यांनी ललितेचा व त्याचा संबंध राहू नये म्हणून खटपट चालविली. पण ललितेने आईला जुमानले नाही. आईने जेव्हा ललिता मोहिनीमोहनला सांत्वनाचे व प्रेमाच्या आश्वासनाचे पत्र लिहीत आहे असे पाहिले तेव्हा "तू अपेशी पुरुषाला धावून मिठी मारणारी पोरगी आहेस काय?" असा प्रश्न केला; मुलीनेत्याला धीटपणाने "होय" असे उत्तर दिले. एवढेच नाही, तर आईने "आपला फायदातोटा तुला कळत नाहीं?" असे विचारल्याबरोबर ललितेने आईच्या व्यवहारनीतीचा उबग येऊन उत्तर दिले, "मला फायदातोटा मुळींच कळत नाही. मी मोहिनीमोहनवर प्रेम करतें एवढेंच मला ठाऊक आहे. मला तुझें तें लग्न जुळवून देणें नको आणि तुझे ते यशस्वी उमेदवारही नकोत. मला माझा मोहिनीमोहन पाहिजे आणि तो जर आज म्हणेल तर मी आज त्याच्याशीं लग्न करावयास तयार आहे!" मिसेस दासनी 'किसमत' म्हणून कपाळाला हात लावला. (पृष्ठ ७०). थोडक्यात सांगायचे म्हणजे आपल्या आईने शिकविलेली तत्त्वे आपण मुलीस शिकवण्याचे काम करीत आहो, खोटे बोलण्यास जे नैतिक धैर्य लागते ते बालिकेस नसते, पुरंध्रीस असते, हा मिसेस दास यांचा विश्वास मात्र शेवटपर्यंत अढळ राहिला. या शंभर टक्के व्यावहारिक दृष्टीमुळेच मिसेस दास यांचे हसू होते, पण वाचकाला त्यांच्याबद्दल अढी राहात नाही.

## सद्भावना व विचारशक्ती

मोहिनीमोहनबद्दल ललिता व सुनीती यांच्यांत स्पर्धा होती. मोहिनीमोहनचे लग्न झाल्यावर आईच्या शिकवणीप्रमाणे सुनीती चंदनानीबरोबर सख्य वाढवू लागली. परंतु मिसेस दासच्या धोरणाचा तिटकारा आल्यामुळे त्यांना फजीत करण्याचा घाट चंदनानीने घातला. तो साध्यही झाला. त्याबरोबर संतापून मिसेस दास यांनी त्याच्यावर कुभांडे रचण्यास सुरुवात केली. त्यावेळीं सुनीती चंदनानीशी जरी फटकून वागत होती, तरी तिचे अंतःकरण त्याच्यावर जडल्यामुळे तिला आईच्या

लबाडीची चीड आली व तिने आईला तोंडास तोंड देऊन आपला विरोध व्यक्त केला. अल्लड दिसणारी ही मुलगी तेव्हापासून अंतर्मुख बनली व तिच्या वृत्तीत व विचारात आमूलाग्र फरक झाला. त्याच वेळी काही 'सेफ्रेजेट' वाङ्मय तिच्या हाती पडले. आणि त्यामुळे तिच्या विचारांना चालना मिळून आपल्या कल्पना कृतीत उतरविण्याचे धैर्य तिला झाले. आपल्या आईने केवळ नवरा पकडण्याकरता आपल्याला ज्ञान दिले, स्वावलंबी बनण्यासारखी कोणतीच विद्या आपल्याजवळ नाही आणि आर्थिक कमाईची ताकद असल्याशिवाय आपण आपल्या आयुष्याची स्वामिनी होऊ शकत नाही, ही जाणीव उत्पन्न होताच ती 'कलावती' बनून अतिशय सुंदर वेषभूषेत स्टेजवर येऊन भावपूर्ण गीतांनी तरुणांची मने हालवून सोडते. इथपासून तिच्या मानसिक व आर्थिक उत्कर्षाला प्रारंभ होतो. एका आंग्ल गायिकेने तिचा उत्कर्ष सहन न झाल्याने तिचा चारचौघांत अपशब्दांनी पाणउतारा करताच आता व्यावहारिक दृष्टी जागृत झालेली सुनीती गप्प बसली नाही. अत्यंत शांत रीतीने पण मर्मभेदी टोमणा मारून तिने त्या गायिकेची रग जिरविली. पण या अशा विजयाच्या भरातही आपली कला तुटपुंजी आहे, तिच्यावर फार दिवस आपण गुजराण करू शकणार नाही हेही तिने ओळखले. चंदनानीच्या प्रकरणामुळे खोल औदासीन्यदेखील तिच्या मनात भरून राहिले होते. मिसेस कैलासनाथच्या मध्यस्थीमुळे सुनीतीची इच्छा पूर्ण झाली; आणि आईच्या शिकवणीमुळे प्रारंभी असलेल्या मनोमालिन्यावर अंतःकरणाच्या खऱ्या ओढीचे मर्म समजल्यावर पडदा पडला. आता तिच्या सद्भावना व विचारशक्ती ही जागृत झाली, ती कायम राहिली.

## चंदनानी

चंदनानीच्या स्वभावाचे दिग्दर्शन वर आलेच आहे. आपला मुद्दा न सोडता शांतपणे प्रतिपक्षाला गारद करण्याचे त्याचे कौशल्य अजब आहे. तरुण मुलींनी अनेक पुरुषांशी मैत्री करावी, हे त्याला हिंदू संस्कारामुळे फारसे आवडत नसे. त्यातल्या त्यात पैशाची दृष्टी ठेवून लग्न करणे म्हणजे स्त्रीच्या बाबतीत मोठाच गुन्हा आहे अशी त्याची भावना होती. या भावनेमुळेच तो सुनीतीवर सूड घेण्यास प्रवृत्त झाला. आणि त्याने आपले लग्न झाले आहे असे सांगितले. पण मिसेस कैलास-नाथनी मुलींच्या अंतःकरणाशी वृथा खेळ खेळण्याची प्रवृत्ती फार निंद्य आहे असा उघड आरोप त्याच्यावर केला तेव्हा तो निरुत्तर झाला व त्याने आपण हे निव्वळ नाटक केले होते अशी कबुली दिली. पण मिसेस कैलासनाथनी "तुमचें मत आज पालटेल ही आशा मला नाहीं. पण तुमचें वय जसजसें वाढत जाईल आणि जगाचा अनुभव तुम्हास जसजसा अधिक येईल तसतसे तुमच्या वागणुकीच्या प्रशंसनीयते-

विषयीं आणि मिसेस दास हिच्या वागणुकीच्या निंद्यतेविषयीं तुमचें मत बदलेल यात शंका नाही." (पृ० १३६) असा सरळ जबाब त्याला दिला. इतकेच नव्हे, तर सुनीतीच्या फटकून वागण्याबद्दल जेव्हा चंदनानीने तक्रार केली, तेव्हा "मुलींच्या ओळखींवर नियंत्रण करण्याची तुमच्या सासूची शिस्त तुम्हांस योग्य वाटेल की अयोग्य वाटेल?" असा प्रश्न केल्यावर "योग्यच" असे उत्तर चंदनानीच्या तोंडून आपोआप बाहेर पडले. डॉ० केतकरांची समन्वयी दृष्टी या एकाच उदाहरणात उत्कृष्टपणे दिसून येते. मराठी कादंबऱ्यात इतकी व्यापक दृष्टी व कल्पकता क्वचितच आढळते.

## समाजशास्त्रीय विचार

आतापर्यंत कथानकातील सामान्य विचारप्रवाहांचे दिग्दर्शन तेवढे आले आहे. वर दिलेले विचार एकसूत्री असल्यामुळे कथानक तंत्राच्या दृष्टीने निर्दोष झाले आहे. कथाप्रवाह पूर्वीच्या कादंबऱ्यांप्रमाणे समाजशास्त्रीय तत्त्वांच्या उघड ऊहापोहामुळे बिघडू नये म्हणून अधिक काळजी डॉ० केतकरांनी या कादंबरीत घेतलेली दिसते. परंतु ही कादंबरी लिहितेवेळी स्त्रियांबद्दलचे काही नाजूक प्रश्न त्यांच्या डोक्यात घोळत होते. त्यातल्या मुख्य प्रश्नाची परिस्फुटता त्यांनी १९२० सालच्या 'विद्यासेवका'त 'मुलींचा वाढता कौमार्यकाल व त्याची निगा' या निबंधात केली आहे. डॉ० केतकरांनी शिक्षणाच्या बाबतीतली मुलींची वाढती संख्या पाहिली. शाळाकॉलेजांतला दीर्घ अभ्यासक्रम पार पाडण्याची स्त्रियांची आकांक्षा व पुरुषवर्गाची हौस त्यांना आढळून आली. अर्थातच या गोष्टींचा परिणाम अविवाहित मुलींचा कौमार्यकालही उत्तरोत्तर वाढण्यात झाला आणि या अवस्थेबरोबर नव्या सामाजिक गरजांची जाणीवदेखील लोकात उत्पन्न होत असलेली त्यांना दिसून आली. या जाणिवेला डॉ० केतकरांनी जे स्वरूप दिले आहे ते त्यांच्याच शब्दांत सांगितलेले बरे. ते म्हणतात, "मुलींचा वाढता कौमार्यकाल व त्याची निगा हे सुशिक्षितत्व पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्येच उत्पन्न होण्याची आवश्यकता आहे. आज ज्या स्त्रिया मातृपद अनुभवीत आहेत, त्यांस अविवाहित मुलींच्या मनोवृत्तींची चांगली जाणीव असणें शक्य नाहीं. कां कीं त्यांस त्याचा पूर्वानुभव नाहीं. मुलींस तरुणांशीं बोलण्याचालण्याचें स्वातंत्र्य किती ठेवावें, निरोध किती करावा, या विषयाचें मार्मिक ज्ञान नसलें, तर चांगल्या परिणामांऐवजी वाईट परिणामच उत्पन्न होतात. पाश्चात्य देशांत प्रत्येक पुरुषास अगर स्त्रीस प्रेमनिराशेचा अनुभव आलाच असतांनाही मुलगी चौदापंधरा वर्षांची झाली म्हणजे कोणावर तरी प्रेम करूं लागते. पण तें प्रेम फार दिवस टिकत नाहीं. मुलींचीं लग्नें वीस वर्षांच्या पुढें होतात. तोपर्यंत निरनिराळ्या तरुणांवर प्रेम करण्याचा अनुभव त्यांना तीनचारदा येऊन जातो. या अनुभवामुळें एखाद्या तरुण बालिकेचें प्रेम एखाद्या अयोग्य पुरुषावर जडलें, तरी तिकडील आई योग्य सूचना करूं शकते. या विषया-

संबंधाने प्रौढपणी लग्न झालेल्या आज ज्या काही स्त्रिया आहेत त्या मुलींच्या आयांस योग्य सूचना करूं शकतील. आज ज्या सुशिक्षित आणि अनुनयाचा अनुभव घेतलेल्या विवाहित स्त्रिया आपल्या समाजांत आहेत त्यांच्यावर तरुण कुमारींसंबंधाने मोठी जबाबदारी आहे. ती त्यांनीं ओळखली पाहिजे." (विद्यासेवक, वर्ष ४, अंक ६, पृष्ठ ४) याप्रमाणे दोनतीन वर्षे मनात घोळत असलेल्या विचारांची पार्श्वभूमी घालून लेखकाने या कादंबरीची रचना केली. वर सांगितल्याप्रमाणे आपल्या समाजात १९२६ सालपर्यंत विवाहपूर्व अनुनयाचा अनुभव घेतलेल्या सुशिक्षित स्त्रियांची संख्या फारच मोजकी होती. त्यामुळे हिंदुस्थानातल्या सामान्य सुशिक्षित मातेचे उदाहरण न घेता डॉ० केतकरांनी सर्वस्वी पाश्चात्य संस्कृतीत मुरलेली, पण हिंदू समाजाशी विवाहामुळे निकटचा संबंध आलेली ब्रह्मोकन्या मिसेस दास हिची निवड केली; आणि तिच्या पात्राला बेसुमार उठाव देऊन वरील विचारांचे व्यवस्थित व्यवहारिक स्वरूपात दिग्दर्शन केले आहे. सुनीतीचे स्वानुभवाने व सफ्रेजेट वाङ्मयाच्या ओझरत्या वाचनाने मतपरिवर्तन होऊन तिने स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या इष्टतेची जी उत्कट इच्छा प्रगट केली त्या घटनेच्या मागेही वरीलप्रमाणेच एक विचारप्रणाली दडलेली आहे. तिचे आविष्करण १९२५ च्या 'विद्यासेवका'तल्या 'मध्यम वर्गातील स्त्रियांचा उद्योगात प्रवेश', 'सुशिक्षित वर्गाचें औद्योगिक पर्व' या लेखात केलेले आढळते. "मध्यम वर्गातील स्त्रियांनीं काम करण्यास घराबाहेर पडावें या संबंधानें लोकमत अनुकूल नाहीं, तें अनुकूल केलें पाहिजे." "तसेंच त्यांस स्वयंजीवी करण्याच्या दृष्टीनें शिक्षण दिलें पाहिजे." असे डॉ० केतकर म्हणतात. त्याप्रमाणे "प्रचलित औद्योगिक वाटणीत ब्राह्मणेतर वर्गाच्या शिक्षणामुळे आणि स्त्रीशिक्षणामुळे काय फरक होत आहेत ते अवलोकून भवितव्याविषयी स्थूलमानाने अंदाज करणें आणि त्याप्रमाणें तरतूद करणें हा व्यावहारिक समाजशास्त्राचा भाग आहे." हे त्यांचे उद्गारदेखील मननीय आहेत. (विद्यासेवक, वर्ष २ अंक ९, पृष्ठ १३, १९) या प्रश्नाचे सूतोवाच त्यांनी 'आशावादी' कादंबरीत कपिलेच्या तोंडून केलेच आहे. भवितव्याचा या बाबतीतला डॉ० केतकरांनी सूचित केलेला अंदाज या उद्गारानंतर तीस वर्षांच्या अवधीनंतर प्रत्यक्ष व्यवहारात प्रतिबिंबित झालेला आज सर्वत्र दिसत आहे. मध्यमवर्गीय स्त्रियांना द्रव्यार्जन करणे खरोखरच किती आवश्यक झाले आहे, याची साक्ष भोवतालची परिस्थितीच देत आहे.

ग्रंथ सं. ... स्थळप्रत
१०९६ ... दि: ...
१५३२ ... नों. दि. ... १९६०
१५०२२

पाच

# ब्राह्मणकन्या

'ब्राह्मणकन्या' ही डॉ० केतकरांची पाचवी कादंबरी. १९३० साली ती 'भारतगौरव माले'तर्फे प्रकाशित झाली. वस्तुतः ती 'गांवसासू'नंतर थोड्याच महिन्यांनंतर प्रसिद्ध झाली असली, तरी तिची सुरुवात १९२७ साली 'आशावादी'च्या मागोमाग डॉ० केतकरांनी 'विद्यासेवका'त केली होती. 'विद्यासेवका'चा सावकाराच्या देण्यापायी एकदम अस्त झाल्यामुळे ती पुढे स्वतंत्र रूपाने तीन वर्षांनी मुंबईस प्रसिद्ध झाली. या कादंबरीचे अंतरंग तपासण्यापूर्वी एक गोष्ट पहिल्यादा नजरेत भरते; ती म्हणजे 'सहृदय' हे लेखकाचे 'विद्यासेवका'तले टोपणनाव. दोन प्रकरणे वाचल्यानंतर कादंबरीचा कर्ता कोण आहे हे कोणीही सहज सांगू शकले असते. हे टोपणनाव घेण्यात डॉक्टरांचा खास काही हेतू असला पाहिजे. त्यांच्या लेखनात प्रत्येक कृतीच्या मागे काहीतरी नक्की योजना असते. काहीतरी प्रयोगाची कल्पना असते. आपले पूर्वीचे 'अज्ञात' टोपणनाव सोडून हे नवे नाव घेण्यात वाचकांनी केवळ पुस्तक वाचून त्याची शहानिशा करावी, लेखकाचे खरे नाव पाहून बुजू नये, असाच त्यांचा मनोदय दिसतो. 'आशावादी'वर झालेले हल्ले लोकांच्या स्मरणात ताजे होते. टीकाकारांनी डॉ० केतकरांना कादंबरीलेखन बंद करण्यास भाग पाडले पाहिजे असा स्पष्ट इशारा दिला होता. पण आपल्याबद्दलच्या एकूण एक टीका जशाच्या तशा आणि त्यासुद्धा एकत्र करून त्या स्वतः छापून आपल्या वाचकांच्या पुढे ठेवणारा डॉ० केतकरांसारखा निडर लेखक विरळा.

ते त्यांच्या सत्यान्वेषी व ज्ञानपिपासू वृत्तीचे एक लक्षण आहे. कोणताही टीकाकार त्यांच्यावर प्रखर कोरडे ओढू शकला, पण त्यांचे कादंबरीलेखन थांबवण्याची शक्ती त्या टीकांत नव्हती हे खास. तेव्हा भीती हे काही या टोपणनावाचे मूळ समजता येत नाही. कारण पुस्तकावर पुढे त्यांचे नाव सरळ आहेच. तसेच डॉ० केतकरांना आपले विचार कोणत्याही प्रकारे बदलायला लावण्यात त्या टीकांना यश आलेले नाही. 'स्वार्थत्यागाच्या मीमांसे'मधले १९१६ सालचे त्यांचे विचार १९३० सालीही पालटलेले नाहीत; उलट ते अधिक दृढ झाले आहेत. राजवाड्यांच्या मृत्यूपूर्वी १९२५-२६ साली एक वर्षभर त्यांचा व राजवाड्यांचा शेजार झाला होता. राजवाड्यांचेही दुबळ्या लोकांच्या त्यागाच्या बावळट कल्पनांबद्दल अगदी तुच्छ मत होते. त्यामुळे सुधारकांवर, प्रार्थनासमाजिस्टांवर आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीवर दोघांचाही हल्ला अगदी एकाच तऱ्हेचा होता. या विचारांची डॉ० केतकरांनी 'गोंडवनातील प्रियंवदे'त बंडूनाना घरकुट्टयांच्या पत्रात, 'आशावादी'त ब्रह्मगिरीच्या प्रवचनात, त्याचप्रमाणे याही कादंबरीत सुरुवातीच्या प्रकरणात पुनरुक्ती केलेली आहे. दुसऱ्याही बाबतीत डॉ० केतकरांचे विचार मूलग्राही निरीक्षणावर आधारलेले असल्यामुळे शेवटपर्यंत बदललेले नाहीत हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

परंतु काहीतरी परिणाम या टीकांनी त्यांच्या वाङ्मयावर म्हणा किंवा मनावर म्हणा केलेला हा आहेच. 'गांवसासू'चे एकंदर स्वरूप जे नीटनेटके झाले त्याच्यामागे हे परिवर्तनच आहे. तें परिवर्तन 'ब्राह्मणकन्ये'च्या रचनेत कायम झाले आहे. हा सुटसुटीतपणा 'विचक्षणा' आणि 'भटक्या' या कादंबऱ्यांतही दिसून येतो. आता 'खिळेजुळव्यां'चा तगादा पाठीमागचा सुटल्यामुळे, त्यांच्या कलाने भराभर लेखन करण्याची जरुरी राहिली नव्हती. समग्र लेखन व्यवस्थित करता येण्याजोगी परिस्थिती होती. 'विचक्षणे'त मात्र काही ठिकाणी ही विस्कळित रचना डोकावताना दिसते. कारण ती कादंबरी क्रमशः 'स्त्री' मासिकात येत असे.

## हृदयस्पर्शी प्रस्तावना

ह्या कादंबरीची प्रस्तावना केवळ दोन ओळींची आहे. प्रस्तावना हे नाव या ओळींना मी तंत्राकरता देते एवढेच. कारण पुस्तकाच्या आरंभी आपल्या लेखनाबद्दल जो इशारा वाचकाला लेखक देतो, तो या दोन ओळींतच लेखकाने दिला आहे. त्या ओळी अशा :

"सहृदय वाचकास—

पुस्तक एकदा वाचल्यानंतर दुसऱ्यानदा वाचावें, व दुसऱ्यानदा वाचल्यानंतर पुन्हा एक किवा अनेक वेळ वाचावें अशी माझी विनंती आहे.

प्रत्येक वाचनाच्या प्रसंगीं प्रस्तुत लेखनाचें रहस्य अधिकाधिक कळत जाईल

श्री० व्यं० केतकर."

अर्थात् 'सहृदय' लेखकाने सहृदय वाचकांना केलेली ही विनंती आहे यापलिकडे या साध्या दोन ओळींच्या मागे डॉ० केतकरांच्या अधिकाधिक अंतर्मुख होत चाललेल्या मनोवृत्तीचा मोठा इतिहास आहे; त्यांच्यामागे एक विषण्ण योगायोग दडलेला आहे हे वरवर पाहणाऱ्याला कळून येणार नाही. तो योगायोग असा की, या ओळींनंतर 'गांवसासू'ला डॉक्टरांनी साहित्यविषयक प्रश्नांच्या चर्चेला तोंड फोडणारी जी प्रस्तावना लिहिली, त्यानंतर फिरून अशी उद्बोधक प्रस्तावना त्यांच्या कुठल्याच पुस्तकाला त्यांनी लिहिली नाही. "माझें पुस्तक फिरून फिरून वाचा आणि मग काय तें ठरवा" एवढेच त्यांनी वाचकाला सांगितले. 'प्राचीन महाराष्ट्र'ला (शातवाहनपर्व १९३५) त्यांनी विषयपरिचय करून देणारा अत्यंत तांत्रिक प्रस्ताव जोडला आहे. जणू केतकर या व्यक्तीचा असा त्यात काही संबंधच नव्हता. ('भारतीय समाजशास्त्रा'ची प्रस्तावना पण अशीच तांत्रिक व निर्जीव आहे.) वास्तविक हा त्यांचा बाणा नव्हे, हे त्यांनादेखील जाणवले असावे. कारण पहिल्या प्रकरणाच्या अगोदर त्यांनी एक श्लोक लिहिला आहे. डॉ० केतकरांच्या काव्यात वाचकांच्या मनाला कारुण्याने स्पर्श करणारा हा एवढा एकच श्लोक आहे. त्यात डॉ० केतकरांच्या मनाचे यथार्थ चित्र आहे. तो श्लोक असा :

**देशी भाषेवरी वा अकपट मनिंचें प्रेम मित्रांस ठावें**
**कल्याणातें तयांच्या मनिं वसत असे ज्यास इच्छा स्वभावें**
**त्याच्या इच्छेप्रमाणें घडुनि किमपि ये, त्यासही होय शंका**
**त्याचें त्यातें न ठावें, अधिक मग वृथा सांगणें काय लोकां ?**

या पंक्तींतला आशय उघडच आहे. 'ब्राह्मणकन्ये'तल्या दोन ओळींचा विस्तार अधिक खुल्या रूपाने या एका कडव्यात झाला आहे एवढेच. गेल्या पाचसात वर्षांत त्यांनी भोगलेल्या बऱ्यावाईट अनुभवांचे दर्शन यात ओझरते का होईना पण घडते. योगायोग मात्र असा की, 'विचक्षणा' 'स्त्री'त संपूर्ण प्रसिद्ध झाली आणि डॉ० केतकरांनी इहलोकातून प्रयाण केले. तिला प्रस्तावना शीलवतीबाईंनी लिहिली. 'व्हिक्टोरियस इंडिया', 'भटक्या' यांना पण त्यांनीच प्रस्तावना लिहिल्या. अशा तऱ्हेचा डॉ० केतकरांच्या प्रस्तावनालेखनाचा अखेरचा इतिहास आहे.

## कादंबरी केतकरांची श्रेष्ठ

डॉ० केतकरांच्या ज्या सात कादंबऱ्या आहेत त्यांत ही कादंबरी श्रेष्ठ आहे. कथानकात प्रमाणबद्धता आहे. पात्रे मोजकीच पण कमालीची जिवंत व बोलकी आहेत.

पात्रांची मनोरचना त्यांच्या त्यांच्या परिस्थितीच्या मुशीतून बेमालूम बाहेर पडल्यामुळे अगदी स्वाभाविक अशी झाली आहे. आता ही पात्रे अस्वाभाविक परिस्थितीत जन्माला आली, वावरली, ती गोष्ट निराळी. चर्चा आणि संवाद हे सुद्धा जे जे आले आहेत ते मुद्दाम ओकांडी मारल्यासारखे नाहीत. त्यांचे वळण शुद्ध केतकरी असले तरी ते अनुरूप प्रसंगांतून जन्माला आल्यामुळे कथानकाची गती सतत चालू ठेवतात. 'गांवसासू'पासून पुढच्या सगळ्या कादंबऱ्यांत गतीच्या तंत्रात डॉ० केतकरांनी निःसंशय प्रगती केली आहे यात शंका नाही. 'ब्राह्मणकन्ये'त कथानकाचा ओघ सारखा राहाण्याचे, आणि ठिकठिकाणी कारुण्याचे आणि उत्कंठेचे मनोहर मिश्रण तसेच राहाण्याचे मुख्य कारण म्हणजे लेखकाने दाखविलेले सौहार्द; आणि हे सौहार्द कसे, तर केतकरी विनोदाने आणि गांभीर्याने परिपूर्ण असे. उपरोध या कादंबरीत जवळजवळ नाहीच. प्रत्येक पात्राच्या भूमिकेचे रहस्य समजून घेऊन त्या पात्राच्या विचारांची व कृतीची विसंगती का व कशी उत्पन्न झाली, हे डॉ० केतकरांनी अत्यंत मार्मिकपणे दाखविले आहे.

### विपुल नाट्यगुण

या कादंबरीचा दुसरा एक विशेष म्हणजे तिच्यात नाट्यगुण विपुल प्रमाणात आहेत. कथानकाची सुरवात अत्यंत नाट्यपूर्ण आविर्भावात झाली आहे ती अशी :

> "स्त्रीशिक्षणाच्या अभिमान्यांस कालिंदीची हकीकत समजून मोठें दुःख झालें. कालिंदीच्या अविचारीपणाबद्दल तिचा तिच्या आईबापांना इतका राग आला कीं, तिचें मुखावलोकन देखील करूं नये असें त्यांस वाटलें. गांवांतल्या कांहीं मंडळींना चर्चा करण्यास चमत्कारीत बातमी मिळाली म्हणून मोठा आनंद झाला...
>
> कालिंदीनें कॉलेज सोडलें, एवढेंच नव्हे, तर आपल्या आईबापांचें घर सोडून देऊन ती एका शिवशरणप्पा नांवाच्या व्यापाऱ्याशीं त्याची केवळ रखेली म्हणून राहिली."

अर्थात अशा खळबळकारक व वाचकाच्या ठिकाणी कमालीची उत्कंठा उत्पन्न करणाऱ्या मजकुराने कादंबरीस सुरवात झाली आहे, यामुळे पुढे काय होते आहे, अशा उत्सुकतेने वाचक पुढे वाचीत जातो. या कादंबरीत पुष्कळसे भाग ठळकपणे याच वृत्तीला पोषक असे आहेत. अगदी शेवटल्या प्रकरणापर्यंत 'पुढे काय असेल' याचा अजमास करीतच वाचक पानामागून पाने उलटीत जातो. कालिंदीच्या गृहत्यागानंतर तिने हा 'निंद्य' प्रकार का केला हे सांगण्यासाठी डॉ० केतकरांनी कालिंदीचा दोन पिढ्यांपासूनचा इतिहास सांगितला आहे. कालिंदीची आजी मंजुळा मास्तरीण लांछित जन्माची असते. तिच्या तरुणपणापासून तो थेट कालिंदी वयात येईपर्यंतचा दोन

घराण्यांचा इतिहास पुढच्या दोन प्रकरणांत दिला आहे. त्यातही भराभर बदलणारे पण अतिशय ठसठशीत असे प्रसंग आणि विचार दिले आहेत. ते नाट्यगुणास पोषक असे आहेत. पुढे कालिंदी शिवशरणप्पाला सोडल्यानंतर जीव देण्यास जाते, तेव्हा अचानक त्या विचारापासून तिची मैत्रीण एसतेर हिचे दर्शन तिला कसे परावृत्त करते, ती हकिगत पण अशीच नाट्यपूर्ण आहे. रामराव व कलिंदी यांची अचानक आगगाडीत भेट व मैत्री, त्यांचे प्रेम, हेही असेच नाटकाला साजेसे प्रसंग आहेत. कालिंदी ज्याला 'दुष्ट' समजत होती तो शिवशरणप्पा खरोखर इतर सर्वांपेक्षा दयेला किती पात्र होता हे दाखवून कथानकाचा शेवट करण्यात रसपरिपोषाची जी सीमा डॉ० केतकरांनी गाठली आहे, ती अत्यंत परिणामकारक इतकेच नव्हे तर कलापूर्णही आहे, असे मला वाटते. डॉ० केतकरांची ही कादंबरी 'कलाकृती'त मोडण्यासारखी नसली, तरी कलेच्या सर्व सीमांना स्पर्शून जाण्याइतके विचारांचे व मांडणीचे सौंदर्य ठिकठिकाणी तिच्यात भरले आहे, हे खास.

### चार दृष्टिकोण

या कादंबरीचा विषय नावातच संपूर्णपणे आलेला आहे. अर्थात या शब्दाचा अर्थ केवळ 'ब्राह्मणाची मुलगी' असा नसून केतकरी वळणाचा आहे. त्यात खोच आहे. 'ब्राह्मणाची वामसंबंधापासून किंवा ब्राह्मणेतरापासून झालेली मुलगी' हा त्याचा मतलब आहे. हा शब्द विशिष्ट अर्थाने त्यांना 'आशावादी' कादंबरीत कपिलेच्या वर्णनात सुचला. तोच या कादंबरीच्या कोंदणात त्यांनी बसवला. वास्तविक 'कड्ड' संबंधापासून झालेल्या मुलींची कुचंबणा हा विषय त्यांनी मत्तमयूरी व कपिला या दोघींच्या रूपाने अगोदरच हाताळला होता. पण प्रत्येक कादंबरीत त्यांच्या या विषयाबद्दलच्या कल्पना अधिक मोठ्या होत चालल्या आहेत. नायकिणीच्या मुली व कड्ड संबंधापासून, त्यातल्या; त्यात ब्राह्मणापासून, झालेल्या मुली असे दोन फरक त्यांनी या मुलींत केले. त्यांपैकी 'ब्राह्मणकन्ये'ची हकीगत या कादंबरीत संपूर्ण आली असून 'विचक्षणे'त नायकिणीच्या मुलीची दिली आहे. या दोन मुलींच्या मनोवृत्तींतला जो सूक्ष्म फरक डॉ० केतकरांनी दाखवला आहे तो सर्वांनाच पटेल असे नाही. तरीपण तो फार विचारार्ह आहे यात शंका नाही.

या कादंबरीत कालिंदीच्या दृष्टीने, सामान्य जगरहाटीच्या दृष्टीने, सत्यव्रताच्या म्हणजे अत्यंत कनवाळू दृष्टीने आणि वैजनाथशास्त्र्यांच्या अतिशय उच्च पातळीतून निघालेल्या तर्कशुद्ध शास्त्रीय दृष्टीने अशा चार प्रकारांनी त्यांनी या विषयाकडे पाहिले आहे. आणि 'ब्राह्मणकन्ये'च्या जीवनाच्या या चारही बाजू त्यांनी सारख्याच तोलाने कादंबरीत मांडल्या आहेत. एकच गोष्ट : पण ती कालिंदी भावनांच्या आकांताने व्यक्त करते; सत्यव्रत सहानुभूतीच्या हळुवार वृत्तीने पण सत्यान्वेषी दृष्टीने तिच्याकडे पाहातो;

भोवतालचे लोक केवळ कुचेष्टेने पाहातात, आणि वैजनाथशास्त्री आपले सिद्धांत अजमावीत अत्यंत निर्विकार पद्धतीने व्यक्तीचे व समाजाचे नीतिमापन करतात. कालिंदीच्या आततायी वागणुकीपासून तो वैजनाथशास्त्र्यांच्या स्मृतीपर्यंत, रसपरिपोष करीत कथानक नेऊन भिडवणे ही कादंबरीलेखनाची एक मोठी कसोटीच आहे यात शंका नाही. समाजशास्त्रज्ञ कादंबरीकाराला तात्त्विक चर्चा ही सहजसाध्य असली तरी तिचा क्षणिक उफाळत्या भावनांशी वेळोवेळी संबंध जोडून कथानकाचा ओघ एकसारखा ठेवणे ही गोष्ट डॉ० केतकरांनाही पूर्वीच्या कादंबऱ्यांत इतकी साधलेली नाही. या कादंबरीतले 'नयदेव-भगिनी' ने लिहिलेले उपेंद्रव्रजेचे पत्ररूपी आख्यान काय ते फार पाल्हाळाचे वाटते. वैजनाथस्मृती काही जणांना या सुंदर कादंबरीच्या गळ्यात अडकवलेले लोढणे (उदाहरणार्थ, प्रा० क्षीरसागर : नवभारत, एप्रिल १९४९, 'केतकरकार्याच्या आकलनातील अडचणी') वाटते. मला तसे वाटत नाही. पण यासंबंधी जास्त चर्चा पुढे येईलच.

## गैरहजेरीतही व्यापून राहिलेली मंजुळा

वास्तविक मंजुळा ही कालिंदीची आजी. या कथानकाला सुरवात होण्यापूर्वीच मंजुळा वारलेली असते. पण ती मेली तरी आपल्या विचारांचा वारसा ठेवून जाते. तिच्या वर्तनाने निर्माण झालेली कुलहीनतेची परंपराही मागे राहिलीच आहे. एवढेच नव्हे तर तिने अधिक उग्र स्वरूप धारण केलेले आहे. स्वतंत्र तऱ्हेने, 'नीतीच्या अघळपघळ कल्पना' ठेवून जगणाऱ्या मंजुळेत एक प्रकारची खोल माणुसकी आहे; तिचे अंतःकरण धर्मजागृत आहे; तिच्या मुलीची, शांताबाईची, मनोवृत्ती कुलीनतेच्या दडपणाने आक्रसून गेली आहे तसे मंजुळेचे झालेले नाही. पहिल्यापासून झगडून-झटून जगाशी तिने सामना दिला होता. लग्नाच्या नवऱ्याला तो अशिक्षित कुणबाऊ आहे म्हणून तिने जातीच्या रिवाजाचा फायदा घेऊन फारकत दिली होती. उच्छृंखल जीवनाचे सगळे आनंद, सगळी दुःखे तिने भोगली, आणि नंतर डॉ० चिंतोपंतांचा स्नेह जुळल्यावर अगदी एकनिष्ठेने त्यांच्या बायकोशी, मुलांबाळांशी मायेचे आणि लीनतेचे नाते कायम ठेऊन ती मरेपर्यंत राहिली. जगाशी झुंजावे कसे व केव्हा आणि नमते कुणाशी व कुठे घ्यावे हे मंजुळेला चांगले अवगत होते. चिंतोपंतांवर तिचे मनापासून प्रेम होते. त्या प्रेमानेच तिला राजीखुषीने परिस्थितीपुढे वाकावे कसे हे शिकविले. त्यामुळे शांताबाईच्या मनाचा परिस्थिती सुखाची व स्नेहसमृद्ध असूनदेखील जगाला तोंड देताना जो कोंडमारा झाला तसा मंजुळेचा झाला नाही. आपण कुलीन आणि आपली आई अकुलीन अशी भावना शांतेच्या मनात नवऱ्याच्या सांगीशिकवणीमुळे उत्पन्न झाली आणि तिने आईचा संबंध अजिबात तोडला. मंजुळेने बिनतक्रार ते सोसले आणि मुलीच्या दुःखाची, तिच्या

परिस्थितीची पुरी जाणीव ठेवून मरणकाळीं अतिशय दुःखपूर्ण पण केवळ तिच्या कळकळीने भरलेले एक पत्र लिहिले. हे पत्र आयुष्यभर शांताबाईंच्या विसाव्याचे स्थान झाले. मायलेकींचे स्नेहबंधन चिरकालाचे झाले. या पत्रातले हृद्गत हाच कालिंदीच्या आयुष्यातला सर्वांत मोठा प्रश्न होता. त्याप्रमाणे चालण्याचे थोडे धैर्य जर तिच्या आईबापांस असते तर कालिंदीच्या आयुष्याची जी धूळधाण झाली ती होती ना. हे पत्र एका उत्कृष्ट पत्राचा नमुना आहे. मंजुळा म्हणते :

"मला तुझ्या अपत्यांचें भवितव्य अंधःकारमय दिसत आहे. तुझें लग्न एका सभ्य गृहस्थाबरोबर झालें, ही आनंदाची गोष्ट झाली नाहीं, असेंच माझ्या मनात वारंवार येतें. चिंतोपंतांनी तुला ब्राह्मणाला न देतां तुझ्यासारखाच पूर्वेतिहास ज्याचा आहे, अशा तरुणाला दिली असती तर तें अधिक बरें झालें असतें, असेंच मला वाटावयास लागलें. तसें झालें असतें तर तूं माझ्यापासून दूर दूर पळाली नसतीस आणि तुला माझ्यापासून दूर ठेवावें असें तुझ्या नवऱ्याला देखील वाटलें नसतें. तथापि हें मी स्वार्थाच्या हेतूनें बोलत नाहीं. तुझें लग्न उच्च दर्जाच्या जातीच्या मनुष्याशीं करून मी तुला आणि तुझ्या मुलांबाळांना एकसारखें भीतींत आणि संभ्रमित स्थितीत ठेवलें आहे...ज्या स्त्रियांस लग्नविरहित संतती झाली आहे, त्या स्त्रियांनीं लग्नाच्या संततीशीं लग्नव्यवहार न करणें हेंच शहाणपणाचें आहे. नाहीतर पिढ्यान पिढ्या पश्चात्तापास कारण होईल. जो प्रयत्न चांगल्या घराण्यांत किंवा जातींत जन्म झालेल्याबरोबर लग्न लावण्यासाठीं होईल, तो प्रयत्न लग्न झालेल्या मनुष्यास त्याच्या जातीतून ओढून अकरमाशांच्या जातींतच घेण्यास कारणीभूत होईल, आणि त्यामुळें लग्न करणारे दोन्ही पक्ष दुःखी होतील.

"ज्या जातींत तुझा नवरा जन्मास आला आहे, त्या जातींत तुझा किंवा तुझ्या मुलाबाळांचा प्रवेश कधींच होणार नाहीं. एवढेंच नव्हे तर शेणवी, सोनापूर, प्रभू वगैरे जातींत देखील होणार नाहीं. तारुण्यामुळें उदार भावना ज्याच्या मनांत खेळतात असा एखादा तरुण गाठून त्याच्याशीं तुझें लग्न चिंतोपंतांनीं ज्याप्रमाणें लावून दिलें तसेंच तुझ्या नवऱ्यास आणि तुला करावें लागेल. जो तरुणपणीं ठकला त्यानें पुढें ठक बनावें असें करावें लागेल. पण अशी ठकवाठकवी किती पिढ्या चालायची ? आणि तिचे परिणाम तरी बरे होतील काय ? तथापि आपणच चूक केली, बायकोकडे कांहीं दोष नाहीं, असें म्हणून तुझा नवरा तुझ्यावर कदाचित रागावणार नाहीं. पण तुझ्यावर रागावण्याचें आणि संतापण्याचें तो जितकें नाकारील, तितका त्याचा मनस्ताप वाढत जाईल, आणि तो मनांत अधिक दुःख पावेल.

"कालिंदीला एका तुझ्यासारख्याच जन्माच्या मनुष्याकडून मागणी आली, आणि त्या मागणीबद्दल तुझ्या नवऱ्याला राग आला आणि ती मागणी तुझ्या नवऱ्यानें नाकारली हें ऐकून मला फार दुःख झालें.

" मला असें वाटतें की तुमच्या कुटुंबाचें जें भवितव्य ठरलें आहे तें ओळखण्याचें तुम्ही गर्वानें नाकारीत आहांत. आणि जितके दिवस तें तुम्ही नाकाराल तितके दिवस तुम्हांस स्थैर्य उत्पन्न होणार नाहीं. ज्या समाजात तुम्ही शिरूं इच्छितां तो समाज तुम्हांस कधींच घेणार नाहीं, आणि जो समाज तुम्हांस स्वीकारावयास तयार आहे त्या समाजास तुम्ही स्वतःपेक्षा कमी समजून वगळीत आहांत......आतां मला असें वाटू लागलें आहे की प्रामाणिकपणाचाच पंथ चांगला. तुला एवढें सांगून ठेवतें कीं तूं आपल्या मुलीचें लग्न व्हावें यासाठीं आपल्या जन्माची कथा कधींही चोरून ठेऊं नकोस. कुलवृत्तांत चोरण्यानें तुझीं मुलें किंवा वंशज ब्राह्मणजातींत कधींच जावयाचीं नाहींत. विदूर, अकरमासे, आणि कडू मराठे या तीन उदार जाती आहेत. त्या जाती तुझ्या मुलांचा स्वीकार करतील. त्यांना त्यांत प्रवेश करण्यास उत्तेजन दे." (पृष्ठ १८-२०, आवृत्ती पहिली)

## 'सर्वसंग्राहक जातीं'कडे लक्ष

या पत्रात जी भावना मंजुळेने व्यक्त केली आहे, स्वानुभवांती अधर्मसंततीचे जे भवितव्य तिने अगदी घरगुती भाषेत सांगितले आहे, त्याभोवती कादंबरीची उभारणी झालेली आहे. छायेप्रमाणे मंजुळेचे विचार निराळ्याच रूपाने का होईना पण तिच्या नातीच्या घसरणाऱ्या आयुष्यात स्पष्टपणे व्यक्त झालेले आहेत. समाजशास्त्राच्या दृष्टीने विचार केल्यास, 'परागंदे'त अधर्मसंततीचे भवितव्य जे डॉ० केतकरांनी वर्तवले होते, ते त्यांना स्वतःलाच आता अपुरे वाटले म्हणून म्हणा, किंवा आता अगदी शुद्ध भारतीय वातावरणातच या प्रश्नाचा खल अधिक व्यावहारिक दृष्टीने कसा करता येईल या विचारामुळे म्हणा, कडू मराठे, विदुर, अकरमाश्यांच्या उदार जातींची ही पुरवणी त्यांनी जोडली आहे. 'उघड्या तोंडाच्या जाती'चे त्यांचे स्वप्न, 'परागंदे'त त्यांना परागंदा समाजात दिसले; ते आता विरले आहे. 'गांवसासू'त अधर्मसंततीच्या संरक्षणाचे कार्य करण्याचा तो मान ब्रह्मोंना बंगाल्यात किंवा ,'प्रार्थनों'ना महाराष्ट्रात 'उघड्या तोंडाची' जात निर्माण करून मिळवता आला असता; पण समाजाचे अध्वर्यू केशवचंद्र सेन खरोखर धडाडीचे गृहस्थ नव्हते म्हणून बंगालमध्ये जातिभेदाचे उच्चाटण करण्याचे कार्य बारगळले. महाराष्ट्रातसुद्धा रानडे-भांडारकरांनी पुनर्विवाहाचा घोष केला, जातिभेदाविरुद्ध प्रचार चालविला, पण ते स्वतः मात्र आपापल्या जातींनाच सर्व प्रकारे चिकटून राहिले. बेटीचे, जातिभेदाचे बंधन तोडायचा कोणी प्रयत्न केला असेल तर त्यांच्या लहानसहान, ज्यांची आर्थिक स्थिती बेताचीच आहे, अशा सुशिक्षित अनुयायांनी. 'आशावादी'त नंदिकेचा बाप असा होता. 'ब्राह्मणकन्ये'त अप्पासाहेब डग्गे असेच 'फसलेले' गृहस्थ होते,

असे दाखविले आहे. अशी स्थिती असताना आता डॉ० केतकरांनी जरा अधिक व्यावहारिक आणि व्यापक दृष्टीने आजूबाजूला पाहिले. 'उघड्या तोंडाच्या' नव्या जातीची कल्पना जशी समाजिस्टांची तशीच त्यांची स्वतःची पण फोल ठरली होती. समाजातील कमी दर्जाच्या पण 'सर्वसंग्राहक जातीं'कडे त्यांचे लक्ष वळले आणि पहिल्याच उत्साहाने त्यांनी या जातींना उचलून धरले. आजूबाजूचा समाज तर बोलूनचालून गतानुगतिक; नवे आणि जुने नेमके आपल्या फायद्याचे तेवढे घेणारा. कुठलाही फटकारा खायला तो तयार नाही; आणि या समाजाच्या अगदी बांधीव पक्क्या धोरणामुळे, सुधारक कळवळ्याने जातिभेद मोडायला निघाले खरे, पण त्यांचे प्रयत्न दुबळे ठरले. त्यांचे धोरणही समाजाच्या गतानुगतिक धोरणाला धक्का देण्याइतके कणखर नव्हते. म्हणून ते पुष्कळदा हास्यास्पद झाले–त्यांच्या प्रयत्नांची हीच हास्यास्पदता डॉ० केतकरांनी १९१६ पासून ते थेट १९३७ पर्यंतच्या आपल्या सामाजिक लिखाणात वारंवार व्यक्त केली आहे.

## एक पारंपरिक सुधारक

ज्याप्रमाणे मंजुळेच्या मनोवृत्तीची छाया सगळ्या कादंबरीभर पसरली आहे, त्याचप्रमाणे पारंपरिक सुधारकी वृत्तीचा सूर अप्पासाहेबांच्या पात्रामुळे कादंबरीत भरून राहिला आहे. हा सूर डॉ० केतकरांनी उपरोधासाठी वापरलेला नाही; अप्पासाहेबांची कीव येऊन वापरला आहे. अप्पासाहेब सद्वर्तनी होते, विचारी होते, सत्प्रवृत्त होते. त्यांना सुंदर व सुशिक्षित मुलगी हवी होती. तशी त्यांच्या पसंतीस येणारी शांता कुलहीन असूनदेखील 'जातिभेद मोडण्याच्या प्रामाणिक इच्छेने' त्यांनी तिच्याशी विवाह केला. वर्तमानपत्रांनी केलेल्या स्तुतीने त्यांना बरे वाटे. आपल्याप्रमाणेच आपल्या मुलीशीदेखील कोणीतरी उमदा ब्राह्मण तरुण लग्न लावील अशा स्वाभाविक वृत्तीने त्यांनी, आपल्या आयुष्यात आणखी काही दूरदृष्टी राखण्याची जरूर आहे याची कल्पना नसल्यामुळे आपल्या कुटुंबास ब्राह्मणांत सक्तीने मिसळायला लावले. सासूशी संबंध तोडला. मुलीच्यावर तिने वाटेल त्या माणसात मिसळू नये, म्हणून निर्बंध घातले. ब्राह्मणाच्या उच्च संस्कृतीची मोहिनी अप्पासाहेबांवर इतकी होती की, ब्राह्मणेतर तरुणांशी तर काय, पण कॉलेजातील कुठच्याच तरुणाशी त्यांनी तिचे संघटन वाढू दिले नाही. तिची नीती उच्च राखणे हेच तिचे ब्राह्मणपत्नी होण्याचे मुख्य साधन आहे, अशा वृत्तीने त्यांनी कालिंदीला वाढविले. पत्नी व मुले यांच्याबद्दल त्यांना फार माया होती. पण त्यांच्या आत्मसंतुष्ट मनाला केवळ नीट पालनपोषण करणे, लाडावणे आणि शिक्षण देणे याखेरीज पालकाचे आणखी काही कर्तव्य असते हे उमगले नाही. आपण सर्वांत जास्ती स्वार्थत्याग बायकोकरता केलेला आहे, तेव्हा जास्त काय करायचे?—अशी त्यांची भावना होती.

बायकामुलांच्या प्रेमात कृतज्ञतेचे स्थान फार लहान असते. त्यांचा विश्वास संपादन करणे हे पालकाचे आद्य कर्तव्य आहे याची जाणीव त्यांना झाली नाही. त्यामुळे बायको त्यांच्याशी आदबीने वागली तरी मनातून ती नवऱ्याशी तादात्म्य कधीच पावली नाही. नवऱ्याच्या जातीच्या आपण नव्हे; कधीच होऊ शकणार नाही; आपली मुले पण आपल्याचसारखी राहाणार; हे शल्य तिच्या मनाला बोचत राही. अप्पासाहेब 'ब्राह्मण'. त्यांना या तिच्या अंतस्थ वादळाची पुरी कल्पना नसे. त्यांना तो त्रागा वाटे. मुलगी मोठी झाली तीही बापाला 'डागाळलेल्या मुली' बरोबर लग्न लावून आपल्याला जातिबाह्य स्थितीत सतत ठेवल्याबद्दल टोचून बोलू लागली. तसेच "तुम्हीं औदार्यामुळें लग्न केलें की कीर्तीच्या लोभासाठीं लग्न केलें हें आज कोण पाहावयास आलें आहे ? आणि तुमच्या हेतूच्या उच्चतेवर तुमच्या मुलांची पदवी ठरते काय ? आणि जें औदार्य दाखविलें तें स्वतःच्या नुकसानीपेक्षां मुलांची नुकसानी करूनच दाखविलें कीं नाहीं ? तुमच्या औदार्यानें तुमची नुकसानी काय झाली ? तर श्राद्धाकरतां भिक्षुक आले नाहींत अशाच प्रकारची ना ? तुम्हांला स्वतःला कमीपणा आला नाहीं. तुम्ही अजून ब्राह्मणच आहांत. पण आम्ही ब्राह्मण कुठें आहोंत ?" (पृष्ठ ९) असा तिने सरळ बापाला प्रश्न केला.

### नवी जाणीव

बायकोच्या वर्षानुवर्षांच्या भुणभुणीने जे काम झाले नाही ते या सरळ सवालाने केले. अप्पासाहेब रागावले, पण निरुत्तर झाले. कधी न आलेले प्रश्न त्यांच्या मनात आले. बायकोचे जीवन स्वतंत्र नव्हते, पण मुलीचे स्वतंत्र आहे ही जाणीव त्यांना झाली. पण मुलीला उत्तर कसे द्यावे हेही त्यांना सुचेना. घरातले आपले अबाधित प्रभुत्व कोसळले आहे हे त्यांना कळले. पुढे कालिंदी जेव्हा शिवशरणप्पाबरोबर निघून गेली, तेव्हा त्यांना तिने आपल्या तोंडाला काळोखी फासली म्हणून राग आला. तिला मूल झाले, तेव्हा आईला राहावेना म्हणून ती एकदा तिला भेटून आली. पण अप्पासाहेबांनी तिचा संबंध तोडला. शिवशरणप्पाला सोडल्यानंतर काही महिने कालिंदीने अतिशय हालात, दारिद्र्यात आणि निराशेत काढले; पण तिची वास्तपुस्त पित्याने केली नाही. इतके झाले तरी आतून अप्पासाहेबांचे बापाचे मन मेले नव्हते. कारण धाकटी उषा धिटाईत कालिंदीच्या पावलावर पाऊल टाकू लागली होती. कालिंदीच्या वागणुकीमुळे उषेचे लग्न कोणत्याही जातीच्या कुलीन घराण्यात होईल ही आशाही नष्ट झाली होती. तेव्हा या परिस्थितीत आपल्या अपत्यांची त्यांना कीव आली. आणि त्यांनी वैजनाथशास्त्र्यांकडे धाव घेतली. कालिंदीची हकिगत कळल्यावर "लग्नाशिवाय मूल झालें तर काय झालें ?" असे म्हणून शास्त्रीबोवांनी असे सांगितले की, स्त्रीपुरुषसंबंधाच्या आमच्या कल्पनाच इतक्या मागासलेल्या आहेत की भीती

बाजूला ठेवून त्या तपासण्याचे अवसानच कुणाला राहिले नाही. या प्रकाराबाबत "पुरुषाच्या सत्तेखाली पूर्णपणे गेल्याशिवाय पुरुषसायुज्याचा आणि मातृत्वाचा हक्क तिनें प्रस्थापित केला आहे, दुसरें काय केलें?" असे उद्गार वैजनाथशास्त्र्यांनी काढले आणि मुलीस दूर लोटल्याबद्दल बापाला दोष लावला. वैजनाथशास्त्र्यांची मते पचवण्याची शक्तीच अप्पासाहेबांमध्ये नव्हती हे खरे आहे. पण याचा परिणाम एक झाला की, उषेचा 'पाठलाग करणारा' अज्ञात इस्राईल तरुण बेंजी जेव्हा तिच्याशी प्रेमसंबंध जुळवतो, तेव्हा त्याच्या लग्नाच्या मागणीला अप्पासाहेबांनी तत्काळ रुकार दिला.

## 'सुखी' संसारातील किंतू

शांताबाईंचा संसार सर्व तऱ्हेने सुखी असला तरी वर दिलेल्या कारणांनी त्यांचा स्वभाव चेपलेला व असंतुष्ट असा बनलेला आहे. आपल्यावर नवऱ्याचे प्रेम आहे याची जाणीव असूनदेखील मुले झाल्यावर त्या दोघांतले अंतर वाढले. शांतपणाने वागून ब्राह्मणजात परजनसंग्राहक बनविण्याची नवऱ्याची कल्पना शांताबाईंना तुच्छतेची वाटे. कारण ब्राह्मण पुरुष जसे अप्पासाहेबांना वागवीत, तशा तऱ्हेची वागणूक ब्राह्मण स्त्रिया शांताबाईंना देत नसत. शांताबाई कुलस्त्री होती. तिला हे 'तिरस्कारगर्भ औदार्य' पाहून चीड येई व ती ब्राह्मणांशी तुटक वागे. इतरांत मिसळणे नवऱ्याला पटत नसे. आईचा संबंध तोडण्यात तिचाही भाग होताच; पण पुढे नवऱ्यापासून जसे तिचे मन दुरावू लागले तसे ते आईकडे ओढ घेऊ लागले. पुढे जावई आपल्याला विचारीत नाही तर कशाला त्याची धन करा म्हणून राहाते घर आईने चिंतोपंतांच्याच ताब्यात राहू दिले आणि मुलीला जवळजवळ काहीच दिले नाही. तेव्हाही ह्या नवराबायकोची निराशा झाली. तिचा परिणाम नवऱ्याबद्दल एक किंतू शांताबाईंच्या मनात कायमचा राहून गेला. वरवर मात्र सारे ठीक होते. शिवशरणप्पाने कालिंदीला बाळंतपणाच्या वेळेला थाटामाटात ठेवलेले पाहूनही 'पुरुष ठेवलेल्या बाईला लग्नाच्या बायकोपेक्षां अधिक सुखात ठेवतात' असाच विचार त्यांच्या मनात आला. स्वतःचे मन असे व्यग्र असल्याने कालिंदी व तिची आई यांच्यात कुठल्याही प्रसंगी उत्कट प्रेमाचा दुवा निर्माण झाला नाही.

## हळवी पण स्वतंत्र विचाराची कालिंदी

कालिंदीमध्ये आईच्या अंगी असणारा दुबळा हळवेपणा आणि आजीच्या अंगी असलेली प्रसंगांतून पार पडण्यास लागणारी तडफ आणि स्वतंत्र विचार करण्याची शक्ती यांचे विलक्षण मिश्रण झालेले आहे. पहिल्यापासून शेवटपर्यंत डॉ० केतकरांनी कालिंदीचे चित्र अत्यंत मार्मिकपणाने रेखाटले आहे. समाजाच्या आणि

व्यक्तीच्या नीतीचे मूल्यमापन हा जरी या कादंबरीचा मुख्य हेतू असला, आणि जरी कालिंदीसारख्यांचे ज्यांचे जन्म आहेत त्यांच्याविषयी अपार सहानुभूती डॉ० केतकरांना वाटत असली तरी आपली सद्भावनापोषकवृत्ती त्यांनी शास्त्रीय सिद्धांतांच्या आहारी जाऊ दिली नाही. ती त्यांनी करुणेच्या ओघात वाहू दिली. संपूर्ण तत्त्वज्ञानाची भूमिका कायम राखून त्यांनी असे दाखविले आहे की, कालिंदीचे वागणे कोणत्याही रीतीने तिच्या मनाचे शांतवन करण्यास उपयोगी पडण्यासारखे मुळातच नव्हते. अशा तऱ्हेच्या संबंधाने दुःखे कमी होण्याऐवजी वाढतात मात्र. मंजुळेचे संस्कार व कालिंदीचे संस्कार वेगळे होते. मंजुळा जन्मभर चिंतोपंतांपाशी सुखाने राहिली आणि तिने चिंतोपंतांच्या औरस मुलांचेही प्रेम आपल्याकडे ओढून घेतले. त्यामुळे चिंतोपंतांच्या मृत्यूनंतरसुद्धा ती उघडी पडली नाही. पण कलिंदीचे तसे होते का ? ती शिवशरणप्पाच्या बायकोला बघूनही फारशी ओळखत नव्हती. एखादी खालच्या दर्जाची रखेली त्या घराण्यात जास्त चांगल्या तऱ्हेने वावरली असती. ते परंपरेला धरून होते. पण शिकलेली, चैनीत वाढलेली, सुंदर ब्राह्मणकन्या! आणि हे तिचे जीवन! कुलीनाच्या मुलीचे असे वर्तन समाजात क्षोभ उत्पन्न करील यात नवल काय ? अशा वेळी तो समाज जन्मलांच्छनामुळे त्या मुलीला उच्चकुलोत्पन्न, तिला शोभेसा नवरा लाभू देण्याचे नाकारीत होता, हे कुणाच्या लक्षात येणार ?

## गृहत्यागाची पार्श्वभूमी

कालिंदीने जो गृहत्याग केला तो मैत्रिणीत होणारा उपहास एवढ्या एका कारणामुळे झालेला नाही. ती इतर मुलींपेक्षा स्वभावतः अत्यंत विचारी आणि बुद्धिमान होती. ती बी० ए० झाली, तर तिचे फोटो वर्तमानपत्रांत येतील अशी आशा तिच्या वडिलांना होती. ती सुंदर होती, चारित्र्यवान होती. तेव्हा मुलांना कॉलेजात भुरळ पाडण्यासारखे सर्व गुण तिच्यात होते. पण तिच्याबरोबर मजा करण्यास अनेक तरुण तिला मिळणे शक्य असूनदेखील कालिंदीला 'आपले लग्न व्हावे' असा ध्यास मनापासून, तारुण्याच्या सुरुवातीपासूनच असल्यामुळे ती भावी पतीच्या गंभीर भूमिकेची अपेक्षा तरुणांकडून करी. 'जात' आडवी आल्याने ब्राह्मण तर काय पण कायस्थ तरुणदेखील तिला पत्नी होण्यालायक समजत ना, हे जेव्हा तिच्या लक्षात आले, तेव्हा एक प्रकारची विकृत चिकित्सक दृष्टी तिच्यात आली. प्रेमाशिवाय लग्न झाले तर पुरुषांनी दुसरी बायको करायला काय झाले, अशा तऱ्हेचे वादविवाद ती सत्यव्रताशी घालू लागली. सत्यव्रत तिच्या पाठचा; तेव्हा या मुलीच्या असल्या उद्गारांनी त्याला आश्चर्य वाटे. परंतु तिची सगळी बौद्धिक शक्ती व महत्त्वाकांक्षा भावनांच्या आहारी जाते आहे हे त्याच्या लक्षात तेव्हा आले नाही. कालिंदी पुरुषांशी फार जपून वागे. घरात आईबाप आपल्या पसाऱ्यात

गुरफटलेले. भाऊ लहान, तेव्हा तिला लांबूनच का होईना, पण जे निराशेचे फटकारे बसले त्याची कल्पना त्याला कुठून येणार ? हे सगळे अनुभव आणि प्रेमात निराश होऊन अब्रूला महाग झालेल्या दुर्दैवी कॉलेजकन्यांचे अनुभव यांचा कालिंदीच्या हळव्या मनावर फार परिणाम झला. नेमका याच वेळी धाकटा भाऊ कॉलेजासाठी मुंबईस गेलेला. दुःखी जीवाविषयी द्रवणारे तिचे मन या वेळी निपुत्रिक आणि अशिक्षित बायकोचे लोढणे गळ्यात अडकल्यामुळे दुःखी अशा शिवशरणप्पाकडे वळले. त्या सहानुभूतीचे परिवर्तन प्रेमात झाले आणि तिने घर सोडले.

पण लवकरच अत्यंत व्यावहारिक दृष्टीने, शिक्षणाचा संस्कार फारसा नसल्यामुळे आडदांडपणे, बेफिकिरीने जीवन व्यतीत करणाऱ्या शिवशरणप्पाच्या सहवासाचा तिला कंटाळा आला. त्याला सुरुवात शिवशरणप्पा लग्नाच्या बायकोची व आपली भेट होऊ नये म्हणून जपतो, एकंदरीत तिचा दर्जा व आपला यात तो फरक करतो या भावनेने झाली. पुढे शिवशरणप्पाचे पैसे गेले व त्याने तिला लांब एका खोलीत ठेवले. तो बेफिकिरीने वागे. पैसा हातात नाही. हाल होऊ लागले. लोक वेश्या म्हणून तिच्याकडे पाहू लागले. तेव्हा कलिंदीला जीवन नकोसे झाले. घरचेही कुणी विचारपूस करीना. ती जीव द्यायला निघाली. पण आता तिचे मन अंतर्मुख झाले होते. जगाला दोष देण्यापेक्षा तिला आपले करणे त्राग्याचे वाटू लागले. आता ती आई झाल्यामुळे तिला आईच्या प्रेमाची कल्पना आली. मुलाकरिता तिचे मन हळहळले आणि आपण व्यर्थ आपल्या आईबापांना जन्माबद्दल बोल लावले असे तिला कळून आले. आई शुद्ध तरी होती, पण आपल्याजवळ काय आहे ?—असे विचार मनात येऊन ती विचार करीत बसली होती तोच अचानक एसतेर किल्लेदार त्या ठिकाणी आली आणि कालिंदीचे आत्महत्येचे विचार क्षणात बदलले. एसतेरला तिने आपली हकिगत थोडक्यात सांगितली. एसतेर वयाने मोठी, जातीत शिकलेला नवरा मिळण्याचा अभाव म्हणून अविवाहित असलेली मास्तरीण होती. रूप, गुण तिच्यात भरपूर होते. पण जगाच्या अनुभवाने तिचे मन खंबीर तितकेच कनवाळू झाले होते. तिच्या घरी मुलाला ठेवून, तिच्याच मदतीने कालिंदीने मुंबईला लेबर ऑफिसमध्ये नोकरी मिळविली आणि मजूर स्त्रियांच्या जीवनाचे निरीक्षण केल्यावर तिला आपल्या पांढरपेशा कल्पना किती अपूर्ण आहेत ते दिसून आले आणि स्त्रीजीवन विशाल स्वरूपात ती पाहू लागली. त्यात रंगली. आता पैसा होता, मनाला भवितव्याची आशा होती; पण तिचे मनच असे की ते पहिल्याने कुटुंबप्रेमाला भुकेलेले. कार्याची विशाल प्रेरणा तिच्यात उत्पन्न होण्यासारखी नव्हती. योग्य सहचराच्या शोधात भटकणारे तिचे मन वर्षानुवर्षे त्याच विषयाभोवती फिरत होते. शिवशरणप्पाविषयी विचारही आता तिच्या मनात येईना. रामराव या कामगार-पुढाऱ्याने तिचे मन आकर्षून घेतले. ते आकर्षण दुतर्फी होते. रामराव सुविद्य असून आणि नव्या दृष्टीने जगाकडे

पाहाणारा, गरिबांचा कैवारी, बाणेदार असा होता. जेव्हा परिचय वाढून लग्नाचा प्रश्न आला, तेव्हा कालिंदीने रामरावाच्या गुजरातणीबरोबरच्या प्रेमाची हकीगत ऐकली. रामराव दुःखी आहे, स्त्रीजातीकडे कठोर दृष्टीने पाहातो आहे, हे पाहून तिला बरे वाटले. मात्र रामरावाने जेव्हा तिची हकिगत ऐकली, आणि तिला मूल आहे व मुलाचा बाप जिवंत आहे हे ऐकल्यावर विवाह कितपत यशस्वी होईल हे मनात येऊन तो कचरला, तेव्हा कालिंदीला धक्का बसला. परंतु आता रामरावावर आपले खरे प्रेम आहे अशी तिला खात्री पटली होती. त्याला हस्तगत करण्याचे तिने ठरवले, पण तिला मुद्दाम तसा प्रयत्न करावा लागला नाही. लवकरच एका सुधारक 'मातृदिनवाल्या'च्या कळकळीच्या आमंत्रणाच्या प्रसंगी 'अनूढ मातृत्वाबद्दल' त्याचे विचार किती अपुरे आणि अंतःकरणशून्य आहेत हे रामरावाला कळले आणि त्याचा निश्चय होऊन त्याने कालिंदीचा स्वीकार केला. त्यानंतर लगेच शिवशरणप्पाच्या मृत्यूचा प्रसंग घडून आला. लग्नानंतर कालिंदीचे मन सामाजिक प्रश्नांतून अजिबात उडाले. ती संसारात रमली.

एसतेर ही ज्यू मुलगी अत्यंत समंजस व विनोदी अशी आहे. बेनेइस्त्राईल लोकांतला मूर्तिमंत मराठमोळेपणा म्हणजे एसतेर आहे. प्रवाहपतित पण आपल्या स्थानाला चिकटून राहाणारी, रसिक पण संयमी अशी ती आहे. तिचे पात्र गौण असले तरी कालिंदीच्या अस्थिर विचारांना स्थिर करण्याचे काम ती करते. सत्यव्रताला आपल्या प्रेमपाशात अडकवून त्याचे जीवन ती सुखी करते. तिच्यामुळेच सत्यव्रत अधिक व्यवहारी बनतो. डॉ० केतकरांना आपल्या स्त्री-पात्रांत प्रियंवदा व एसतेर ही पात्रे फार आवडत. (प्रतिभा, १९३४, ५ जानेवारी, 'डॉ० केतकरांच्या ब्राह्मणकन्येतील एक रहस्य': पिनाकी.)

## प्रेमानेच बेफिकीर बनलेला शिवशरणप्पा

शिवशरण हा 'वाणगट' खरा. त्याच्या आयुष्याची स्थूल मीमांसा वर आलेलीच आहे. अगदी जवळजवळ त्याचे मृत्युपत्र वाचीपर्यंत कालिंदीप्रमाणे वाचकही त्याच्यामधला चांगुलपणा ओळखू शकत नाही. त्याच्या मृत्युपत्राने डॉ० केतकर वाचकाला आश्चर्याचा धक्का देतात आणि शिवशरण हा व्यसनी, बेफिकीर, विश्वासघातकी नसून आयुष्यात चुलत्याच्या आणि मुनिमाच्या कारस्थानांना बळी पडलेला, संकोची वृत्तीचा आणि ज्याच्या प्रेमाच्या आशा फक्त कालिंदीच्या सहवासात उत्फुल्ल झाल्या व आर्थिक डबघाईमुळे अकाल चुरडल्या गेल्या असा माणूस दिसतो. तो दुष्ट नव्हताच. तायम्मा स्त्री नाही हे माहीत असूनही तिचे गौप्य संकोचामुळे आणि सहानुभूतीने त्याने कायम राखले. निपुत्रिकपणामुळे झालेल्या चेष्टा सोसल्या. तायम्माला सवत आणली नाही. पुढे कालिंदीशी जी बेफिकिरी

त्याने दाखविली ती त्याच्या आत्यंतिक प्रेमाचे द्योतक होती. कालिंदीने हालात आपल्याजवळ राहू नये, तिला देण्यासारखे आपल्याजवळ काही नाही, तिने निघून जावे व सुखी व्हावे म्हणून योजलेला तो डाव होता. शेवटीदेखील तायम्माची आणि कालिंदीच्या मुलाची सोय करुन देऊन, कालिंदी रामरावाच्या आश्रयाने सुखी होईल ही खात्री झाल्यानंतर हा भणंग भग्नहृदय शिवशरणप्पा आत्महत्या करतो. लिंगायतांत माणसाला पुरुन त्यावर समाधी बांधतात. त्यावर क्वचित नावदेखील कोरतात. पण ख्रिस्त्यांप्रमाणे मृत्युलेख कोरीत नाहीत. पण "आप्तांची आणि आप्तांशी संगनमत करणाऱ्या दिवाणजीची कारस्थाने यांस बळी पडलेला शिवशरण श्रीशंकरापाशी सर्व पापांबद्दल क्षमा मागत आहे," हा मृत्युलेख विलायती थाटाचा असला तरी कथानकात करुणरस वाढवतो.

## मवाळ भावनात्मक सत्यव्रत

या कादंबरीत स्वतःच्याच विचारांचे चालतेबोलते रूप म्हणून डॉ० केतकरांनी दोन पात्रे योजली आहेत : पहिला सत्यव्रत व दुसरे वैजनाथशास्त्री. सत्यव्रताच्या रूपाने त्यांनी आपल्या मनाची भावनात्मक मवाळ बाजू पुढे मांडली आहे. वैजनाथशास्त्री राजवाड्यांची छाया असली व त्यांच्या भाषेत, विचारांत, परिस्थितीत राजवाड्यांची नक्कल हुबेहूब डॉ० केतकरांनी वठवली असली, तरी या कादंबरीत त्यांच्या रूपाने जे विचार डॉ० केतकरांनी मांडले आहेत ते सगळे डॉ० केतकरांचेच आहेत; राजवाड्यांचे मुळीच नव्हत. रानडे-भांडारकरांना बैलाची जोडी म्हणणे, हरिभाऊ आपट्यांना हऱ्या आपटे म्हणणे वगैरे सर्व राजवाडी विशेष हे चित्र ठसठशीत करण्याकरता या कादंबरीत (त्याचप्रमाणे 'प्रियंवदे'त) डॉ० केतकरांनी मुक्त हस्ताने वापरले आहेत. राजवाड्यांच्या मृत्यूनंतर त्यांनी 'विद्यासेवका'त 'राजवाड्यांनी सांगितलेल्या आठवणी' दिल्या आहेत, त्या डॉ० केतकरांशिवाय कुणीच लिहायला धजला नसता. जेव्हा त्या आठवणींवर श्री० न० चिं० केळकरांनी काहूर माजविले तेव्हा त्यांनी 'समकालीनांचा उल्लेख' या सदरात जे सांगितले ते 'आशावादी'च्या परीक्षणात आलेलेच आहे.

## दुहेरी पेच

वैजनाथशास्त्र्यांच्या रूपाने अगदी ठाशीव, रेखीव व क्वचित उग्र भाषेत डॉ० केतकरांनी आपली मते वैजनाथस्मृतीत दिलेली आहेत. ही मते तपासली तर काही ठिकाणी अतिशय परिपूर्ण, तर काही अगदी अपरिपक्व पण सारख्याच ठाशीव राजवाडी भाषेत लिहिली आहेत. ती कादंबरीच्या साच्यात बसण्याइतकी नेहमीची नसली, तरी स्मृतीप्रमाणे अधिकारी आणि आधुनिक काळाच्या अपेक्षांप्रमाणे

'सार्वभौम' आणि 'सार्वायुष' ही नाहीत हे डॉ० केतकरांना स्वतःला माहीत असावे. ते विचार तर कादंबरीत तिच्या साच्याला बाधा न होईल अशा बेताने द्यायचे या त्यांच्या धोरणामुळे त्यांना वैजनाथशास्त्र्यांचे पात्र ओढूनताणून फिरून कादंबरीत आणावे लागले असे मला वाटते. एरवी सत्यव्रताची कोवळी भूमिका अधिक मोठ्या कल्पना पेलून धरील असे त्यांना वाटेना. आणि हे विचार तर त्याच्याशी निगडित ठेवायचे. या दुहेरी पेचात पडून किंवा त्या पेचातून आपली सुटका करून घेण्याच्या हेतूने डॉ० केतकरांनी अप्पासाहेबांस बाजूस ढकलून सत्यव्रताला 'वैजनाथस्मृतींचा लेखक व वारस' बनवले. आता हे सगळे विचार एवढे गहन आणि तात्त्विक आणि पुष्कळसे अव्यावहारिक होते की, कागद जपून ठेवण्या-पलिकडे सत्यव्रतदेखील त्या बाबतीत काही करू शकला नाही. तेव्हा मोठ्या अवाढव्य योजनांची काय स्थिती होते ते दाखविण्यासाठीच की काय, डॉ० केतकरांनी या गोष्टीचा मुद्दाम उल्लेख केला असावा. गांभीर्य व विनोद यांच्या रेषांवर वेगाने व आळीपाळीने आक्रमण करणारी डॉ० केतकरांची बुद्धी या उदाहरणात चांगलीच व्यक्त झालेली आहे. कळस म्हणजे सर्व वैजनाथस्मृतीला रामरावाच्या एका उक्तीने कादंबरीच्या अगदी शेवटच्या छेदात व्यावहारिक कलाटणी दिली आहे व मंजुळेची बाजू उचलून धरली आहे. ते उद्गार असे:

"नवीन विचाराचा समाज स्थापन करावयाचा आणि त्याची एक निराळी जात बनवायची या कल्पनेच्या मी विरुद्धच आहें. सर्व सुशिक्षित लोकांची निराळी जात करण्याचें कारण नाहीं. मराठा जातच किती तरी व्यापक आहे. तिच्यांतच सर्वांचा समावेश होत जाईल. आज ही जात अशिक्षित असल्यामुळें हिच्यांत आपला प्रवेश तुम्हांस आवडत नाहीं, म्हणून तुम्ही निसटून जाऊं पाहात आहांत. मला तर महाराष्ट्रांतले सर्व जातिभेद मोडूं पाहाणारे लोक पुढें मराठ्यांच्या जातींत समाविष्ट होतील असें वाटतें. मातृसत्ताक समाजपद्धति तयार करण्याचें ओझें कोणीं घेऊं नये. कायदा आणि उपासनापद्धति यांचा परस्पर संबंध तोडून टाकण्यासाठी लागणारा कायदा आपणांस पूर्ण स्वराज्य मिळेल तेव्हां आपण आणूं."

सत्यव्रताचे पात्र अती सौम्य, विचारी. जो जो मनुष्य जवळ येईल त्याच्याकडे तो न्यायबुद्धीने पाहाणारा. तरी पण त्याचा स्वभाव जाज्वल्य नसल्यामुळे, स्वतःच्या मानसिक उर्मीत गटांगळ्या खाणारा असा तो झाल्यामुळे, व्यवहाराची बाजू त्याला माहीत नाही. वैजनाथशास्त्री जगाला तुच्छ लेखणारे. करुणा आणि द्वेष यांच्या पलिकडचे. तेव्हा व्यवहाराला न विसंबणाऱ्या पण भवितव्याबद्दल उच्च आकांक्षा बाळगणाऱ्या डॉ० केतकरांनी हा त्या काळी रुजू घातलेला सिद्धांत रामरावाच्या तोंडी घातला असावा. अशा तऱ्हेने सत्यव्रत, रामराव आणि वैजनाथशास्त्री ही तिन्ही पात्रे वैशिष्ट्यपूर्ण राहूनही एकमेकांस पूरक अशी झालेली आहेत.

## वैजनाथ-स्मृती

'वैजनाथस्मृति', हे कादंबरीतले ठिगळ नव्हे. तिची रचना कादंबरीप्रमाणे नसली तरी ती कादंबरीची रसहानी करते असे मला वाटत नाही. तात्त्विक आणि समाजशास्त्रीय कूटांवरच जर कथा आधारायची म्हटली तर पुष्कळ वेळा असे बोजड तंत्रसुद्धा हाताळणे अपरिहार्य असते. (इंग्रजीत अप्टन सिंक्लेअरच्या कादंबऱ्यांत वेगवेगळ्या बोजड युक्त्या तंत्राखातर वापरलेल्या आढळतात. एच० जी० वेल्ससुद्धा या अपवादाला पारखे नाहीत. बर्नार्ड शॉ तर प्रस्तावनेखातरच म्हणे नाटके लिहीत. तर मग डॉ० केतकरांनी समजा 'वैजनाथस्मृती'च्या 'तात्पर्या'साठी एखादी कादंबरी लिहिली तर बिघडले कुठे?) कदाचित 'माझे तंत्र वेगळे आहे' असे जे डॉ० केतकर म्हणत असत, ते त्यांचे हेच तंत्र असण्याचा संभव आहे. पण समाजशास्त्रीय कादंबऱ्यांच्या तंत्राविषयी डॉ० केतकरांच्याखेरीज चर्चा करण्याइतकी दुसरी ठळक उदाहरणे मराठीत आहेतच कुठे? आणि जोपर्यंत हे तंत्र अजमावण्याइतकी आमची समाजशास्त्रीय कथांची संपत्ती वाढली नाही तोवर वैजनाथस्मृतीसारखे विचारप्रवर्तक वाङ्मय लोटणे म्हणणे वाजवी होणार नाही. 'वैजनाथस्मृती'संबंधाने सांगायची आणखी एक गोष्ट अशी की नागपूरला असताना आपण एक 'श्रीधरस्मृति' लिहिणार आहो असे डॉ० केतकर आपल्या स्नेह्यांजवळ बोलत, ती 'श्रीधरस्मृति' तीच ही 'वैजनाथस्मृति' असेही काहींना वाटण्याचा संभव आहे. डॉ० केतकरांचे हिंदू जाती, हिंदू धर्म व भारतीय संस्कृती यांवरचे समग्र वाङ्मय तपासून पाहाता, आणि त्यातही अगदी लहान गोष्टींकरता त्यांनी पानेच्या पाने अडवलेली पाहाताना, या सगळ्या वाङ्मयानंतरची जी स्मृती तिचा आराखडासुद्धा त्यांच्या मनात यापेक्षा कितीतरी मोठा आणि पारंब्या फुटलेला असला पाहिजे होता. त्यांचे ज्ञानकोशातले हिंदूंची जातिव्यवस्था, धर्म, भारतीय संस्कृतीची प्रसरणशीलता वगैरे विषय चाळले असता ही 'वैजनाथस्मृति' काही ठिकाणी याच विधानांची संक्षिप्त आवृत्ती, तर काही ठिकाणी विशिष्ट संदर्भ गाळून कोणत्याही समाजस्थितीला लागू होईल असे त्याच त्या मुद्यांचे रूपांतर, तर काही ठिकाणी जरा नव्या कल्पना घालून त्यांनी केलेली तीच विधाने आहेत असे दिसते. 'वैजनाथस्मृती'त क्वचितच असा मुद्दा असेल की, तो वर उल्लेखिलेल्या डॉ० केतकरांच्या लिखाणात नाही. जगाच्या संस्कृतीत भारतीय संस्कृतीचे स्थान सर्वांत महत्त्वाचे आहे हे डॉ० केतकरांनी आग्रहाने सांगून त्यासाठी आमच्या आचारविचारांत इतरांप्रमाणे काय काय बदल केले पाहिजेत हेही सांगितले आहे. त्याच मुद्यांचा सारांश घेऊन ही 'वैजनाथस्मृति' तयार झालेली आहे.

### विवाहविषयक प्रश्न

अधिक खोल गेले तर असेही आढळून येते की, 'वैजनाथस्मृती'त संस्कृतिविषयक वर दिलेल्या धोरणाचा अवलंब करून विवाहविषयक प्रश्नांना जास्त प्राधान्य दिले आहे. मातृप्रधान कुटुंबपद्धतीबद्दलचे विचार डॉ० केतकरांनी 'प्रियंवदे'त आणि स्त्रीसत्तापराभवा'त दिलेलेच आहेत. तेच विचार त्यांनी इथे परत मांडले आहेत. समाजात मातृप्रधान व पितृप्रधान अशा दोन्ही कुटुंबपद्धती असाव्या असे त्यांचे म्हणणे आहे. आणि स्त्रियांची 'पुरुषांकितता किंवा कुटुंबांतील पितृसत्ता द्रव्यमूलक' (पृष्ठ २९८) आहे असा साम्यवादी विचारसरणीतून उचललेला सिद्धांत डॉ० केतकरांना मान्य असला, तरी रशियाने अर्थपद्धतीला दिलेले महत्त्व त्यांना मान्य नाही. स्त्री मिळवती असेल त्या कुटुंबात हवी असेल तर मातृसत्ताक पद्धती यावी असे ते म्हणतात. परंतु कोठेही जा, 'कुटुंब' हाच ते समाजाचा आधार समजतात. आणि "कुटुंबस्थैर्य येण्यास विवाह ही संस्था अत्यंत उपयुक्त आहे. त्याच्या योगानें पुरुषास अपत्याविषयीं स्वकीयता उत्पन्न होते व या दृष्टीनें ही संस्था बऱ्यावाईट नियमांनीं बद्ध झाली असल्यामुळें तिची उपयुक्तता मर्यादित झाली आहे, तर तिची उपयुक्तता वाढवावी हें शास्त्राचें ध्येय आहेच. विवाह हा एक तऱ्हेचा विमा आहे. मनुष्याचा प्रयत्न ज्या आपत्ती मनुष्यमात्रावर स्वभाविक कारणामुळें उत्पन्न होतात त्या दूर करण्याकडे असावा. स्त्री व पुरुष हीं एकत्र झालीं म्हणजे स्त्रीस गरोदरस्थिती व अपत्यप्राप्ती हीं होतात व त्यामुळें तिची द्रव्यार्जन-क्षमता कमी होते; पुरुषाची द्रव्यार्जनक्षमता कमी होत नाहीं; त्यामुळें स्त्रीच्या आणि तिच्या अपत्याच्या पोषणाचा भार पुरुषावर टाकला आहे व टाकतां यावा यासाठीं पुरुषाच्या ठायीं अपत्याविषयीं स्वकीयता स्थापन झाली पाहिजे. म्हणून विवाहपद्धती अंमलांत आणली पाहिजे." (पृष्ठ २८८) हे उद्गार या वैजनाथस्मृतीचा गाभा आहेत. बेचाळीसपैकी सारी सात कलमे वेश्या किंवा कुमारिका माता व त्यांची संतती यांच्यासाठी आहेत. थोडक्यात सांगायचे म्हणजे वैजनाथस्मृती ही मनुयाज्ञवल्क्यासारखी समग्र स्मृती नाही तर केवळ विवाहनीती म्हणजे आधुनिक तऱ्हेने का होईना, पण जर हिंदूंकरता डॉ० पां० वा० काणे 'धर्मशास्त्रविचारा'त म्हणतात त्याप्रमाणे सार्वत्रिक स्मृती अजूनही जरूरीची असली तर अशा स्मृतीत डॉ० केतकरांची ही बेचाळीस कलमे केवळ एक प्रकरण होईल. तेही अपुरे. कारण पुढे 'विचक्षणे'त 'तर्कटनीति' म्हणून जे सिद्धांत आले आहेत ती 'वैजनाथस्मृती'चीच पुरवणी आहे. 'ब्राह्मणकन्ये'च्या मुख्य विषयाशी वर दिलेला सिद्धांत व पतिता-वेश्यांबद्दलची पुरवणी ही दोन्ही सुसंगतच आहेत असे मला वाटते. या सिद्धांतातल्या अर्थोत्पादनाच्या मुद्यावर पुढे डॉ० केतकरांनी 'विचक्षणे'ची उभारणी केली.

वर दिलेल्या विवाहसंस्थेच्या तरफदारीवरून ही स्मृती म्हणजे डॉ० केतकरांच्या सबंध विचारांचेच फळ आहे, राजवाड्यांचा त्यात संबंध नाही, असे सहज दिसून येते. कारण राजवाड्यांनी १९२५ साली 'चित्रमयजगता'त विवाहसंस्थेबद्दलचे विचार मांडण्यासाठी एक लेखमाला चालू केली होती. लोकांनी 'अश्लील' म्हणून ओरड केल्यावर संपादकांनी ती लगेच बंद केली. परंतु त्या लेखात त्यांनी बहिणभावांचा विवाह त्याज्य नाही, कारण वेदांत यम व यमी, त्र्यंबक व अंबिका ही भावंडे होती असे म्हटले आणि विवाहसंस्थेच्या अस्तित्वाची समाजाला बिलकूल आवश्यकता नाही असे सुचवले होते. पण डॉ० केतकर तर विवाहसंस्थेचे एकनिष्ठ पुरस्कर्ते आणि प्रेमविवाहाचे चाहाते होते.

वेश्यांच्या कन्येला 'टिळा' लावण्याचा विधी, हा डॉ० केतकर एकप्रकारचा विवाहविधीच समजतात. तो 'समाजाच्या दुर्गतीचे द्योतक आहे' असें ते सांगतात (पृष्ठ २९३). या सिद्धांतासाठी वेश्येचे, रंगीचे ऊर्फ रंजनेचे, अत्यंत मोहक कथानक त्यांनी 'विचक्षणे'त निर्माण केले आहे. 'संगमोत्सुकता हा मानवी धर्म आहे' (पृष्ठ २९६) असे म्हणून त्यांनी गौण प्रकारांकडे सहानुभूतीने पाहिले असले, तरी स्त्रीपुरुषांतले प्रेम, मग ते विधीने उत्पन्न होवो की निसर्गाने होवो, त्यालाही एक शाश्वत बाजू असते, ती नसेल तर विवाह सफल होणार नाही, आणि हे प्रेम दृढ असेल तर विवाहावाचूनही जीवन सुंदर होऊ शकते, असा डॉ० केतकरांचा सिद्धांत आहे. असे प्रेम जिथे आहे तिथे सारे सौंदर्य व पावित्र्य आहे. तेच लग्न. ही लग्नाची व्यापक व्याख्या एकनिष्ठ प्रेमावर—त्यातल्या त्यात स्त्रीच्या एकनिष्ठतेवर—भर घालून केल्यामुळे खरोखर यात कुणा विचारी माणसाला खुपण्यासारखे काहीच नाही. उलट यात मानवतेचा उत्कृष्ट आदेशच आहे.

सहा

# विचक्षणा

'विचक्षणा' ही डॉ० केतकरांची सहावी कादंबरी. १९३६ सालापासून ती क्रमशः 'स्त्री' मासिकात प्रसिद्ध झाली आणि डॉ० केतकरांच्या मृत्यूनंतर थोडे दिवसांनी पुस्तकरूपाने १९३७ साली किर्लोस्करवाडीस प्रसिद्ध झाली. 'ब्राह्मणकन्ये'ला पाच वर्षे पुरी लोटली होती. या मधल्या काळात डॉ० केतकरांनी किरकोळ लेखन मासिकांत पुष्कळ केले. 'प्राचीन महाराष्ट्रा'च्या दुसऱ्या भागाचे लेखन पुरे केले, कायस्थांचा सामाजिक इतिहास लिहिला; पण कादंबरी मात्र या काळात लिहिली नाही. वास्तविक कादंबरी ते बहुशः स्वतःला विरंगुळा वाटावा म्हणूनच गहन विषयांवर लेखन करता करता लिहीत. गेल्या पाच कादंबऱ्यांच्या आकाराचा व विचारांचा विस्तार पाहिला, तर त्यांचे कादंबरी-लेखन किती जलद व सहज होत होते हे सहज दिसून येण्यासारखे आहे. तेव्हा मधल्या पाच वर्षांत त्यांनी कथालेखन का बंद ठेवले असावे, हे एक गूढच आहे. सुदैवाने पुढे त्यांनी आणखी दोन कादंबऱ्या लिहिल्याने ही मुग्धता अखेरची ठरली नाही. तरीसुद्धा कादंबरीलेखनाचा जो सराव त्यांना पहिल्या चारपाच वर्षांत झाला होता आणि सर्व दृष्टीने त्यांनी 'ब्राह्मणकन्ये'त जी उत्तरोत्तर प्रगती आपल्या कथालेखनात गाठली होती, तिला या पाच वर्षांच्या मुकेपणाने थोडी खीळ बसली. सफाईच्या दृष्टीने 'विचक्षणा' 'ब्राह्मणकन्ये'च्या तोडीची उतरली नाही. तरी पण 'परागंदा'शी किंवा 'आशावादी'शी तुलना करता ती कमी तोलाची नाही. 'ब्राह्मणकन्ये'नंतरची पाच वर्षे डॉ०

केतकरांच्या आयुष्यातली फार खडतर वर्षे होती. १९३४ सालच्या 'प्रतिभे'त (१६-२-१९३४) आर्थिक डबघाईमुळे त्यांनी आपल्या पाचही कादंबऱ्यांच्या आवृत्त्यांचे सर्व हक्क विकायला काढले होते. पण त्यांचे पुनर्मुद्रण करण्यास कोणी प्रकाशक त्या वेळी पुढे आला नाही आणि त्यामुळे त्यांच्या हयातीतच पहिल्या तीन कादंबऱ्या बाजारात उपलब्ध नसून देखील त्यांची द्वितीयावृत्ती निघण्याचा योग आला नाही. या मध्यंतरीच्या काळातली दुसरी एक गोष्ट म्हणजे 'प्रतिभे'त (१६-९-१९३४) त्यांनी चालू केलेली "वाङ्मयक्षेत्रात नियंत्रक संस्थेची आवश्यकता" या विषयावरील चर्चा. "अश्लील वाङ्मयापेक्षा अनृताचा प्रसार करणारे वाङ्मय अत्यंत तिरस्करणीय होय. आज मराठी वाङ्मयक्षेत्रांत खमंगपणाच्या नावाखाली नियतकालिकांकडून व वृत्तपत्र-कारांकडून अनृताचा प्रसार जोरानें होत आहे. त्यामुळें लेखनव्यवसायात जी मंडळी पडली आहे, त्यांना दुष्ट बुद्धीच्या लेखकांकडून व संपादकांकडून होणाऱ्या अन्याया-बद्दल आज संरक्षण हवें आहे, तें कसें मिळेल ?" हा डॉ० केतकरांच्या लेखाचा आशय आहे. त्यावर महाराष्ट्रातल्या बहुतेक सर्व मोठमोठ्या साहित्यिकांनी आपली साधकबाधक मते दिलेली आहेत. ते असो; सांगण्याचा मुख्य मुद्दा असा की या लेखात डॉ० केतकरांनी आपल्याला अशा टीकाकारांपासून कसा उपद्रव होत आहे हे उघडपणाने सांगितले असून जनतेपासून न्यायाची मागणी पण केलेली आहे. या संबंध लेखात डॉ० केतकरांची विमनस्क वृत्ती स्पष्ट दिसून येते. या चर्चेत भाग घेणाऱ्या काही लेखकांनी डॉ० केतकरांची सुद्धा मनःशांती अशा तऱ्हेच्या उपद्रवाने उडून जाते, मग तो उपद्रव इतर लेखकांस कसा हानिकारक होत असेल असाच सूर काढला आहे. तेव्हा या मधल्या काळात त्यांचे मनःस्वास्थ्य पुष्कळ हिसकळले गेले होते याबद्दल शंका वाटत नाही. 'प्रतिभे'त पुढे त्यांनी 'माझी गेलीं आठ वर्षे' (१९३५) हा लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी आपला जगावरचा विश्वास कायम असून आपले आशावादित्व शाबूत असल्याचा निर्वाळा दिलेला आहे. तरी पण समग्र केतकरवाङ्मयाचा आढावा घेताना या काळात त्यांच्या आशावादीपणाला कुठे तरी तडा गेल्याची जाणीव वाचकाला झाल्याशिवाय राहात नाही. अशा या वातावरणात 'विचक्षणे'चा जन्म झाला आहे.

## केतकरांच्या लिखाणामागील 'रहस्ये'

डॉ० केतकरांच्या पाच वर्षांच्या कथालेखनात पडलेला खंड, त्यांचे 'प्रतिभे'तले वर उल्लेखिलेले लेख, आणि नंतर शीलवतीबाईंची प्रस्तावना या सर्वांचा संगम होऊन एक प्रकारचे गंभीर व करुण वातावरण आपोआपच निर्माण झालेले दिसते. या वातावरणातच वाचक कादंबरीस सुरवात करतो. कादंबरी अर्थातच संपूर्ण केतकरी थाटाची, काहीशी भेदक, काहीशी आशावादी आणि तात्त्विक

असल्यामुळे, पहिली उदासीनता विसरून जाऊन तो कादंबरीच्या विचारप्रवाहातच गुरफटला जातो.

शीलवतीबाईंची प्रस्तावना दोनच पानी आणि इंग्रजीत लिहिलेली आहे. अगदी मोजक्या शब्दांत, थोड्या जागेत जास्तीत जास्त विचार, सरळ व ठासून देण्याची त्यांची लेखनपद्धती असल्याने या छोट्या प्रस्तावनेत किती मनोगते, आणि डॉ० केतकरांच्या लिखाणाबद्दलची कितीतरी 'रहस्ये' शीलवतीबाईंनी सूचित केली आहेत. याच सुमाराला शीलवतीबाईंनी 'लोकशिक्षण' मासिकाच्या 'केतकर अंका'साठी गृहस्वामी या दृष्टीने डॉ० केतकरांचे एक व्यक्तिचित्र दिले होते. परंतु या लहानशा प्रस्तावनेत जो बोलकेपणा आहे तो त्या लेखात दिसून येत नाही. कारण तो संपादकांनी लिहवून घेतला होता. आणि ही प्रस्तावना शीलवतीबाईंनी स्वतः होऊन प्रकाशकास विनंती करून लिहिली होती. प्रारंभीच लेखिकेने सांगितले आहे की, ज्या दिवशी प्रकाशकाचे 'स्त्री' मासिकात शेवटले प्रकरण पुरे झाल्याचे आणि प्रस्तावनेच्या मागणीचे पत्र आले, त्या दिवशी, म्हणजे दहा एप्रिलला, डॉ० केतकरांच्या इहलोकातील जीवनाचा शेवटला अंक चालू होता. 'दृश्य देहाच्या व्यवहारांचा खेळ' बंद होत होता. मर्त्य देहाने जगाचा निरोप घेतला. पण डॉ० केतकरांच्या बुद्धीच्या गाभ्यातून निघालेले विचार—त्यांची बौद्धिक मूर्ती—मागे राहिले आहेत. त्यांना मिळालेली गती डॉ० केतकरांच्याबरोबर विराम पावली नाही. डॉ० केतकरांचे बुद्धीचे व्यापार निराळ्या रूपाने का होईना पण पुढेमागे लोकांना घेण्यासारखे वाटतील असा आशावादही शीलवतीबाईंनी प्रगट केला आहे.

## चर्चात्मक संवादांचे मूळ

या प्रस्तावनेतला एक महत्त्वाचा भाग म्हणजे डॉ० केतकरांनी आपल्या कादंबऱ्यांत जे प्रसंग निवडले, ज्या तऱ्हेने चर्चात्मक संवादांची रचना केली, त्यासंबंधी थोडी हकिगत दिलेली आहे. शीलवतीबाई म्हणतात की, "जे जे सिद्धांत डॉ० केतकरांनीं आपल्या कादंबऱ्यांत मांडले आहेत, अवघड प्रसंग कल्पून त्यातून बाहेर पडण्याकरतां ज्या ज्या योजना त्यांनीं तयार केल्या, त्या सर्वांबद्दल त्यांनीं माझ्याजवळ सतत चर्चा केलेली आहे. त्यांच्या संवादांत एकाच विषयावर नाना तऱ्हेचे मुद्दे उलटसुलट बाजूंनीं काढून चर्चा करण्याची विशिष्ट ढब आहे. ती आमच्या दोघांच्या संवादाच्या तऱ्हेतून निमाण झालेली आहे. दोघांचें मत जरी एकच असलें तरी एका गोष्टीकडे किती तऱ्हांनीं पाहतां येतें हें अजमावण्यासाठीं आम्ही दोघें विरुद्ध बाजूंनी वाद घालीत असूं." डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांतल्या उलटसुलट चर्चेचा प्रकार व नंतर कथानकातील प्रसंगांच्या रूपाने एका ठराविक मताकडेच झुकणारा लेखकाचा मनोदय, या निवेदनावरून स्पष्ट होतो. नारायण

वामन टिळकांच्या विशिष्ट वाङ्मयकृतींचे गूढ लक्ष्मीबाईंच्या स्मृतींमुळे असेच उकलले आहे. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतले संवाद कृत्रिम म्हणून टीकाकारांनी केलेल्या हाकाटीबद्दल सौ० शांताबाई माडखोलकरांनी 'नवे संसार'च्या प्रस्तावनेत, 'ते संवाद आपल्या माजघरांतच अनेक व्यक्तींशी झालेल्या चर्चेचें फळ आहे,' असे सांगितले आहे. तार्किक संवादांची किंवा मतांची काव्यकथांतली उकल वाङ्मयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. वामन मल्हार जोश्यांच्या कादंबऱ्यासुद्धा चर्चांनी भरल्या आहेत. पण त्यांच्या त्या वाङ्मयप्रकाराचे मूळ इतके विशदपणे कुणी मांडलेले माझ्या पाहाण्यात नाही. वेगवेगळ्या तऱ्हेचे स्वतंत्र विचार किंवा वाङ्मयप्रकार रूढ करणाऱ्या लेखकांच्या विचारप्रवाहाचे असे उगम संकलित होणे अभ्यासाच्या दृष्टीने अगत्याचे आहे. मनोरंजनही त्यात भरपूर आहेच.

आणखी एक मुद्दा शीलवतीबाईंनी डॉ० केतकरांच्या लेखनाविषयी सांगितला आहे. तो असा : "डॉ० केतकरांचे लिखाण तरुणांसाठी होते. पुढच्या पिढीसाठी होते. आजची परिस्थिती व तिच्यातून उपस्थित होणारे उद्यांचे प्रश्न यावरच त्यांचे कादंबरीचे लिखाण आधारलेले आहे." डॉ० केतकर भविष्यात रंगणारे होते. तरुणांबरोबर समरस होणारे होते. मागच्या पिढीतल्या रानडे-भांडारकरांच्या चुका रोकड्या शब्दांनी त्यांच्या पदरात बांधणारे डॉ० केतकर तरुणांविषयी फार उदार होते. पक्षपाती पण होते. त्यामुळे आपल्याभोवती असलेल्या तरुण मंडळींच्या 'नव्या' मतांबद्दल व 'स्वैरवर्तना'बद्दल वडीलधाऱ्या नीतिबाज विद्वानाप्रमाणे उपदेशाचे घुटके न पाजता, त्यांनी तटस्थ वृत्तीने तरुणांच्या वृत्तीचे परीक्षण केले. सर्व प्रश्नांची उघड खल केला आणि स्वाभाविक ममतेच्या वृत्तीने त्यांच्या प्रश्नांची उत्तरे अगदी व्यावहारिक आडाख्यांनी त्यांनी दिली. 'विचक्षणे'त 'ब्राह्मणकन्ये'पेक्षा शिकलेल्या मुलांमुलींच्या पुढचे आर्थिक व सामाजिक प्रश्न अगदी ताजे असे जास्ती प्रमाणात आले आहेत आणि त्यांची उत्तरे पण अधिक सडेतोड बाण्याने डॉ० केतकरांनी दिली आहेत. थोडक्यात सांगायचे म्हणजे तरुण मुलगे व मुली आणि त्यांचे आईबाप किंवा पालक या दोघांनाही सर्व बाबतीत दिलेला इतका स्पष्ट इशारा आमच्या वाङ्मयात सापडणे मुष्कील आहे. हा भाग इतका उघड आहे की त्याची जास्त चर्चा करण्याची गरज नाही.

## कादंबरीचे नाव

कादंबरीचे नाव 'विचक्षणा' हे नायिकेच्या नावावरून दिलेले असले तरी प्रियंवदेप्रमाणे विचक्षणेचे व्यक्तिमत्त्व आतल्या सर्व कथाभागाला आणि तात्त्विक विचारांना पहिल्यापासून शेवटपर्यंत उठाव देण्याइतके प्रभावशाली नाही; एवढेच काय, पण या कादंबरीचा बराचसा भाग पाहिला तर त्यात विचक्षणेचे पात्र अगदी

गौण आहे. एवढेच नव्हे, तर या कादंबरीचे नाव दुसरे काही असते, किंवा ते तिच्या बहिणीचे म्हणजे 'मधुमालती' असे असते, तरी त्यामुळे या कादंबरीच्या कथानकाला काहीच कमीपणा आला नसता. किंबहुना, आतल्या कथाभागावरूनच पाहायचे झाल्यास विचक्षणेच्या वडिलांचे नाव 'प्रो० लोंढे' असे जर कादंबरीस दिले असते तर ते कादंबरीला 'आशावादी'प्रमाणे जास्त शोभून दिसले असते. 'विचक्षणा' हे नाव देण्यात डॉ० केतकरांनी त्या नावातल्या अर्थाकडे जास्त लक्ष दिलेले दिसते. 'विचक्षणा' या शब्दाचे जे अर्थ होतात ते असे : विचक्षणा म्हणजे जिची बुद्धी चोखंदळ व चपळ आहे अशी स्त्री. अशा बुद्धीत वृत्तीचा उदारपणा कमी संभवतो; प्रत्येक गोष्ट जोखून आणि मापून घेण्याची शक्ती पण अशा चोखंदळपणात आढळून येते. 'विचक्षणा' म्हणजे चिकित्सा. या दृष्टीने पाहिले तरी डॉ० केतकरांची कुठल्याही प्रश्नाकडे जिज्ञासू दृष्टीने, प्रयोगशील वृत्तीने पाहाण्याची जी एक तऱ्हा आहे, त्या तऱ्हेशी 'विचक्षणा' हे नाव चांगलेच जमते. 'विचक्षणा' या शब्दात कोणत्याही गोष्टीचा कीस काढण्याचा अर्थ स्पष्टपणे ध्वनित होतो. अर्थात हा ऊहापोह मार्मिक किंवा उच्च बुद्धीला पेलेल असाच असला पाहिजे हे उघड आहे. तरी पण 'ब्राह्मणकन्या' या नावाइतके 'विचक्षणा' हे नाव, त्या कादंबरीला ते जसे अंतर्बाह्य शोभून दिसते, तसे हे दिसत नाही. नायिकेचे कर्तृत्व कादंबरी पेलून धरण्यास अपुरे आहे.

## सात कथानके

या कादंबरीचे 'आशावादी'शी पुष्कळ साम्य आहे. आकाराने ती 'आशावादी' प्रमाणे मोठी आहे. कदाचित जास्तच मोठी असेल. 'आशावादी'प्रमाणे एकाच तऱ्हेचे नव्हे तर अगदी वेगवेगळे सामाजिक प्रश्न या कादंबरीत काठोकाठ घालण्यात आलेले आहेत. फरक एवढाच की 'आशावादी'ची रचना विस्कळित आहे; तशी या कादंबरीची नाही. अनेक उपकथानके मिळून जरी 'आशावादी'प्रमाणेच ही कादंबरी तयार झालेली असली, तरी 'आशावादी'तली उपकथानके तुटलेल्या धाग्यांसारखी जी लोंबत राहिलेली दिसतात तशी या कादंबरीत दिसत नाहीत. हेच कादंबरीकाराचे कौशल्य. 'आशावादी'प्रमाणे ब्रह्मगिरीचे मूळ कथानक व नंदिकेचे उपकथानक या दोहोंतून बाकीची उपकथानके तयार होतात. त्याप्रमाणेच डॉ० लोंढ्यांच्या घरगुती वातावरणातून विचक्षणा व माधव छत्रे, मधुमालती व संकर्षण आठवले, बाळोबा आणि मंजुळा, बाळोबा व कृपा, डॉ० तर्कटे व रंजिता, पद्मनाभ मंडपे, अशी एकंदर सात कथानके एकत्र होऊन ही कादंबरी बनली आहे. या कादंबरीत मुख्य कथानक व उपकथानक असा फरक नाही. सर्व कथानके व व्यक्ती सारख्याच रीतीने रंगविल्या आहेत. या सर्व कथानकांना एकत्र गुंफून ठेवणारे मुख्य

पात्र म्हणजे प्रो० लोंढे. कादंबरीतल्या या सर्व पात्रांशी त्यांचा दृढ संबंध आहे. विचक्षणा, मधुमालती आणि बाळोबा ही प्रो० लोंढ्यांचीच अपत्ये. डॉ० तर्कटे त्यांचे परममित्र. पद्मनाभ मंडप्यांचे गुरू जे श्रीरंगाचार्य यांच्या 'पुष्टिमार्गी' तत्त्वज्ञानाचे गाढ व्यासंगी असे हे प्रो० लोंढे असल्यामुळे पद्मनाभाच्या हकिगतीशी देखील त्यांचा संबंध जवळचा आहे. कादंबरीतल्या पात्रांची हालचाल अशा नियमित रिंगणातच होत राहिल्यामुळे प्रो० लोंढे यांचे कुटुंब, मित्र व इतर निकटच्या व्यवहारातल्या लोकांच्या हकिगती, असे या कादंबरीचे स्वरूप असल्यामुळे, सर्व पात्रे एकमेकात गुरफटलेली, एकमेकांस पूरक अशीच झाली आहेत. आणि त्यामुळे कादंबरीचा ओघ पहिल्यापासून शेवटपर्यंत अखंड राहिला आहे. वर सांगितलेल्या सात कथानकांचे विषय अगदी स्वतंत्र असले तरीदेखील त्यांचे प्रवाह एकमेकात मिळून गेल्यामुळे रसपरिपोषाच्या दृष्टीने कादंबरी निर्दोष झाली आहे. प्रमाणबद्धताही तिच्यात भरपूर आढळते. 'आशावादी'नंतर डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांत आलेली प्रमाणबद्धता टिकून राहिली ही एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

## प्रचलित वादग्रस्त प्रश्न

या कादंबरीत वेगवेगळ्या कथानकांच्या रूपाने ज्या वेगवेगळ्या प्रश्नांची चर्चा डॉ० केतकरांनी केली आहे ते प्रश्न मुख्यतः असे आहेत : १. विवाहित स्त्रीने नोकरी केल्यास तिच्या पतीची 'द्रव्यार्जनक्षमता' कमी होते काय? २. विवाहबाह्य संबंधांत नीतिमत्ता व सहृदयता असू शकते की नाही? ३. 'कलावती'चे (डॉ० केतकर 'कलावंतीण' हा रूढ शब्द कधीच वापरीत नाहीत.) आयुष्य कलेच्या उपासनेने समृद्ध होत नाही काय? ४. समाजात ज्या ज्या गोष्टीला बाजारभाव असतो, तो त्या वस्तूंत काहीतरी आकर्षक आणि उपयोगी असे असते म्हणूनच असतो, असे गृहीत धरल्यानंतर, 'गुरुबाजी'चे मूल्यमापन समाजशास्त्रीय पद्धतीने कसे करता येईल? ५. स्त्रीपुरुषांमधले जे स्वाभाविक आकर्षण आहे, त्यातल्या बदलत्या छटा कोणत्या आणि स्थिर भाव कोणाचे? ६. मुलांच्या संगोपनात आणि आजूबाजूच्या समाजात ती वावरत असता त्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी पालकावर कितपत असावी? ७. ज्या भिन्नधर्मीय स्त्रीपुरुषांची भाषा, संस्कृती ही एक आहेत त्यांच्या वैवाहिक मीलनास धार्मिक संस्कार कशा तऱ्हेने वापरले जावे? इत्यादि. वरवर पाहाणाराला हे सर्व प्रश्न इतक्या भिन्न स्वरूपाचे वाटतील की या सर्वांची सांगड घालणे म्हणजे गंगाजमनी भेसळ करणेच आहे, असे वाटेल. पण या विषयांच्या स्थूल मर्यादा ओळखून डॉ० केतकरांनी सांध्याला सांधा जोडण्याचे जे त्यांचे स्वतःचेच तंत्र या कादंबरीत वापरले आहे, ते वाखाणण्याजोगे आहे.

समाजशास्त्रीय प्रश्नांवर, विशेषतः प्रचलित वादग्रस्त विषयांवर, कादंबरी

लिहायची म्हटल्यास थोडासा कृत्रिमपणाचा दोष कोणत्याच कादंबरीकारास टाळता येईल असे मला वाटत नाही. पण हा अपरिहार्य कृत्रिमपणा सोडल्यास, अशा तऱ्हेच्या प्रश्नांकडे अत्यंत चौकस आणि निःपक्षपाती दृष्टीने पाहिले पाहिजे. आणि अशी निःपक्षपाती दृष्टी केव्हा येते ? तर हा एकेक प्रश्न इतर प्रश्नांहून अलग राहू शकत नाही, हे समजेल तेव्हा. या प्रश्नांचा उगम मानवी जीवनातून, समाजबद्ध जीवनातून झाला आहे; आणि आमचे जीवन किती गुंतागुंतीचे आहे; ते प्राचीन संस्कृतीने समृद्ध आणि पाश्चात्य संस्कृतीने पराभूत, आर्थिक दृष्ट्या स्थगित झालेले, जाती, उपजाती, पंथ, उपपंथ यांच्या अभिमानांनी फुगलेले असे आहे; अशा या आयुष्याच्या वेगवेगळ्या कक्षांतील माणसांचे त्या त्या कक्षांनी मर्यादित झालेले विचार व व्यवहार, दुसऱ्या कक्षांतील माणसांच्या विचारात व व्यवहारात कसे मिळून जातात किंवा परावर्तित होतात किंवा त्यांचा संघर्ष कसा चालू रहातो, ते दाखविल्याशिवाय समाजशास्त्रीय कादंबरीची परिपूर्णता होणार नाही असे मला वाटते. भारतीयांचे जीवन हे असे आहे. आणि त्याचा अगदी कोणताही बिंदू घेऊन त्याचा अभ्यास करायचा म्हटला तरी डॉ० केतकरांनी आपल्या कादंबऱ्यांत सुचविलेल्या समन्वयी पद्धतीनेच हाताळले असता पुष्कळसे सामाजिक प्रश्न सर्वसाधारण लोकांना जितके बोचक वाटतात तितके वाटणार नाहीत आणि विरुद्ध बाजूने मत ऐकताना आणि त्याबद्दल निर्णय देताना एकांगीपणा आपोआप बाजूस टकलला जाईल यात शंका नाही.

कादंबरीत वर सांगितलेल्या प्रश्नांची चर्चा करायची म्हटल्यास पात्रांची संख्या आणि त्यांच्या अत्यंत भिन्न कक्षादेखील कादंबरीकारास विचारात घेणे आवश्यक असते. अशा कादंबरीत विरोधाभासाला साहजिकच प्राधान्य येते. एकासारखे दुसरे पात्र घालता येत नाही. प्रत्येक पात्राला सारखाच उठाव द्यावा लागतो. त्यामुळे प्रचलित कादंबरी-शास्त्राच्या दृष्टीने काही पात्रांना उठाव देऊन (म्हणजे नायक-नायिकेला प्राधान्य देऊन) इतर पात्रांना जुजबी तऱ्हेने वागवावे लागते. जो मुख्य प्रश्न असेल, त्याला अनुकूल अशा भावना आणि प्रसंग यांनाच खत घालावे लागते, आणि त्यांना सजावट देण्यासाठी म्हणून बाकीच्या साऱ्या घटनांचा आणि विचारांचा उपयोग करून घ्यायचा असतो. पण समाजशास्त्रज्ञाला सर्वच प्रश्न सारख्या मोलाचे असतात. त्यातल्या त्यात अनेक प्रश्नांची एकत्र गुंफण करून ‘ विचक्षणा ’ किंवा ‘ आशावादी ’ सारखी जी कादंबरी असते तिच्यात या सर्व मिश्र घटनांना एकत्र कवळून धरणाऱ्या अत्यंत विशाल सामाजिक भावनेला सर्वांत जास्त प्राधान्य द्यावे लागते. अर्थात अशा प्रश्नांना तोलून धरणारी ही चौकस व सहृदय आणि शास्त्रशुद्ध दृष्टी अशा कादंबऱ्यांचा आत्माच होय. ‘ आशावादी ’त ब्रह्मगिरीच्या रूपाने, आणि या कादंबरीत प्रो० लोंढ्यांच्या रूपाने, डॉ० केतकरांनी या शास्त्रीय दृष्टीचे आणि पर्यायाने अत्यंत इष्ट अशा सामाजिक

भावनांचे दिग्दर्शन केलेले आहे. उच्च तऱ्हेच्या पारखून घेतलेल्या सामाजिक भावनांचे पोषण हा कादंबरीचा अंतिम हेतू असल्यामुळे, डॉ० केतकरांना परस्परभिन्न अशा कथानकांचे सांधे बेमालूम जुळविण्यात इतके यश आले आहे. किंबहुना, विविध मते वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून पाहिली असता कशी दिसतात, हे मनुष्यस्वभावाच्या सूक्ष्म निरीक्षणासहित देण्यात विवेचक कादंबरीचे स्वारस्य आहे असे मला वाटते. अशा तऱ्हेच्या विचारपद्धतीशिवाय मतामतांमुळे उद्भवणारे, समाजातले दीर्घकाल टिकणारे प्रक्षोभकारक वादविवाद, व्यक्ती व समाज यांच्या हितात व ध्येयात फरक पडल्यामुळे, उत्पन्न होणाऱ्या भावनांच्या आणि विचारांच्या वावटळी यांच्यावर नीट प्रकाश पडत नाही. आणि या बावरून टाकणाऱ्या प्रश्नांचा काही ना काही उलगडा करून व्यक्तीच्या आयुष्यातील जी काही स्थिर विचारांची रेषा असते, की जिच्यामुळे ती व्यक्ती अंतर्मुख होऊन आलेल्या सर्व संकटांतून (व स्वतः देखील अज्ञानामुळे ओढवून घेतलेल्या आपत्तींतून) आपली सुटका करून घेते, तिचे यथार्थ दर्शन वाचकाला करून देणे हे विवेचक कादंबरीच्या लेखनाचे एक उद्दिष्ट असले पाहिजे. आतापर्यंत डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांतील पात्रांचे जे वर्णन आले आहे, त्यावरून अंतर्मुख आत्मनिरीक्षण करून चिकाटीने परिस्थिती जिंकून घेण्याचा गुण त्यांच्या बऱ्याचशा पात्रांच्या अंगी आहे, हे कबूल करावे लागेल. डॉ० केतकर धडपडीनंतर अपेक्षिलेले फल आपल्या पात्रांच्या पदरात टाकतात तेही यामुळेच असावे.

## कादंबरीचे वैशिष्ट्य

या कादंबरीचे वैशिष्ट्य एका समाजशास्त्रीय प्रश्नात आहे. तो प्रश्न म्हणजे जातिगंड. जातिशास्त्राचा अभ्यास हे डॉ० केतकरांच्या समाजशास्त्रीय अभ्यासाचे विद्यार्थिदशेपासूनचे प्रमुख अंग होते. रोटीबेटीच्या अकुंठित व्यवहाराचे ते पुरस्कर्ते असले तरीदेखील श्रुतिस्मृतीतले चातुर्वर्ण्य ते कुचेष्टेचा विषय समजत नसत. पूर्वीचे चातुर्वर्ण्य जन्म व वृत्ती या दोहोंवर अवलंबून असे. सध्या जन्माने जात मोजणे इष्ट नसले तरी वृत्तीने शिक्षण अगर भिक्षुक, सैनिक, वाणी, शेतकरी व मजूर अशा वृत्तींत जातीची कल्पना कोणत्या तरी स्वरूपात असतेच. इतकेच नव्हे, तर जगभरचे 'जातिहीन' समजले जाणारे जे समाज आहेत, त्यांच्यातही वृत्तिनिर्मित सामाजिक वर्गीकरण आढळते व ते चातुर्वर्ण्याच्या मूळ कल्पनेहून फारसे भिन्न नसते हे त्यांनी 'हिंदूइझम' (Hinduism) व 'कास्ट' (Caste) या आपल्या ग्रंथांत सोदाहरण दाखवून दिलेलेच आहे. याच सूत्राच्या आधाराने त्यांनी 'भटक्या'त व विभावरी शिरूरकरांच्या 'हिंदोळ्यावर' या कादंबरीवरच्या परीक्षणात जातिभेद मोडण्याच्या प्रश्नाचा ऊहापोह करताना, आजचा प्रश्न 'ब्राह्मणांनी शूद्रांचे हक्क मिळविण्याचा आहे' असे म्हटले. त्याचे विवरण करताना ते म्हणतात की,

पुनर्विवाहाची तरफदारी, घटस्फोटाची मागणी, स्वतःस हवा असेल तो धंदा करण्याची मुभा इत्यादी गोष्टी त्याची साक्ष देतात. अर्थात उपजीविकेच्या साधना-प्रमाणे समाजाचे भावी चातुर्वर्ण्य नियंत्रित होईल असे डॉ० केतकरांना वाटत असे व या नव्या चातुर्वर्ण्यातदेखील ब्राह्मण म्हणजे बुद्धिजीवी वर्ग समाजसंस्कृतीचा नियंता राहील, कायस्थवृत्ती सरकारी नोकरांत मुख्यतः दिसून येईल, म्हणजे सरकारशी वाटेल ते झाले तरी तडजोड करून सरकारी कारभारात वाकबगार होण्याची वृत्ती दिसून येईल. (एका कायस्थ रावबहादुरांचे उदाहरण 'भटक्या' कादंबरीत आहेच. इंग्रज सरकारची मर्जी संभाळून राहाणे, व राष्ट्रीय चळवळीपासून दूर असणे, असा त्या पात्राचा प्रतीकात्मक पण उपहासगर्भ उल्लेख डॉ० केतकरांनी केलेला आहे). क्षत्रिय लढाऊ व राजकीय सत्ता संपादन करणारे असतील आणि वैश्य व्यापारी उद्‌मी असतील. या वर्गांची नीतिमत्ता, व्यवहारी दृष्टी, परंपरागत वैश्य समाजाप्रमाणेच असेल. शूद्र म्हणजे श्रमजीवी शेतकरी, कामकरी वगैरे. अस्पृश्यांचा वर्ग अशा वृत्तिजीवी चातुर्वर्ण्यात गेला तरी पतित स्त्रियांचा वर्ग आजप्रमाणेच पुढेही कदाचित तसाच राहील असे ठोकळमानाने डॉ० केतकरांच्या चातुर्वर्ण्याच्या भाष्याचे वर्णन करता येईल. त्यांची 'चातुर्वर्ण्य संरक्षण पीठ' ही संस्था स्थापन करण्याची मनीषा सर्वश्रुतच आहे.

सदतीस सालापासून तो एकोणिसशे सहासष्टपर्यंतची भारतीय समाजाची स्थित्यंतरे पाहिल्यानंतर, आणि गेल्या जागतिक युद्धानंतर सर्व जगभरच जो आमूलाग्र क्रांतिकारक बदल घडून आला तो पाहिल्यानंतर, डॉ० केतकरांची उपरिनिर्दिष्ट मते प्रत्यक्षात उतरतील असे म्हणणे धाडसाचे ठरेल. डॉ० केतकरांना आगामी युद्ध व स्वतंत्र भारताचे राजकीय स्थान दिसले नव्हते; ते कुणालाच दिसणे शक्य नव्हते. आमचे स्वातंत्र्य हा गेल्या महायुद्धाचाच एक पर्याय आहे. अर्थात या स्वातंत्र्यानंतर आमच्या कायदेमंडळांनी जातिभेदास तात्त्विक दृष्ट्या गवसणी घालण्याचा उपक्रम हाती घेतलेला आहे. त्यात प्रगतीही आहे. अस्पृश्यतानिर्मूलन कायद्याने घडलेले आहे. हिंदू कोड बिलामुळे हिंदू समाजाची सांस्कृतिक व आर्थिक पातळी एक असावी असा आदर्शवाद तयार झालेला आहे. तरी पण आजमितीस 'पूर्व वरिष्ठ' समजलेल्या जातींना मागे टाकणे व राजकारणात 'पूर्व-मागास' जातींच्या हाती सत्तासूत्रे मतदानाच्या पद्धतीने देणे यातून अनेक समस्या तयार होतातच आहेत. याचे कारण एकच की, जातिभेदाचे कायद्याने निर्मूलन होऊन भागणार नाही. ही सारी स्थित्यंतरे, आत्मसात होऊन समाजाचे मन सामान्यपणे जातिभावशून्य होण्यास अद्यापही बराच अवधी लागेल हे आजदेखील आपल्याला कबूल केले पाहिजे. हा अवधी मुख्यतः कशाकरता लागेल? तर 'सुंभ गेला तरी पीळ जळत नाही,' या म्हणीप्रमाणे जातीचे महत्त्व गेले तरी 'गंड' कायमच राहातो त्यामुळे. अद्यापही

जातीय संस्था ब्राह्मणापासून अस्पृश्यापर्यंत व पूर्वास्पृश्यांपर्यंत तशाच त्या बंदिस्त वातावरणात आपापले सुखासीन संसार थाटून मजेत कालक्रमणा करताहेत. त्यामुळे स्वजात्याभिमानाचा हा गंड प्रत्येक जातीत सारखाच असतो. राजकारणामुळे संख्याबाहुल्यामुळे वर्चस्व पावलेली जात इतर जातींना मागे रेटू शकते व ही क्रिया जातिवादाचा उच्चार केल्याशिवाय व सर्वांना माहीत असूनही घडू शकते, हे आजच्या राजकरणातले उघड गुपित आहे. फक्त त्या गुपितावर लिहिणारा समर्थ, निःपक्षपाती, उदारमतवादी लेखक मात्र आता नाही. डॉ० केतकर हा एकच असा लेखक महाराष्ट्राला मिळाला. परंतु तो दुर्दैवाने पारतंत्र्याच्या काळीं आला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जेव्हा लोक अत्यंत कळवळ्याने कार्य करीत असतात तेव्हा त्यांच्यात एकाच एका कल्पनेच्या तंतूला हिरीरीने धरून राहावे लागते. त्यातून एक स्थिरभ्रमाची मनोवृत्ती उदय पावते. ही वृत्ती स्वातंत्र्योत्तर कालात घातुकही ठरण्याचा संभव असतो. पारतंत्र्याच्या काली समाजशास्त्रीय भूमिकेतून, इतिहासाच्या सूत्रातून, जातीय विग्रहाकडे बघणे, 'जातीय ऐक्या'च्या त्या भाबड्या स्थिरभ्रमाला मानवण्यासारखे नव्हते आणि म्हणूनच डॉ० केतकरांची जातिविषयक निदाने अनेकांना हास्यास्पद, दूषित व प्रसंगी कुत्सितही वाटतात. परंतु डॉ० केतकरांनी या गंडाचा विविध तऱ्हांनी पाठपुरावा केला. उदाहरणार्थ, प्रत्येक जात 'वरच्या' जातीत मिसळायला पहाते, तिच्याशी सर्व बाबतींत स्पर्धा करते व 'खालच्या' जातीला दूर ठेवते. लग्नसंबंधातही खालच्या जातीच्या व्यक्तीला बाकीची 'जात' कमी लेखते. यामुळे लहानसहान बाबतीत व्यक्तीला मानसिक कुचंबणा कशी सहन करावी लागते, हे डॉ० केतकरांनी आपल्या भोवतालचा समाज पाहून 'ब्राह्मणकन्ये'त दाखवले. पण त्या कादंबरीत ती एका व्यक्तीचीच केवळ कहाणी होती. एका कथेच्या घाटातच तो प्रश्न बसवलेला आहे. परंतु 'विचक्षणे'त हा प्रश्न अनेक तऱ्हेच्या कहाण्यांत त्याच त्या स्वरूपात आलेला दाखवला आहे.

जातिगंड हा भारतीयांच्या रक्तात इतका मुरलेला आहे की वस्तुतः उदारहृदयी, सुशिक्षित व समाजधारणेचा आणि तत्त्वज्ञानाचा व्यासंग असणारी व्यक्तीही या गंडापासून अलिप्त असू शकत नाही. प्रार्थनासमाजी व सुधारक प्रामाणिक व उच्च हेतूने प्रेरित असे असूनदेखील पारंपरिक जातिगंड व्यक्तीला कसा पछाडतो, हे जाणू शकले नाहीत; आणि त्यामुळेच त्यांचे जातींच्या एकीकरणाचे प्रयत्न व्हावे तसे फलदायी झाले नाहीत. या गंडाने आमच्या प्रत्येक व्यवहाराला कसे काबूत ठेवले आहे, हे डॉ० तर्कटे यांच्या स्वलित लोकांच्या अनुभवानंतर आलेल्या विवेचनावरून व रंगू नायकिणीच्या चरित्रावरून केवळ 'विचक्षणे'तले डॉ० लोंढे हे तत्त्वज्ञ व समाजशास्त्रज्ञही अजमावू शकले. रंगूला उर्फ रंजितेला ती 'अस्पृश्य' म्हणजेच रखेली व विवाहेतर संबंधापासून प्रजोत्पत्ती करणारी म्हणून ते कमी लेखीत

व तिचा परिचय होऊ देण्याचे वार्धक्यापर्यंत त्यांनी टाळले. ही उच्चनीचपणाची जाणीव रंजितेलाही होतीच. ती उच्चवर्णीय म्हणून महारांची सावली टाळी. तिची मुलगी मंजुळा आपल्या हीन जन्माबद्दल खंत मानी; आपण ब्राह्मणाबरोबर लग्न करून संसार करावा म्हणून तिची धडपड चालू होती. शेवटी तिला लग्न करावे लागले ते चंदू लटकेशी. पुनरूढ ब्राह्मण दांपत्याच्या मुलाशी. महार पुढारी रावसाहेब खेडकर हेदेखील उच्च जातीची बायको मिळावी, मग ती मंजुळेसारखी कुळहीन असली तरी चालेल अशा मताचे. खिस्तीदेखील या कल्पनेपासून फारसे दूर गेलेले नव्हते, हे डॉ० केतकरांनी रे० गणपतराव व त्यांची मुलगी कृपा या पात्राकरवी दाखवले आहे. ब्राह्मण खिस्ती महार खिस्त्याशी संबंध ठेवू इच्छित नाही. हिंदू महार खिस्ती महाराला (त्याची राहाणी उच्च दर्जाची असूनदेखील) कमी लेखतो. एवढेच नव्हे तर जिथे पती प्रजोत्पत्तीस नालायक असतो तिथेही पुत्रप्राप्तीच्या लालसेने बुद्धिवान पण दरिद्री ब्राह्मण तरुणालाच सर्वांत अधिक पसंती मिळते. शेट मोतीलाल हे माधवाला तो विवाहित असल्यामुळेच या कामासाठी पसंत करतात; आणि कुमुदसुंदरीला त्याच्यापासून मुलगा झाल्यावर त्याचे पितृत्व साफ नाकारून केवळ आपल्या जातीला खूष करण्यासाठी, पुत्रजन्माच्या समारंभात परजातीय माणसाचा शिरकाव नको या बहाण्याने त्याला दूर करतात. दूर करतानाही या पाहुण्याची नीती वाईट असून त्याने आपल्या दिवाळी नावाच्या मोलकरणीला बिघडवली अशीही कंडी मोतीलालच्या घरात उठते. याप्रमाणे जातिगंडाचा १९३६ सालापर्यंतचा साधकबाधक विचार करून स्मृतींच्या परंपरेशी संलग्न पण आधुनिकांच्या आधुनिक मतांना व समजुतींनाही धक्का देईल अशी 'तर्कटनीति' डॉ० केतकरांनी तयार केली.

## अकरा-कलमी तर्कटनीति

'तर्कटनीति' ही डॉ० तर्कटे, प्रो० लोंढे या दोघांची कलमे व पद्मनाभ मंडपे यांची 'खैलिक सूत्रें' मिळून झालेली आहे. तिच्यात एकंदर अकरा कलमे आहेत. पण त्यातली दोन कलमे सोडली तर बाकीची सर्व विवाहेतर स्त्रीपुरुषसंबंधावर आहेत. 'जातिगंड' ही जर या कादंबरीची पार्श्वभूमी मानली, तर जातिबाह्य संबंध व विवाहेतर संबंध यांना या कादंबरीत महत्त्वाचे स्थान मिळावे हे उचित आहे. ही नीती लिहिताना डॉ० केतकरांच्या दृष्टीसमोर (आधुनिक रशियाविरहित) पितृप्रधान पद्धतीचा जगभर पसरलेला सुसंस्कृत समाज होता. या समाजाच्या शेकडो वर्षांच्या उत्क्रांतीच्या अवस्था पाहून आणि अवतीभवती चाललेले वेगवेगळ्या लोकांचे व्यवहार पाहून डॉ० केतकरांनी काही अनुमाने काढली आहेत. 'तर्कटनीतीचा' मुख्य मुद्दा एकच आहे: तो म्हणजे स्त्रीपुरुषसंबंध, आणि हा संबंध मुख्यतः विवाहबाह्य संबंध आहे. 'ब्राह्मणकन्ये'तल्या 'वैजनाथस्मृती'त विवाहपद्धतींची व कुटुंबपद्धतींची

चिकित्सा आलेली आहे, तर 'तर्कटनीती'त वैयक्तिक नीतीच्या मूल्यांचा विचार केलेला आहे. नीती ही दोन प्रकारची असते; एक, ज्या जातीत व कुळात आपण जन्माला येतो, त्यांच्या बंधनाने आलेली नीती; आणि दुसरी, मानवी स्वभावास अनुसरून प्रत्येक व्यक्तीने अधिक उच्च किंवा शिथिल केलेली नीती. पहिल्या कलमाप्रमाणे पांढरपेशांना जी नीती लागू पडते ती राबणाऱ्या समाजास उपयोगी पडत नाही असे विधान आहे. स्मृतींतले कडक नियम उघड ठरावीक प्रतिष्ठित लोकांकरता आहेत, शूद्रांकरता नव्हेत, पण जुन्या स्मृतींतले नियम ज्या आचार्यांनी केले ते विवेकी व दूरदृष्टीचे होते. सर्व लोकांस एकाच तऱ्हेची नीती केव्हाही लागू करणे इष्ट नाही, हे त्यांनी ओळखले होते. म्हणून ब्राम्हणांना पुनर्विवाहाची मोकळीक न ठेवता ती त्यांनी शूद्रांकरता ठेवली. पुढे दुर्दैवाने परचक्रामुळे स्मृतिकारांचे कार्य अपूर्ण राहिले व सर्व समाजबंधने शास्त्रीय दृष्टीने संकलित केली गेली नाहीत. ही गोष्ट न ओळखता आज आम्ही समाजाचे वेगवेगळे थर उपेक्षून सर्व समाजाला एकच नीती लावू पाहातो, ही गोष्ट अंती समाजाच्या हिताची होणार नाही. तर मग सर्वांना जास्तीत जास्त सुखावह होईल, अशा लवचीक नीतीचे नियम कोणते? ते स्थूलपणे असे सांगता येतील :

आजकाल जगभर जी पितृप्रधान संस्कृती पसरलेली आहे व तिच्यामुळे वैवाहिक नीतीची जी बंधने रूढ झालेली आहेत, त्याच बंधनांना प्रत्युत्तर म्हणून, किंवा त्यांच्या अपूर्णतेची खूण म्हणून ठिकठिकाणी वेश्याव्यवसाय अस्तित्वात आला आहे. स्त्रीची अर्थोत्पादनात गौणता हेही एक मोठे कारण या परिस्थितीला आहे. जोपर्यंत ही परिस्थिती आहे, तोपर्यंत वेश्याव्यवसाय समाजात राहणार. निराळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, वेश्यागमन किंवा विवाहेतर लैंगिक संबंध हीसुद्धा ठरावीक प्रमाणात समाजाची एक गरज म्हणून पूर्वीपासून विचारवंतांनी ओळखली आहे. आमच्याकडे देवदासी आणि कलावंतिणी यांच्यासारख्या विशिष्ट पद्धती रूढ करून त्या पंथाला पोटार्थी वेश्याव्यसायापेक्षा उच्च व मोहक स्वरूप प्राप्त करून देण्यात समाजाने पूर्वीच यश मिळविले आहे. विवाहेतर संबंधात अती हिणकस दर्जाचे संबंध म्हणजे केवळ पोटाकरता देह विकायला लागणे. हे फार लाजिरवाणे आहे आणि म्हणून समाजाची धारणा विचारपूर्वक करायची झाल्यास स्त्रीने कुमारिका व विधवा असल्यास ब्रह्मचर्य पाळून राहावे, पत्नीपद स्वीकारावे, एखाद्या गृहस्थाची रखेली (अवरुद्धा) म्हणून राहावे की अनेक पुरुषांशी संबंध ठेवून वेश्यावृत्ती पत्करावी, हे तिच्या पसंतीवर सोपवलेले बरे.

'ब्राह्मणकन्ये'तल्या 'वैजनाथस्मृती'प्रमाणेच अपत्याचे हित हे प्रत्येक दांपत्याचे सर्वांत मोठे कर्तव्य असले पाहिजे, मग ते दांपत्य विवाहाने एक झालेले असो वा नसो, हेच या 'तर्कटनीती'त सुद्धा डॉ० केतकरांनी आवर्जून सांगितले आहे.

त्या दृष्टीने नीतीचे तिसरे कलम हा या नीतीचा गाभा ठरतो. तो असा : " विवाह आणि विवाहाशिवाय स्त्रीपुरुषांची संयुक्तता या दोहोंमध्ये विवाहाची बंधनकारकता अधिक आहे. तथापि विवाहाशिवाय संयुक्तता हीदेखील विशेष खेदकारक नाहीं. त्या प्रकारच्या संयुक्ततेस लोकांची अमान्यता असल्यामुळें स्त्रीस दुःख भोगावें लागतें. तथापि ही लोकांची अमान्यताच नाहींशी झाली किंवा अधिक बुद्धियुक्त झाली तर ते विवाह करणाऱ्या स्त्रियांची मानसिक स्थिति दुःखास्पद होणार नाहीं. विवाहविहीन संयुक्ततेविषयीं विचार करताना धार्मिक विचारांचें बल कमी झालेलें नाही. जसजशी वैवाहिक प्रश्नांत विचारयुक्तता वाढेल तसतसें काल्पनिक नीतिविचारांचें बल कमी होईल. आणि तसें झालें म्हणजे ज्याप्रमाणें आपण धार्मिक लग्न करावें किंवा रजिस्टर लग्न करावें यावर स्त्रीपुरुष विचार करतात व आपल्या इच्छेनें आपला मार्ग स्वीकारतात, त्याप्रमाणेंच विधीशिवाय आपण संयुक्त व्हावें किंवा नाहीं, याविषयींदेखील स्त्रीपुरुष विचार करतील व त्या वेळेस दिसणारा योग्य मार्ग अवलंबतील. विवाहाशिवाय स्त्रीपुरुषसंयुक्ततेस आक्षेपाचें एक कारण त्या स्थितीत मुलांची आबाळ होणें हें आहे. तथापि त्या विचाराचें फारसें महत्त्व नाहीं. स्त्रीपुरुषांचें अपत्यावर जें प्रेम असतें, त्यावर दोघांची संयुक्त स्थिति ही विवाहविधीच्या बंधनकारकतेपेक्षा अधिक बळवान आहे. आणि यामुळें विवाहविहीन संयुक्तता विवाहास पोषकच होईल. मनुष्यप्राणी एकदम जबाबदाऱ्या पत्करण्यास तयार होत नाहीं, तर त्या तो क्रमाक्रमानेंच पत्करतो. थोडीशी जबाबदारी पत्करल्यानंतर अधिक पत्करतो." (पृष्ठ ३०४)

त्याचप्रमाणे ' स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा हेतू स्त्रियांस नवऱ्यापासून स्वतंत्र करण्याचा नसून बाप व नवरा यांखेरीज इतरांवर जें त्यांचें अवलंबित्व उत्पन्न होतें, त्यांपासून त्यांची मुक्तता करण्याचा असावा ' हे या ' तर्कटनीती 'चे दुय्यम कलम आहे. बाकीची वेश्यावृत्तीबद्दलच्या आणि गुरुबाजीच्या मर्यादित आवश्यकतेबद्दलची कलमे पद्मनाथ मंडप्यांविषयीच्या आणि रंजनेविषयीच्या मजकुरात आली असल्याने त्यांची पुनरावृत्ती मी इथे करीत नाही.

## एक अविस्मरणीय, प्रतीकात्मक पात्र

प्रो० लोंढे हे केतकर-वाङ्मयातले एक अविस्मरणीय पण प्रतीकात्मक पात्र आहे. रघुनंदन कामत, डॉ० सरंजामे, ब्रह्मगिरी, वैजनाथशास्त्री, डॉ० वैसास यांच्याच प्रथेतले एक-एक तरी पात्र एकेका कादंबरीत घालून, त्या पात्राच्या द्वारे धार्मिक व सामाजिक रूढींचा समाजशास्त्रीय दृष्ट्या खल करून, जुन्या रूढींची मूल्ये तपासून, त्यांनी नवसमाजनिर्मितीसाठी काही निष्कर्ष काढले आहेत. प्रत्येक कादंबरीत त्या त्या काळचे ताजे प्रश्न हाताळून आपल्या समाजशास्त्रीय तत्त्वांच्या आणि निष्कर्षांच्या

यादीत डॉ० केतकर वेळोवेळी बहुमोल भर अगदी सावकाश टाकीत गेले आहेत. प्रत्येक कादंबरीतल्या घटना, पात्रे आणि पार्श्वभूमी ही सर्व या निष्कर्षांचे प्रात्यक्षिक म्हणून उपयोगात आणलेली आहेत, ही विशेष लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट आहे. प्रो० लांडे हे वर सांगितलेल्या प्रतीकात्मक पात्रांपैकीच एक असून, समाजशास्त्रीय विचारांचा खल करण्याच्या आणि आपले मनोगत व अनुभव व्यक्त करण्याच्या दुहेरी हेतूने त्यांनी या पात्रांना वेगवेगळ्या कादंबरीत वेगवेगळ्या भूमिका देऊन त्यांचा उपयोग करून घेतलेला आहे. खरे सांगायचे म्हणजे या पात्रांच्या भूमिका क्षणभर बाजूला सारल्यास असे दिसून येते की, ही सर्व डॉ० केतकरांच्या तारुण्यापासून तो अखेरपर्यंतच्या मानसिक अवस्थांचीच प्रतीकात्मक चित्रे आहेत. तरुण रघुनंदन कामतच्या किंवा डॉ० सरंजाम्यांच्या राजकीय आणि समाजशास्त्रीय आकांक्षा आणि त्यांचा आवेश, त्यांचे ते परागंदा समाजाबद्दलचे तारुण्यसुलभ गगनचुंबी पण निष्फळ स्वप्न, ही डॉ० केतकरांच्या कार्यास लागण्यापूर्वीच्या तडफेची व वृत्तीची लक्षणे होती. त्यानंतर हिंदुस्थानात येऊन जिज्ञासू वृत्तीने समाजाचे निरीक्षण करताना आशावादी ब्रह्मगिरींनी आपले कार्य कोणते ते पाहाण्यासाठी केलेली 'मुलुखगिरी', डॉ० केतकरांनी ज्ञानकोशाचे काम हाती घेण्यापूर्वी सीलोन, आंध्र, बंगाल व मध्यप्रांत इत्यादी प्रांतांत आपल्याला काय काय करता येण्यासारखे आहे हे पाहाण्याकरता केलेल्या भ्रमंतीसारखीच नाही काय? आणि नंतर गृहस्थाश्रम घेतल्यानंतर संसारी जीवनाचे प्रत्यक्ष अनुभवाने आणि समाजशास्त्रज्ञ या दृष्टीने केलेले त्यांचे निरीक्षण 'वैजनाथ-स्मृती'त यथार्थ आलेले नाही काय? यानंतर 'विचक्षणे'त आता पूर्वीप्रमाणे जिज्ञासू वृत्तीनेच केवळ डॉ० केतकरांनी कथा-प्रांतात पाऊल टाकलेले नाही. प्रो० लांड्यांच्या मिषाने वत्सल पित्याच्या रूपाने वयस्कर तत्त्वज्ञाच्या भूमिकेत, अंतर्मुख झालेल्या समाजशास्त्रज्ञाच्या अवस्थेत ते आपल्याला दिसतात. डॉ० केतकरांच्या आत्मदर्श विचक्षण पात्रांचे त्यांच्या कादंबऱ्यांतले अस्तित्व व कार्य हे स्थूल मानाने अशा प्रकारचे आहे.

तपशिलात जाऊन पाहाताना मात्र डॉ० केतकरांनी स्वतःच्या आयुष्याशी या पात्रांना जखडून टाकलेले नाही. ती पूर्णपणे स्वतंत्र आहेत. उदाहरणार्थ, प्रो० लांड्यांचेच पाहा. प्रो० लांडे पूर्ववयात, बंगालमध्ये अध्यापकाचे काम करून १९१८ च्या सुमारास पुण्यास येऊन राहू लागले. "त्यांच्या व्याख्यानांत बरेंच वैविध्य असल्यामुळें पुणेकरांची करमणूकही बरीच होत असे. विचारासही प्रोफेसर जे प्रश्न घेत असत ते जरी नित्य परिचयाचे असत, तरी त्यांच्या मांडणींत विचारास घेतलेलें क्षेत्र अत्यंत विस्तृत असल्यामुळें त्यांचें म्हणणें पुष्कळशा स्थानिकांस समजेनासेंही झालें होतें." (पृष्ठ १) एवढा भाग डॉ० केतकरांच्या पुण्यातल्या रहिवासाच्या अनुभवाचे

प्रत्यक्ष सार असून त्यांच्या पूर्वचरित्रास पूर्णपणे लागू पडणारा आहे. परंतु स्वतःच्या आयुष्याची केवळ छाया या दृष्टीने पात्रांचा परिपोष होऊ नये म्हणून त्यांनी खबरदारी घेतलेली दिसते. कारण त्यानंतरच्या मजकुरात त्यांनी प्रो० लोंढ्यांचे चित्र स्वतःस अभिप्रेत असलेल्या धर्मस्वरूपाशी तंतोतंत जुळते ठेवूनदेखील त्यांच्या पात्रास आपले कार्यक्षेत्र निश्चित ठरवून त्याप्रमाणे परिस्थितीप्रमाणे प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. (त्या बाबतीत बर्नार्ड शॉसारख्या नामांकित लेखकांनी, मनुष्याच्या हाडामांसाच्या भावनांचा मागमूस नसलेली पण प्रचलित समाजावर कोरडे ओढण्याच्या एकमेव उद्देशाने सर्वस्वी कल्पनारूप पात्रे जी बरीचशी निर्माण केली आहेत त्यापेक्षा डॉ० केतकरांची स्वतःच्या अनुभवांतून निर्माण झालेली पण समाजबद्ध अशा पात्रांची निर्मिती मला अधिक श्रेयस्कर वाटते.) या स्वातंत्र्यातून डॉ० लोंढ्यांच्या पुष्टिमार्गीय सिद्धांताच्या तात्त्विक व व्यावहारिक स्वरूपाचे चिंतन आणि नियंत्रण करणारी वृत्ती निर्माण झाली आहे.

प्रो० लोंढे हे धर्मांच्या तौलनिक इतिहासाचे अभ्यासक म्हणून दाखविले असले तरी घरीदारी समाजशास्त्रीय पद्धतीने व्यक्तीच्या आणि संस्थांच्या अंतस्थ शक्तीचा अजमास घेणे हीच त्यांची खरीखरी प्रवृत्ती दिसते. या बाबतीत डॉ० तर्कटे यांची प्रेरणा तशाच तऱ्हेची असल्यामुळे हे पात्र प्रो० लोंढ्यांच्या पात्राची पुरवणीच आहे असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही.

## सुधारून वाढवलेली आवृत्ती

प्रो० लोंढे हे वैजनाथशास्त्र्यांप्रमाणेच विधुर दाखविले आहेत. पत्नीच्या निधनाने दोघेही वेगवेगळ्या तऱ्हेने पण वैयक्तिक आणि कौटुंबिक बाबतींना आळा घालण्यास असमर्थ झालेले दिसतात. पण प्रो० लोंढ्यांचा पिंडच कुटुंबवत्सलाचा मधुमालतीने पहिले लग्न बापाच्या मनाविरुद्ध केले; नंतर नवरा वारल्यानंतर परत हक्काने बापाच्या घरी राहून, तिने आई वारल्यामुळे प्रपंचाचा भार पूर्वीप्रमाणेच वाहिला आणि त्यामुळे बाप दुसऱ्या दोन्ही मुलांपेक्षा स्वैराचाराच्या कड्यावरून परतलेल्या या मुलीवर अंतःकरणातून मायेचा वर्षाव करीत आहे. मधुमालती दुबळी, असंयमी आहे. पण मनाचा मवाळपणा बापात आणि या मुलीत जसा एकाच गुणाचा आहे तसा दुसऱ्या दोघा मुलांत नाही. बाळोबा व विचक्षणा स्वतःला कुठे न खरचटावून घेतानादेखील संभ्रमातच वावरताना दिसतात. त्यातल्या त्यात कृपेबरोबर लग्न झाल्यामुळे बाळोबाचा संभ्रम दूर होतो, व तो घाण्याला जुंपलेल्या गृहस्थाप्रमाणे जगात स्थिर होतो. बुद्धिमान विचक्षणा मात्र आपल्या पूर्ण बदललेल्या, आणि परपुष्ट नवऱ्याला, गवसणी घालता घालता मेटाकुटीला येते. तिच्याही खटपटीला यश येतेच; पण ते सर्वांत कमी प्रतीचे.

प्रो० लोंढ्यांचे पात्र हे 'ब्राम्हणकन्ये'तल्या आप्पासाहेबांची सुधारून वाढवलेली आवृत्ती आहे. आप्पासाहेब स्वतःच्या 'त्यागा'च्या धुंदीत वावरणारे व त्यामुळे आपल्या बायकामुलांची दुःखे समजून घेण्यास असमर्थ असल्यामुळे कालिंदीचा तडफडाट त्यांना जाणवला नाही. तिच्या वर्तनाने ते कावले. त्यांना कमीपणा वाटला; पण मातापितरांत व मुलांत विश्वास नसला तर कुटुंबात किती करुण परिस्थिती निर्माण होते, हे कळताच त्यांनी वैजनाथशास्त्र्यांकडे धाव घेतली. प्रो० लोंढ्यांचे चित्र आप्पासाहेबांपेक्षा अधिक करुण व उदार आहे. प्रो० लोंढे हे विधुर असल्यामुळे एक प्रकारे विकल होते. इच्छा असूनही मुलांच्या अंतःकरणात प्रवेश करणे त्यांना जमले नाही. "मला तुमचा मित्र समजा, भिऊ नका" असे त्यांनी मुलांना वारंवार सांगितले तरी आपल्या बापाच्या मृदू अंतःकरणाची पारख त्या पोरक्या पोरांना झाली नाही. बापाचे गांभीर्य कदाचित त्याला कारण असेल. परंतु विचक्षणा वेकार माधवाशी लग्न करते, मधुमालती घरातून पळून जाते, तेव्हा मनातून दुःखी झालेला हा पिता त्रागा करीत नाही. आपण मुलांचे मन जिंकायला असमर्थ ठरल्यामुळे ही परिस्थिती ओढवली; आपण आईचे स्थान मिळवू शकत नाही, ही जाणीव त्यांना झाली. त्यांना आपल्या जुन्या घोकीव व घोटीव नीतीच्या कल्पनांचा उबग आला नव्या दृष्टीने ते जग पाहू लागले. तरुणांची दुःखे आता त्यांना कळली. आपल्या नीतिविषयक कल्पना नव्याजुन्याची आणि बदलत्या परिस्थितीची सांगड घालून त्यांनी 'तर्कटनीतीं'त बसवल्या.

डॉ० तर्कस्त्यांना 'तर्कटनीती'मुळे प्राधान्य आलेले असले, तरी ते वस्तुतः प्रो० लोंढ्यांचेच उपचित्र आहे. तीच स्थिती पद्मनाभ मंडप्यांची आहे. या पात्राची बैठक लोंढ्यांच्या पात्राला टेकू देण्यासाठीच आहे. लोंढ्यांच्या विचाराची दुसरी बाजू दाखविण्यासाठीच या पात्राची योजना आहे.

## पुष्टिमार्गीय पंथ

पद्मनाभ मंडप्यांचे पात्र व एकंदर पुष्टिमार्गीय पंथाचे दिग्दर्शन हे डॉ० केतकरांनी दोनतीन हेतूंनी केलेले दिसते. एक तर १९२८ ते १९३३ मध्ये महाराष्ट्रातल्या काही पत्रांनी गुरुबाजीविरुद्ध रीतसर मोहीम सुरू करण्याचा चंग बांधला होता. 'किर्लोस्कर'मध्ये त्या वेळीं उपासनीमहाराजांबद्दल व 'प्रगति'मध्ये नारायण-महाराजांबद्दल बराच मजकूर आला होता. आणि पुढे फिर्याद रंगणार इतक्यात 'किर्लोस्कर' या नियतकालिकातले हे सदर विनशर्त बंद पडले, हेहि पुष्कळांच्या लक्षात राहिले आहे. गुरुबाजीच्या ढंगाचा त्या वेळेला सुबुद्ध लोकांना खरोखरच उबग आला होता. पण ही मोहीम इतकी अचानक बंद का पडली हे मात्र एक उघड 'गुपित'च राहिले. या बाजारी किंवा व्यवहारी गोप्याशी आपल्याला काहीच करायचे

नाही. पण गुरुबाजीबद्दलच्या त्या काळचा खराखुरा असंतोष सुशिक्षित लोकांच्या मनात ताजा असताना गुरुबाजीचे एका दृष्टीने तात्त्विक समर्थन करणारे हे वर्णन वाचून पुष्कळांना धक्का बसला, हे उघड आहे. त्याचप्रमाणे गुरुभजनी लागलेल्या शिक्षितांनाही ज्या धीटपाठ पद्धतीने डॉ० केतकरांनी विवेचन केले ती पद्धत व त्यामागचा हेतू विलकूल रुचण्यासारख्या नव्हता. दोन्ही पक्षी 'टवाळ विनोदा'तच त्याची गणना करण्यात आली. परंतु या निमित्ताने डॉ० केतकरांनी त्या प्रक्षोभक समकालीन संदर्भाची पार्श्वभूमी कायम ठेवून जे लिहिले, ते खरोखर काय होते याचा विचार साधकबाधकपणे करण्यास जो कालावधी आवश्यक होता, तो न लोटल्याने, डॉ० केतकरांच्या समकालीनांना या धट्ट व अतिक्षोभक अशा प्रश्नाला हात घालणे जमले नाही. डॉ० केतकरांचे म्हणणे थोडक्यात असे की, परंपरेने व धार्मिक संप्रदायात शिरल्यामुळे जे आचार रूढ झाले आहेत, त्यांचे पृथक्करण केल्यास, समाजातल्या काही गौण गरजा त्यांच्यामुळे पुऱ्या होत असाव्यात, व म्हणूनच ते टिकून राहिले असावेत हे उघड आहे. गुरुबाजीच्या 'कृष्णलीले'तही एक समाजशास्त्रीय उपयुक्तता डॉ० केतकरांना दिसली आणि ती त्यांनी निःसंकोच समाजापुढे ठेवली. जितक्या निर्ममपणे पूर्वोक्त धर्मशास्त्रकारांनी नियोगाचे समर्थन केले तितक्या निःपक्षपातीपणाने त्यांनी या समकालीन रूढ घटनेचे केलेले आहे.

ही घटना एका व्यक्तीपुरती नव्हती; एका कुटुंबापुरतीही नव्हती; अशा घटना परिमित असल्या, तरी ठराविक परिस्थितीत, ठराविक संप्रदायांच्या आधाराने त्यांचा परिपोष होतो. आणि त्या परिमित असल्या तरी त्या परंपरेचे सातत्य पडद्याआड टिकून राहिलेले असते. विवाह व कुटुंब या दोहांमध्ये कुटुंबाचे स्थान समाजात निःसंशय अधिक महत्त्वाचे आहे. विवाह हा कुटुंबात निमित्तमात्र आहे. तेव्हा वाटेल ते करून कुटुंबाचे स्थैर्य व चिरत्व टिकविणे हे पितृप्रधान संस्कृतीत सर्वांत महत्त्वाचे कार्य आहे. मातृप्रधान संस्कृतीत स्त्रीला वैवाहिक व विवाहेतर संबंध जोडून कुटुंब टिकविणे शक्य असते. पण पितृप्रधान संस्कृतीत स्त्रीची भूमिका दुय्यम असल्याने तिला सर्वप्रकारे नीतीची बंधने आपल्यावर लादून घ्यावी लागतात. पितृप्रधान कुटुंब-पद्धतीत वारसाचा प्रश्नही मोठा असतो. औरस पुत्र नसला तर स्वतःच्या विवाहित स्त्रीला स्वतःस संमत असलेल्या पुरुषाकडून संतती होऊ देणे स्वैराचारापेक्षा इष्ट आहे, असा रूढीचा निर्णय आहे. नियोग कलिवर्ज्य असला तरी आपत्काळी लोकांनी नियोगाचे वैधिक स्वरूप टाकून दिले व शास्त्राशी आपल्या आचरणाची फारकत करून टाकली, पण नियोगाचा मथितार्थ रूढीने टिकवलाच होता. बहुतेक वेळी नियोगाची आवश्यकता उत्पन्न झाली की धर्मगुरूंची या ठिकाणी योजना होत असते. पहिल्या रात्री नववधू धर्मगुरूकडे पाठवणे अनेक धर्मपंथांत रूढ आहे.

जगातल्या पुष्कळशा धर्मपीठांचा इतिहास याला साक्षच आहे. त्याचप्रमाणे समाजात सर्वच व्यक्तींना विवाह करणे शक्य नसते; सर्वच व्यक्ती विवाहात सुखी नसतात; अर्थात अशा वेळी कुटुंबाचा उच्छेद न होता नीतीचा कमीत कमी ऱ्हास व्हावा अशी योजना गुरुबाजीमुळे होत असते, अशी एकंदर डॉ० केतकरांची या प्रकाराबद्दलची भूमिका आहे.

दुसरी गोष्ट अशी की बौद्ध, जैन, पुष्टिमार्गी, मुसलमान व प्रार्थनासमाजी या सर्वांनी ज्ञानकोशात डॉ० केतकरांनी त्या त्या पंथाची जी चिकित्सा केली तीमुळे चिडून जाऊन त्यांचा निकराचा निषेध केला होता (१९२५ च्या सुमारास); त्यांपैकी या कादंबरीत त्यांनी वरील सर्व दिग्दर्शनाबरोबर गुरुबाजीची हास्यास्पदता पण दाखवली आहे. रंजनेचे गाणे घातले नसते, तर हे वर्णन विदारकच झाले असते आणि पद्मनाभ मंडप्यांची 'खैलिक सूत्रे' निष्फळ ठरली असती.

## हिंदुधर्माबद्दलचा जिव्हाळा

पुष्टिमार्गाचे जे काही समर्थन डॉ० केतकरांनी केले आहे ते अशा हेतूने की, हा मार्ग जैनमताचा कट्टर प्रतिस्पर्धी आहे म्हणून. दोघांचाही प्रसार गुजराथेत. डॉ० केतकरांना निवृत्तीचे वावडेच. तथा संन्यासमार्ग त्यांना अभिमत नव्हता असे नव्हे. आपण स्वत: शेवटी संन्यास घेणार असेही ते म्हणत. परंतु त्यांना अभिप्रेत असलेला संन्यास चातुराश्रम्याच्या बैठकीतला होता. कर्म करायचे व मग कर्मफलत्याग करायचा असा त्याचा समाजाभिमुख अन्वय होता. डॉ० केतकरांनी संन्याशांची अनेक पात्रे आपल्या कादंबऱ्यांत घातलेली आहेत. पण हे सारे संन्यासी या आश्रमातदेखील सामाजिक ध्येयाची परिपूर्ती करताना दिसतात. ज्यांना भगवी वस्त्रे पेलत नाहीत ते ती सोडून पुनश्च गृहस्थाश्रमात येतात. जे संप्रदायनिष्ठ आहेत ते त्या त्या संप्रदायांच्या रूढी संभाळून कार्यप्रवृत्त असतात. 'भटक्या'तले स्वामी भूतादनं तर संसाराची काळजी सोडून देण्यासाठी आपण हा आश्रम घेतला, पूर्वीचे आयुष्य सुखाचे होते, जन्मभर पैशाच्या मागे लागण्यात काही अर्थ नाही, म्हणून प्रत्येक ब्राह्मणाने चतुर्थाश्रम घ्यावा, असे उघड म्हणतात. आयुष्यक्रमात पालट म्हणून कृतकृत्य माणसाने घेतलेला संन्यास, डॉ० केतकरांना अभिप्रेत होता. पण जैन व बौद्ध मतांबद्दल त्यांना गृहस्थाश्रमाचे छेदन करणाऱ्या नैष्कर्म्यवृत्तीमुळे आदर नव्हता. डॉ० केतकरांची ही मते विवाद्य असली तरी हिंदुधर्माच्या विचारप्रणालीच्या बाहेर ती नाहीत. डॉ० केतकरांचा हिंदुधर्माबद्दलचा जिव्हाळा प्रसिद्धच आहे. तेव्हा जैन व बौद्ध अशा फुटून निघालेल्या मतांपेक्षा पुष्टिमार्गीय सिद्धांत त्यांना जवळचे वाटत. कोणत्याही तऱ्हेने का होईना, पण बहुजिनसी, बहुरंगी समाज एकत्र आणण्याचे कार्य या पंथांनी आजवर करून हिंदुसमाज टिकवून ठेवला आहे,

या जाणिवेमुळे अशा मार्गांचा अभ्यास सामाजिक संदर्भात समतोल वृत्तीने होणे जरूर आहे असे ते प्रतिपादीत.

## विचक्षणा व माधव छत्रे

आतापर्यंत आलेल्या कादंबरीतल्या पात्रांच्या संदर्भात विचक्षणेच्या स्वभावाबद्दल बरीच चर्चा येऊन गेली आहे. तिचे पात्र जरी पहिल्याने भेदक रीतीने डॉ० केतकरांनी मांडले असले तरी पुढेपुढे विचक्षणेबद्दल अधिकाधिक सहानुभूती त्यांनी व्यक्त केली आहे. शेवटी तर आपला मोडू पाहाणारा संसार अत्यंत संयम व शहाणपण यांच्या जोरावरच ती तगवून धरते असे दाखवले आहे. माधव छत्रे हा भ्रमरवृत्तीचा आणि बेकार असा देखणा तरुण होता. त्याची वृत्ती माहीत असूनही विचक्षणेने त्याच्याशी लग्न लावले; कारण तो सुंदर होता. ती स्वतः रूपहीन असल्यामुळे लग्नाच्या बाजारात आपली किंमत कमी आहे याची जाणीव ठेवून होती. केतकर-वाङ्मयातल्या सर्व शिक्षित स्त्रियांप्रमाणे विचक्षणेच्या अंतिम सुखाचे व महत्त्वाकांक्षेचे निधान पतिसुखच होते; राजकारण व समाजकारण नव्हते. लग्न झाल्यावर तिने कुटुंबभरणासाठी नोकरी पत्करली; पण त्यामुळे तिचा नवरा अधिक बेजबाबदार झाला, बहकला व समाजात अप्रिय झाला. नवराबायकोमधले अंतर वाढले. विचक्षणा किती झाले तरी सच्छील होती. आता तिचा कोंडमारा झाला. मधुमालतीने आपले मन जसे बापाशी मोकळे केले तसे तिला करता येईना. नवऱ्याला सोडायचे म्हटले, तरी परित्यक्तेचे जीवन आतापेक्षाही भयाण आहे असे तिला पटले. तिचे मन अंतर्मुख झाले. स्वतःच्या चुका तपासू लागले. मिळवत्या बायकांचे नवरे बेजबाबदार होतात, असा निष्कर्ष त्या विचारमंथनातून तिने काढला. सुदैवाने याच वेळी माधव छत्रेलाही मोतीलाल शेटच्याकडून अपमानाची वागणूक मिळाल्याने त्याचा रामप्यारीबद्दलचा मोह उतरला. कृपा आणि मंजुळा या दोघींनीही त्याचा उघड धिक्कार केला. जात्याच भ्याड असल्यामुळे आता तो परत विचक्षणेकडे आला आणि संसाराचे नाटक नीट वठवू लागला. त्याचे प्रेमप्रकरण बाहेर फुटले नव्हते, हे भाग्यच. विचक्षणेला त्याचा संशय आला होता; तो इतर बायकांबरोबर लवळपणा करतो याबद्दल तिचा मनातल्या मनात जळफळाट होत असला, तरी ती शहाणी असल्यामुळे तिने तो बाहेर व्यक्त होऊ दिला नाही. माधवच्या दृष्टीने हे इष्टच होते. पण हळूहळू या नाटकातून त्यांच्यामध्ये एक नवेच पण दृढ बंधन निर्माण होऊ लागले. त्यात पुढे मूल झाल्यामुळे विचक्षणेने नोकरी सोडल्यामुळे माधवला संसाराचा सगळाच भार डोकीवर घ्यावा लागला आणि तो मार्गावर आला.

विचक्षणेच्या बाबतीत विवाहित स्त्रियांनी नोकरी करू नये, ती केल्यास पुरुष

नालायक बनतात, हा विचार डॉ० केतकरांनी ज्या काळी मांडला त्याकाळी नोकरी करणाऱ्या गृहिणींचे प्रमाण फार कमी होते. ज्या स्त्रिया (डॉक्टरणी सोडून) नोकरी करीत त्यांची कौटुंबिक परिस्थितीच आर्थिक दृष्ट्या व कौटुंबिक स्वास्थ्याच्या दृष्टीने चिंतेची असे. 'प्रियंवदे'त शारदेचे पात्र घालून त्यांनी वैजनाथासारख्या पंडिताला पोसणे हे एक व्रत नोकरी करणाऱ्या स्त्रीने घेणे आवश्यक आहे असा या नियमाला विकल्प असलेला विचार मांडला आहे. परंतु आज मध्यमवर्गाची आर्थिक परिस्थिती अतिशय ओढगस्तीची झाली आहे. सुशिक्षित स्त्रियांच्या आकांक्षेचे व कर्तृत्वाचे क्षेत्र इतके वाढले आहे की, डॉ० केतकरांचा हा निष्कर्ष अधिकच गुंतागुंतीचा झालेला आढळून येईल; कारण आता नोकरी करणाऱ्या स्त्रियांत विवाहितांचे प्रमाण फार मोठे आहे.

## प्रेम आणि मोह यांतील फरक

मधुमालतीचे चित्र डॉ० केतकरांनी फार हळुवारपणे रंगवले आहे. डॉ० केतकरांनी स्त्रियांची जी काही पात्रे रंगवली आहेत, त्यात संसारी स्त्रियांची पात्रे त्यांनी विशेष गौरवून लिहिली आहेत. मधुमालतीला त्यांनी गौरविलेले नाही. उलट ती अधःपाताच्या टोकापर्यंत जात चाललेली आणि तिथून परतलेली त्यांनी दाखवलेली आहे. त्यांनी आपली करुणा तिच्या बाबतीत विशेष व्यक्त केली आहे. मधुमालती लहानपणापासून मंदबुद्धीची पण अत्यंत संसारी वृत्तीची मुलगी होती. तिने पहिले लग्न बापाच्या इच्छेविरुद्ध केले, पण लवकरच विधवा होऊन ती पित्याच्या घरी परतली व पूर्वीसारखाच त्याचा संसार पाहू लागली. बापाची तिच्यावर विशेष मर्जी होती ती यामुळेच. काळजीही त्याला याच भोळ्या मुलीबद्दल वाटे. जेव्हा माधवाबद्दल दोघी बहिणींना आकर्षण उत्पन्न झाले, तेव्हा धूर्त विचक्षणेने माधवाची स्त्रियांबद्दल असलेली वाईट बुद्धी तिला नानातऱ्हेने सांगून तिला माधवापासून पराङ्मुख केले; इतकेच नव्हे, तर संकर्षण आठवल्याबरोबर तिचा सहवास व्हावा व त्यांच्यात आकर्षण निर्माण व्हावे म्हणून खटपट केली. संकर्षण त्या वेळी स्थायिक झाला नव्हता. त्यामुळे व माधवचे विचक्षणेबरोबर घाईघाईने लग्न झाले त्यामुळे व्यग्र होऊन मधुमालतीने घर सोडले आणि ती संकर्षण आठवल्याबरोबर मुंबईस निघून गेली. तिथे काही दिवस राहिल्यावर तिने विवाहबाह्य संसाराची काही दृश्ये बघितली. स्वतःची तिने त्यांच्याशी तुलना केली. पतिता आणि संसारी स्त्रिया यांच्यामधला हा दुवा पाहून ती अंतर्मुख झाली. ज्या गोष्टी ती कल्पनेने जाणू शकत नव्हती त्या प्रत्यक्ष पाहिल्यानंतर तिला कळून आल्या. विवाहबाह्य संसार तिला पूर्वीप्रमाणे निंद्य वाटले नाहीत, तरी आता त्या संसाराच्या सुखाची मर्यादाही तिला कळून आली. तिचे मन आता संकर्षणाबरोबर तसेच राहायला घेईना. सिनेमा

नटीही ती झाली नाही. ती परत घरी आली. या वेळेला आपल्या पित्याची दृष्टीही तिच्या या भानगडीमुळे फार सोशिक, उदार व समंजस झाल्याचे तिला आढळून आले. बापाची सहानुभूती पूर्णपणे आपल्याकडे आहे असे पाहून तिने आपले मन त्याच्यापुढे खुले केले. त्यामुळे तिचे भटकणारे मन स्थिर व शांत झाले आणि तिने संकर्षणाबरोबर लग्न केले. विवाहबाह्य संबंधांची चिकित्सा डॉ० केतकरांनी या कादंबरीत जरी अतिशय सहानुभूतीने केली असली तरी मुलींनी प्रेम करताना आपला जोडीदार लायक व गुणी आहे की नाही ते जरूर पाहावे हा स्पष्ट इशाराही त्यांनी दिलेला आहे. मधुमालतीच्या वर्तनाचे समर्थनही त्यांनी केलेले नाही. तो एक अपरिहार्य मूर्खपणाचा प्रकार आहे असाच त्यांचा आशय आहे. मधुमालतीप्रमाणेच विचक्षणेने भ्याड, आळशी आणि स्त्रियांबद्दल वाईट बुद्धी ठेवणाऱ्या माधव छत्रेबरोबर लग्न केले हीदेखील मोठी चूकच केली असे त्यांनी दाखवले आहे. प्रेम व मोह यातला फरक यात त्यांनी मार्मिकपणे दाखवला आहे.

## ‘पुरोगामी’ तरुणाचे प्रतिक

कादंबरीच्या अखेरच्या पर्वात बाळच्या तीन प्रेमप्रयोगांचे वर्णन आलेले आहे. बाळ हा आर्ट्स कोर्स घेऊन पास झालेला व नंतर बेकार राहाणाऱ्या तरुणाचे प्रतीक आहे. अशा तरुणांना बहुधा स्वाभाविकपणे वृत्तपत्रसृष्टीतच प्रवेश करावा लागतो. या वेळी ध्येयवादाची धुंदी व महत्त्वाकांक्षा असल्यामुळे तरुण वेगवेगळ्या पुरोगामी चळवळींकडे आकर्षिले जातात. कामगार-चळवळ ही १९२५-३७ च्या दरम्यान, काँग्रेसची कामगार संघटना अस्तित्वात येईपर्यंत, अत्यंत पुरोगामीच समजली जात असे. अजूनही डावे गट स्वतःला सर्वत्र पुरोगामीच समजतात. बाळही अशाच मतांचा आहे. परंतु वकूब कमी असलेल्या कार्यकर्त्याचे मूर्तिमंत प्रतीक तो आहे. बाळची प्रेमप्रकरणे व त्याचे सार्वजनिक अनुभव आता लोकांच्या इतक्या परिचयाचे झालेले आहेत की १९३६ पूर्वी ताजे असणारे हे व्यक्तिचित्र आता चिरपरिचित भल्या व बावळट अशा सत्ताहीन साम्यवादी किंवा समाजवादी तरुणाचे भासते. हे प्रतीक आता झिजून गुळगुळीत झाले आहे. मात्र हा गुळगुळीतपणा वाङ्मयात अशा लोकांचे चित्रण पुष्कळ झाल्यामुळे आलेला नव्हे. राजकीय व सामाजिक चळवळींत शिरलेल्या सामान्यांची चित्रे वाङ्मयात अजूनही कमी प्रमाणातच येतात. पण येतात तिथे मात्र ठराविक ठशातच येतात. किंबहुना, ध्येयवादी कादंबऱ्यांत तर नायक बहुधा समाजवादी दाखवलेला असतो आणि तो आदर्श तरुण असतो. (उदाहरणार्थ, खांडेकरांची, ‘हिरवा चाफा’ ही कादंबरी पाहा.) पण डॉ० केतकरांचे हे पात्र त्या वेळी दुर्मिळ असूनसुद्धा अधिक वास्तववादी आहे. डॉ० केतकरांनी बाळला आदर्शवादी बनवले नाही हेच त्यांचे यश. त्याची अनेक

व्यंगेही त्याच्या गुणांबरोबर त्यांनी दाखवलेली आहेत. बाळ हा धडपडणारा तरुण आहे. पण सानेगुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांपेक्षा तो फार वेगळा आहे. कारण तो खराखुरा सामान्य आहे. त्याच्या सामान्यत्वामुळे तो वाचकाला आवडतो. सामान्याची सदिच्छा त्याच्यात भरपूर आहे. बहुधा सामान्य माणूसच खऱ्या ध्येयवादी माणसापेक्षा सार्वजनिक क्षेत्रात पुढे यायचे झाल्यास अधिक चिकाटी दाखवतो. तीच चिकाटी बाळमध्ये आहे. तिच्यामुळे तो यशस्वी होतो. तीच चिकाटी, तीच सदिच्छा आजच्याही प्रत्येक धडपडणाऱ्या सामान्य तरुणात आपल्याला दिसते. पण त्याचे प्रवाहपतितत्व सार्वजनिक जीवनातल्या अनुभवांची कक्षा हळूहळू वाढवते. हेच या पुरोगामी सामान्यांचे समाजाला मिळणारे वरदान. जे जे या सामान्यांना कळले नाही, रुचले नाही ते वाढत नाही; अशा या सामान्यांचा सौम्य प्रवृत्तीचा प्रतिनिधी बाळ आहे. भटक्या प्रखर सामान्यांचे प्रतीक आहे. सत्यव्रताचे पात्र बाळचीच एक आवृत्ती आहे.

## अभिनव स्वयंभू लालित्य

रंजनेच्या पात्रात अत्यंत उठावदारपणाशिवाय दुसरे काहीच नवीन नाही, की जे डॉ० केतकरांनी पूर्वीच्या कादंबऱ्यांत आर्जवून सांगितले नाही. मराठी कादंबरीच्या इतिहासाच्या दृष्टीने एकच मुद्दा ध्यानात घ्यायचा तो हा : पतिता व वारांगना यांच्याविषयी रानडे-भांडारकरांच्या वेळी जी एक घृणेची आणि उपकाराची भावना होती तिच्यावर पहिला प्रभावी घाव 'संशयकल्लोळ' या नाटकाने घातला. नंतर काही वर्षांनी बंगाली वाङ्मयकृतींची मोहिनी पडलेल्या विठ्ठल सीताराम गुर्जरांनी 'देवता' हे बंगाली कादंबरीचे (१९१६ साली) भाषांतर केले, त्यात नायकिणीच्या प्रेमाचा मनोहर आविष्कार कालिंदीच्या रूपाने प्रकट केला. त्यानंतर हे इंग्रजी-बंगालीमिश्रित वाङ्मय मागे पडून पु० य० देशपांडे यांच्या 'बंधनाच्या पलीकडे' (१९२८) या कादंबरीत वेश्येच्या निष्कलंक कन्येच्या कुळवंताशी झालेल्या हक्काच्या विवाह-बंधनाचे वर्णन आले आहे. १९२९ साली भा० वि० वरेरकरांनी सुरू केलेल्या 'कुलदैवत' या कादंबरीत मोगाच्या रूपाने कुळवंत (गोवेकरीण) नायकिणीचे स्वार्थत्यागी निर्मळ चारित्र्य पुढे मांडले आहे. देशपांड्यांच्या कथेतला प्रचार किंवा कृत्रिमपणा वरेरकरांच्या कथेत नाही. या दुसऱ्या वृत्तीशीच डॉ० केतकरांच्या रंजनेच्या पात्राचे जास्त साम्य आहे. डॉ० केतकरांनी या कल्पनेचा केवळ शास्त्रीय अर्थ मात्र दाखवला आहे, एवढेच त्यांचे वैशिष्ट्य. या वैशिष्ट्यामुळे एक सुपरिणाम म्हणजे आता मराठीत या विषयावर हीच शास्त्रशुद्ध विचारसरणी पक्की झालेली आहे.

रंजनेचे पात्र कथानकाच्या गतीला चालना देणारे नसले, वस्तुतः कथानकात तिचे काहीच प्रयोजन नसले, तरी कादंबरीच्या वातावरणाला तिच्यामुळे जो उठाव

मिळतो तो अप्रतिम आहे. कादंबरीच्या सर्व तंत्रमंत्रांना बाजूला टाकून मनोविश्लेषणाच्या विलक्षण शक्तीने डॉ० केतकरांनी जे अभिनव स्वयंभू लालित्य निर्माण करून कादंबरीची कक्षाच फार व्यापक करून टाकली आहे, त्या लालित्याचे सर्वांत उत्कृष्ट उदाहरण म्हणजे उपपात्रांच्या अनुपम मार्दवामुळे व आत्यंतिक समंजसपणामुळे मानवी सौहार्दाचे उत्कृष्ट दर्शन घडविणे. हे लालित्य बहुधा स्त्रीपुरुषसंबंधाला चिकटलेले असते. प्रेमाच्या सायुज्यतेचा प्रश्न आला की डॉ० केतकर रुक्ष राहात नाहीत. ते स्वप्नदर्शी होतात; आणि तिथे त्यांच्या कथनाला विलक्षण रंग चढतो. रंजनेचे पात्र हे असेच एक उपपात्र आहे. रुक्मिणीसारखेच पण दुसऱ्या तऱ्हेचे. परमलीन व परम शालीन, कलाप्रवीणा अशी ही रंजना इतकी चांगली का? तर ती खरीखुरी स्त्री आहे. जन्मभर प्रियकरावर निस्वार्थ प्रेम करण्याची शक्ती तिच्यात आहे. रंजनेपुढे कादंबरीतली सर्व स्त्रीपात्रे तर फिक्की पडतातच, पण पर्यायाने डॉ० तर्कट्यां-सारख्या तल्लख बुद्धीच्या पुरुषाचे कर्तृत्व तिच्या सौहार्दापुढे व सौंदर्यदृष्टीपुढे गौण भासते. वस्तुतः हे पात्र नसते तर कादंबरीतल्या घडामोडीत कोणतीच उणीव दिसली नसती. पण यदृच्छया रंजनेचे पात्र आले आणि मग या स्वभावसुंदर कलावतीच्या मार्दवामुळे कादंबरीला अपूर्व उजळा मिळाला. ही कादंबरी केवळ वास्तववादी व रुक्षही झाली असती; तिला रंजनेमुळे मोहक, काव्यमय व आनंदी वातावरण लाभले. किंबहुना रंजना नसती, तर 'तर्कटनीती'तला बौद्धिक गाभाही प्रत्ययकारी ठरला नसता. रंजना होती म्हणून तर्कटे हे तर्कटे म्हणून राहिले व कार्यक्षम झाले.

वेश्याव्यवसायाची चर्चा दोन प्रकारे डॉ० केतकरांनी या कादंबरीत दोन पात्रांकरवी केलेली आहे. ती पात्रे म्हणजे रंगूबाई ऊर्फ रंजिता व तिची मुलगी मंजुळा. ही पात्रे परस्परविरोधी आहेत. मायलेकींच्या परस्परविरोधी जोड्या डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांत दोन आहेत व दोन्ही ठिकाणी विरोधाभासाने फार परिणाम साधलेला आहे. 'ब्राह्मणकन्ये'तली मंजुळा मास्तरीण व शांताबाई डग्गे ही एक जोडी; आणि रंजिता व मंजुळा ही दुसरी जोडी. रंगूबाई गतानुगतिक पण उच्च अभिरुचीची व प्रतिष्ठित गायिका आहे. या दोघी मायलेकींची आयुष्यातली मुख्य धडपड वस्तुतः एकाच उद्दिष्टाने झालेली आहे. ती म्हणजे वेश्यावृत्तीपासून स्वतःचा बचाव करून कलेच्या व विद्येच्या द्वारा व विवाहाच्या योगाने स्वतःला समाजात काही-तरी प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून घेणे. या कादंबरीत रंजनेचे उद्दिष्ट अगोदरच सफल झालेले दाखवले आहे; त्यामुळे ती शांत व तृप्त आहे. पण मंजुळा मात्र धडपडताना दाखवली आहे. साध्यप्राप्तीमुळे रंजनेचा गौरव होतो व तो गौरव अनाठायी नाही हे एका लहानशा रंगच्छटेनेच केतकर दाखवतात. पण तिची मुलगी ही मात्र समकालीन विद्याविभूषित उच्चवर्णीय तरुणींप्रमाणेच संभ्रमात आहे. पण कालिंदीप्रमाणे मंजुळा कुळहीनत्वामुळे विवाहाच्या बाबतीत सतत पराभूत झालेली दिसते. वास्तविक रंजना

## सामान्याकडून असामान्याकडे

डॉ० केतकरांच्या कादंबऱ्याचे तंत्र आणि विचारांची प्रगती ही दोन्ही पहिल्या कृतीतून दुसऱ्या कृतीत उतरतात. नंतर त्या दुसऱ्या कादंबरीतला गौण असलेला मुद्दा पुढच्या कादंबरीचा मुख्य विषय ते करतात, हे आतापर्यंतच्या त्यांच्या कादंबऱ्यांच्या विवेचनावरून सहज लक्षात येते. या पद्धतीतूनच 'ब्राह्मणकन्ये'चा 'विचक्षणे'शी दुवा जुळला आहे. तो काही अंशी पूरक विचारांत आणि हालचालींत दिसून येतो. उदाहरणार्थ, 'ब्राह्मणकन्ये'चे कथानक अस्वाभाविक परिस्थितीवर आधारलेले आहे, तर त्याच्या अगदी उलट स्थिती 'विचक्षणे'त आहे. या कादंबरीतही सर्व प्रसंग आणि वातावरण हे समाजात सर्व ठिकाणी अत्यंत सामान्य स्वरूपात व्यक्त होणारे आहेत. 'ब्राह्मणकन्ये'त असाधारण व्यक्तीतला सामान्यपणा सर्वांस परिचित अशा मानवी भावनांतून निर्माण झाल्यामुळे ती हृदयंगम झाली आहे. 'विचक्षणे'त विचारांची दिशा सामान्यातून असामान्य कल्पनांकडे वळलेली दिसते. अधिक समर्पक शब्दांत सांगायचे झाल्यास तत्कालीन समाजस्थितीचा दुवा तेव्हा केवळ अंधुकपणे दिसत असलेला पण भविष्यकाळाशी अचूक जुळलेला असा दाखविला आहे. त्यामुळे ही कादंबरी जरी हृदयंगम नसली तरी भविष्याच्या निदानामुळे अधिक वस्तुनिष्ठ झाली आहे. 'ब्राह्मणकन्ये'तील परिस्थिती त्या काळाला शोभेशीच होती. अप्पासाहेब डग्ग्यांचे सुधारक असूनही अत्यंत कनवाळुपणाने जे चित्रण केले आहे, ते मुख्यतः त्यांचे परममित्र कै० प्रो० भाऊसाहेब नगरकर यांच्या काही विचारांवरून आणि आयुष्यातल्या मोजक्या प्रसंगांवरून सहज दिसून येते. १८९७-९८ च्या सुमारास केशवचंद्र सेनांचे प्रथमतः जे चरित्र संदर्भ दिले आहेत, त्यावरूनदेखील हे कळून येते. नगरकरांच्या ज्यू बाईशी झालेल्या विवाहाचा उल्लेख एस्तेर आणि सत्यव्रत, क्रमलिंदी आणि बेंजमिन यांच्या विवाहाच्या तरफदारीत नमूद केला आहे. त्यामुळे वरील विधानास पुष्टी मिळते. अशा उल्लेखांमुळे कादंबरीत तत्कालीन वातावरण विषयाशी एकजीव झाल्यासारखे वाटते. याच्या उलट 'विचक्षणे'त १९३७ सालचे चित्र जरी दिले असले, तरीदेखील, त्यातल्या विचारांचा प्रत्यय आज जेवढा येतो, तेवढा कादंबरीच्या कालातसुद्धा येत नाही, हे मागे केलेल्या ऊहापोहावरून सहज कळून येते.

पूरक मुद्द्याचे उदाहरण, कालिंदीच्या आर्थिक कुचंबणेचे; विचक्षणेच्या खरोखरीच्या आर्थिक ओढघस्तीच्या चित्रणावरून दिसून येते.

## वहिणींचे द्वंद्व

दोन वहिणींच्या विरुद्ध स्वरूपाचे आणि प्रवृत्तींचे उदाहरण 'गावसासू'त

आलेलेच आहे. पण या कादंबरीत तो विशेष ठळकपणाने जाणवतो. विचक्षणा आणि मधुमालती या दोघी जीवनात विरोधी पण आयुष्याच्या दैवकथेत एकमेकींस पूरक अशा आहेत. या त्यांच्या वैशिष्ट्यामुळे कादंबरीस कलंकशोभा न येता उलट तिच्यातली माणुसकी खोल प्रकारची झाली आहे. हा डॉ० केतकरांच्या मार्मिक पण संस्कारी उपरोधाचा उत्कृष्ट नमुना आहे. ‘विचक्षणे’च्या बहिणींचे जे चित्र आहे त्याच्याशी विरोधवृत्तीत साम्य असलेले भगिनीद्वय डॉ. केतकरांच्या आधी हरिभाऊ आपट्यांनी ‘कालकूट’ या कादंबरीत कमलसुंदरी व विमलसुंदरी या पृथ्वीराज चव्हाण आणि जयचंद राठोड यांच्या आयांच्या चरित्रात रेखाटले आहे. चार्लस डिकन्सने पण ‘मार्टिन चझलविट’ या कादंबरीत चेरी व मेरी या दोन बहिणींचे जे चित्र दिले आहे ते बहुधा या कल्पनेतूनच उगम पावले असावे. हॉल केन या आयरिश कादंबरी-काराने पण ‘दि ख्रिश्चियन’ या कादंबरीत अशीच एक बहिणींची जोडी दिलेली आहे. जागतिक वाङ्मयातले हे सर्व काळी दिसणारे अविभाज्य अंधेरा-उजेडाचे मानसशास्त्रीय व नैतिक तत्त्व गमतीचे आहे, तितकेच ते खोल व गूढ पण आहे. डॉ० केतकरांनी या प्रचाराला ‘द्वंद्व’ हे जे नाव दिले आहे ते अत्यंत समर्पक आहे. त्यात जोडी व विरोध दोन्ही दिसून येतात. हा शब्द डॉ० केतकरांनी संस्कृतात त्या शब्दाचे जे अर्थ आहेत, अगदी तंतोतंत त्यांच्यावरून उचलला आहे. या अशा तंत्राने कादंबरीकाराला स्वभावाची आणि कथानकाची गुंतागुंत निर्माण करता येते; आणि अगदी त्याच तंत्राने त्या गुंतागुंतीची उकल पण सहज करता येते. दोन व्यक्तींच्या मानसिक विरोधाचे अगर द्वंद्वाचे हे विश्वमान्य तंत्र डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांत वेळोवेळी दिसून येत असता त्यांच्या कादंबऱ्यांना ‘तंत्रहीन’ म्हणणे कसे बरे न्याय्य दिसेल? एकदम पाहिल्या म्हणजे डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या जरी मुलखावेगळ्या वाटल्या तरी त्यात ही अशी उदाहरणे आढळून येतात. पहिल्याने जरी असे लेखन अगदी मामुली व टाकाऊ वाटले, तरी समन्वयाच्या दृष्टीने पाहिले, तर त्यांचा जागतिक विचारांशी आणि मानवी कृतींशी व्यवस्थित मेळ बसतो.

स्थळप्रत
४४०९९ दि. १।६।९१
१८३२ नों. दि. २६।१२।९०

सात

# भटक्या

'भटक्या' ही डॉ० केतकरांची शेवटली, सर्वांत लहान कादंबरी आहे. अपूर्ण पण हीच राहिली आहे. ही एका खाजगी नोकरीतल्या कारकुनाची कहाणी आहे. वास्तविक गरीब, प्रवाहपतित पण सालस अशा कारकुनांच्या गोष्टी हरिभाऊ आपट्यांनी केव्हाच लोकप्रिय करून टाकल्या होत्या. समाजाला त्यांनी सुखी आणि विभक्त कुटुंबाचा आदर्श दाखविला. हे त्यांचे वैशिष्ट्य कबूल करून डॉ० केतकरांनी आपल्या 'भटक्या'च्या कहाणीत त्याचे दोन्ही वेळचे संसार सुखपूर्ण दाखविले आहेत. त्यांनी हरिभाऊंच्या 'मंत्रा'त जरासुद्धा बदल केलेला नाही. तरी पण डॉ० केतकरांच्या नजरेतून १९३६ सालापर्यंतची, उत्तरोत्तर परिस्थितीच्या भोवऱ्यातून गटंगळ्या खात जाणारी, अल्पशिक्षितांची भलीमोठी रांग सुटली नाही. अगदी चेपल्या जाणाऱ्या लोकांमधली दर दिवशी वाढीस लागलेली आत्मप्रत्ययाची जाणीव त्यांना मनोमन पटली. कारकुनासारख्या, आणि त्यातल्या त्यात हरघडीला नोकरीधंद्याची धरसोड करणाऱ्या दरिद्री भटक्याचे हे चित्र घेण्यालायक चित्र आहे. भटक्याची अंतिम इच्छा हरिभाऊंच्या कारकुनांप्रमाणेच आपला चिमुकला संसार सुखा-समाधानाने चालविण्याचीच आहे आणि यातच भटक्याच्या धडपडीच्या मागचे सगळे चैतन्य आहे. सगळ्या आपत्ती, सगळे कडू अनुभव बुद्धिपुरस्सर या अगदी सामान्य माणसाने आपल्या आकांक्षेसाठी खतपाण्यासारखे वापरले. आणि तीन तपांनंतर त्याच्या पदरी स्थिर आयुष्याचे इच्छित फळ पडले. हीच त्याच्या आयुष्याची

पूर्तता, हाच त्याच्या आतापर्यंतच्या आयुष्याचा शेवट. हे सत्य भटक्याच्याच तोंडून डॉ० केतकरांनी वदवले आहे. त्याचे लग्न होते, त्याच प्रकरणी जर कादंबरीचा शेवट केला असता, तर कादंबरी अगदी निखोड झाली असती. शेवटल्या प्रकरणातली हकिगत ('स्वातंत्र्ययुद्धात माझा भाग') खरोखरच लादल्यासारखी व कादंबरीची रसहानी करणारी आहे. बाकी डॉ० बैसासांचे कथानक, त्यांचे संस्थानातील पूर्वायुष्य वगैरे हकिकती भटक्याच्या जीवनाशी एकरूप होणाऱ्या नसल्या तरी सुसंगत आहेत. कुठे न चिकटता पुढे पुढे दैवगतीने वाहात जाणाऱ्या त्याच्या जीवितक्रमात, काय वाटेल ते त्याला पदरात पाडून घ्यावे लागे. झेपेनासे झाले म्हणजे तितक्याच निःस्पृहपणाने तो ती माणसे, ते कार्य सोडी आणि दुसऱ्याच कार्यक्रमात मग्न होऊन जाई. अशा या स्वयंपूर्ण पण प्रवाहपतित कारकुनाचे जे चित्र डॉ० केतकरांनी मांडले आहे, ते उत्तरोत्तर अधिक लोकप्रिय होत जाईल. कारण आता मध्यम स्थितीतल्या अल्पशिक्षितांच्या कर्तृत्वाला भटक्यासारखीच नवीनवी क्षितिजे खुली होत आहेत. चतकोर भाकरीसाठी भयंकर धडपड करावी लागणार आहे. स्पर्धा जीव घेण्याइतकी वाढणार आहे. कुठल्याही मार्गाने जा, आयुष्याला स्थिरपणा येणार नाही. एका जागी मनुष्य राहिला, तरीदेखील त्याला त्याच जागी, भटक्याचे अनुभव वेळोवेळी येतील. आम्हांला भटक्या जसा सर्वांत जवळचा वाटतो; तसे डॉ० केतकरांचे दुसरे पात्र वाटत नाही. हल्लीच्या लघुकथांत कारकुनी जीवनाचेच सर्व बाजू लक्षात घेऊन उत्कृष्ट चित्रण केले जात आहे. पण त्यात डॉ० केतकरांच्या भटक्यातला रसरशीतपणा तेवढा नाही. तपशिलात मात्र अभिनंदनीय भर पडली आहे. अशी ही चमकदार कहाणी आहे. 'अवनायक' (non-hero) कादंबरींचे हे एक स्वयंस्फूर्त उदाहरण आहे.

आणि शेवटल्या प्रकरणावरून पाहाता ती अपूर्ण ठेवण्यात दैवानेही डॉ० केतकरांना साहाय्यच केले आहे. मृत्यूमुळे अपूर्ण राहिल्यामुळेच कादंबरीच्या कथानकाला जिथे पाहिजे तिथेच पायबंद बसला. ज्या राजकारणाच्या चर्चेत डॉ० केतकर उत्तरोत्तर बसरत चालले होते, त्या चर्चेला सुरुवात अशी याच प्रकरणात होत होती. आणि दैवाची खैर म्हणूनच हे पुस्तक अपूर्ण राहिले. हरिभाऊंचा 'कर्मयोग' अपूर्ण राहिल्याने जितकी हळहळ वाचकाला वाटते, तितकाच समाधानाचा सुस्कारा 'भटक्या'चा वाचक शेवटी टाकतो.

## 'भटक्या' हे आत्मचरित्र : एक भ्रम

'भटक्या'च्या अंतरंगाची चर्चा करण्यापूर्वी एक भ्रम डॉ० केतकरांच्या काही जुन्या स्नेह्यांच्याही मनात वागताना मला दिसून आला, तीच भोळी समजत माझीसुद्धा हे पुस्तक वाचून झाली होती. ती ही की हे डॉ० केतकरांचेच आत्मचरित्र

आहे. डॉ० केतकरांच्या जवळ आत्मचरित्रातील धागे आपल्या सर्व तऱ्हेच्या लेखनात वापरण्याचे कौशल्य अजब आहे. पण देवीदास, लेंढे किंवा घैसास जितके 'डॉ० केतकर' आहेत, तितका 'भटक्या' नाही. आपले व्यक्तिमत्त्व आपल्या जनकापासून जितके सारखे तितकेच संपूर्ण स्वतंत्र ठेवण्यात 'भटक्या'ने मिळवलेले यश अवर्णनीय आहे. या पुस्तकावर डॉ० केतकरांचे जे उभे बाहेर जातावेळच्या पोशाखातले, मिस्किल हास्य असलेले चित्र दिले आहे, त्यानेच 'भटक्या' हे नाव डॉ० केतकरांनीच या कथारूप आमचरित्राला दिले आहे, असा भास होतो. आणि श्रीधर व्यंकटेश केतकर हा एक कादंबरीकार आहे, याचा प्रथमदर्शनी वाचकाला विसर पडतो.

## किशोरावस्थेचे चित्रण

या कादंबरीतले मुख्य आकर्षण म्हणजे भटक्याच्या कोकणातील विद्यार्थीदशेचे वर्णन. यातल्या सर्व किशोरभावांचे वर्णन हे स्वतः डॉ० केतकरांच्या त्या वयातल्या मानसिक स्थितीचे द्योतक आहे; जशी 'मी'मधल्या भाऊरावाचे बाल्य हरिभाऊंच्या शैशवाची अखंड वाङ्मयीन स्मृती आहे. डॉ० केतकरांनी आपल्या जीवनाच्या व विचारांच्या कणिका आपल्या लेखनात स्वच्छंद पेरून ठेवल्या आहेत. त्या सर्वांचा विचार आपण आतापर्यंत केलेलाच आहे. पण त्या सर्व क्षणांपैकी अमर क्षण हा भटक्याचे 'बाल्य व तारुण्य' हे प्रकरण आहे. या बाबतीत त्याचे डॉ० केतकरांचे हरिभाऊंशी त्याचप्रमाणे 'श्याम'च्या साऩ्यांशी फार जवळचे नाते आहे. परंतु साऩ्यांच्या श्यामप्रमाणे भटक्या हट्टी असला तरी गरीब व हळवा नाही. देशावरच्या 'मी'चा व्रात्यपणा, हूडपणा यात आहेच; पण नीतीच्या बंधनांना मनोमन जपणारा असा हा भटक्या आहे. ज्यांना घरचे बंधन नाही, आईबापांचे पोटभर प्रेम नाही, अखंड दारिद्र्याची धास्ती उरावर बाळपणापासून बसलेलीच आहे, अशा बुद्धिवान आणि अहंकारी पण आनंदी तरुणाचे हे चित्र आहे. भटक्याची लहान पोराप्रमाणे 'सर्वसंग्राहक' वृत्ती जन्मभर टिकून राहिली आहे. मध्यम स्थितीतल्या लहान पोरांप्रमाणेच तो अल्पसंतुष्ट आहे, आणि त्या मुलांप्रमाणेच आपण मोठे व्हायचे, ही कल्पना पण तो अहर्निश हृदयाशी बाळगून आहे. या कल्पनेनेच त्याला उदारचरित आणि पापभीरू बनवले. अगदी सामान्य माणसाला जोपासता येईल इतकी निर्भर देशभक्ती त्याच्या मनात सतत तेवते आहे. त्याचे जीवन म्हणजे एक प्रयोगपरंपराच आहे.

अशा या प्रेरणेने भरलेल्या किशोरावस्थेचे वर्णन जे डॉ० केतकरांनी थोडक्यात केले आहे ते मननीय आहे. ते त्यांच्याच शब्दांत सांगितलेले बरे. "नवमतवादी तरुणांनो, तुम्हांला आमच्या गोष्टी आम्ही सांगाव्यात कीं सांगू नयेत असे प्रश्न माझ्यापुढें उभे रहात आहेत. कारण ज्या गोष्टी आमच्या आयुष्यांत आम्ही गौरवा-

स्पद समजतो, त्या तुम्ही केवळ मूर्खपणाच्या समजाल.—समजा ना! आम्हांला त्याचें काय? निंदा किंवा स्तुति एवढ्या दृष्टीनें मी कथन करीत नाहीं. आयुष्यक्रमाची विविधता लक्षांत यावी, आमच्या समकालिनांच्या सामाजिक स्थितीची चित्रणा पुरी व्हावी, एवढीच माझी मुख्य मनीषा आहे. वाचकहो! दुरभिमान सोडा, आमच्या-सारख्याचें चरित्र निरीक्षा, म्हणजे तुम्ही खात्रीनें कांहीं तरी शिकाल. एवढेंच नव्हे, तर आपल्या तरुण मंडळींच्या भवितव्याविषयीं अधिक आशामय वृत्ति बाळगाल यांत शंका नाहीं." (पृष्ठ २) आता पुढे पाहा : "नऊ वर्षांपासून सतराव्याअठराव्या वर्षांपर्यंत ज्या ज्या गोष्टी आमच्यापर्यंत पोहोचत असत, त्या त्या गोष्टींनीं माझ्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होत असे. आमच्या भावना जागृत व्हावयाच्या म्हणजे दोन क्षेत्रांत व्हावयाच्या. देशभक्ती व प्रेम हे आमचे विषय अगदीं लहानपणापासून होते. मी नऊदहा वर्षांचा असतानाच पुरा देशभक्त बनलों होतों. आमच्या जवळच्या अनेक गांवांत जीं कोकणस्थ ब्राह्मणांचीं घरें होतीं, त्यांतील बहुतेक घराण्यांतील मंडळी पेशवाईच्या काळांत आमचा अमुक पूर्वज उदयास आला, अमूक लढाई त्यानें मारली, अशा गोष्टी बोलतांना ऐकूं येत असत. आणि त्यामुळें आमचा देशाभिमान हा ऐतिहासिकतेवर आधारलेला होता. प्रेमभावना काय, तारुण्य पक्कें स्थापित झालें असतांनाच जागृत होतात काय? तसें समजत असाल तर चुकाल! प्रेमभावनाच काय पण लैंगिक भावनादेखील तेराचौदाव्या वर्षांच्या वयात जागृत होतात. या वेळेस ज्या भोवतालच्या मुली प्रेमाचा विषय होतात, त्या आठदहा वर्षांच्या परकऱ्या पोरीच कशा असतील? माझ्या मनांत प्रेमभावना ज्या मुलींविषयीं किंवा स्त्रियांविषयीं उत्पन्न होत त्या स्त्रिया अल्पवयांच्या पोरी नव्हत्याच तर बहुतेक संप्राप्तयौवना असत. त्यांत सर्वच अविवाहित असत असें नाही...माझ्या शेजारची गोदू व मंजुळा या दोघी माझ्या विचारांचा विषय झाल्या. त्या वेळेस जे प्रौढ विवाहांचे पुरस्कर्ते होते त्यांचा मला संताप येत असे. माझ्या काकांनी चौदाव्या वर्षीच माझें लग्न गोदूपाशीं करून टाकावें असें मला वाटे. (पृष्ठ ४५) ..."खरोखरच म्हणाल तर आमच्यापैकीं बऱ्याच जणांचें अभ्यासावरील लक्ष उडालें होतें. ज्या लोकांना इंग्रजी राज्य आलें, हीच गोष्ट चांगली झाली, असें वाटत होतें, त्यांच्याकडून जसा झटून अभ्यास होत असे किंवा सरकारी नोकरी एकनिष्ठपणानें होत असे, त्याप्रमाणें या राज्याविषयीं प्रेमभाव नसणाऱ्या मंडळींत राजकर्त्यांशी सहकारिता करण्याची भावना कोठून उत्पन्न होणार? इतरांच्या मनावर या परिस्थितीचा परिणाम काय झाला असेल तो पूर्णपणें सांगतां येत नाहीं, माझ्या मनावर परिणाम झाला तो असा कीं, ज्यास जगांत मोठेपणा आहे, तो मिळविण्या-विषयीचा उल्हासच निघून गेला होता. सरकारी नोकरी जर करावयाची झालीच तर आपद्धर्म म्हणून करावयाची, ती गोष्ट सन्मानाची म्हणून नव्हे." (पृष्ठ ९)

१५८२६

डॉ० केतकर म्हणतात त्याप्रमाणे अनुभव गेल्या पन्नासपाऊणशे वर्षांत महाराष्ट्रात आपल्यापैकी कुणाला बरे आले नसतील ?

या दृष्टीने पाहिल्यास भटक्यास वाण्याच्या दुकानात, डॉ० घैसासांच्या घरी, वर्तमानपत्राच्या कचेरीत, आणि शेवटी रावबहादुरांच्या घरी जे जे विलक्षण अनुभव आले, ते ते सगळे धक्के अस्थिर आयुष्याच्या सामान्य माणसासच खावे लागणारे आणि जिंकावे लागणारे आहेत. त्यांपैकी बरेचसे धक्के तुम्हीआम्ही खाल्लेलेच आहेत. असो.

## वैचित्र्य व गांभीर्य

डॉ० केतकरांचा वाटेल ते आख्यान कादंबरीत हवे तिथे आणून घालण्याचा सोस या चिमुकल्या कादंबरीतही स्पष्टपणे दिसून येतो. विठू घोमणाच्या रूपाने केलेली गुन्हेगारीची सहृदय चिकित्सा, आणि पोलिसखात्याच्या ' लायकी 'बद्दलच्या कल्पनांची मिस्किलपणे केलेली छाननी मजेदार आहे. पण डॉ० घैसासांची हकिगत, म्युनिसि-पालिटीवरील (म्हणजेच सार्वजनिक स्वच्छतेवर) व्याख्यान आणि संस्थानी नीतीची चिकित्सा तर्कशुद्ध असली तरी कादंबरीत कंटाळवाणी होतात. चंदुशास्त्र्याचे आख्यान (म्हणजेच स्थानिक निवडणुकींचे तंत्र) असेच उपरे वाटते. ही प्रकरणे डॉ० केतकरांनी ' विद्यासेवका 'त ' अज्ञात ' या टोपणनावाने त्या काळच्या पुण्याच्या म्युनिसिपालिटीवर आणि राजकारणावर खरमरीत टीका म्हणून वेगळीच प्रसिद्ध केली होती. वास्तविक ती सुटीसुटीच होती. तेच तुकडे त्यांनी या कादंबरीत गोवून टाकले आहेत. त्यामुळे विषयाचे वैचित्र्य व गांभीर्य वाढले; पण मनोरंजन कमी झाले.

अशी ही गांभीर्य, कारुण्य, औपरोधिक विनोद व तांत्रिक अस्ताव्यस्तपणा यांनी आकंठ भरलेली भटक्याची कहाणी आहे.

' भटक्या ' ही कादंबरी डॉ० केतकरांच्या ' आशावादी ', ' विचक्षणा ' या कादंबऱ्यांशी मिळतीजुळती आहे. ' गोंडवनातील प्रियंवदा ', ' परागंदा ', ' गांवसासू ' व ' ब्राह्मणकन्या ' या कादंबऱ्या डॉ० केतकरांच्या समाजशास्त्रीय वैशिष्ट्याने भरलेल्या असल्या, तरी हा गट कथानकाच्या कल्पनेने अधिक बांधलेला आहे. कथानकाला व व्यक्तींना उठाव देऊन त्यांच्या अनुषंगानेच समाजशास्त्रीय चर्चा विशिष्ट काळी व स्थळी करण्याची या गटातल्या कादंबऱ्यांची लकब याही कादंबरीत आढळते. परंतु तरीही इथे वर उल्लेखिलेली अनेक उपरी प्रकरणे पाहिली की कित्येक समकालीन घटनांना, प्रसंगांना व व्यक्तींना कादंबरीत गोवण्यासाठीच समाजशास्त्रीय तंत्राचा वापर केलेला आहे हे पटते. ' ब्राह्मणकन्ये 'तले वैजनाथशास्त्री, ' परागंदा 'तले डॉ० सरंजामे व डॉ० गोगटे, ' आशावादी 'तले डॉ० तर्कटे हे समाजनिरीक्षक दाखवलेले आहेत. परंतु तर्कट्यांइतकेच डॉ० घैसासांचे पात्रही या

कादंबरीत उपरे आहे. इथेही ज्याप्रमाणे रंजनेच्या मुळे तर्कस्थांना कादंबरीत स्थान उत्पन्न झाले त्याप्रमाणेच नर्मदाबाईमुळेच डॉ० घैसासांना स्थान मिळालेले आहे.

### एक हृद्य कहाणी

नर्मदाबाईची हकिगत ही एक हृद्य कहाणी आहे. 'नर्मदाबाई सरवटे' हे प्रकरण नुसते सुटेच वाचले तर ती एक प्रकारची लघुकथाच भासते; व तशी पाहिली तर ही कथा खरोखरच सुरेख आहे. नर्मदाबाई आपली हकिगत डॉ० सरवट्यांस सांगताहेत असा या कथेचा बराचसा भाग आहे. नर्मदाबाई परित्यक्ता नर्स होत्या. त्यांच्या नवऱ्याने जबलपुरास एका विधवा मास्तरणीशी संबंध ठेवला होता. एकदा तिची खरडपट्टी काढायला नर्मदाबाई तिच्याकडे गेल्या; व प्रथम संतापाच्या भरात हवे ते बोलण्यास सुरुवात केली; पण लक्ष्मीबाईने थंडपणे सांगितले की, "तुमचे यजमान आपणहून माझ्याकडे येतात त्याला माझा इलाज नाही. त्यांना कुटुंब पोसण्याचें सामर्थ्य नाहीं तेव्हां तुम्ही थोडेसे पैसे त्यांना पाठवावे" इत्यादी. हे ऐकून नर्मदाबाई सर्द झाली. तिथे लक्ष्मीबाईने स्वच्छ सांगितले की, "हिंदूंत दोन लग्नं करण्याची पद्धत असल्यानें मी तसें करीन. तुम्ही शाळाखात्यांत माझ्याविरुद्ध तक्रार करून काय साधणार? उलट फजीत मात्र व्हाल."

लक्ष्मीबाईच्या आईनेही लेकीची कड घेतली खरी, पण नर्मदाबाईला सहानुभूती दाखविली. आणि तिचे लहानपणी लग्न झाल्यामुळे मनोहरपंतांना केवळ बायको मिळाली. त्यांची प्रवृत्ती धन मिळवण्याची नाही. सर्वच पुरुष पैसे मिळवणारे नसतात; आणि जे पैसे मिळवणारे असतात त्यांच्या बायका सुखाने संसार करतात असे नव्हे. तेव्हा अशा नवऱ्याला कमावती बायको एक प्रकारे ऐदी व्हायलाच उत्तेजन देते. अशा बायकोने मुकाट्याने त्याला थोडे पैसे पाठवावे. त्याला तिने स्वतःजवळ संसार करण्यास भाग पाडले तर तिला भटका नवरा पोसावा लागेल व तसे करणे ऐपतीबाहेरचे होईल. इत्यादी. हे एकून या स्त्रीच्या व्यवहारी ज्ञानाचा नर्मदाबाईला फार अचंबा वाटला व तिचे म्हणणे रास्त वाटले. नवऱ्याजवळ पोटगीखर्च मागायला निघालेली ही स्त्री अखेर सवतीशी 'तहनामा' करून नवऱ्याला निमूटपणे पैसे पाठवू लागते. पुढे लक्ष्मीबाईचा त्याच्याशी पुनर्विवाह होतो आणि काही वर्षांनी ती मरते. मनोहरपंत संन्यास घेतात व 'विशिखानंद' नावाने प्रसिद्ध होतात. नर्मदाबाई व डॉ० घैसास यांबद्दल लोक वृथा कंड्या पिकवितातच. हे एक स्वतंत्रच उपाख्यान आहे.

त्याचप्रमाणे दुसरे असेच एक स्वतंत्र प्रकरण 'बटाट्याच्या चाळीतील हकिगत : माझे लग्न' हे असेच लघुकथेत सामावल्यासारखे आहे. बटाट्याच्या चाळीचे सामाजिक स्वरूप रोचक विनोदासकट जर प्रथम कुणी वाङ्मयात आणले असेल ते डॉ० केतकरांनीच. बटाट्याची चाळ म्हणजे मुंबईतील जे अगदी गरीब किंवा

अगदीच गरिबीतून वर आलेले पांढरपेशे असतील त्यांची राहाण्याची, त्याचप्रमाणे त्यांच्या अड्डयांची जागा. इथे अनेक अड्डे असत. काही अड्डयांत यजुर्वेदी मंडळींचा भरणा असे तर काही अड्डयांत कोकणस्थांचा व कऱ्हाड्यांचा भरणा असे. पुण्यासारख्या शहरापेक्षा या चाळीत सोवळेपणा व त्यांच्या दृष्टीने धर्मनिष्ठा अधिक असे हा त्या सामाजिक बैठकीचा पाया.

सार्वजनिक घटनांना 'आशावादी'प्रमाणेच या कादंबरीत प्राधान्य दिले आहे. डॉ० घैसासांकडे भटक्या नोकरीला राहिला. डॉ० घैसास हे एकटेच होते. त्यांचे जीवन संपूर्ण सार्वजनिकच आहे. पण कादंबरीत प्रत्यक्ष डॉ० घैसास कुठेच स्वतः वावरताना दिसत नाहीत. त्यांचे जीवन व विचार भटक्याच्याचकडून वदवले गेले आहेत. विशिष्ट कालखंडाशी बद्ध झालेल्या व सार्वजनिक जीवनावर आधारलेल्या कादंबरीत हा कलेच्या दृष्टीने दुय्यम असणारा भाग अवश्यमेव येणारच. यात समाजेतिहासाला कलेहून प्राधान्य मिळणे अटळ असते.

## आनंदी आणि उद्योगी भटक्या

'भटक्या' कादंबरीतील मुख्य पात्र भटक्याचेच आहे. नवल म्हणजे या गृहस्थाचे नाव कादंबरीकाराने कुठेच सांगितले नाही व वाचकालाही ही उणीव कुठे खटकत नाही. यातला 'मी' इतका खटपटी प्राणी आहे, व त्याच्या आयुष्याची बेसुमार प्रसंगांनी भरलेली हकिगत इतकी चित्तवेधक आहे की ती ऐकताना नायकाच्या नावाची उठाठेव करण्याची गरजच भासत नाही. त्याची जात व त्याचे गाव यांचे प्रयोजन नावापेक्षा अधिक आहे, हे मात्र कादंबरीकाराने वाचकाच्या नीट निदर्शनाला आणून दिले आहे. दुसरे म्हणजे भटक्या हा एक अतिसामान्य म्हणजे नेहमी सर्वत्र दिसणाऱ्या कारकुनाचा नमुना आहे. हंगामी नोकरी व हरकामीपणा यामुळे त्याच्या आयुष्याला गती मिळालेली आहे. मराठी वाङ्मयात कारकुनाचे चित्र हळवे, रडवे व दुबळे आहे. पण या कारकुनी जगापासून त्याला वेगळे ठेवणारे एवढेच नव्हे तर त्याचे व्यक्तिमत्त्व खुलवणारे त्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा आनंदीपणा व उद्योगाची जबरदस्त हाव. परिस्थितीचे तडाखे सहन करण्याची सवय कारकुनांना पडलेलीच असते. पण हा कारकुन नुसता तडाखेच शेवटपर्यंत खात राहिला नाही. त्याला महत्त्वाकांक्षा आहे. देशप्रेम आहे. सभोवारच्या माणसांना नीट पारखण्याची बुद्धी आहे. चिकाटी आहे. धैर्य आहे. याचे शिक्षण जेमतेम मॅट्रिकपर्यंत झाले व पुढे नापासांचे शिक्के लागल्यामुळे तो नोकरी करण्याचे ठरवतो. सर्व तऱ्हेचे दुय्यम दर्जाचे काम त्याला करावे लागते. व्यापाऱ्याच्या मुनिमापासून तो उपसंपादकापर्यंत आणि नंतर निवडणुकांत एजंट म्हणून सगळी कामे त्याने केली. मेसेपोटेमियात तो पहिल्या युद्धात रिक्रूट म्हणून जाऊन आला. आणि यामुळे तो

सार्वजनिक आयुष्यात पुढारीपणाची सारी लक्षणे व इंगिते जाणणारा असा एक महत्त्वाचा इसम बनला. राजकारणातली बिंगे ही माणसे चांगली जाणतात; आणि 'राजकारण' म्हणून जी एक गुंतागुंतीची सामाजिक शक्ती असते, जिच्यामुळे भल्याभल्यांनाही कैफ येतो, त्या शक्तीची सूत्रे हलविण्याचे काम याच दुय्यम चळवळ्या मंडळींमुळे पुष्कळ वेळा होत असते. जिथे कार्यापेक्षा व्यक्तीला, देशापेक्षा वैयक्तिक मोठेपणाला प्राधान्य दिले जाते अशा ज्या घडामोडी दैनंदिन राजकारणात मोठ्या तत्त्वांच्या आणि पुढाऱ्यांच्या नावांनी होत असतात, त्यांचे व्यावहारिक स्वरूप भटक्याच्या जीवनात अत्यंत ढोबळ व भरड शब्दांत चित्रित झाले आहे, कादंबरीचा हा उत्तरार्ध जसा डॉ० केतकरांच्या हयातीत तसाच आजही वादग्रस्त समजला जाण्याचा संभव आहे. दादा कावळे व 'साहित्यशिखर' या स्वरूपात त्या काळच्या वर्तमानपत्री संपादकीय कौशल्याचे व कौटिल्याचे थोडक्यात दिग्दर्शन डॉ० केतकरांनी केले आहे. दादा कावळे हे टोपणनाव, साहित्यशिखर हे बिरुद, दादा कावळे मेल्याची भूमका व नंतर ते जिवंत असल्याची बातमी या घटनांच्या द्वारा वर्तमानपत्रातल्या भडक व खोट्या बातम्यांचे त्यांनी विडंबन केले आहे. 'शार्दूल'कारांच्या रूपात श्री० न० चिं० केळकरांची थोडीशीच छाया अर्थात डॉ० केतकरांना ती जशी भासली तशी आली आहे. 'साहित्यशिखरा'च्या संदर्भात, 'डॉ० केतकरांबद्दल' ते साहित्य परिषदेचे अध्यक्ष झाल्याबद्दल केळकरांनी कसे अनुदार उद्गार काढले त्याचाही उल्लेख भटक्याने केला आहे. शेवटच्या प्रकरणात डॉ० केतकरांनी गांधींच्या राजकारणाच्यासुद्धा रेवड्या उडवल्या आहेत. निर्बुद्धपणाचा शिक्का असलेले गांधींचे राजकारण जाणूनबुजून लोकांना फसवण्याकरता वापरले जात आहे, असा जो उघड आरोप डॉ० केतकरांनी 'व्हिक्टोरिअस इंडिया'त केला आहे, तोच याही प्रकरणात आढळतो.

## प्रश्नांच्या अनुरोधाने आलेली पात्रे

भटक्याच्या पात्राचा परिपोष अशा तऱ्हेने केल्यामुळे बाकीची पात्रे केवळ छायारूप आहेत. व्यवहारात हरघडी नाना तऱ्हेची माणसे, सामान्य व ही असामान्य, आपल्याला भेटतातच. त्यांचे ठसे आपल्या जीवनावर उमटतात. तशीच पात्रे आहेत. पण त्यांच्या इतर कादंबऱ्यांतल्या पात्रांप्रमाणे इथे मात्र भटक्या सोडून कुठल्याही पात्राचे स्वभावविश्लेषण आपल्याला करता येत नाही. कारण ही सर्व माणसे विशिष्ट सामाजिक प्रश्नांच्या अनुरोधानेच अस्तित्वात आलेली आहेत. विधवाविवाहाच्या प्रश्नाच्या निमित्ताने गोदूबाई, परित्यक्तेच्या निमित्ताने नर्मदाबाई, सार्वजनिक आरोग्याच्या निमित्ताने डॉ० वैसास इत्यादी. यात भटक्याचेच काय ते स्थिर पात्र व बाकीची धावती व जुजबी पात्रे आहेत.

# समारोप

## विवेचक कादंबरीचे तत्त्वज्ञान

डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या विवेचक कादंबरीच्या सदरात बसतात, किंबहुना त्यांना 'सामाजिक विचारकथा' हे अभिधान सार्थ होईल, असे मी मागे म्हटलेलेच आहे. डॉ० केतकरांची लेखणी तत्त्वस्पर्शी आहे. सामाजिक घडामोडींच्या आणि व्यक्तींच्या अंतरंगाच्या निरीक्षणातून स्फुरलेले तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्रीय सिद्धांत यांच्या अनुरोधाने 'सामाजिक मना'ची चाचणी ते करीत. त्यांची पात्रे पुष्कळशी प्रतीकात्मक असण्याचे कारण तेच आहे. विशिष्ट व्यक्तिसमूहावरील, संस्थांवरील आणि सामाजिक व धार्मिक पंथांवरील त्यांचे सारासारविवेचन हा त्यांच्या कादंबऱ्यांचा एक महत्त्वाचा भाग आहे. सामाजिक मनाची, म्हणजेच समाजाच्या आकांक्षांची, दुःखाची, सामर्थ्याची आणि दुर्बलतेची चिकित्सा त्यांनी आपल्या वाङ्मयातून सरसहा केली आहे. त्यांच्या विचारांच्या दिशेची ती चाकोरी ठरलेलीच होती. अर्थात त्यांच्या कादंबऱ्या ह्या समग्र वाङ्मयातून बाजूला काढता कशा येतील ? त्या वाङ्मयाच्या चौकटीतलाच एक कोपरा म्हणून त्यांची छाननी केली पाहिजे. विवेचक कादंबऱ्या मराठीत अजूनही थोड्या आहेत. आहेत त्या बऱ्याचशा प्रचारात्मक आहेत. त्यामुळे सामाजिक मूलसिद्धांतांची तपासणी करून समाजाला जागे करण्याकरता जे कथासाहित्य डॉ० केतकरांनी निर्माण केले आहे,

त्याची खरी पारख होण्यासाठी अजूनही थोडा काळ लोटला पाहिजे असे मला वाटते. कारण वाङ्मयीन व सामाजिक मूल्यांची जाणीव ठेवून हेतुप्रधान कथासाहित्य निर्माण करणाऱ्यांचा वर्ग मराठीत थोडा असला तरी वाढतो आहे, हे विसरून चालणार नाही. आणि अशा साहित्याच्या भरपूर वाढीनंतर फिरून डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांचा आढावा घ्यावा लागेल असे मला वाटते.

या बाबतीत अशा लेखनाचे महत्त्व काय आहे, हे दाखविणारे एक स्फुट १९३४ च्या 'प्रतिभे'च्या अंकात 'पिनाकी' यांनी लिहिलेले माझ्या दृष्टीस पडले. आजही ते विचार कामाला येतील असे वाटल्यामुळे मी ते देत आहे. ते असे :

"**कादंबरीकाराची कामगिरी**

'इंग्लिश रिव्ह्यू' मासिकाच्या जानेवारीच्या अंकांत स्टॉर्न जेम्सन या विख्यात इंग्रज कथालेखिकेचा 'कादंबरीकाराची कामगिरी' या मथळ्याखालीं एक अनुभवपूर्ण, सुंदर, विवेचक लेख प्रसिद्ध झाला आहे. या लेखांत भाषासौष्ठव, प्रसंगांचीं मार्मिक वर्णनें, कथानकाचा रेखीवपणा, खुसखुशीत संवाद, हृदय हालवून सोडणारी काव्यात्मता, वाचकाच्या औत्सुक्याला सारखी भरती आणणारें कथनचातुर्य एवढीं असलीं म्हणजे कादंबरी सर्वांगपूर्ण झाली असें मानून जे टीकाकार अशा कादंबरीचा उदो उदो करतात, त्यांच्यावर सडकून टीका केली आहे. लेखिकेचें म्हणणें असें कीं, उत्कृष्ट कादंबरींत हे गुण तर अवश्य पाहिजेतच, पण त्यांबरोबरच त्यांतील पात्रांची प्रत्येक हालचाल, प्रत्येक कृती त्यांच्या अंतर्व्यापारांशी कशी संबद्ध आहे याचें यथातथ्य दर्शन त्याला जर करून देतां आलें नाहीं तर त्याची कारागिरी उच्च दर्जाची आहे असें म्हणणें चुकीचें होईल. श्रेष्ठ कारागीर तोच कीं जो मनुष्याच्या अगोचर सृष्टींत लीलया प्रवेश करून, तेथील सूक्ष्मतर हालचालींचें चित्र आपल्या लेखणीच्या द्वारा शब्दरूपानें गोचर करूं शकतो. हें सामर्थ्य ज्याच्या लेखणींत आहे तोच कथालेखक खरा कारागीर. तो तेवढ्यावरच थांबत नाहीं, तर तो सामाजिक मनाचा बारकाईनें अभ्यास करीत असतो, त्याच्यापुढें असलेल्या जीवनविषयक प्रश्नांचा आस्थापूर्वक विचार करून, त्यांतून मार्ग काढण्यास तो साहाय्यक होत असतो. मार्गदर्शनाचें काम तो अगदीं सफाईनें करतो. या सफाईतच त्याच्या कारागिरीचें वैशिष्ट्य असतें. मनोजरंन करण्याचें काम फारसें कठीण नाहीं; पण समाजाचें हृदय काबीज करून त्याला आपल्या विचारप्रवाहांतून वाहात नेणें यांतच कादंबरीकाराची खरी कामगिरी आहे. दोनचार मनोरंजक व लोकप्रिय कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्याबरोबर 'मनोरंजन करणें हेंच कादंबरीचें ध्येय आहे', 'कादंबरी व्यासपीठ नव्हे, मयूरसिंहासन आहे,' अशी घोषणा करून, स्वतःस सर्वश्रेष्ठ कलावंत समजणाऱ्या कथालेखनपटूंनीं व त्यांचें अंध अनुकरण करणाऱ्या कोवळ्या

बटूंनीं वरील विचारांचें अवश्य मनन करावें." (२६ फेब्रुवारी, १९३४)

## कथानकाचा ओघ

डॉ० केतकरांच्या ठिकाणी कथानकाचा ओघ चालू ठेवण्याचे कसब पहिल्याने जरी यशस्वी कादंबरीकार होण्यास पुरेसे नसले, तरी ते दोन कादंबऱ्यांनंतर त्यांनी प्रयत्नाने कमावलेले दिसून येते. कथानकाच्या गुंफणीत स्वाभाविकपणा आणण्याचे त्यांचे चातुर्य 'पिनाकी' यांनी 'प्रतिभे'च्या १९३४ च्या ता० ५ जानेवारीच्या अंकातल्या, 'डॉ० केतकरांच्या ब्राह्मणकन्येतील एक रहस्य' या लेखात मुद्दाम वर्णन केलेले आहे. त्या लेखातल्या मुद्द्याचा भाग असा : "ते (डॉ० केतकर) मला म्हणाले, 'तुम्हांला माझ्या ब्राह्मणकन्येतील एक रहस्य ठाऊक आहे का?' 'कोणतें तें?' 'ब्राह्मणकन्येंत एके ठिकाणीं मागें विद्यासेवकांत प्रसिद्ध झालेल्या प्रो० माधवराव पटर्धनांच्या सुधारक काव्यावरील टीकालेखनांतील एक भाग जशाचा तसा आला आहे.' 'होय, मग?' 'तो अगदी स्वाभाविकपणें तिथं आला आहे, असं वाटलं असेल तुम्हांला?' डॉक्टर मिस्किलपणे हसत म्हणाले. 'हो बुवा. मला तर तो भाग कथानकाच्या ओघाबरोबर आलेला वाटतो.' 'मग सांगतों तर त्याच्याविषयीची एक गंमत. वाङ्मयिक रहस्य आहे बरं हें! त्याचं असं झालं, ब्राह्मणकन्येचा काही भाग पूर्वी विद्यासेवकात प्रसिद्ध झाला होता. मी जेव्हा कर्नाटक छापखान्याला कादंबरी देऊं लागलों तेव्हा पुन्हा लिहिण्याचे श्रम कोण घेतो म्हणून विद्यासेवकातली पाने फाडून देऊं लागलो. अशाच एका पानाच्या मागे मी प्रो० पटवर्धनाच्या सुधारक काव्यावर टीका केलेला भाग होता. तुम्ही, मी लिहिलेला कवी माधव ज्यूलियन यांचे प्रेमचित्र हा लेख वाचलाच असेल. त्यांतलाच होता हा भाग. छापखान्यांत कादंबरीचा भाग देताना ज्या पानावर हा भाग आला होता तो खोडून टाकण्याचें विस्मरणानें राहून गेलें, आणि झालें असें कीं कादंबरीतील भागाबरोबर हाही मजकूर कंपोज केला गेला. प्रुफें आलीं तेव्हां माझ्या लक्षात ही चूक आली. बाह्यतः अप्रस्तुत असलेला हा मजकूर बराच होता, आणि तो खोडून टाकणें म्हणजे छापखानेवाल्याच्या दृष्टीनें नुकसानीचें होतें. शिवाय बिचाऱ्या कंपॉझिटरला धन्याकडून या प्रमादाबद्दल बोलणीं खावीं लागलीं असतीं, तें वेगळेंच. तेव्हा मनांत असा विचार आला कीं ही चूक सावरून घेऊन मुद्रकाला खर्चांतून व कंपोझिटरला धन्याच्या इतराजींतून सांवरून घेतां नाहीं का येणार? मग मी असें केलें कीं कादंबरीतील मजकुरांत तो प्रस्तुतच करावा याकरितां आरंभीं व अंतीं एकदोन ओळींचा मजकूर अधिक घालून तो भाग तसाच राहू दिला व मी प्रुफें छापखान्यांत नेऊन दिलीं...' 'भले, खूप आहे बुवा तुमचं डोकं!' आम्ही दोघेही पोट धरधरून हसलो."

## प्रेमरहस्यावर मार्मिक टीका

डॉ० केतकरांच्या कादंबऱ्यांत प्रेम हा प्रधान विषय कधीच नसला, तरीदेखील प्रेमरहस्यावर मार्मिक टीका त्यांनी वेळोवेळी केली आहे. पहिल्या दोन कादंबऱ्या तर तीन जोडप्यांवरच लिहिलेल्या. 'आशावादी'त स्वामी ब्रह्मगिरी यांची आपल्यापासून कायमचीच अशी दुरावलेल्या बालपत्नीबद्दलची ओढ, तिच्या दर्शनाच्या उत्कट भासामुळे त्यांचा नैतिक अधःपातापासून झालेला बचाव, 'ब्राह्मणकन्ये'त प्रेमाला भुललेल्या पण खोट्या कल्पनांना बळी पडलेल्या कालिंदीचे रामरावाबद्दलचे खरे प्रेम, रंजनेचे डॉ० तर्कस्यांवर असलेले केवळ दिव्यच असे प्रेम, ही सर्व डोळ्यांत भरण्यासारखी उदाहरणे आहेत. परंतु समाजाची दुःखे व ती दूर करण्याचा उपाय हा मात्र त्यांच्या एकूण एक कादंबरीचा जणू प्राणच आहे. प्रेमाबद्दल डॉ० केतकरांची वृत्ती त्यांच्या 'बाळे कोहिनूर' या कवितेतल्या एका ओळीत सूत्ररूपाने व्यक्त झालेली दिसते. ती ओळ अशी : 'प्रेम न मार्मिकता प्रेमाची अनिच्छ मज आकर्षी'. त्यांचे भावना व विचार यांच्या मागीलसुद्धा असणाऱ्या प्रेरणेचा त्यांच्या एकंदर मनोवृत्तीवर विलक्षण प्रभाव पडलेला दिसतो. आणि त्यामुळे प्रेमाचा आविष्कार या प्रेरणेच्या साहाय्याने ते पुष्कळदा काहीशा रुक्ष भाषेतही करू शकतात. प्रेमविषयक भाषेबद्दल त्यांचे मत 'माधव ज्यूलियनचे प्रेमचित्र' या टीकेत विशद झाले आहे. त्याबद्दल दुमत होणे अगदी शक्य आहे. ते म्हणतात : 'मराठी भाषेत प्रेमाची भाषा अजून घटलेली नाही.' म्हणूनच 'सायुज्यते'सारखे शब्द त्यांनी सिद्धांतवजा पद्धतीने मांडले. त्यांच्या प्रेमविषयक कल्पनांचा आणि त्यांच्या ते प्रेम व्यक्त करण्याच्या पद्धतीचादेखील उल्लेख मागे येऊन गेला आहे; तेव्हा अगदी थोडक्यात सांगायचे म्हटल्यास या बाबतीत असे सांगता येईल की, डॉ० केतकरांना पाश्चात्य तऱ्हेचा प्रेमाचा उघडा आविष्कार अधिक आवडे. आणि मत्तमयूरी, डॉ० नंदिका यांची उदाहरणे ठळक आहेत, त्याचप्रमाणे 'आशावादी'त देवीदासपंताने अचानक घडलेल्या प्रथमदर्शनाच्या वेळी तिला मिठी मारण्याइतकी मजल गाठणे, आणि कपिलेच्या बाबतीतही उत्कट आलिंगनेच्छा प्रयासाने दाबून टाकणे ही उदाहरणेदेखील लक्षात घेण्यासारखी आहेत. पुरुषाच्या बाबतीत आतुर प्रियकर त्यांना रंगविणे आवडे. ही सर्व पाश्चात्य प्रियाराधनशास्त्राचीच द्योतक आहेत. स्त्रीपुरुषांनी आपले प्रेमविषयक भाव एकमेकांना उघड करून दाखवावे, असाच सल्ला त्यांनी प्रेमिकांना आपल्या कादंबऱ्यांतून दिला आहे. विकृत आणि बदलत्या प्रेमाची मात्र त्यांना चीड आहे. याबाबतीत एक ठळकपणाने आढळून येणारी गोष्ट अशी आहे की, डॉ० केतकर 'प्रणयपंढरीचे वारकरी' असलेल्या कादंबरीकारांसारखे प्रेमाच्या विषयात गुरफटून जात नाहीत. ते विषयापासून जरा अलग राहून, आणि जरा उंच जाऊनच प्रेमाची

चिकित्सापूर्वक छाननी करताना दिसतात. ही गोष्ट त्यांच्या कवितांत विशेष दिसून येत असल्यामुळेही या कल्पनेला दुजोरा मिळतो.

नारायण वामन टिळकांप्रमाणे पत्नीबद्दल गाढ प्रेम असूनही, त्यांनी जसे संन्यस्त जीवन अंगिकारले तसेच कदाचित डॉ० केतकर आणखी काही वर्षे जगले असते तर त्यांनीही अंगिकारले असते. ते शीलवतीबाईंना नेहमी म्हणत की "मी उतारवयात घरादारांच्या मोहातून मुक्त होऊन संन्यास घेणार आहे." मग त्या संन्यस्त स्थितीत पत्नी जवळ असली तरी टिळकांप्रमाणेच त्यांना तिची बाधा झाली नसती. संन्यासाचा त्यांचा आदर्श मात्र श्रद्धानंदांचा होता. त्या संन्यासामागे संसाराबद्दलचा वैताग नव्हता, स्वतःच्या दुःखाच्या निरसनाचीही भावना नव्हती, की नव्हता आत्मोन्नतीचा आध्यात्मिक आवेश. संसारात सुसंस्कृत झालेल्या प्रेमाला समाजाच्या हितासाठी करवेल तितके विशाल करावे अशी त्यांची मानवी जीवनाच्या परमोच्च ध्येयाची कल्पना आहे. आत्मप्रेम, पतिपत्नीप्रेम, अपत्यप्रेम व मित्रप्रेम यांच्या मर्यादा माहीत असणाऱ्यालाच 'एक जगाची' कल्पना मांडणे शक्य होते.

## केतकरांचे स्त्री-चित्रण

स्त्रियांच्या बाबतीत डॉ० केतकरांनी जे काही लिहिले, ते संपूर्ण पुरुषी वृत्तीने स्त्रियांची चिकित्सक दृष्टीने छाननी करून लिहिले आहे. 'मनोरंजन'कार मित्र व पर्यायाने आगरकरपंथी सुधारक यांनी लिहिलेल्या स्त्रियांबद्दलच्या वाङ्मयात गौरवाची भावना, त्याचप्रमाणे त्यांच्या असहायतेबद्दल कीव व्यक्त केली आहे. डॉ० केतकर स्त्रीला गौरवीत नाहीत. पाश्चात्यांप्रमाणे स्त्रीदाक्षिण्य दाखवीत नाहीत. पण जुन्या मतवाद्यांप्रमाणे ते तिला पुरुषापेक्षा गौणही लेखीत नाहीत. स्त्रीचे कार्यक्षेत्र वेगळे असले तरी तिचे स्थान, ती अशिक्षित असली तरीही, अन्यायाने चेपली असली तरीही पुरुषाहून हीन नाही असे ते मानतात. एरवी स्वार्थत्यागाची टिंगल करणारे डॉ० केतकर हिंदू सामायिक कुटुंबातील विधवेचे त्या कुटुंबाच्या सेवेप्रीत्यर्थ होणारे कष्ट, हा निःस्वार्थ सेवेचा उच्चतम आदर्श मानतात. त्याचप्रमाणे जितक्या म्हणून स्त्रिया त्यांनी आपल्या कादंबऱ्यांत रंगविल्या आहेत त्यांच्यामध्ये सहिष्णुता (पुरुषाच्या बाबतीत स्त्रीने दाखविलेली) हा एक सर्वसामान्य उत्कृष्ट गुण म्हणून दाखवलेला आहे. या बाबतीत 'मनोरंजन'कारांच्या 'सोसाळू ही बायको-जात आहे' या वचनाचाच पुनःप्रत्यय डॉ० केतकरांच्या लेखनात आढळून येतो. त्यांच्या कादंबरीतल्या स्त्रिया प्रतिकूल परिस्थितीशी झगडतात. स्वतःच्या कमजोर भावना किंवा दुर्वासनादेखील कबूल करून त्यांच्या पकडीतून मुक्त होण्याचा प्रयत्न करतात. परंतु बाकी सर्व ऐहिक महत्त्वाकांक्षेपेक्षा प्रिय पुरुषाची चिरप्राप्ती हेच त्यांच्या सर्वांच्या आयुष्याचे ईप्सित असल्यामुळे त्या भा० वि० वरेरकरांच्या नायिकांप्रमाणे बंडखोर

बनल्या नाहीत, किंवा दुसऱ्या अनेक कादंबऱ्यांतल्या नायिकांप्रमाणे अपेश आले की दुःखाने खचून जाऊन मेल्याही नाहीत. कालिंदी व मिसेस हंटर यांचे वर्तन बंडखोरीचे नसून त्राग्याचे होते व म्हणूनच ते पश्चात्तापाला कारण झाले.

डॉ० केतकरांनी स्त्रियांबद्दल लिहिले, तरी आपल्याला स्त्रियांच्या—विशेषतः शिकलेल्या स्त्रियांच्या—अंतःप्रवृत्तींबद्दल, अनुभवाबद्दल हवी तितकी माहिती नाही, हे ते ओळखून होते आणि म्हणूनच विभावरी शिरूरकरांच्या 'कळ्यांच्या निःश्वासा'ला त्यांनी जी प्रस्तावना लिहिली तिच्यात व त्यांच्याच 'हिंदोळ्यावर' या कादंबरीवरच्या 'प्रतिभे'तल्या परीक्षणात त्यांनी स्त्रीने स्त्रीचे मन विशद केल्याबद्दल कौतुक व्यक्त केले आहे. पुरुष हा स्त्रीचे अनुभव तिच्याप्रमाणे उत्तम रीतीने व्यक्त करू शकणार नाही असे त्यांनी सूचित केले आहे. अर्थात कादंबरीकाराचे अनुभव हे स्वतःच्या लिंगभेदावर अवलंबून असावेत ही धारणा जगातल्या श्रेष्ठ कथा-कादंबरीकारांचे साहित्य वाचल्यावर कुणालाही पटण्यासारखी नाही. टागोर, शरद्बाबू हे कथा-कादंबरीकार 'स्त्री'चित्रणातच अधिक यशस्वी आहेत. खुद्द हरिभाऊंच्या स्त्री-रेखाही पुरुषरेखांइतक्याच सजीव आहेत. चिंतामणराव वैद्यांची 'दुर्दैवी रंगू'ही किती लक्षणीय आहे.

याचा अर्थ डॉ० केतकरांच्या स्त्री-रेखा चुकीच्या आहेत असा नव्हे.

**'स्त्रीचारित्र्य जनांस अल्प कळलें आहे जरी अद्भुत'**

असा त्यांचा पवित्रा असल्यामुळे त्यांना आपण स्त्रीचरित्रातले काही कणच टिपले आहेत व स्त्रियांच्या सुखदुःखांची खरी जाणीव आपल्याला नाही ही रुखरुख व्यक्त होते, आणि त्यांच्या लेखनालाही मर्यादा पडते. इथेच अनुभव घेणारा माणूस व अनुभव घेणारा कलावंत यांच्यामधला फरक दृग्गोचर होतो. इथेच डॉ० केतकरांचा कल्पनाविलास व त्यांची कलासंवेदना यांच्यामधला विसंवाद स्पष्ट होतो. इथेच टॉलस्टॉय, शरद्बाबू वगैरेंचे कलात्मक उच्च पद दिसून येते. स्वतःच्या संवेदनांत संपूर्णपणे बुडाल्याशिवाय अनुभवांना कलात्मक घाट येत नाही. इथेच डॉ० केतकरांचा घाट कच्चा राहिला.

लोहाराच्या जीवनावर कादंबरी लिहायची तर स्वतः लोहार व्हायला हवे असे नाही. बाळंतिणीचा अनुभव खुद्द सुईण अधिक चांगला वर्णन करू शकते. कलात्मक अनुभव अलिप्ततेने व त्रयस्थपणे व्यक्त करण्यात लेखकाचे उत्कृष्ट यश आहे, हे डॉ० केतकरांना जाणवलेले दिसत नाही.

## हरिभाऊ आपटे व डॉ० केतकर

हरिभाऊ आपटे व डॉ० केतकर यांच्या लेखनाच्या पद्धतींत जमीनअस्मानाचा

फरक असला, तरी मराठी कादंबरीच्या अभ्यासकाला या दोन लेखकांची एकत्र सांगड पडल्याचे दिसून येते यात शंका नाही. याला दोनतीन कारणे आहेत. ती अशी : १. डॉ० केतकरांनी हरिभाऊंना 'सदाशिवपेठी' कादंबऱ्या लिहिणारे म्हटले असले, तरी हरिभाऊंच्या वर्णनांतली जी शिताफी होती तिची छाप नकळत डॉ० केतकरांच्या पहिल्या कादंबऱ्यांवर ओझरती का होईना पडलेली दिसते. विशेषतः कादंबरी लिहिताना उपोद्घाताची विशिष्ट लकब 'एक गृहस्थ अमूक अमूक करीत होता, त्याचे विचार असे चालले होते, इतक्यात त्याला अमूक अमूक दृश्य दिसले, किंवा तो जे काय करीत होता त्यात अमूक तऱ्हेने विघ्न आले' अशा तऱ्हेची आहे. तिच्यात वाचकाचे औत्सुक्य लांबलचक वर्णनाने वाढू देऊन नंतर ती व्यक्ती कोण ते सांगायचे व नंतर कथानकाला प्रारंभ करायचा हा जणू काही त्यांच्या कादंबरीलेखनाचा शिरस्ताच पडून गेला आहे. 'प्रियवंदे'ची सुरुवात अशीच नापास झालेल्या रामभाऊला आत्महत्येपासून वाचविणाऱ्या मित्राच्या आगमनापासून झाली आहे. त्याचप्रमाणे 'आशावादी'चे पहिले प्रकरणसुद्धा 'हरिभाऊ-थाटा'चेच आहे. पुढच्या कादंबऱ्यांत मात्र ही ओझरती छटासुद्धा साफ लुप्त होऊन डॉ० केतकरांनी आपल्या कादंबऱ्यांची घाटणी पूर्णपणे स्वतःची बनविली आहे. डॉ० केतकरांची पात्रांची निवड व एकंदर मनोरचना इतकी प्रभावी आहे की, वारंवार हरिभाऊंसारख्या समाजचित्रणात सूक्ष्मता असणाऱ्या कादंबरीकाराबरोबरच त्यांची तुलना, बऱ्या अर्थाने असो की वाईट अर्थाने असो, करावी लागेल. २. हरिभाऊंप्रमाणेच डॉ० केतकरांनी सुशिक्षित मध्यमवर्गाचेच चित्रण केलेले आहे. तेव्हा विशिष्ट वर्गाच्या वर्णनामुळे उत्पन्न झालेला दोन्ही लेखकांच्या कथालेखनातील मर्यादितपणा शेतकरी-कामकरी-वर्गाच्या जीवनाचे चित्र हेच जातिवंत समाजचित्रण असे मानणारे व साम्यवादी मताकडे झुकणारे जे काही चोखंदळ आधुनिक वाचक आहेत, त्यांना दोषास्पद वाटण्याचा संभव आहे. इतके मात्र खरे की जो समाज या दोन कादंबरीकारांनी दिग्दर्शित केला आहे, त्या समाजाच्या आकांक्षांचे व व्यंगांचे ज्ञान या दोघांनाही संपूर्ण होते. माहीत नसलेल्या वर्गाबद्दल अघळपघळ लिहून आपली आजतागायत वर्गविहीन दृष्टी सिद्ध करण्याच्या अट्टाहासापेक्षा आपल्या निरीक्षणाच्या मर्यादा ओळखून माहीत असलेल्याच समाजाच्या अंगाचे वर्णन करणे अधिक श्रेयस्कर आहे. ३. ऐतिहासिक संगतीच्या दृष्टीने देखील डॉ० केतकरांनी मराठी कादंबरीस विशिष्ट वळण लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे यथार्थ वर्णन प्रो० वि० द० साळगावकर यांनी 'प्रतिभे'च्या ८ जून १९३४च्या अंकात 'कादंबरी व मराठी वाङ्मय' या आपल्या लेखात केले आहे. ते असे : "आपल्या मराठी कादंबरीच्या क्षेत्रांत कै० आपटे यांनीं आपल्या माहितीच्या मध्यमवर्गाच्या समाजाचेंच चित्र आपल्या कादंबऱ्यांत काढलेलें स्पष्ट दिसून येतें. परंतु हरिभाऊंच्या नंतर डॉ० केतकर यांनीं मराठी कादंबरीमध्यें

नावीन्य उत्पन्न करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. आपल्या प्रत्येक कादंबरींत हिंदुसमाजाच्या (अगर दक्षिणी समाजाच्या) एखाद्या विशिष्ट अंगाचा विचार करून त्यावर आपल्या अनुभवाचा व ज्ञानाचा त्यांनीं भरपूर प्रकाश टाकला व मराठी कादंबरीस कांहीं प्रमाणांत इंग्रजी कादंबरीचें स्वरूप आणून दिलें ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे. कारण हरिभाऊंच्या मागें प्रसिद्ध झालेल्या बहुतेक मराठी कादंबऱ्या त्यांच्या कृतींच्याच वहिणी आहेत व कांहीं अपवाद सोडून दिले तर त्यांत महाराष्ट्रीय समाजाचें विशिष्ट प्रकारचेंच चित्र काढलेलें दिसून येतें. व या दृष्टीनें डॉ० केतकर यांची कामगिरी महत्त्वाची आहे. परंतु त्यांच्या कादंबऱ्या 'ब्राह्मणकन्या'खेरीज-करून फारशा लोकप्रिय झालेल्या नाहींत, याचें कारण महाराष्ट्रीय वाचकसमाज फारसा नावीन्यप्रिय व विवेचनप्रिय नाहीं हें तर आहेच; परंतु डॉक्टरसाहेबांच्या कादंबऱ्यांतील दोषही कांहीं अंशीं कारण आहेत."

## शीलावतीबाईंच्या शब्दांत

डॉ० केतकरांच्या कादंबऱ्याविषयीच्या चर्चेचा गोषवारा शीलावतीबाईंच्या 'भटक्या'च्या 'पूर्वसूचने'त दिलेल्या शब्दांत देणें मला उचित वाटतें. ते शब्द असे :

"डॉ० केतकर यांच्या कादंबऱ्या ह्या सर्वच समाजास समजण्यास कठीण आहेत व त्यामुळेंच त्यांचा सर्वत्र फैलाव झाला नाहीं; परंतु ज्यांच्या ज्यांच्या वाचनांत त्या आल्या, त्यांना विचाराचा चटका लावणाऱ्याच झाल्या आहेत. उपमा देऊनच बोलावयाचें म्हटलें तर त्यांच्या कादंबऱ्या पक्व फणसाप्रमाणें आहेत. ज्याप्रमाणे फणस आंतील गऱ्यांनी खाणारांचीं मनें जशीं आनंदित करतो व हा आनंद उपभोगीत असतां ज्यांत हे गरे साठविले होते त्या बाहेरील कांटेरी सालीची त्यांस आठवणही राहात नाही, त्याचप्रमाणें डॉक्टरांच्या कादंबऱ्या शाब्दिक बोजडपणामुळें कांटेरी वाटत असल्या तरी पण त्यांतील पूर्णत्वास पोचलेल्या विचारांनीं वाचकांचीं मनें तल्लीन करतात. इतकेंच नव्हे तर आपणांस अपूर्व ठेवा मिळाला असेंही त्यांस वाटल्याशिवाय राहात नाहीं, व त्यामुळें कांटेरी वाटत असलेला शाब्दिक बोजडपणाचा विचार हा वाचकांच्या मनात जरा बाजूला पडतो."

आणि या समग्र समालोचनाचा शेवट डॉ० केतकरांच्याच शब्दांत केलेला बरा नाही काय ?

**"उदात्त भावा वर्णन करितो नलगे मज हा मान**
**खरें वर्णितो इतुकें मजला पुरे प्रशंसावचन."**

*परिशिष्ट : १*

# डॉ० केतकरांची भाषा

'डॉ० केतकरांचे भाषेचे प्रयोग' (ऑक्टोबर १९४५) व 'डॉ० केतकरांची भाषा' (फेब्रुवारी १९५०) हे माझे दोन लेख 'साहित्य' मासिकात आले होते. डॉ० केतकरांचे प्रयोग भाषेच्या क्षेत्रात विशेष लक्षणीय आहेत. त्यांची भाषा व तिचे मर्म समजल्या-खेरीज त्यांच्या कादंबऱ्यांची जडणघडण लक्षात येणे कठीण आहे. आणि म्हणूनच हा पूरक मजकूर 'कादंबऱ्यां'च्या परिशीलनाला मी जोडला आहे.

### *प्रयोगशीलता*

डॉ० श्रीधर व्यंकटेश केतकर हे शास्त्रीय विचारसरणीचे लेखक. शास्त्रीय विचारांची मुख्य कसोटी म्हणजे प्रयोगशीलता. आयुष्यातील कर्तृत्वाला तांबडे फुटू लागण्यापूर्वीच

> "तत्त्वांचें करण्यास परीक्षण होती प्रयोग जगतीं
> प्रयोगार्थ या अपुल्या देहा स्वेच्छेनें जन देती
> जाई देशीं कार्या लागे स्वजनांच्या कल्याणा
> प्रयोग म्हणुनी योजावें या देहातें तूं वीरा"

हे उद्गार काढणाऱ्या डॉ० केतकरांच्या मनोवृत्तीत हा शास्त्रीय बाणा कसा भिनला होता हे सहज दिसून येते. यानंतर त्यांनी पुढच्या तीस वर्षांत जे काही लेखनकार्य केले,

आणि इतरही कार्ये करण्याचे घाट घातले, त्यांच्या बुडाशीदेखील त्यांची विशाल जिज्ञासा आणि प्रत्येक गोष्ट बारकाईने तावूनसुलाखून घेण्याची वृत्तीच दिसून येते. मारुतीने रामाची प्रतिमा नसलेली रत्नमाला फोडून फेकून दिली त्याप्रमाणेच डॉ० केतकरांनीही समकालीनांचे अनेक मोठे विचार आणि ते विचार व्यक्त करण्याचे शिष्ट भाषासंप्रदाय केवळ प्रयोगाखातर, स्वतःच्या मनाचे समाधान होईना म्हणून, बेधडक झुगारून दिले. यात त्यांचा विजय आहे; यात त्यांच्या अपयशाचेही सूक्ष्म बीज पेरले गेले आहे.

### *भाषाबीजाची परंपरा*

डॉ० केतकरांची भाषा बोजड आणि समजण्यास पुष्कळदा कठीण आहे याबद्दल दुमत होणार नाही. डॉक्टरांची भाषेची धाटणी अगदी स्वतंत्र आहे. त्यांचा लेख सहज ओळखू येईल अशी त्यांची भाषा असते. डॉक्टरांनी भाषेचे जे अनेक प्रयोग केले त्यांचे दिग्दर्शन पुढे येईलच. परंतु त्याच्या आधी डॉक्टरांच्या लेखणीवर पूर्वसंस्कार किती व कसे झाले आहेत ते पाहिल्यावाचून त्यांच्या वाङ्मयाचे सारासार-ग्रहण करता येणे कठीण आहे. हे संस्कार म्हणजेच त्यांच्या वाङ्मयात आढळून येणाऱ्या भाषाबीजांचे किंवा, सोप्या शब्दांत सांगायचे झाल्यास, शब्दांच्या निर्मितीचे मूळ आधार होत.

### *इंग्रजीचा प्रभाव*

जांभेकर-लोकहितवादींपासून तो थेट आतापर्यंत जे जे म्हणून वाङ्मय मराठीत बाहेर पडले आहे, ते ते सर्व इंग्रजी विचारांच्या व भाषेच्या मुशीतूनच बाहेर पडले आहे, असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही. पहिल्या मराठी लेखकांची शब्दसंपत्ती घेऊनच एकेक पिढी अधिकाधिक पुढे सरसावत आहे. परंतु ही संपत्ती वाढते आहे ती अगदी आपोआप वाढली असे कुणी समजू नये. पुष्कळसे शब्द विरोधाच्या धगीतूनच जन्माला आले व नंतर टिकाऊ झाले; तर काही शब्द लोकांच्या तत्कालीन भावनांस चेतविणारे असल्यामुळे तत्काल लोकप्रिय झाले. उदाहरणार्थ, टिळकांच्या 'नोकरशाही' या शब्दाने त्या वेळच्या सरकारचे पित्त खवळले, पण लोकांनी त्या शब्दाला ताबडतोब उचलून धरून अमर केले. त्याच्या उलट राजारामशास्त्र्यांनी जुन्या रामदासी व बखरी वाङ्मयावरून पहिल्या प्रथमच 'राजकारण' व 'हेजीब', 'ब्राह्मणेतर', 'विश्वविद्यालय', 'न्यायमूर्ती' यांसारखे शब्द आपल्या लेखांत वापरल्यामुळे, मराठी भाषेचे धिंडवडे काढणारा उपजत खरडा, असा वेगवेगळ्या टीकाकारांकडून खरपूस अहेर त्यांना मिळाला. कालांतराने 'राजकारण' हा शब्द आमच्या जीवनात किती खोल खोल गेला, हे आता कुणाला सांगायला

हवे काय ? 'हेजीब' हा शब्द मराठीचे अमोलिक लेखक हरिभाऊ यांनी आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत चिरंजीव करून टाकला. असो. इतर शब्दांबद्दल बोलायलाच नको. याप्रमाणे प्रत्येक प्रभावशाली लेखक आपापल्यापरी मराठीची शब्दसंपत्ती वाढविण्यास मदतच करीत होता.

डॉ० केतकर हे भाषाशास्त्राचे व्यासंगी, इतिहासाचे भोक्ते व अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांचे तर दर्दीच होते. या विषयांवर होणाऱ्या वाङ्मयाची कक्षा ठरलेलीच असते. त्यांच्या आधी इतिहास, तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र व भाषाशास्त्र या विषयांचा साकल्याने अभ्यास करणारे दोनच विद्वान केतकरांच्या धाटणीशी साम्य असणारे आहेत. दोघेही नव्या कल्पनांचे प्रचारक. दोघेही आपापल्या परीने विक्षिप्त म्हणून गणले गेलेले. हे दोघेजण म्हणजे राजारामशास्त्री भागवत, व दुसरे इतिहासाचार्य राजवाडे. शास्त्रीबोवांचा डॉ० केतकरांच्या लिखाणावर प्रत्यक्ष परिणाम झालेला दिसला नाही तरी पर्यायाने झालेला आहे. कारण राजवाड्यांचे बरेचसे सामाजिक सिद्धांत मूळ शास्त्रीबोवांच्या लेखनात सापडतात; आणि राजवाड्यांचा डॉ० केतकरांच्या लिखाणावर इंग्रजीच्या खालोखाल परिणाम झालेला आहे. दोघांच्या शैलीत मात्र पुष्कळच फरक आहे. राजवाड्यांचे मराठी राजारामशास्त्र्यांप्रमाणे 'मराठी' वळणावरचे आहे. त्यात आवेश संस्कृताचा आहे. भाषा अती शुद्ध व रेखीव आहे. याच्या उलट डॉ० केतकरांची भाषा इंग्रजी वळणाची, अमेरिकन आवेशाची, संस्कृताच्या आधाराने गती घेणारी अशी बहुढंगी आहे.

टिळक, आगरकर इत्यादी मराठीचे लेखक भारदस्त, प्रौढ भाषा लिहीत. पण त्यांच्या लेखनाची लकब अशी की एकेकच मुद्दा घोळूनघोळून विस्ताराने लिहायचा. याच्या उलट राजारामशास्त्री, राजवाडे व केतकर यांच्या भाषेची घडणच अशी की अत्यंत वेगाने एकदम पुष्कळशा कल्पना उसळून यायच्या. कधी त्या परस्परविरोधी असायच्या; कधी एकीतून एक निघणाऱ्या असायच्या. त्याचा परिणाम या तिन्ही लेखकांच्या धाटणीवर असा झाला आहे की, थोडक्या शब्दांत, थोडक्या वाक्यांत खूपच अर्थ, अगदी घालवेल तितका घालायचा. या तिघांचे लिखाण त्यामुळेच लोकांना पचवायला जड जाते. त्यातल्या त्यात हे विलक्षण अर्थगौरव यशस्वी रीतीने पेलून धरण्यास समर्थ अशी राजवाड्यांची भाषा झाली. बाकीच्या दोघांच्या बाबतीत, त्यातल्या त्यात डॉ० केतकरांच्या बाबतीत विशेषेकरून, असे झाले की त्यांची भाषा कमजोर नाही तरी कमी तोलाची पडली. पण हे काही असले तरी हे तिन्ही लेखक पराकाष्ठेचे कल्पक व मेहनती आणि बहुश्रुत असल्यामुळे वेगवेगळे शब्द गरजेप्रमाणे, न कचरता बनविण्याची, मनाला वाटतील तसे रचनाप्रयोग करण्याची कमाल त्यांनी आपल्या लेखनात केली आहे. मराठी भाषेला तिच्या कलावंतांनी सुंदर भूषणे लेवविली असली, तरी तिच्या आसनाची बैठक डळमळीत राहू नये, तिचे मंदिर भक्कम पायावर

उभारले जावे, म्हणून या तीन पाथरवटांनी अपरंपार मेहनत घेऊन, लोकनिंदेची पर्वा न करता, घणाचे घाव घालून लहानमोठे चिरे तयार केले. ते चिरे व्यवस्थित रचून त्यांचा शोभिवंत इमला बांधण्याचे काम करण्याइतकी फुरसत त्यांच्या हयातीत त्यांना मिळाली नाही हे खरे. आणि म्हणूनच त्यांच्या अव्यवस्थित लेखनशैलीबद्दल बोभाटा होतो. पण तिच्यात असणारे अर्थाचे सामर्थ्य मात्र थोड्यांनाच विलोभनीय वाटते.

### राजवाड्यांचा प्रभाव

डॉ० केतकरांच्या भाषेवर राजवाडी भाषेचा प्रभाव पडला आहे तो मुख्यतः अशा स्वरूपात की, त्यांच्या भाषेत थोडक्यात पुष्कळ अर्थ आणण्याच्या खटपटीमुळे शब्दांची उधळपट्टी नाही; उलट ते जितके कमी आणि काटेकोर रीतीने वापरता येतील असेच वापरलेले. मात्र विचारांना भरपूर वाव दिल्यामुळे कोणत्याही विषयावर शेकडो पाने ते सहज लिहू शकत. लेखनाचा पसारा अफाट, कल्पनांची वारेमाप उधळपट्टी, पण शब्दांची काटकसर, असा त्यांचा लेखनप्रपंच आहे. राजवाड्यांच्या संस्कृतप्रचुर भाषेची छाप डॉ० केतकरांचे १९०८ सालच्या 'विश्ववृत्ता'च्या अंकांत जे लेख आले आहेत त्यांच्यावर चांगलीच पडली आहे. पण ही स्थिती एकदोन वर्षेच राहिली असेल. डॉ० केतकरांचा स्वभाव अनुकरणशील नव्हता. राजवाड्यांची नवी आणि शास्त्रीय अर्थांनी परिपूर्ण असलेली अत्यंत चोखंदळ परिभाषापद्धती डॉ० केतकरांना मार्गदर्शक झाली यात शंका नाही. राजवाड्यांचे भाषाशास्त्राचे नैपुण्य डॉ० केतकरां-इतके कुणालाच त्या काळी उमगले नाही. आणि म्हणूनच राजवाड्यांच्या कार्यसिद्धीची चर्चा करताना, त्यांच्या मृत्युलेखात डॉक्टरांनी त्यांच्या भाषाशास्त्राच्या ज्ञानाला पहिले स्थान दिले. राजवाड्यांच्या कार्याचे ते मूल्यमापन आता सर्वमान्य व कायम झाले आहे यात शंका नाही. राजवाड्यांचा लाडका शब्द 'ग्रांथिक' डॉ० केतकरांनी बेधडक उचलला..'सांस्कृतिक' हा शब्द राजवाड्यांपेक्षाही, संस्कृती या शब्दाचे जितके अर्थ व सामाजिक संकेत डॉ० केतकरांच्या काळी जगात ज्ञात होते तितक्या सर्व अर्थांनिशी व संकेतांनिशी डॉ० केतकरांनी आपल्या लेखनात ठिकठिकाणी वापरला आहे. 'मानववंशशास्त्र' हा शब्द प्रथम राजवाड्यांनीच तयार केलेला. डॉ० केतकरांनी हाच शब्द ज्ञानकोशात जरी सर्रास वापरला असला तरी या शब्दाच्या रचनेच्या मागे थोडी अतिव्याप्ती आहे हे त्यांनी जाणले होते. 'मानवशास्त्र' (anthropology) आणि 'वंशशास्त्र' (ethnology) या दोन इंग्रजी पारिभाषिक शब्दांचे बुद्ध्या मिश्रण करून हा शब्द बनविला आणि मग तो मराठीत रूढ झाला असे डॉ० केतकरांनी म्हटले आहे. (ज्ञानकोश–प्रस्तावनाखंड १, पृष्ठ ५०) डॉ० केतकरांचे हे विधान आज मान्य झाले आहे. 'मानवशास्त्र' हा शब्द अस्तित्वात येऊन 'वंशशास्त्र' त्याच्या-पासून सुटे झाले आहे. त्याप्रमाणे राजवाड्यांनी भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या

पहिल्या वार्षिक संमेलनात जो ठराव आणला त्यात 'भारतीय अर्थशास्त्र', 'भारतीय समाजशास्त्र' इत्यादींवरही ग्रंथरचना व्हावी अशी सूचना होती. राजवाड्यांनी लिखाण असे या विषयांवर मोजकेच केले. पण समाजशास्त्रज्ञ डॉ० केतकरांना जो मिळायचा तो इषारा या दोन शब्दांतून मिळाला. त्यांनी ज्ञानकोशात 'भारतीय अर्थशास्त्र' म्हणून एक स्वतंत्र विभाग कल्पून लेख लिहिला. त्यावर डॉ० धनंजयराव गाडगिळांनी १९२५ सालीच, भारतीय अर्थशास्त्र अशी काही अजब व स्वतंत्र चीज नाही, पश्चिमेकडून आलेले अर्थशास्त्र सर्वसामान्य आहे, त्यात हिंदुस्थानातल्या काही गोष्टी तपशिलादाखल मिळविल्या की ते आमच्या उपयोगाचे अर्थशास्त्र झाले, अशी खरपूस टीका केली होती. पण आता डॉ० गाडगिळांना केतकरांचेच विधान स्वीकारणे भाग पडले आहे. 'आर्थिक घडामोडी' या पुस्तकात त्यांनी डॉ० केतकरांचीच संज्ञा बरोबर आहे, व आपले मत चुकले होते. असे नमूद केले आहे. 'भारतीय समाजशास्त्र' या नावाचे पुस्तकच डॉ० केतकरांनी १९३० साली प्रसिद्ध केले. पण या शब्दामागे असलेल्या धोरणाचा परामर्ष घेण्याचे हे स्थान नव्हे. 'पुरुषसायुज्यता' हा संभोगाच्या अर्थी राजवाड्यांनी वापरलेला सुंदर शब्द डॉ० केतकरांनी 'ब्राह्मणकन्ये'त रूढ केला आहे. (पृष्ठ २०५) वैजनाथस्मृतीत राजवाड्यांच्या भाषेची तंतोतंत नक्कल डॉ० केतकरांनी केली. राजवाड्यांचे 'वंशसातत्य', 'आत्मसातत्य' हे शब्द ज्याप्रमाणे त्यांनी ज्ञानकोशात त्याचप्रमाणे या स्मृतीतही वापरले. परंतु त्यांना न आवडणारे राजवाड्यांचे 'सार्ववुप', 'सार्वभौम', 'संबंधचालन' इत्यादी शब्द डॉक्टरांनी चुकूनही कुठे वापरले नाहीत. त्याचप्रमाणे 'न्हावगंड युनिव्हर्सिट्या', 'कारकून प्रोफेसर' अशा तऱ्हेचा राजवाडी उपरोधाचा जो नमुना होता त्यापेक्षा डॉक्टरांचा 'सदाशिव पेठी'सारखा उपरोध अगदी वेगळ्याच स्वरूपाचा व अधिक सुसंस्कृत होता.

### *संस्कृत भाषेचा प्रभाव*

संस्कृत भाषेच्या पांडित्यातच वर सांगितलेल्या तिन्ही लेखकांच्या, थोडक्यात पुष्कळ आशय ठासून भरण्याच्या पद्धतीचे मूळ आहे असे मला वाटते. संस्कृतात सूत्रे व स्मृती या सर्व तत्त्वज्ञानांचे आणि सामाजिक विचारांचे आगर आहेत. अर्थात सूत्रमय भाषा म्हटली म्हणजे थोड्या शब्दात अर्थांच्या शतरंगी कला भरलेली. यामुळे डॉ० केतकरांच्या भाषेत अतिप्राचीन शब्दप्रयोग पण अतिआधुनिक विचारपद्धती यांचा दुरंगी मिलाफ दिसतो. उदाहरणार्थ, 'गोंडवनातील प्रियंवदे'त त्यांनी 'प्रोषितभर्तृका' म्हणून संस्कृत साहित्यातली पदवी बहाल केलेली नायिका कल्पिली. 'गांवसासू'तही वरीलप्रमाणे अष्टनायिकांतील 'वासकसज्जिका' म्हणजे नटूनथटून प्रियकराची वाट पाहात बसलेली नायिका सुनीतीस बनविली. पण मूळ संस्कृतातल्या शब्दांतील सारा झोक कायम ठेवूनही त्यांनी या दोन्ही नायिकांच्या मनोभावनांना अती आधुनिक स्वरूप

दिले. त्याशिवाय 'मी त्याचे पुनः कथन करतो', 'हिचे (या क्रियेचे) अवगमन ब्राह्मण-ब्राह्मणेतर संबंधावर प्रकाश पाडते.' (महाराष्ट्रियांचे काव्यपरीक्षण, पृष्ठ ११८), यासारखे संस्कृत वाक्प्रचार वापरले आहेत. मराठीत ते अधिक सोप्या शब्दांत सांगता येण्यासारखे असूनही पंडिती भाषेत डॉ० केतकर वापरू लागल्यामुळे भाषा कठीण झाली आहे. अशी उदाहरणे केतकर-वाङ्मयात हवी तेवढी सापडतील. 'अशिष्ट वाङ्मयाचे शिष्टीकरण' (काव्यपरीक्षण, पृष्ठ ११८) ही कल्पना फार मोठी व अतिशय अभिनव आहे. आणि मोठ्या कल्पनांना परिभाषेच्या चौकटीत बसविल्याखेरीज पुष्कळदा लोकांचे लक्ष तिकडे वेधत नाही, आणि वेधलेच तर त्यांचा आशय थोडक्यात व्यक्त करता येत नाही. त्यामुळे स्पष्ट अर्थ व्यक्त करणारे, एकाच अर्थाचे अनेक शब्दही वापरावे लागतात. अशिष्ट वाङ्मयाला, अनागर वाङ्मय किंवा कुणब्यांचे वाङ्मय, असेही डॉ० केतकर म्हणतात. (पृष्ठ ११४) अर्थात अशा तऱ्हेच्या कल्पनांची कक्षा वाढवून परिस्थितीचे सूक्ष्म ज्ञान व्यक्त करण्यासाठी उपयोगात आणलेले संस्कृत वाक्प्रचार इष्टच समजले पाहिजेत. अशीही उदाहरणे डॉ० केतकरांच्या वाङ्मयात इतस्ततः विखुरली आहेत.

*हरदासी पद्धत :* डॉ० केतकरांच्या कादंबरीतील 'करते झाले', 'बोलते झाले' इत्यादी भावे प्रयोगातील हरदासी लकब, कै० वा० म० जोश्यांनी 'लोकशिक्षणा'च्या खास अंकात लोकांपुढे आणली. 'एवंच' हा त्यांच्या लिखाणात वारंवार आढळून येणारा शब्दही याच पद्धतीचा द्योतक आहे. 'तें चाणक्यांदींकडून व्याख्यानलें गेलें', (ब्राह्मणकन्या, पृष्ठ २८७) हे वाक्यही त्याच मासल्याचे.

*कोकणी लकब :* वैजनाथशास्त्री व शारदाबाई यांच्या संवादांत वैजनाथशास्त्री 'बाई गे' म्हणून शारदाबाईंना संबोधतात. 'आशावादी'त मिसेस हंटर आपल्या मुलीला 'बाई गे' म्हणूनच म्हणते. 'ब्राह्मणकन्ये'त बेने इस्रायल एसतेर आपली मैत्रीण कालिंदी हिलाही 'बाई गे' म्हणते. अर्थात हा जुना प्रयोग डॉ० केतकरांनी का वापरला असावा ते कळत नाही. डॉ० केतकरांच्या काळच्या कादंबऱ्यांत 'बाई ग' असाच वाक्प्रचार रूढ होता. त्याचप्रमाणे 'घटनेसंबंधे'—आपण संबंधी म्हणतो— ('ब्राह्मणकन्या', पृष्ठ २९१) हा प्रयोगदेखील जुन्यातलाच आहे.

*चिपळुणकरी भाषेचा उपयोग :* सुधारकांची चेष्टा करण्याच्या मिषाने चिपळुणकरी पद्धतीचा डॉ० केतकर कधीकधी उपयोग करीत. उदाहरणार्थ, 'सुधारणेचे तारू' ('ब्राह्मणकन्या', पृष्ठ २) व 'या गोंडवनांत येऊन आमची प्रियंवदा मात्र अगदीं मागासलेल्या विचारांची बनली. सुधारणादेवीच्या अत्युत्कृष्ट उदाहरणांनीं इतका ताळ सोडलेला पाहून सुधारणादेवीनें आता खुशाल आत्महत्या करावी.' ('गोंडवनातील प्रियंवदा,' पृष्ठ १८) इत्यादी.

*हरिभाऊ आपट्यांची सूक्ष्म छाया :* डॉ० केतकर व हरिभाऊ यांच्या शैलीत

जमीनअस्मानाचे अंतर आहे. एक लोकांच्या बुद्धीला जागी करू पाहाणारा, तर दुसरा भावनांना हलवून सोडणारा. हरिभाऊंच्या लेखनातील उणीवा दाखविणारे डॉ० केतकर आपल्या कादंबरीत, क्वचित का होईना, पण अगदी अभावितपणे हरीभाऊंच्याच वर्णन-शैलीचा आधार घेतात, ही एक हरीभाऊंच्या विजयाची मोठी खूण आहे. उदाहरणार्थ, 'गोंडवनातील प्रियंवदे'ची पहिली दोन प्रकरणे पाहा. नापास झालेल्या प्रियंवदेच्या नवऱ्याचे वर्णन, निराश झालेला रामभाऊ जीव देण्यास जातो ती हकिगत आणि त्याचा मित्र बंडूनाना त्याला आत्महत्येपासून परावृत्त करतो तो वृत्तांत हरिभाऊंच्याच प्रभावाचे द्योतक आहे. त्याचप्रमाणे 'आशावादी' कादंबरीची सुरुवात, पहिले प्रकरण-सुद्धा हरिभाऊंच्या थाटाचे आहे.

### डॉ० केतकरांच्या भाषेचे नमुने

आतापर्यंत परंपरागत भाषेचा डॉ० केतकरांच्या भाषेवर कसा परिणाम झाला ते आपण पाहिले. त्यांच्या भाषेचे आणखी सूक्ष्म परीक्षण करण्यापूर्वी त्यांच्या भाषेचे काही निवडक उतारे उदाहरणादाखल पाहिले पाहिजेत.

१. "नवमतवादी तरुणांनो, तुम्हांला आमच्या गोष्टी आम्हीं सांगाव्यात कीं सांगू नयेत असे प्रश्न माझ्यापुढें उभे राहात आहेत. कारण ज्या गोष्टी आमच्या आयुष्यांत आम्ही गौरवास्पद समजतों त्या तुम्ही केवळ मूर्खपणाच समजाल.—समजा ना! आम्हांला त्याचें काय? निंदा किंवा स्तुती एवढ्या दृष्टीनें मी कथन करीत नाहीं. आयुष्यक्रमाची विविधता लक्षांत यावी, आमच्या समकालीनांच्या सामाजिक स्थितीची चित्रणा पुरी व्हावी, एवढीच माझी मुख्य मनीषा आहे.—आमचें चरित्र आणि आमचें अवलोकन हें प्रचलित समाजाच्या इतिहासाचें एक महत्त्वाचें प्रकरण आहे—वाचक हो! दुरभिमान सोडा, आमच्यासारख्यांचें चरित्र निरीक्षा." ('भटक्या', पृष्ठ ३)

या उताऱ्यातील मनमोकळेपणा आणि आनंदीपणाची झाक पाहा! पण त्यावरोबरच 'चित्रणा', 'निरीक्षा' यासारखे शब्द ध्यानात ठेवण्यासारखे आहेत. 'वाचकहो!' हा प्रयोगदेखील केतकरांच्या आधीच्या लेखकांत मुख्यतः दिसून येत असे. १९३६-३७ साली असे प्रयोग क्वचितच वापरीत.

२. "कांहीं तरी लेखनीनाम जाहीर करावें आणि तें लेखनीनाम आपलेंच असें म्हणून त्यांनीं सांगावें येणेंप्रमाणें ठरलें." ('भटक्या', पृष्ठ १०४)

टोपणनावाऐवजी लेखनीनाम डॉ० केतकरांनी वापरले आहे. ते इंग्रजीच्या प्रभावाचे द्योतक आहे. 'येणेप्रमाणे'सारखे प्रयोग जुन्या कृष्णशास्त्रीछाप मराठीची आठवण करून देतात.

३. "हे लेख कोणीतरी अगदींच अनधिकारी माणसानें लिहिले आहेत असें भासून आल्याशिवाय राहात नसे." ('ज्ञानकोशमंडळाचा इतिहास', पृष्ठ ५)

'भासून आल्याशिवाय' यापेक्षा 'भासल्याशिवाय' हे जास्त सोपे व चांगले दिसले असते.

४. "त्या तऱ्हेच्या संशोधक परिश्रम कोणी केला असेल असें वाटत नाहीं." ('ज्ञानकोशमंडळाचा इतिहास', पृष्ठ ९६).

'संशोधक परिश्रम' हा रूढ होण्यालायक शब्दप्रयोग आहे.

५. "दैत्यांनी ग्रासलेल्या अरण्यास ज्याप्रमाणें ऋषी सोडून जातात, अगर तेथें येत नाहींत, त्याप्रमाणें पांडित्यास अपकर्षक अशा परिस्थितीनें ग्रासलेल्या हिंदुस्थानांत येऊन शिकविण्यास देखील पाश्चात्य पंडितांचा वर्ग तयार नाहीं." (ज्ञानकोश.)

यातली अगदी महाभारती थाटाची पण समर्पक उपमा पाहा!

६. "कायस्थवृत्तीच्या म्हणजे सरकारी नोकरी करणाऱ्या ब्राह्मणांचा इतिहास." ('गोंडवनांतील प्रियंवदा', पृष्ठ २२)

७. "पुरुषाकर्षण हें नयनाचें, नटण्यामुरडण्याचें ध्येय" ('गोंडवनांतील प्रियंवदा', पृष्ठ १८)

८. "जननेंद्रियशास्त्रांतर्गत मानसशास्त्र" ('प्रियंवदा', पृष्ठ ७०) या चमत्कारिक पण यथार्थ शब्दाऐवजी पुढे डॉ० केतकरांनी र० धों० कर्व्यांनी रूढ केलेला लैंगिक मानसशास्त्र हा आटोपशीर शब्द वापरण्यास सुरुवात केली. पण लैंगिक नीतीबद्दल 'ऐंद्रियनीती' हा जुना शब्दप्रयोग त्यांनी चालू ठेवला. ('एका संशोधनाचे फलित', 'संजीवनी', वर्ष १, अंक १)

९. डॉ० केतकरांची भाषा एरवी व्याकरणशुद्ध आहे. पण त्यांनीं उभयान्वयी अव्ययांचा उपयोग फार अव्यवस्थितपणे केलेला आढळतो. त्यामुळे रचना बेडौल होते. उदाहरणार्थ : "शांतेचे हायस्कुलात जाणे तिला पोट भरण्यास समर्थ करते झाले नाही तरी अन्यफलदायी झाले. शांतेचे लग्न झाले आणि ते मंजुळेच्या कल्पनेपेक्षा चांगले झाले. आप्पासाहेब डगे नावाचा एक तरुण वकील होता त्याला अगदी लहान मुलगी लग्नाला नको होती, व सुशिक्षित मुलगी हवी होती आणि जातिभेद ही एक गैर गोष्ट आहे, ती मोडून काढली पाहिजे, असे तो म्हणणारा होता, आणि त्यामुळे शांतेचे त्याच्याशी लग्न जुळून आले. सामान्य लग्नातदेखील हुंडा मिळतो व प्रथमवर एलएल० बी०स चांगलाच मिळाला असता. पण जे लग्न उदार बुद्धीने केले जाते त्यात पैशाची गोष्ट कशी काढणार?" ('ब्राह्मणकन्या', पृष्ठ ७).

१०. वर सर्वसामान्य केतकरी भाषेचे स्वरूप आपण पाहिले. अर्थाच्या दृष्टीने अत्यंत काटेकोर असले तरी त्यांच्या भाषेत गोडवा नाही, हे सहज कळून येते. श्री० ना० गो० चापेकरांनी, 'लोकशिक्षणा'च्या 'केतकर अंका'त म्हटल्याप्रमाणे 'नागपुरी धस्मर भाषेचा'ही तो संस्कार असेल. डॉ० केतकरांचे सुबोध भाषेशी वावडे आहे, ती त्यांना प्रयत्नसाध्य नव्हती, असे मात्र कुणी समजू नये. त्यांचे 'निःशस्त्रांचे राजकारण'

हे सर्व पुस्तक सुबोध भाषेत अभिनव पद्धतीने लिहिले गेले आहे. 'विद्यासेवका'तले बहुतेक लेख असेच आहेत. केतकरी वैशिष्ट्याची थोडीबहुत माहिती झाल्यावर हे लिखाण न समजण्याबद्दल कुणी तक्रार करील असे वाटत नाही. या भाषेचा थोडक्यात नमुना असा देता येईल : "महात्मा गांधींनीं हें ओळखलें कीं, आपणांस जो कार्यक्रम पाहिजे तो असा असावा, कीं दुर्बल मनुष्यासही त्या कार्यक्रमाशीं सहकारिता करतां येईल. यासाठीं त्यांनीं असहकारिता अथवा नॉन-को-ऑपरेशनचें सर्वजनव्यापी तत्त्व पुढें आणलें. महात्मा गांधींनीं दुसरी एक महत्त्वाची गोष्ट केली ती ही कीं, आपणांस चळवळ करावयाची आहे, या मवाळांच्या व लो० टिळकांच्या जुन्या तत्त्वाचा महात्माजींनी निर्मल चित्तानें व जोरानें पुरस्कार केला. चळवळ करण्यासंबंधानें आणखी एक तत्त्व महात्मा गांधींनीं ओळखलें कीं, स्वराज्य प्राप्त करून घेणें ही आध्यात्मिक चळवळ आहे. म्हणजे मनुष्याच्या मनाचा विकास असा झाला पाहिजे कीं देशांतील लोकांचीं अंतःकरणें स्वराज्यास लायक अशीं बनलीं पाहिजेत, त्यांच्या मनांत असलेलें कार्पण्य नष्ट झालें पाहिजे. स्वराज्याला लायक अशीं अंतःकरणें बनवणें हेंच अधिक महत्त्वाचें आहे, हें त्यांनीं ओळखलें. स्वराज्य इंग्रजांनीं द्यावयाचें व आपण दान म्हणून तें घ्यावयाचें असा प्रकार मुळींच नसून व्यक्तीचें अंतःकरण, स्वातंत्र्य व समता यांनीं आत्मविश्वासानें आणि एकमेकांवरील विश्वासानें प्रेरित होणें, आपले व इतरांचे हक्क ओळखणें, आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठीं जागृत असणें, यांचाच स्वराज्य हा स्वाभाविक परिणाम आहे. मुसलमानांच्या हितसंबंधाकरितां हिंदूनें बद्धपरिकर व्हावें इतकें समाजांतील निरनिराळ्या वर्गांत प्रेम उत्पन्न झालें पाहिजे. म्हणजे आत्मविश्वास, स्वत्वस्थापन व बंधुप्रेम यांची जोपासना करून आध्यात्मिक उन्नतिप्रत पोचणें हें आपलें प्रधान आचारतत्त्व आहे, आणि या सद्गुणांचा विकास करता करता स्वराज्यप्राप्ती ही स्वाभाविकपणें घडवून आणावयाची आहे." ('निःशस्त्रांचें राजकारण', पृष्ठ ५४-५५) यासारख्या उताऱ्यांवरचे नाव काढले तर ते खचित कुठल्याही मराठी शैलीवाल्या भारदस्त मराठी निबंधकाराच्या नावाखाली सहज खपतील. 'सत्त्वस्थापन' हा खास केतकरी शब्द या उताऱ्यात असल्यामुळे व्यासंगी वाचकास काय ते तो डॉ० केतकरांचा असल्याबद्दल ओळख पटेल.

११. वरच्याप्रमाणेच काही ठिकाणी सुंदर वाक्येदेखील त्यांच्या लेखनात इतस्ततः विखुरलेली आहेत. उदाहरणार्थ :

(अ) "शास्त्र म्हणजे जमा झालेलें आणि व्यवस्थित केलेलें ज्ञान." ('भारतीय समाजशास्त्र', प्रस्तावना, पृष्ठ १) याच्याइतकी शास्त्राची सोपी व समर्पक व्याख्या दुसरी मिळेल काय?

(ब) "फुलांचा वास व रंग पुष्कळ अंशीं मदनसहायक म्हणजे प्रजोत्पत्तीस मदत करणारा जो भ्रमर त्याच्या आकर्षणासाठीं आहे." ('प्रियंवदा', पृष्ठ १८)

(क) "संस्कृतीतील लालित्य व गांभीर्य हीं संस्कृतीस स्थिरता आणतात." ('तरुण गोवेकरांचे अंतःकरण', 'विद्यासेवक' १९२५, अंक ७, पृष्ठ १६)

(ड) "संगमोत्सुकता हा मानवी धर्म आहे." ('ब्राह्मणकन्या', वैजनाथस्मृति, पृष्ठ २९४)

ही आधुनिक सुभाषितेच आहेत. या सर्वसाधारण भाषेत डॉ० केतकरांनी अनेक व्यवहारात अवश्य वापरले जावेत अशा शब्दांची भर टाकली आहे. कै० वा० म० जोशी यांनी 'सदाशिवपेठी', 'परीक्षामोजू' व 'बाहेर जाव' यांसारख्या शब्दांची स्तुती केलेली आहे. या यादीत आणखी पण काही शब्दांची भर घालणे अवश्य आहे असे मला वाटते. ते शब्द असे : 'तुकडेमागू' (या शब्दाने त्या काळी रण माजविले होते), 'जावईपकड्ड', 'वकीलकोठी', 'वड्ड-संबंध' (म्हणजे लग्नाशिवाय झालेला स्त्री-पुरुषांचा संबंध), 'यश-पावती', 'भोजनपरीक्षक', इत्यादी. त्याशिवाय, चित्र व ध्येय या शब्दांनी डॉ० केतकरांनी आपल्याला उपयोगी असे सामाजिक शब्द बनवले आहेत ते विचारात घेण्याजोगे आहेत. ते असे : 'कार्यध्येय', 'आयुष्य-ध्येय', 'कर्तव्य-ध्येय', 'आशाचित्र', 'समाजचित्र' 'जगत्संस्कृतिचित्र', 'गृहचित्र', इत्यादी; 'आशास्थान', 'कर्तव्यस्थान', 'मत्सरस्थान' इत्यादी. 'जागतिक' हा शब्द तर डॉ० केतकरांची मराठी भाषेला मोठी देणगी आहे.

## *संशोधकीय परिभाषेतील मौल्यवान भर*

संशोधकी भाषेचे स्वरूप कुठल्याही वाङ्मयात स्वतंत्रच असते. बुद्धिप्रामाण्य आणि प्रयोगशीलता यांमुळे शास्त्रीय परिभाषा तयार होत असते. सामान्य जनता जसजशी अधिक सुशिक्षित व सुसंस्कृत होत जाते, तसतशी परिभाषा नेहमीच्या साध्या वाङ्मयात रूढ होऊ लागते. हेच शास्त्रीय परिभाषेच्या यशाचे प्रमाण. ज्ञानकोशाच्या प्रस्तावना, आणि 'प्राचीन महाराष्ट्र, शातवाहनपर्व' हे सर्व पुस्तक याच भाषेत लिहिले आहे. या भाषेची डॉ० केतकरांची कल्पना व या भाषेचा नमुना पुढील उताऱ्यात दिसून येतो. तो असा : "सुगमता आणि विश्वासार्हता हे दोन्ही गुण इतिहास-ग्रंथास अवश्य आहेत. हे गुण भिन्न प्रकारच्या लेखनपद्धतींची अपेक्षा करतात, आणि इतिहासलेखकास दोन्हीं प्रकारच्या अपेक्षा पुऱ्या कराव्या लागतात. कथेचें मुख्य सूत्र अगोदर अधिकारी वाणीनें सांगून नंतर एकेका अंगाचें साधार विवेचन करणें या प्रकारची क्रिया केली, तर सरलकथन आणि विश्वाससंपादन या दोन्ही गोष्टी साध्य होतात...

"इतिहास व लोकस्थितिवर्णनास चित्राची उपमा वारंवार देतात. चित्रास ज्याप्रमाणें बाह्यरेषादी असतात, त्याप्रमाणें ऐतिहासिक वृत्तासदेखील बाह्यरेषा, आंतील रेषा आणि रंगभरणी, हीं आहेतच; आणि इतिहास ज्या अर्थी राजकीय आणि

सांस्कृतिक आहे, त्या अर्थी त्या प्रत्येक प्रकारालादेखील बाह्यरेषा आणि अंतर्गत रेषा आहेत. राजकीय इतिहासांत जेव्हां एका राज्याचा व्यवस्थित विकास झालेला असतो तेव्हां त्या राज्याच्या वृद्धिसंकोचदर्शक ठळक गोष्टी बाह्यरेषा म्हणाव्या लागतील; आणि तो बाहेरचा इतिहास होत असतां ज्या अंतर्घटनात्मक गोष्टी झाल्या असतात, त्यांना आंतील अंतर्गत प्रधान-रेषा म्हणावें लागेल. जेव्हा आंतल्या आंत घटनात्मक स्थित्यंतरें होत असतात, तेव्हा त्या स्थित्यंतरांस कारण झालेले थोर पुरुष व त्यांशी स्पर्ध्यमान असलेले पुरुष, व या दोघांच्या मनोभावना आणि त्यामुळे उत्पन्न झालेली अरि-मित्रता यांना आंतील रंगभरणी म्हणता येईल." ('प्राचीन महाराष्ट्र, शातवाहन पर्व', पृष्ठ १)

## *परिभाषेचे महत्त्व*

वर दिलेल्या उताऱ्यातील भाषेचे व ज्ञानकोशातील भाषेचे स्वरूप एकाच मासल्याचे आहे. तेव्हा त्यातले वेगळे उदाहरण देत नाही. फक्त अशा तऱ्हेच्या भाषेची जरुरी किती व कशी आहे हे 'ज्ञानकोशकारांच्या कर्तव्या'त स्पष्ट दिसून येते. "महाराष्ट्रीय ज्ञानकोश म्हणजे पूर्वपरंपरागत ज्ञान आणि भविष्यकालीन स्थिती यांस जोडणारा दुवा असल्यामुळे" मराठी भाषेत अनेक लेखकांनी आपले एका विषयावरील विचार व्यक्त करण्यासाठी निरनिराळे शब्द योजिले असता जे भाषाद्वैत उत्पन्न झाले असेल ते काढून टाकून भाषा स्थिर करणे, हे ज्ञानकोशकारांचे कर्तव्य आहे." ('ज्ञानकोशमंडळाचा इतिहास,' पृष्ठ ११०) हे काम अर्थातच जोखमीचे व अवाढव्य होते. त्यापैकी आधुनिक शास्त्रीय परिभाषेलाही अनेक विद्वानांकरवी इंग्रजीच्या आधारे व्यवस्थित रूप देऊन पुढेमागे 'संज्ञाकोश' बनविण्याची जी पूर्वतयारी डॉ० केतकरांनी केली तिच्यावरून त्यांनी आपली जबाबदारी उत्तम तऱ्हेने ओळखून कार्य केले असे सहजच सिद्ध होते. आता हे कार्यच अफाट असल्यामुळे, डॉ० केतकरांच्या परिभाषेत आता थोडा बदलही करावा लागेल, तिच्यात काळ लोटल्यामुळे भरही घालावी लागेल, ती गोष्ट निराळी. परिभाषा बनविण्याच्या कामी डॉ० केतकरांना कधी अडचण पडली नाही. या बाबतीत त्यांनी परिश्रमाची कसूर केली नाही ही गोष्ट, त्यांचे सहकारी श्री० चिं० ग० कर्वे यांनी मुद्दाम सांगितली आहे. प्रस्तावनाखंड जो खुद्द डॉ० केतकरांच्याच हातचा आहे त्यातल्या पारिभाषिक शब्दनिर्मितीचा परामर्ष इथे घेता येणार नाही, इतकी ती अफाट आहे. अगदी थोडक्यात सांगावयाचे म्हणजे 'देश्य भाषा', 'समाजांगे', 'समाजनीतिमापन', 'द्वैमातुर' (म्हणजे दोन भाषा जाणणारा), 'वेदोत्तर', 'वेदपूर्व', 'बुद्धोत्तर', 'बुद्धपूर्व', 'खैस्त्य', 'बुद्धानुयायित्व', 'पाखंड', 'यावद्वीप', 'प्रास्तर संस्कृती', 'कृष्णवामन' (नेग्रिटो), 'द्राविड', 'पर्शु-भारतीय', (इंडो-इराणी), 'संस्कृतिसातत्य', 'शासनसंस्थाशैशव', 'अतिमहाराष्ट्रीय',

'मूलगृहकाल' (इंडो-यूरोपियन पीरियड), 'जातीचे दूरीभवन', 'स्थावर आणि जंगम लिखाणांचा अभ्यास', 'दैवतेतिहास' हे शब्द विशेष महत्त्वाचे आहेत. या बाबतीतही पाश्चात्यांचे केवळ अंध अनुकरण डॉ० केतकरांनी केले नाही. उदाहरणार्थ, मायथॉलाजी "या गचाळ शब्दाने जे क्षेत्र अंधुकपणे दर्शविले जाते त्याची कक्षा निश्चित करून त्या क्षेत्राच्या अभ्यासास" 'अवस्त्वास्तिक्यशास्त्र' असे डॉ० केतकरांनी म्हटले आहे. (ज्ञानकोश, प्रस्तावनाखंड १, पृष्ठ ९१,)

त्याप्रमाणे 'ईव्होल्यूशन' या शब्दाचे 'उत्क्रांती' असे भाषांतर केले जाते, ते डॉ० केतकरांना आवडले नाही. या शब्दावर डॉ० केतकरांनी कडकडीत बहिष्कार घातला आहे. कारण 'उत्-क्रम्' म्हणजे निघून जाणे, नाश पावणे; आणि इंग्रजी शब्दांत तर प्रगतीचे तत्त्व गोवले आहे. तेव्हा त्यांनी उत्क्रांतीबद्दल 'विकास' व 'विकासवाद' असे शब्द वापरले आहेत. ते खरोखरच सुंदर आहेत. परंतु पहिला शब्द इतका रुळला गेला आहे की डॉ० केतकरांची सूचना योग्य असूनही ती अंमलात आली नाही.

याप्रमाणे स्वतः बोजड भाषा लिहिणारा परंतु भाषेचे मर्म पूर्णपणे जाणणारा, त्यात रंगणारा असा हा एक थोर शब्दसाधक मराठी भाषेस ज्ञानकोशकारांच्या रूपाने मिळाला. त्याची स्मृती मराठी भाषेच्या सेवकास नेहमी स्फूर्ती देईल यात शंका नाही.

## *डॉ० केतकरांच्या भाषेची ऐतिहासिक परिणती*

डॉ० केतकरांच्या भाषेवर पूर्वसंस्कार कोणते व किती प्रमाणात झाले त्यासंबंधी विवेचन मी वर केलेच आहे. परंतु त्यांच्या भाषेची ऐतिहासिक परिणतीसुद्धा लक्षात घेण्यासारखी आहे.

डॉ० केतकरांची भाषा आता दोन तपांनंतर बदललेल्या निबंधाच्या अगर कादंबरीच्या भाषेच्या कसोटीने तपासता येणार नाही. त्यांच्या भाषेचे खरे स्वरूप इतर कोणत्याही लेखकाप्रमाणे तारुण्याच्या पहिल्या उमेदीतच स्थूलपणे रेखले गेले होते. म्हणजे हा काळ सुमारे १९१५-१६चा येतो, आणि डॉ० केतकरांवर राजवाडी छाप कशा तऱ्हेने पडली आहे हे लक्षात घेता, राजवाड्यांच्या भाषेचा सांगाडा १८९५ पूर्वीच तयार झाला होता.

दुसरा एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. तो म्हणजे, डॉ० केतकरांच्या भाषेवर त्यांच्या आधीच्या पिढीतले टिळक, आगरकर (आणि त्याच्याही आधीच्या पिढीतले माधव गोविंद रानडे) यांचाही नकळत परिणाम झाला आहे, हे त्यांच्या विचारांच्या आणि भाषेच्या अत्यंत सूक्ष्म अशा अंतःप्रवाहावरून अभ्यासकास उमजून येते. 'गोंडवनांतील प्रियंवदे'त डॉ० केतकरांनी आपल्या अगोदरच्या पण अगदी थोडे अंतर असलेल्या

एकंदर लेखकांचे जे वर्णन केले आहे, ते मननीय आहे. ते असे : "पुण्यांतल्या या तरुण पिढींत आणि पूर्वीच्या पिढींत पुष्कळच अंतर होतें. या पिढीच्या मंडळींनी संस्कृत काव्यें वाचलीं होतीं. इंग्रजी काव्यें वाचलीं होतीं, आणि इंग्रजी कादंबऱ्याही वाचल्या होत्या. त्यामुळें या मंडळींच्या मनांत अद्भुतरसाची थोडी जागृती झाली होती. रोमान्सच्या गोष्टींची आवड होती, आणि त्या त्यांस परिचित असलेल्या वास्तविक जगांत नाहींत म्हणून दुःख वाटत असे." याचे उदाहरण स्थूलपणाने 'केशवसुतां'च्या काव्याच्या अंतरंगाचे देता येईल. तत्कालीन कादंबऱ्या—हरिभाऊ आपट्यांच्या सोडून—नाटके, गोष्टी वगैरे प्रकारांत ते सहज दिसून येते. याचा ओझरता परिणाम डॉ० केतकरांच्या 'महाराष्ट्रवाग्विलासा'तल्या त्यांच्या 'मला मात्र कष्टात लोटलें आहेस' या गोष्टीत दिसून येतो. या काळात (१९०७ साली) डॉ० केतकरांच्या भाषेचे स्वरूप तयार होत होते. पुढच्या काळात मात्र, स्वामी ब्रह्मगिरींच्या बालपत्नीच्या काल्पनिक स्वरूपाच्या दर्शनाचे वर्णन सोडल्यास, या तऱ्हेच्या लिखाणाचा कोणताच परिणाम त्यांच्या भाषेवर किंवा विचारावर घडलेला दिसून येत नाही. निबंधकारांच्या परंपरेकडे पाहिले तरीदेखील टिळक–आगरकरां-सारख्या मागच्या पिढीच्या लेखनाचा प्रभाव इतका विलक्षण होता की, त्यांच्या मागूनच्या सर्व निबंधकारांवर त्यांची छाप पडलेली दिसते. आता भाषेच्या अंतरंगाचे सूक्ष्म परीक्षण केल्यास, टिळकांच्या लेखनातला कठोर युक्तिवाद असलेली सुस्पष्ट भाषा, आणि तितक्याच स्पष्ट अर्थाने भरलेली आगरकरांची समासप्रचुर भाषा यांचा डॉ० केतकरांच्या लेखनावर, अप्रत्यक्ष का होईना, प्रभाव पडलेला दिसतो. इंग्रजी कल्पनांचे आणि भाषेचे भाषांतरित संस्कृतनिष्ठ समास डॉ० केतकरांच्या लिखाणात विपुल प्रमाणात सापडतात. आगरकरांच्या आणि डॉ० केतकरांच्या भाषेत थोडा फरक म्हणजे आगरकरांच्या लिखाणात केवळ संस्कृतनिष्ठ शब्द सापडतात, तर डॉ० केतकरांच्या भाषेत मराठी तऱ्हेचे समास फार मोठ्या प्रमाणात आढळून येतात. उदाहरणार्थ, कोर्ट-पणा, फिर्याद-बाहुल्य, वेळ-घालवू पद्धत इत्यादी. डॉ० केतकरांना मोठेमोठे समास आवडत नसत. आणि म्हणून ते श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या पद्यांतील (विशेषतः 'वीरतनया'तील) लांबलचक समासांची 'वेडेपणाचा एक प्रकार' म्हणून संभावना करीत. डॉ० केतकरांच्या या समासांत अर्थ पूर्णपणे निश्चित असल्यामुळें, ते समास राजवाड्यांच्या सुटसुटीत आणि ठाशीव संस्कृतपद्धतीच्या समासांशी अधिक मिळतेजुळते आहेत. ते राजवाडी शब्दांपेक्षाही काही ठिकाणी अधिक व्यवहारोपयोगी आहेत. पण म्हणूनच लोकांना शास्त्रीय विचारसरणीस पोषक अशा त्यांच्या भाषापद्धतीचे मोल वाटले नाही. बाकीची बोजड केतकरी भाषा सहज 'सुधारता' येण्यासारखी आहे. पण हे अशा तऱ्हेचे शब्दप्रयोग मात्र केवळ त्याच स्वरूपात, अगदी जसेच्या तसेच, भावी समाजशास्त्रज्ञांना वापरावे लागतील असे

मला वाटते. तरच थोडक्यात पुष्कळ आशय आणता येईल. भाषेत लालित्य नसले तरी अर्थाचा अनर्थ कुठेच होण्याचा संभव नाही. आणि यामुळे विचारांचे गुंतागुंतीचे धागेही त्यांच्याचप्रमाणे सोयिस्कर रीतीने हाताळता येतील.

आजच्या मराठी भाषेत उत्तरोत्तर सुलभ होत चाललेल्या लेखनशैलीमुळे आता कोणत्याही लेखकाला केतकरी किंवा राजवाडी भाषा लिहून चालणार नाही. पण ज्यांच्याजवळ वाचन, निरीक्षण आणि अनुभव यांची सबळ पुण्याई आहे, ज्यांचे विचार पारंब्या फुटलेल्या वटवृक्षाप्रमाणे उत्तरोत्तर विस्तृत होत जाणार आहेत, अशा या शब्दसाधकाची आणि चिकित्सकाची 'कठीण भाषा लिहिणारे' म्हणून बोळवण करणेही घाताचे ठरेल. त्यांची शब्दसंपत्ती हा आजच्या पिढीचा मानाचा वारसा आहे.

## *डॉ० केतकरांच्या मार्गातील अडचणी*

डॉ० केतकरांनी मराठी लिहिताना आपल्याला कोणत्या अडचणी आल्या व त्यामुळे आपल्या लेखनातल्या उणीवाची जाणीव असून देखील त्या दूर का करता आल्या नाहीत याबद्दल ओझरते उल्लेख केले आहेत. त्यांचे मुख्य म्हणणे असे की, मराठी भाषा कोणत्याच विषयात अद्याप घटलेली नाही; ती प्रारंभीच्या प्रयोगावस्थेतच आहे. म्हणून तिचे स्वरूप निश्चित कोणत्या विषयात कसे असावे हे आजच ठरविता येणार नाही. स्पष्ट अर्थाला प्राधान्य देऊन, त्या त्या विषयाच्या मूळ प्रेरणांशी समरस होऊनच भाषेची घडण सुधारली पाहिजे. माधव ज्यूलियननांच्या काव्याचे परीक्षण करताना त्यांनी त्यांची भाषा प्रेमाच्या सर्व कलांस पेलून धरण्यास असमर्थ आहे अशी टीका केली आहे. पण त्यामागे चिमटा घेण्याची प्रवृत्ती नसून यांचा 'मराठीत प्रेमाची भाषा घटलेली नसल्यामुळेच' ही अपरिहार्य उणीव राहून गेली आहे, असा सिद्धांत आहे.

अनभ्यस्त विषयांवर लिहिल्याखेरीज वाङ्मय आणि विचार यांची तर्कशुद्ध वाढ भरपूर प्रमाणात होत नाही. डॉ० केतकर तर 'वैविध्या'चे, विशाल कल्पनांचे पुरस्कर्ते; संशोधकाचा त्यांचा बाणा. पण बहुजनसमाजासाठीच ज्ञानसत्र घालावे लागल्यामुळे त्यांची भाषेच्या बाबतीत फार ओढाताण झाली. अगोदर पंडिती भाषाच अस्तित्वात नाही. तिथे लोकांच्या नित्याच्या व्यवहारात रुळली जाणारी भाषा कशी पुढे ठेवणार? त्या दृष्टीने भारतीय विचारांचा आत्मा कायम ठेवून ज्ञानकोशात आणि इतरही ठिकाणी त्यांनी जी सरळ रोकठोक भाषापद्धती स्वीकारली आहे, ती मुळात बरोबर आहे असे मला वाटते. आता मराठीतल्या कोशवाङ्मयात तरी ही केतकरी नवे शब्द तयार करण्याची पद्धत स्थिरावली आहे यांत शंका नाही.

डॉ० केतकरांच्या विषयांची बहुतेक दालने अनभ्यस्त असल्यामुळे त्यांना आपल्या तर्कशक्तीलाही फाजील ताण द्यावा लागला, भविष्यकालातही उड्डाण करावे

लागले. त्यामुळे काही दोष त्यांच्या लेखनात शिरले. ते असे : (१) अगदी लहान-सहान विचार, किंवा निव्वळ तर्कसुद्धा, त्यांनी मोठमोठ्या सिद्धांताशी जोडले. त्यामुळे पुष्कळ वेळा सिद्धांत अधिक आणि प्रमाणे, उदाहरणे तोकडी, असे त्यांच्या लेखनात नेहमी आढळून येते. आणि त्यामुळे विचाराची कक्षा वारंवार पालटते. मला वाटते, हेच डॉ० केतकरांची भाषा अनभ्यस्ताला दुर्बोध वाटण्याचे मुख्य कारण आहे. (२) डॉ० केतकरांचा स्वभाव कोणत्याही कल्पनेत मुळात खोल शिरण्याचा. पण त्याच्या-बरोबर नव्यानव्या कल्पना सुचतील तशा व सुचतील तेथे घालण्याचा मोह न आवरल्यामुळे, काही वेळा वाचक मूळ कल्पनेला वळसा घालून, बारीकसारीक कल्पनांतच अडखळून पडतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांचा 'प्रतिभे'तील (३०-३-१९३४) 'महाराष्ट्र व आर्यावर्त यातील प्राचीन साहित्यिकांचा आयुष्यक्रम' हा लेख. पण एकंदरीत हा दोष फार ठिकाणी दिसत नाही. (३) इंग्रजी आणि संपूर्ण भारतीय असे दोन्ही विचारप्रवाह डॉ० केतकरांच्या मनोभूमीत पक्के शिरल्यामुळे अगदी संस्कृत वळणाची आणि इंग्रजी वळणाची वाक्ये त्यांच्या लेखनात शेजारीशेजारी बसलेली दिसतात. पण इतके असले तरी डॉ० केतकराच्या लेखनात कमालीचा वेग आहे. आणि विचारांचा प्रवाह एवढा दांडगा आहे की, तो जाणत्या वाचकाला बरोबर मार्गदर्शन करतो.

परिशिष्ट : ?

# कादंबरीविषयीचे संदर्भग्रंथ

द क्राफ्ट ऑफ फिक्शन : पर्सी लबॉक; लंडन, १९२१.
द अॅस्पेक्टस ऑफ द नॉव्हेल : ई० एम० फॉर्स्टर; लंडन १९२४.
द स्ट्रक्चर ऑफ द नॉव्हेल : एडविन म्यूर; लंडन, १९२८.
द इंग्लिश नॉव्हेल : फोर्ड मॅडॉक्स फोर्ड; लंडन, १९२७.
टेंडन्सीज इन मॉडर्न नॉव्हेल (निबंधसंग्रह) : ह्यू वॉलपोल (इंग्लंड), हॅमिश माइल्स (फ्रान्स), मिल्टन वॉल्डमन (अमेरिका), जॅकोल ग्वॅझरमन (जर्मनी), व्ही० एस० प्रिचेट (स्पेन), लुईजी पिरँदेलो (इटली), डी० एस० मर्स्की (रशिया), एरिक नेस्टर्टन (स्कँडिनेव्हिया); लंडन, १९३४.
नोट्स ऑन नॉव्हेलिस्ट्स : हेन्री जेम्स; लंडन १९२४.
अल्बेर काम्यु अँड द लिटरेचर ऑफ रिव्होल्ट : जॉन क्रुकशँक; लंडन १९५९.
व्हॉट्स इन अ नॉव्हेल : हेलन ई० हेन्स; न्यूयॉर्क १९४२.
रीडिंग ऑफ अ नॉव्हेल : वॉल्टर अॅलन; लंडन १९४९.
द नॉव्हेल टुडे : वॉल्टर अॅलन; लंडन १९५५.
डायलॉग्ज इन नॉव्हेल्स अँड प्लेज : (द पी० ई० एन०), चार्ल्स मॉर्गन.
द पी० ई० एन० हर्मान ओल्ड मेमोरियल लेक्चर्स : हॅन स्वोर्ड; लंडन, १९६४.
द वर्किंग नॉव्हेलिस्ट : व्ही० एस० प्रिचेट; लंडन, १९६५.

अ ट्रीटाइज ऑन द नॉव्हेल : रॉबर्ट लायडेल (प्रथम प्रकाशन; १९४७. पेपरबॅक, १९६५.)
नॉव्हेल अँड सोसायटी : डायना स्पेअरमन; लंडन, १९६६.
स्नॅपशॉट्स अँड टोवर्ड्स अ न्यू नॉव्हेल : ॲलन रॉबे-ग्रिलेट (अनुवाद : बार्बारा राइट); लंडन, १९६५.
नॉव्हेल, अ ह्यूमन इडिअम : विल्यम वॉल्श; लंडन, १९६४.
द आर्ट ऑफ द नॉव्हेल : हेन्री जेम्स; लंडन, १९३५.
नॉव्हेलिस्टस ऑन द नॉव्हेल : व्हिव्हिअन ॲलॉट (अनुवाद : ल्युशियन डीन पीअर्सन—पेपरबॅक.)
द नेचर ऑफ नॅरेटिव्ह : रॉबर्ट स्कोल्स आणि रॉबर्ट केलॉग; न्यूयॉर्क १९६६.
क्रिटिसिझम ऑफ द नॉव्हेल (१८६५-१९००) : केनन ग्रॅहॅम; ऑक्सफर्ड, १९६५.
द टर्न ऑफ द नॉव्हेल : ॲलन फ्रेडमन; न्यूयॉर्क, १९६६.
द इंग्लिश नॉव्हेल : जे० बी० प्रीस्टले; १९२७.

## सूची


अधर्मसंततीचे भवितव्य २३,५९
अनंतराव घरकुट्टे ६
अप्पासाहेब डांगे ६०,६१
अवनायक (नॉन-हीरो) ९९
अज्ञात (डॉ० केतकरांचे टोपणनाव) १, ५३,१०२
आगरकर (गोपाळ गणेश) ४,८
आपटे हरि नारायण ३,४,९,१२,१५, ९८,९९,१००; (हरिभाऊ आपटे पाहा.)
*आर्थिक घडामोडी* ११८
*आशावादी* २,२८-४२,४४,५१,५२, ५६,५९,७१,७५,७७,१०२, १०३, १०४,१०९,
इंग्रजपूजन ६,४३,
उद्धारक ७,३४
उपरोध ३३,५५
उपासनीमहाराज ८६
एसतेर ५६,६४,६५,६६
*ऐक्य* २९
कपिला ५१,१०९
*कर्मयोग* ३१,३२
कर्वे (धोंडो केशव) ८
काणे (पां० वा० डॉ०) ६९
कादंबरी विवेचक, तिचे तत्त्वज्ञान १०६
कालिंदी ५५,५६,६१,६२,६३
कास्ट ७८
*किर्लोस्कर* २९,८६
*कुलदैवत* ९२
कुसुमकलिका दास ४५,४७,४८
कृपा ७५,८५
केतकरांची भाषा ११४-१२८
*केतकरांचे भाषेचे प्रयोग* ११४
*डॉ० केतकरांच्या कादंबऱ्या* २

केतकर, शीलवतीबाई, १२,७३,७४, १०९
केळकर (न० चिं०) ६६,१०५
खैलिक सूत्रे ८८
*दि खिश्चियन* ९७
गजपतराय, लाला १५
गडकरी, (बाळकृष्ण संतुराम) २
गंगाधर २०,२१,२२,२३,२४,२५
गाडगीळ, (ध० रा० डॉ०) ११८
गांधी, महात्मा ३०,३१,३४,१०५
*गांवसासू* १५,१९,५३,५४,५५,९६, १०२
*गीता*, ३५
गुर्जर (वि० सी०) ९२
गुरुबाजी ८६,८७,८८
डॉ० गोगटे १४,१८,२३,२५,१०३
*गोंडवनांतील प्रियंवदा* १-१४,१५,१६ ३३,५३,६९,१०२,११२
गोदूबाई (*भटक्या*) १०५
गोदावरी (*आशावादी*) ३२,४०
*गोरा* ४४
डॉ० घैसास ९८,१०१,१०२,१०३, १०४,१०५
चंदनानी ४५,४६,४९,५०
चंदुशास्त्री १०२
चातुर्वर्ण्य-संरक्षक पीठ ७९
चाफेकर (ना० गो०) १२१
चिपळुणकर (विष्णुशास्त्री) ४
चिपळुणकरी भाषा ११९
जात, उघडया तोंडाची, २३,२७,५९
जात, सर्वसंग्राहक ५९
जातिगंड ८०
जातिसंस्था १९
जान्हवी कैलासनाथ ४५,४६,४७
जोशी, (वा० म०) ११९
टागोर (रवींद्रनाथ) ४४,१११
टिळक, (नारायण वामन) ११०
टिळक, (लो० बाळ गंगाधर) ४,७,३१,३२
तर्कटनीती ६९,८१,८२,८३,८६
डॉ० तर्कटे ७५,९३,९४,९५,१०३,१०९
दादा कावळे, साहित्यशिखर, १०५
*दुर्दैवी रंगू*
देशपांडे (आ० रा०)
देशपांडे (पु० य०) ९२
नगरकर भाऊसाहेब प्रो० (प्रार्थना-समाजाचे सदस्य) ९६
नर्मदाबाई सरवटे १०३,१०५
डॉ० नंदिका ४०,४१,१०९
*नवे संसार* ७४
नाथमाधव १५
नारायणराव, अलंकार ३७
नारायणमहाराज (केडगाव) ८६
*निःशास्त्रांचे राजकारण* ३०,३१
पटवर्धन (माधवराव, माधव ज्यूलियन) १०८
पट्टाभि सीतारामय्या २५
*पण लक्षात कोण घेतो!*
डॉ० परमानंद ४०, ४१
*परागंदा* १,२,७,१४–२७,४३,४५,५९, १०२,१०३
*परागंदा* आणि समाजशास्त्र १८
पिनाकी ६५,१०७,१०८
पुष्टिमार्गीय पंथ ८६,८७,८८
*प्रगति* ८६
प्रणयपंढरीचे वारकरी १०९
*प्रतिभा*, केतकर-अंक १,२,२०

*प्रतिभा* ७२,१०७,१०८,११२
*प्राचीन महाराष्ट्र*, शातवाहन पर्व, ५४, ७१
प्रार्थनो (प्रार्थनासमाजिस्ट) ५९
प्रादेशिक कादंबरी ९,१०
प्रियंवदा ६,१०,११,२३
प्रेमविषयक विचार १०९
प्रेमाचा पाश्चात्य आविष्कार १०९
प्रेमाचे भाष्यकार डॉ० केतकर ९
प्रौढ कुमारिका व विधवा ३
प्रौढविवाह ८
प्रौढविवाह व पुनर्विवाह ७
फडके (ना० सी० प्रा०) २
बटाट्याची चाळ १०३,१०४
बहिणींचे द्वंद्व ९६,९७
*बंधनाच्या पलीकडे* ९२
*बाळे कोहिनूर* (कविता) १०९
बाळोबा उर्फ बाळ लोंढे, ७५,८५,९१, ९२
बिंबाबाई ३,६,७,८
ब्रह्मगिरी स्वामी ऊर्फ देवीदास २९,३०, ३४,३५,३७,४०,४१,४२,१०९
*ब्राह्मणकन्या* ४३,५२-७०,७१,९६ १०२,१०८,१०९,११३
ब्राह्मोसमाज ४४
भट भा० वा० १२
भटक्या ५३,९०,१०८
भांडारकर (रामकृष्ण गोपाळ डॉ०) ८, ३४,५९,६६
भारतीय समाज १७
भारतीय समाज, अमेरिकेतील १६
भारतीय स्त्रीचा आदर्श ३९
मधुमालती ८९,९०,९१
*मध्यम वर्गातील स्त्रियांचा औद्योगिक प्रवेश* (निबंध) ५१
मत्तमयूरी २१,२२,२३,२४,१०९
'मनोरंजन'कार (काशिनाथ रघुनाथ मित्र) ११०
*मला मात्र कष्टात लोटले आहेस* (कथा) १२६
*महाराष्ट्र* २९
*महाराष्ट्रवाग्विलास* १२६
मंजुळा (रंजितेची मुलगी) ७५,९४,९५
मंजुळा मास्तरीण ५७,५८,५९
माडखोलकर (ग० त्र्यं०) १,२,२९
माडखोलकर, शांताबाई ७४
मातृसत्ताक समाजपद्धती ५, ९, ६७, ८७
माधव छत्रे ७५,८९,९०,१०९.
*माधव ज्यूलियनचे प्रेमचित्र* (निबंध) १०९
मिल १९ .
मिश्रविवाह १९,२०
*मुमुक्षु* २९
*मुलींचा वाढता कौमार्यकाल व त्याची निगा* (निबंध) ५०
बॅ० मोरे ३७
रघुनंदन कामत १८,२३
रमाबाई, पंडिता ३,५
रंजना, ऊर्फ रंजिता ऊर्फ रंगूबाई ७५, ८०,८१,९२,९३,९४,९५,१०९
राजवाडे (वि० का०) ५३.६६
राजवाड्यांचे चित्र १२
राजवाडी भाषेचा प्रभाव ११७
*राजवाड्यांनी सांगितलेल्या आठवणी* (लेख) ६६

रानडे (माधव गोविंद, न्यायमूर्ती) ८,३४,५९,६६,
रामराव ५६,६४
रुक्मिणी २०,२१,२२,२३,९३
रोझनबाम २५
लजपतराय, लाला २५,२६
ललिता दास ४८
लक्ष्मीबाई १०३
लालनाथ ३७,४०
प्रो० लोंढे ८३,८४,८५,८६
*लोकशिक्षण*, केतकर-अंक ७३
वरेरकर (भा० वि०) ९२,११०
*वाङ्मयक्षेत्रात नियंत्रक संस्थेची आवश्यकता* (निबंध) ७२
*विचक्षणा* ५३,५४,५६,६९,७१-९५, ९६,१०२
विचक्षणा, ७४,७५,८५
विठू घोमण १०२
विनोद ३४,५५
*विद्यासेवक* १,१४,२८,२९,३१,३२, ५१,५२,६७,१०२,१०८
विभावरी शिरूरकर १११
विभावरी-वाङ्मयाची पूर्वचिन्हे ११
विवाहपूर्व अनुनय ८
विवाहविषयक प्रश्न ६९
बॅ० विश्वामित्र ३७
वैजनाथशास्त्री, ३,४,७,१०,१२,६१६७, १०२
वैजनाथस्मृती ५७,६८,६९,७०,८२
वैद्य चिंतामणराव १११
*व्हिक्टोरिअस इंडिया* १०५
शरद्‌बाबू (शरच्चंद्र चट्टोपाध्याय) ४४, १११
शंकरमामंजी ३७
शारदाबाई ३,४,५,८,९
शांताबाई ६२
श्याम (साने गुरुजी) १००
शिवशरणप्पा ५५,५६,६१,६४,६५,६६
शुद्धिसंघटना ३२
श्रद्धानंद, स्वामी ३२
सत्यव्रत ६६,६७
सदाशिवपेठी कादंबऱ्या ११२
सफ्रेजेट वाङ्मय ४९,५१
समाजशास्त्र १७,१८,१९
समाजशास्त्रीय विचार ५०
डॉ० सरंजामे १८,२५,१०३
सहृदय (डॉ० केतकरांचे टोपणनाव) ५२
*संशयकल्लोळ* १२
संस्कृत भाषेचा प्रभाव ११८,११९
साने (गुरुजी) १००
सामाजिक प्रश्न १७
साळगांवकर (वि० द० प्रा०) ११९
सुधारक ७,८,९,३४,६१
*सुधारक* (काव्य) १०८
सुधारणात्रयी ७
*सुधारणेचा मध्यकाल* २
सुनीति दास ४५,४६,४८,४९
सेन केशवचंद्र ४४,५९,९६
*स्त्री* ५३,५४,७१,७३
स्त्रीरेखा ११०,१११
स्पेन्सर १९
स्वत्वस्थापन २४
*स्वार्थत्यागाची मीमांसा* (निबंध) ३२ ५३.
हर्डीकर तापीबाई ४
हरिभय्या मोघे ३,६,८

हरिभाऊ आपटे व डॉ० केतकर १११, ११२
हरिभाऊ आपटे यांचा प्रभाव ११९
हरिभाऊ आपटे यांच्या स्त्रीरेखा १११
मिसेस हंटर ३८,३९,४०,१११
*हिंदुइझम* ७८
हिंदुधर्माबद्दलचा जिव्हाळा ८८
*द हिस्टरी ऑफ द इंडियन नॅशनल कॉंग्रेस* २५
*हिंदोळ्यावर* १११
क्षीरसागर (श्री० के० प्रा०) ५७
*ज्ञानकोश*, प्रस्तावना खंड ६
*ज्ञानकोश मंडळाचा इतिहास* (माझे बारा वर्षांचे काम) ७,८,१०,१८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

REFBK-0015926